८७·५४५३

सोनसाखळी व इतर कथा

साने गुरुजी

▌कावळे ▌दारूबंदीच्या कथा ▌साक्षरतेच्या कथा▐
▌मोरी गाय ▌गुरुजींचे उपदेश ▌कुमारांपुढील कार्य▐

सोनसाखळी व इतर कथा

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

सोनसाखळी व इतर कथा : साने गुरुजी

प्रकाशक

रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

अक्षरजुळणी

रावजी देसाई

मुखपृष्ठ

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक

ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

आवृत्ती

१५ ऑगस्ट, २०११

किंमत

रुपये २००/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

अनुक्रमणिका

सोनसाखळी ५

○ गुराखी ७

○ बहीणभाऊ ११

○ सोनसाखळी १४

○ दगडफोड्या १७

○ मुले म्हणजे देवाची ठेव २०

○ खरा भक्त २२

○ सदिच्छेचे सामर्थ्य २५

○ शब्दावरून पारख करावी २९

कावळे ३५

○ बालपणाचा मित्र ३७

○ कावळ्यांची कैफियत ४०

○ कावळ्यांची परिषद ४३

○ स्वर्गाकडे कूच ४८

○ दुर्दैवी मानव ५०

○ देवाच्या दरबारी ५२

○ आनंदी-आनंद ५५

दारूबंदीच्या कथा ५७

○ उदार आनंदराव ५९

○ दुर्दैवी सीता ६३

○ तारक देवता ६८

○ सावित्रीचा सुका ७२

○ मोदगावची कहाणी ७७
साक्षरतेच्या कथा ७९
○ पैलगडची रमी ८१
○ भीती पळवणारा मंत्र ८५
○ ज्याला ज्ञान, त्याला मान ८८
○ गांधीबाप्पाची शपथ, शिकेन ! ९१
○ माणूस होण्यासाठी शिका ९४
○ मंदीचे डोळे ९६
○ ज्ञान हा खरा दिवा ! ९९
मोरी गाय १०३
○ मोरी गाय १०५
गुरुजींचे उपदेश १२७
○ तिळगूळ घ्या गोड बोला १२९
○ थोडे पण चांगले १३२
○ आपण शिकतो कशासाठी ? १३६
○ व्यवस्थितपणा १३९
○ रोजची प्रार्थना १४३
○ भक्ती करा १४६
○ मूर्खाच्या हाती पुस्तक देऊ नका १४९
○ चैन करू नका १५३
देवाघरच्या फुलांनो १५५
कुमारांपुढील कार्य १८५

✦✦✦

सोनसाखळी

गुराखी

एक होता राजा. त्याला शिकारीचा फार नाद. एकदा तो शिकारीसाठी गेला व रस्ता चुकला. भटक भटक भटकला.

रानात त्याला एक लहानसा गुराखी भेटला. तो गाई चारीत होता, पावा वाजवीत होता. राजा त्याला म्हणाला, ''मुला, मला रस्ता दाखवतोस ?''

मुलाने विचारले, ''तुम्ही कोण ?''

तो म्हणाला, ''मी राजा.''

गुराखी म्हणाला, ''राजासुद्धा रस्ता चुकतो ! आम्ही नाही बा कधी चुकत. अंधारातसुद्धा नेमके घरी जाऊ.''

राजा म्हणाला, ''मुला, तू हुशार आहेस. कोण तुला शिकवते?''

गुराखी म्हणाला, ''मला कोण शिकविणार? झाडे, माडे, फुले, पाखरे, नद्यानाले हे माझे मित्र. गाई चारतो, घरी जातो. आई भाकर देते ती खातो.''

राजा म्हणाला, ''कोठे आहे तुझी आई?''

गुराखी म्हणाला, ''जवळच आहे झोपडी. येता का आईकडे?''

राजा म्हणाला, ''चल.''

दोघे निघाले. झोपडी आली. गुराखी म्हणाला, ''आई, आई, आपल्याकडे राजा आला. हा बघ.''

म्हातारी लगबगा बाहेर आली. तिने घोंगडी घातली.

राजा म्हणाला, ''म्हातारे, तुझा मुलगा हुशार आहे. त्याला मी नेतो, शिकवतो, पुढे त्याला प्रधान करीन.''

म्हातारी म्हणाली, ''नको रे बाबा, आम्ही रानातले राजेच आहोत. राजाची मर्जी ढगावाणी, अळवावरचे पाणी. आता आहे मग नाही. काडीचा भरवसा नाही.''

परंतु मुलगा म्हणाला, ''आई, राजाबरोबर मला जाऊ दे. मी मोठा होईन. तुला मग पालखीतून नेईन.''

आई म्हणाली, ''तुला इच्छा आहे तर जा. परंतु माझे शब्द ध्यानात ठेव.''

राजा व गुराखी निघाले. गुराख्याने रस्ता दाखविला. दोघे राजधानीला आले. राजाने गुराख्याला शिकविण्यासाठी एक शिक्षक ठेवला. हळूहळू तो गुराखी हुशार झाला. राजाने त्याला मुख्य प्रधान केले.

गुराखी मुख्य प्रधान झाला; परंतु त्याला गर्व झाला नाही. तो गरिबांची काळजी घेई, त्याने विहिरी बांधल्या. धर्मशाळा बांधल्या. तो कोणाला नाही म्हणत नसे. लोक त्याला दुवा देत; परंतु राजाचे जुने नोकर त्याचा हेवा करू लागले.

ते राजाला म्हणत, ''राजा, भिकारडा गुराखी, त्याला तू प्रधान केलेस हे बरे नव्हे. तो प्रामाणिक असू शकणार नाही. लोकांना मदत करतो, विहिरी बांधतो. धर्मशाळा बांधतो. कोठून आणतो हे पैसे ? तिजोरीतील चोरीत असेल.''

राजा हलक्या कानांचा नव्हता. तो लक्ष देत नसे.

परंतु पुढे तो राजा मेला व त्याचा मुलगा गादीवर आला. या नव्या राजाजवळ ते जुने नोकर नाना गोष्टी सांगू लागले. एके दिवशी म्हणाले, ''महाराज, तुमच्या वडिलांनी ऐकले नाही व या भिकारड्या गुराख्याला प्रधान केले. हा लफंग्या आहे. तुमच्या वडिलांची हिऱ्यांच्या मुठीची एक तलवार होती. ती याने लांबविली. विचारा याला ती कोठे आहे म्हणून.''

नव्या राजाने गुराखी प्रधानाला बोलाविले व सांगितले, ''ती रत्नजडित मुठीची तलवार घेऊन ये.''

प्रधानाने शोध शोध शोधली. तलवार सापडेना. परंतु त्याला आठवले की एकदा पूर्वीच्या राजानेच ती मोडून नवीन दागिने केले. त्याने ती हकिकत सांगितली. नव्या राजाचा विश्वास बसेना. तो म्हणाला, ''प्रधानजी, चार दिवसांनी सर्व खजिन्याचा हिशेब घेईन. पैची अफरातफर असेल तर मान उडवीन.''

प्रधान म्हणाला, ''महाराज, चार दिवस नकोत. आताच घ्या. चार दिवसांची मुदत द्याल; परंतु माझे शत्रू म्हणतील की नेलेले पैसे आणून ठेवले असतील, पुन्हा संशयाला जागा नको.''

राजा म्हणाला, ''ठीक तर, आताच खजिना पाहू.''

राजा निघाला. तो प्रधान निघाला. सारी जुनी कारभारी मंडळी निघाली. खजिना मोजण्यात आला. पाव आण्याचीही चूक नाही. मत्सरी मंडळींची मान खाली झाली. परंतु त्यातील एकजण धीर करून राजाला म्हणाला, ''राजा, या प्रधानाच्या घराची झडती घ्या. खात्रीने चोरलेली हिरेमाणके तेथे सापडतील.''

राजा म्हणाला, ''चला.''

सारे प्रधानाच्या घरी गेले. ओटीवर साधी चटई होती. ना गालिचे, ना हंड्याझुंबरे. राजा म्हणाला, ''यांचे घर तर साधे दिसते.'

मत्सरी मंडळी म्हणाली, ''लबाड लोक वरून असेच असतात. बगळे दिसायला ढवळे परंतु आत काळे.''

राजा म्हणाला, ''बरे, घरात शिरूया.''

घरात कोठे काही सापडले नाही; परंतु शोधता शोधता एका खोलीत एका कपाटाला भले मोठे कुलूप होते. मंडळी म्हणाली, ''केवढे मोठे कुलूप ! यात असेल चोरीचा माल.''

राजाने विचारले, ''प्रधानजी, यात काय आहे ?''

प्रधान म्हणाला, ''महाराज, माझी सारी संपत्ती यात आहे.''

राजा खवळला. रागाने लाल झाला. तो ओरडून म्हणाला, ''फोडा ते कुलूप.''

कुलूप फोडण्यात आले. परंतु आत काय होते ? तेथे एक फाटकी घोंगडी, एक काठी व एक फाटका वहाणांचा जोड होता.

राजाने रागाने विचारले, ''कोठे आहे संपत्ती ? राजाची थट्टा करतोस?''

प्रधान नम्रपणे म्हणाला, ''महाराज, हीच माझी खरी संपत्ती. तुमच्या वडिलांनी मला रानातून आणले तेव्हा एवढ्याच वस्तू माझ्याजवळ होत्या. बाकीचे माझे वैभव तुमचे होते. ते मी सारे लोकांस देत असे. आई म्हणाली होती, ''राजाची मर्जी म्हणजे अळवावरचे पाणी. राजाची नोकरी म्हणजे सुळावरची पोळी. तिचे शब्द खरे झाले. मी पुन्हा रानात जातो व रानातील राजा होतो.''

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

राजाला वाईट वाटले. त्याला त्या दुष्ट कारभारी मंडळींचा राग आला. त्याने गुराख्याला सांगितले, ‘‘तू जाऊ नकोस. या चांडाळांनाच मी दूर करतो. तुझ्यासारखा प्रधान असेल तरच राजाच्या हातून भले होईल. लोकांच्या कल्याणासाठी तरी तू राहा.’’

गुराख्याने ऐकले. दुष्ट मंडळी दूर गेली. प्रजा सुखी झाली. गुराख्याने आपल्या आईलाही रानातून अणिले. तो दिवसा लोकांचे कल्याण करी व रात्री आईचे पाय चेपून तिचा आशीर्वाद घेई.

✦✦✦

बहीणभाऊ

मधू व मालती दोघे बहीणभाऊ. त्यांचे एकमेकांवर फार प्रेम. घरात अलोट संपत्ती होती. कशाची वाण नव्हती. आईबाबा मधू- मालतीचे सारे लाड पुरवीत. मधू घोड्यावर बसायला शिके. त्याचा एक छानदार घोडा होता. मालतीचे लग्न झाले. एका जहागीरदाराच्या घरी तिला देण्यात आले. माहेरच्यापेक्षाही मालतीचे सासर श्रीमंत होते.

मधूही आता मोठा झाला होता. त्याचे अद्याप लग्न झाले नव्हते; परंतु एकाएकी त्याचे वडील वारले. वडील वारले व थोड्या दिवसांनी आई पण वारली. मधू एकटा राहिला. मालती चार दिवस माहेरी आली होती; परंतु पुन्हा सासरी गेली.

सारा कारभार मधूच्या अंगावर पडला. परंतु त्याला अनेकांनी फसविले. एकदा त्याने मोठा व्यापार केला; परंतु त्यात तो बुडाला. मधू भिकारी झाला. त्याची शेतीवाडी जप्त झाली. घरादारांचा लिलाव झाला. सुखात वाढलेला मधू त्याला वाईट दिवस आले. ज्याच्याकडे शेकडो लोक जेवत त्याला अन्न मिळेना. जो गाद्यागिर्द्यांवर झोपायचा, त्याला रस्त्यावर निजावे लागे. ज्या मधूला हजारो लोक पूर्वी हात जोडत, तोच आज सर्वांसमोर हात पसरीत होता. मधूला वाटले, आपल्या बहिणीकडे जावे. प्रथम बहिणीकडे जाण्याला तो धजत नव्हता. तो स्वाभिमानी होता. 'श्रीमंत बहिणीकडे भिकाऱ्यासारखे कसे जावयाचे ? जिच्याकडे पूर्वी हत्तीघोड्यांवरून गेलो तिच्याकडे पायी कसे जावयाचे ?'

जरीच्या पोषाखाने पूर्वी गेलो, तेथे फाटक्या चिंध्यांनी कसे जावयाचे ? परंतु मधू मनात म्हणाला, 'प्रेमाला पैशाअडक्याची पर्वा नाही, हिरेमाणकांची जरूर नाही. माझी बहीण का मला दूर लोटील ? छे! शक्य नाही.'

मधू बहिणीकडे आला, दारात उभा राहिला. वरून गच्चीतून बहीण बघत होती. मधूने वर पाहिले; परंतु बहीण आत निघून गेली. मधूला वाटले बहीण खाली भेटायला येत असेल. परंतु कोणी आले नाही. दरवाजावरील भय्याने विचारले, "कोण रे तू? येथे का उभा चोरासारखा ? नीघ येथून."

मधू म्हणाला, "माझ्या बहिणीचा हा वाडा आहे. तिला आत सांगा, जा."

नोकर हसला. परंतु घरात जाऊन परत आला. तो मधूला म्हणाला, "चला तिकडे गोठ्यात, तेथे तुम्हाला भाकरी आणून देतो. ती खा व जा."

मधूने विचारले, "बहिणीने काय सांगितले ?"

नोकर म्हणाला, "बाईसाहेब म्हणाल्या, असेल कोणी भिकारी. बसवा गोठ्यात, द्या शिळी भाकरी."

मधू गोठ्यात गेला. त्याच्या डोळ्यांत पाणी आले. त्याला कोरडी भाकर देण्यात आली. मधूने तेथे एक खळगा खणला व त्यात ती भाकर पुरली. पाणीही न पिता तो तेथून निघून गेला.

मधू दूर देशी गेला. तेथील राजाच्या पदरी तो नोकर राहिला. एकदा फार कठीण प्रसंग आला असता त्याच्या सल्ल्याने राजा वाचला. राजाने त्याला मुख्य प्रधान केले. मधूच्या सांगण्याप्रमाणे राजा वागे. नव्या प्रधानाची वाहवा होऊ लागली. मधूने आता विवाहही केला. तो मोठ्या बंगल्यात राहू लागला.

आपल्या बहिणीला भेटावे असे मधूच्या मनात आले. पत्नीसह तो निघाला. बरोबर हत्ती होते. घोडे होते. थाटामाटाने निघाला. पुढे जासूद बहिणीला कळविण्यासाठी गेले. बहीण एकदम उठली. ती आपल्या पतीसह सामोरी गेली. चौघडे वाजत होते, शिंगे फुंकली जात होती. थाटामाटाने भाऊ बहिणीच्या घरी आला.

दुसऱ्या दिवशी मोठी मेजवानी होती. गावातील मोठमोठ्यांना आमंत्रणे होती. चंदनाचे पाट होते. चांदीची ताटे होती. मोठा थाट होता. पंचपक्वान्ने होती. सारी मंडळी पाटावर बसली. आता जेवायला बसावयाचे इतक्यात भाऊ एकाएकी उठला. सारे चकित झाले. 'काय पाहिजे, काय हवे?' सारे विचारू लागले. परंतु मधू

एकदम गोठ्यात गेला. येथील ती जुनी मातीसारखी झालेली भाकर त्याने खणून काढली.

मालती मधूला म्हणाली, ''भाऊराया, हे काय वेड्यासारखे करतोस?''

मधू म्हणाला, ''ताई, तुझ्या भावाला बसायला गोठा व खायला शिळी भाकर हेच योग्य. हा आजचा थाटमाट भावासाठी नाही. हा सारा मान भावाच्या श्रीमंतीचा आहे. हे पैशाचे प्रेम आहे.''

मालतीच्या डोळ्यांत पाणी आले. ती मधूच्या पायी पडून म्हणाली, ''भाऊ, चुकले मी. तू बहिणीला क्षमा नाही करणार ? पुन्हा उतणार नाही, मातणार नाही. प्रेमाला विसरणार नाही. भाऊ, क्षमा कर. घरात चल.''

मधूने मालतीचे डोळे पुसले. पुन्हा कधी मालतीने कोणाला तुच्छ मानले नाही. बाहेरची संपत्ती, ती आज आहे उद्या नाही. खरी संपत्ती हृदयाची. ती कधी गमावू नये असे ती साऱ्यांना आता सांगते. मधू व मालती दोघे बहीणभावंडे सुखी झाली तशी आपण सारी होऊ.

✦✦✦

सोनसाखळी

एक होता गाव. त्या गावात एक गृहस्थ राहात होता. त्याला एक मुलगी होती. त्या मुलीचे नाव सोनसाखळी. सोनसाखळी लहान असतानाच तिची आई मेली. सोनसाखळीच्या बापाने दुसरे लग्न केले.

सोनसाखळी बापाची लाडकी होती. तो आपल्याजवळ तिला जेवायला घेई, आपल्याजवळ निजायला घेई, तिच्याजवळ कितीतरी खेळ, किती बाहुल्या, किती बुडकुली. बाप सोनसाखळीला नवीन नवीन परकर शिवी, छान छान झबली शिवी. तिच्यासाठी त्याने कितीतरी दागिने केले होते.

सोनसाखळीचा असा थाट होता. जेवायला बसताना रंगीत पाट, पाणी पिण्याला रुप्याची झारी. जेवताना सोनसाखळी बापाला म्हणे,

"बाबा, मला भरवा. मी मोठी झाले म्हणून काय झाले?" मग प्रेमाने बाप तिला घास देई.

सोनसाखळीचा बाप एकदा काशीस जावयास निघाला. ते जुने दिवस. सहा महिने जायला लागत, सहा महिने यायला लागत. बाप सोनसाखळीच्या सावत्र आईला म्हणाला, "हे बघ, मी दूर जात आहे. माझ्या सोनसाखळीस जप. आईवेगळी पोर. तिला बोलू नको, मारू नको. पोटच्या मुलीप्रमाणे तिचे सारे कर."

सावत्र आई म्हणाली, "हे मला सांगायला हवे ? तुम्ही काळजी नका करू. सोनसाखळीचे सारे करीन. तिला गुरगुट्या भात जेवायला वाढीन. कुशीत

निजायला घेईन. न्हाऊमाखू घालीन. वेणीफणी करीन. जा हो तुम्ही. सुखरूप परत या.''

सोनसाखळीचा बाप गेला. सावत्र आईचा कारभार सुरू झाला. ती सोनसाखळीचा छळ करू लागली. लहान कोवळी सोनसाखळी; परंतु तिची सावत्र आई तिला पहाटे थंडीत उठवी. सोनसाखळी झाडलोट करी, भांडी घाशी. ती विहिरीवरून पाणी आणत असे. तिला पोटभर खायला मिळेना. शिळेपाके तिला तिची सावत्र आई वाढत असे. रात्री पांघरायलाही नसे. सोनसाखळी रडे; परंतु रडली तर तिला मार बसत असे.

एके दिवशी तर तिच्या कोवळ्या हाताला सावत्र आईने डाग दिला. फुलासारखा हात, त्याच्यावर त्या दुष्ट आईने निखारा ठेवला. असे हाल सुरू झाले. सोनसाखळी बापाला घरी आल्यावर हे सारे सांगेल अशी भीती सावत्र आईस वाटत होती. म्हणून एके दिवशी रात्री तिने सोनसाखळीस ठार मारले. एका खळग्यात तिचे तुकडे पुरण्यात आले. त्या खळग्यावर सावत्र आईने डाळिंबाचे झाड लावले.

काशीहून बाप परत आला. त्याने मुलीसाठी नाना प्रकारची खेळणी आणली होती. लहानशी चुनडी आणली होती. परंतु सोनसाखळी सामोरी आली नाही. सावत्र आई एकदम डोळ्यांत पाणी आणून म्हणाली, ''गेली हो आपली सोनसाखळी ! तिला कमी पडू दिले नाही. देवाची इच्छा, तेथे कोणाचे काय चालणार ?''

बाप दु:खी झाला. त्याला सारखी मुलीची आठवण येई. जेवताना, झोपताना डोळ्यांसमोर सोनसाखळी येई. तिची खेळणी तो जवळ घेऊन बसे व रडे. बाप आंघोळीसाठी त्या झाडाजवळ बसे. ते डाळिंबाचे झाड मोठे सुरेख वाढत होते. कशी कोवळी कोवळी तजेलदार पाने. काय असेल ते असो. बापाचे त्या झाडावर प्रेम बसले. तो त्या झाडाची पाने कुरवाळीत बसे.

त्या झाडाला फुले आली; परंतु सारी गळून एकच राहिले. त्या फुलाचे फळ झाले. फळ वाढू लागले. वाढता वाढता डाळिंब केवढे थोरले झाले! लोकांना आश्चर्य वाटले. लोक येत व बघून जात. बाप त्या डाळिंबाला दोन्ही हातांनी धरी व कुरवाळी.

शेवटी ते डाळिंब पिकले. बापाने तोडले व घरात आणले. गावातील मंडळी ओटीवर जमली. केवढे मोठे डाळिंब ! कलिंगडाएवढे होते. बापाने ते डाळिंब

फोडण्यासाठी हातात घेतले. तो फोडणार तोच आतून गोडसा आवाज आला, ''हळूच चिरा, मी आहे हो आत.'' असा तो आवाज होता. सर्वांना आश्चर्य वाटले.

बापाने हलक्या हाताने डाळिंब फोडले. आतून सोनसाखळी बाहेर आली. बाहेर येताच एकदम मोठी झाली. तिने बापाला मिठी मारली. ''बाबा, बाबा, पुन्हा मला सोडून नका हो जाऊ.'' ती म्हणाली. सोनसाखळीने सारी हकिकत सांगितली. बापाला राग आला. परंतु सावत्र आई म्हणाली, ''मला क्षमा करा. पाप कधी लपत नाही, असत्य छपत नाही, मला कळले. मी नीट वागेन.''

पुढे ती खरोखरच चांगल्या रीतीने वागू लागली. सोनसाखळी सुखी झाली.

✦✦✦

दगडफोड्या

एक होता दगडफोड्या. गाढवांवर दगड घालून तो नेहमी नेत असे. एके दिवशी दगड लादलेली गाढवे घेऊन तो झा झा करीत जात होता. तो त्याला वाटेत शिपायांनी अडविले. ते त्याला म्हणाले, ''हा रस्ता बंद आहे. राजेसाहेबांची स्वारी या रस्त्याने जाणार आहे. माहीत नाही का तुला, दिसत नाही का तुला ? चालला गाढवे घेऊन. गाढवच दिसतोस.''

तो दगडफोड्या म्हणाला, ''मी असा राजा असतो तर किती छान झाले असते! मग मला कोणी अडविले नसते. मीच साऱ्यांना अडविले असते.'' त्याच्या मनात असे आले नाही तोच त्याच्यासमोर एक देवता उभी राहिली. तिने त्याला विचारले, ''तुला काय राजा व्हायचे आहे ?''

तो म्हणाला, ''हो, मला राजा व्हायचे आहे, म्हणजे सारे हात जोडून माझ्यासमोर उभे राहतील.''

देवता म्हणाली, ''ठीक तर. मीट डोळे व उघड म्हणजे तू राजा झालेला असशील.''

दगडफोड्याने डोळे मिटले व उघडले. तो काय आश्चर्य! तो एकदम राजा झालेला. तो पांढऱ्या छानदार घोड्यावर बसलेला होता. अंगावर जरीचा पोषाख होता. डोक्यावर मुकुट होता. भालदार- चोपदार जयजयकार करीत होते. मोठमोठे शेट, सावकार, सरदार, जहागीरदार नजराणे देत होते व अदबीने नमस्कार करीत होते.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

परंतु आकाशात वर सूर्य तापत होता. राजाला ताप सहन होईना. तो मनात म्हणाला, "हा सूर्य माझ्यापेक्षा मोठा दिसतो. त्याला माझी पर्वा वाटत नाही. मी सूर्य असतो तर चांगले झाले असते."

तो असे मनात म्हणतो तोच ती देवता त्याच्यासमोर उभी राहिली व म्हणाली, " तुला सूर्य व्हायचे आहे? मीट डोळे व उघड म्हणजे तू सूर्य झालेला असशील."

त्याने तसे केले व तो सूर्यनारायण झाला. तो आता सारा पराक्रम दाखवू लागला. बारा डोळे जणू त्याने उघडले. झाडेमाडे सुकून गेली. नद्यानाले आटून गेले. गाईगुरे तडफडू लागली. सूर्याला ऐट आली.

परंतु आकाशात एक लहानसा ढग आला. हळूहळू तो मोठा झाला. सूर्याला त्याने झाकून टाकले. सूर्याचे ऊन पृथ्वीवर पडेना. सूर्याचा प्रखर ताप पृथ्वीपर्यंत पोहोचेना. सूर्य मनात म्हणाला, "हा ढग माझ्याहून मोठा दिसतो, माझा प्रकाश अडवतो. मी असा ढग असतो तर किती छान झाले असते!"

तो असे मनात म्हणतो तोच ती देवता समोर उभी राहिली व म्हणाली, "तुला ढग व्हायचे आहे ?"

तो सूर्य म्हणाला, "हो."

देवता म्हणाली, "मीट डोळे व उघड म्हणजे तू ढग होशील."

तो आता ढग झाला. काळाकुट्ट ढग. दिवस असून पृथ्वीवर अंधार पडला. आता तर मुसळधार पाऊस पडू लागला. नद्यानाले भरून गेले. शेतेभाते वाहून जाऊ लागली. गावे वाहून जाऊ लागली. जणू प्रलयकाळ आला असे वाटले. पूर्वी लोक उन्हाने मरत होते, आता पाण्यात मरू लागले. ढगाला आपल्या पराक्रमाचे कौतुक वाटले. तो अभिमानाने खाली पाहू लागला.

परंतु त्याला एक भला मोठा फत्तर दिसला. एवढा पाऊस पडत होता, तरी त्याला ढमसुद्धा झाला नव्हता. ढगाला वाटले की, हा दगड माझ्याहून मोठा दिसतो. मी जर असा दगड असतो तर बरे झाले असते. त्याच्या असे मनात येताच ती देवता समोर उभी राहिली व म्हणाली, "काय तुला दगड व्हायचे आहे ?

तो म्हणाला, "हो."

ती म्हणाली, "मीट डोळे व उघड म्हणजे तू भला मोठा दगड होशील."

तो आता प्रचंड फत्तर झाला. परंतु एके दिवशी एक दगडफोड्या तेथे आला. तो घणाचे घाव घालून त्याला फोडू लागला. त्याचे तुकडे होऊ लागले. तो दगड मनात म्हणाला, ''हा दगडफोड्या माझ्याहून मोठा दिसतो. मी दगडफोड्या झालो तर बरे होईल.''

तो असे मनात म्हणताच ती देवता समोर उभी राहिली व म्हणाली, ''तुला दगडफोड्या का व्हायचे आहे? अरे, तो तर तू पूर्वी होतास. पुन्हा मूळ पदावरच आलास. हो दगडफोड्या.'' पुन्हा आपला तो पूर्वीचा दगडफोड्या झाला.

✦✦✦

मुले म्हणजे देवाची ठेव

एक होता राजा. तो रस्त्याने जात असता वाटेत जर मुले भेटली तर त्यांना नमस्कार करी. राजा म्हाताऱ्या लोकांना नमस्कार करीत नसे; परंतु मुलांसमोर मात्र लवे. लोकांना याचे आश्चर्य वाटे. हळूहळू लोक राजाला वेड लागले असे म्हणू लागले.

गोष्ट प्रधानाच्या कानावर गेली. त्याच्या मनात आले की, राजाला आपण सारे सांगावे. एके दिवशी तो मुद्दाम उजाडताच राजाला भेटावयास गेला. राजाने विचारले, "आज इतक्या लवकर काय काम आहे?"

प्रधान म्हणाला, "महाराज, मला तुम्हाला काही विचारावयाचे आहे."

राजा म्हणाला, "विचारा. संकोच करू नका."

प्रधान म्हणाला, "महाराज, तुम्ही वेडे झाला आहात असे सारे लोक म्हणतात."

राजा म्हणाला, "का बरे? मी कुणाच्या घरांना आगी लावीत नाही. कोणाचे नुकसान करीत नाही. दुसरे देश लुटित नाही. प्रजेवर वाटेल तसे कर लादित नाही. मग मला वेडा का म्हणतात?"

प्रधान म्हणाला, "महाराज, आपण दयाळू आहात, न्यायी आहात, सारे खरे. आपल्या कारकिर्दीत खेडोपाडी रस्ते झाले, विहिरी झाल्या, पाट झाले, उद्योगधंदे आहेत, सारे शिकलेले आहेत. न्याय आहे, नीती आहे. ते सारे खरे पण–"

राजा म्हणाला, "पण काय ? कोणती माझी चूक झाली, कोणते अविचाराचे कृत्य झाले?"

प्रधान म्हणाला, "महाराज, तुम्ही रस्त्यातून जाताना शेंबड्या लहान पोरांना वाकून लवून नमस्कार करता; परंतु वृद्धांना कधी करीत नाही. नमस्कार करायचाच झाला तर म्हाताऱ्या मंडळींस करावा. लहान मुलांना का कोणी नमस्कार करतो ?"

राजाने हसून विचारले, " म्हणून का मी वेडा?"

प्रधान म्हणाला, "लोक असे म्हणतात, राजा पोराबाळांना प्रणाम करतो. राजाला वेड लागले."

राजाने उत्तर दिले, "मी वेडा नाही. लोकांनाच कळत नाही. मी करतो ते बरोबर करतो."

प्रधानाने विचारले, "ते कसे काय?"

राजा म्हणाला, "जे लोक म्हातारे झाले, त्यांचा पराक्रम कळून चुकला. ते काय करणार, काय नाही, सारे जगाला कळले. त्यांची कर्तबगारी काय ती दिसून आली. परंतु लहान मुलांचे अद्याप सारे दिसावयाचे असते. लहान मुले पाहिली म्हणजे माझ्या मनात येते, यांच्यातून उद्या कोण निर्माण होईल, कुणास ठाऊक ? यांच्यातून मोठे कवी निघतात, चित्रकार निघतात, वीर निघतात, मुत्सद्दी निघतात, साधुसंत निघतात का मोठे शास्त्रज्ञ निघतात ? काय सांगावे ? सारे शक्य आहे. म्हणून मी मुलांना वंदन करतो: त्यांच्यातील अप्रकट शक्तीला नमस्कार करतो."

प्रधान म्हणाला, "महाराज, आपले करणे बरोबर आहे. आम्हीच वेडे. आपण शहाणे आहात, दूरचे बघणारे आहात."

राजा म्हणाला, "म्हणून तर लहान मुलांची काळजी घेतली जावी म्हणून मी खटपट करतो. त्यांच्यासाठी फुलबागा आहेत, त्यांच्यासाठी क्रीडांगणे आहेत. त्यांच्यासाठी नाना वस्तूंची संग्रहालये आहेत. शाळांतून त्यांना गाईचे दूध मिळेल अशी व्यवस्था केली. मुलांमधील देव प्रकट होतो. मुलांची जीवने नीट फुलून त्याचा सुगंध पसरो. मुले म्हणजे देवाची ठेव. हिला जपले पाहिजे.

प्रधान म्हणाला, "खरे आहे महाराज. आता लोकांना मी समजावून सांगेन. इतके दिवस बालदिन पाळतात परंतु मुलांचे महत्त्व त्यांना कळले नाही. मलाही कळले नाही. आम्ही सारे वरवर पाहणारे लोक. बरे जातो."

✦✦✦

खरा भक्त

एका गावाबाहेर एक शंकराचे देऊळ होते. ते स्वयंभू स्थान होते. काळीभोर शंकराची पिंडी होती. त्या गावाच्या राजाची देवावर फार भक्ती. त्याने त्या देवाला सोन्याचा मुखवटा केला होता. शिवरात्रीच्या उत्सवात, श्रावण सोमवारी तो मुखवटा चढविण्यात येई. हजारो लोक पाहायला येत.

राजा रोज देवाच्या पूजेला जात असे. 'पाहि मां पाहि मां' म्हणत असे. राजाकडची ती पूजा. तिचा थाट किती वर्णावा ! किती सांगावा ? सुंदर सुगंधी फुलांच्या माळा असत. बेलाच्या त्रिदळांच्या पाट्या भरलेल्या असत. चंदनाचा सुवास सुटलेला असे. उदबत्त्यांचा घमघमाट असे. ओवाळायला कापूर असे. बाहेर चौघडा वाजत असे. अशा थाटाने पूजा होई.

त्या देवळाजवळ एक संन्यासी राहायला आला. तो फार कोणाशी बोलत नसे. देवा शंकराला प्रदक्षिणा घालीत असे. आसन मांडून जप करीत बसे. तो झाडाचा पाला फक्त खाई. जवळ झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्याचे पाणी पिई. असा त्याचा कार्यक्रम असे.

एकदा एक परगावचा मनुष्य त्या गावी आला. देवा शंकराच्या दर्शनास गेला. संन्यासी शांतपणे बसला होता.

"महाराज, आपणाला एक प्रश्न विचारू का ?" त्या माणसाने विचारले.

"विचारा." संन्यासी म्हणाला.

“तुम्ही येथे पुष्कळ दिवस आहात. देवाच्या पूजेला, देवाच्या दर्शनाला रोज कितीतरी लोक येतात. त्यांच्यातील देवाचा खरा भक्त कोण ?”

“खरे सांगू का ?”

“खरे सांगा. दुसऱ्याच्या रागाची संन्याशाला काय पर्वा ?”

“खरे आहे. ऐका तर. तेथे रोज दोन प्रहरी एक गुराखी येतो. तो देवा शंकराचा खरा भक्त.”

“त्याला वेदमंत्र येत नसतील. जपजाप्य करीत नसेल तो. पूजा तरी कशाने करणार ? कोठून आणील गंध ? कोठून आणील निरांजन ? येथे राजा रोज पूजेसाठी येतो. कशी घवघवीत दिसते ती पूजा! किती माळा, किती कापूर! त्या राजापेक्षाही का तो गुराखी मोठा भक्त ?”

“हो, पुन्हा पुन्हा काय सांगू ?”

“महाराज, तुमच्या म्हणण्यावर विश्वास बसत नाही.”

“उद्या प्रचिती दाखवितो. राजा पूजा करील त्या वेळेस व गुराखी दुपारी येईल त्या वेळेस तुम्हीही येथे असा.”

“अवश्य येईन.”

तो मनुष्य निघून गेला. संन्यासी आपल्या कर्मात रमला.

दुसरा दिवस उजाडला. तो मनुष्य आधीच देवळात येऊन बसला. काही वेळाने राजा आला. चौघडा वाजू लागला. सनया आलापू लागल्या. महापूजा सुरू झाली. माळा चढविण्यात आल्या. कापूर पेटवून राजा ओवाळू लागला. इतक्यात काय झाले ? ते देऊळ एकदम हलू लागले. भूकंप होणार असे वाटले. राजा घाबरला. दगड डोक्यावर पडतात की काय असे त्याला वाटले. त्याच्या हातातील ती हलकारती खाली पडली. कोठले ओवाळणे, कोठली पूजा. राजा धूम पळत सुटला. राजाच्या बरोबरचे सारे पळत सुटले. ती पूजा तशीच अर्धवट तेथे पडून राहिली.

दुपारची वेळ झाली. तो गुराखी आला. त्याच्या गाई रानात चरत होत्या. तो देवाच्या दर्शनाला आला. तो गाभाऱ्यात शिरला. पिंडीला त्याने कडकडून मिठी मारली. नंतर त्याने आपल्या भाकरीचा नैवेद्य देवासमोर ठेवला. क्षणभर त्याने डोळे मिटले आणि तेथेच ती कांदाभाकर खाऊ लागला. आईजवळ बसून जेवू लागला. देव म्हणजे सर्वांची आई ना ?

इतक्यात ते देऊळ हलू लागले. दगड डोक्यावर पडणार असे वाटले. हातातील भाकरी हलू लागली. भूकंप होणार असे वाटले. परंतु त्या गुराख्याने काय केले ? तो पळाला का ? त्याने धूम ठोकली का ? नाही. त्याने एकदम शंकराच्या पिंडीला मिठी मारली. ''देवा, सांभाळ.'' असे तो म्हणाला.

देऊळ हलायचे थांबले. गुराख्याला आनंद झाला. त्याने भाकरी पोटभर खाल्ली. देवाला नमस्कार करून पुन्हा रानात गेला. गाईसाठी बासरी वाजवू लागला.

प्रचिती ज्याला हवी होती तो मनुष्य तेथे होता.

''पटले की नाही?'' संन्याशाने विचारले.

''राजा पळून का गेला ? गुराखी तेथेच का राहिला?''

''अरे, राजा ज्या पिंडीची पूजा करीत होता, ती पिंडी त्याला खरोखर देवाची वाटत होती का ? देऊळ हलू लागताच तो पळाला. देव जवळ असता तो पळाला का ? संकटात देवाशिवाय कोण तारणार ? परंतु ही पिंडी रक्षण करील असे त्याला वाटले नाही. त्याने स्वतःच्या पायांवर अधिक विश्वास ठेवला. ती पिंडी म्हणजे केवळ दगड. हीच त्याची शेवटी भावना झाली. परंतु तो गुराखी ? देऊळ हलू लागताच पळाला नाही. त्याने पिंडीलाच मिठी मारली. संकटात लहान मूल आईला बिलगते. तो गुराखी देवाला बिलगला. त्याला ती पिंडी म्हणजे दगड वाटला नाही. त्याला तेथे खरोखर देव दिसत होता. ती पिंडी परमेश्वराची, देवा महादेवाची आहे, असे त्याला खरोखर वाटत होते. त्याचा खरा भाव होता, त्याची खरी भक्ती होती. त्याच्या पूजेत फुले नसतील, कापूर नसेल, चंदन नसेल; परंतु सर्व सुगंधाहून थोर असा खऱ्या भक्तीचा सुगंध त्याच्या पूजेत होता. आता पटले ना ?'' संन्याशाने शेवटी विचारले.

''होय महाराज.'' असे म्हणून विचार करीत तो मनुष्य निघून गेला.

✦✦✦

सदिच्छेचे सामर्थ्य

एक होता राजा. तो फार दुष्ट होता. तो प्रजेला फार छळी. प्रजेला कोणतेही सुख नाही. डोक्यावर कर मात्र वाढत होते. प्रजा हवालदिल झाली. 'असा कसा हा राजा, मरत का नाही एकदा!' असे ती म्हणे.

पुढे काय झाले. राजा आजारी पडला. त्याच्या सर्व शरीराला व्रण झाले. त्या व्रणांतून पू येई, रक्त येई. माशा सभोवती भणभण करीत. गावोगावचे वैद्य आले. हकीम आले, नाना उपाय झाले. परंतु गुण पडेना, व्रण बरे होईनात. ती क्षते मोठी होऊ लागली. अपार वेदना होऊ लागल्या. राजाला वाटे मरण बरे.

गावाबाहेर एक नवीन साधू आला होता. लहानशी झोपडी बांधून तो राहिला होता. तो कोणाच्या आगीत नसे दुगीत नसे. रामनाम घेण्यात रंगलेला असे.

''राजा, गावाबाहेर एक साधू आला आहे. त्याच्याकडे जाऊन पाया पड. तो काही उपाय सांगेल.'' एक जुना वृद्ध मंत्री म्हणाला.

''न्या मला पालखीतून. पाहूया प्रयत्न करून.'' राजा म्हणाला.

पालखीतून राजाला नेण्यात आले. साधू रामनामात रंगला होता.

''महाराज, राजा तुमच्याकडे आला आहे. पाहा त्याची स्थिती. किती दुर्दशा झाली आहे ! तुम्ही सांगा काही उपाय. राजाला चैन पडत नाही. त्यामुळे राज्यकारभाराकडे लक्ष लागत नाही. तुम्ही दया करा.'' असे मंत्री हात जोडून म्हणाला.

पालखीवरील पडदा दूर करण्यात आला. राजा विव्हळत होता. माशा येऊन भणभण करू लागल्या. शिपाई त्यांना हाकलू लागले.

''फार होतो त्रास. महाराज, फार आहे दुःख. तुम्ही तरी आरोग्य द्या. माझ्यासाठी देवाला आळवा. देव तुमचे ऐकेल.'' राजा म्हणाला.

साधूने राजाची दशा पाहिली. तो तेथेच सचिंत उभा होता.

''राजा, तुझ्यासाठी मी देवाची प्रार्थना करीन; परंतु तूसुद्धा मी सांगेन तसे केले पाहिजेस. औषध घेतले पाहिजेस. पथ्यपाणी सांभाळले पाहिजेस.'' साधू म्हणाला.

''कोणते औषध घेऊ ? जो उपाय सांगाल तो करीन. तुम्ही सांगाल त्याप्रमाणे मी वागेन.'' राजाने सांगितले.

साधू म्हणाला, ''राजा, तुझ्या सर्व अधिकाऱ्यांना प्रजेशी नीट वागण्याची आज्ञा दे. प्रजेवर कितीतरी नवीन नवीन कर बसविण्यात आले आहेत, ते सारे कमी कर. शेतसारा फार वाढला आहे, तोही माफक कर. रस्ते नीट बांध. दवाखाने ठायी ठायी घाल. उद्योगधंद्याच्या शाळा काढ. त्याने बेकारी कमी होऊन लोक सुखी होतील. ठिकठिकाणी पाटबंधाऱ्यांची कामे सुरू कर. कालवे वाढव. तसेच लाचलुचपतीस आळा घाल. जंगलातील गवत, वाळलेले फाटे लोकांना मोफत नेऊ दे.

अरे, प्रजा सारी दुःखी आहे. ती दुःखी असता तुला कोठून सुख ! सारी प्रजा तुझ्या नावाने खडे फोडीत आहे. मी जेथे जातो तेथे हाय हाय ऐकू येते. रोग वाढले, दारिद्र्य वाढले. मरणाचा सुकाळ झाला. 'असा कसा हा राजा, असा कसा हा राजा!' असे सारे बोलतात. म्हणून हो तुझ्या शरीराला ही व्याधी ! तू नीट वाग, प्रजेला पोटच्या मुलाप्रमाणे पाळ म्हणजे बघ चमत्कार होईल. रोग पळून जाईल. तू बरा होशील.''

मंत्री म्हणाले, ''साधू महाराज, राजाच्या दुखण्याचा राज्यकारभाराशी काय संबंध? राज्यकारभार कसा चालवावा ते सांगायला आहेत मंत्री. तुम्ही एखादे औषध सांगा. झाडाचा पाला, एखादी मुळी, नाहीतर अंगारा असे काही द्या. राजाच्या दुखण्याची थट्टा नका करू.''

साधू म्हणाला, ''मला उपाय माहीत आहे तो सांगितला. दुसरे उपाय मला माहीत नाहीत. जडीबुटी मजजवळ नाही. राजाच्या दुखण्याची मी थट्टा नाही करीत. मी खरे ते सांगितले. दुसऱ्याच्या दुःखाची थट्टा करणारा साधू कसा असेल ? मी तसा असेन तर माझी प्रार्थना तरी देव कसा ऐकेल ?''

राजा म्हणाला, "प्रधानजी, साधू म्हणतो तसे करून पाहूया. इतके बाह्य उपाय झाले. हकीम झाले, वैद्य झाले, मांत्रिक झाले, तांत्रिक झाले. आता साधू म्हणतो तसे वागूया. चला परत."

साधूला प्रणाम करून ते सारे परत गेले. राजाने नवीन हुकूम दिले, अधिकारी नीट वागू लागले. डोईजड कर कमी झाले, शेतसारा प्रमाणात झाला. रस्ते झाले, कालवे झाले. उद्योगधंद्याच्या शाळा झाल्या. लोकांना आजारीपणात औषधपाणी मिळू लागले. जसजसा राज्यकारभार सुधारू लागला तसतसा राजाचा रोग बरा होऊ लागला. प्रजा राजाला दुवा देऊ लागली. 'कसा उदार आहे राजा, किती प्रजेवर त्याचे प्रेम !' असे लोक म्हणू लागले. 'राजा चिरायू होवो, सुखी होवो, उदंड आयुष्याचा होवो !' असे स्त्रीपुरुष, लहानथोर सारे म्हणू लागले.

हळूहळू राजा निरोगी झाला. शरीरावरचे व्रण गेले. शरीर तेजस्वी व सुंदर झाले. त्याचे मनही सुंदर झाले. त्याची बुद्धीही निर्मळ झाली. एके दिवशी राजा प्रधानाला म्हणाला, "त्या साधूने सांगितले तसे झाले. त्याचे हे उपकार. त्यांना वाजतगाजत येथे आणूया. त्यांचा सत्कार करूया."

सारे शहर शृंगारले गेले. ठायी ठायी कमानी व तोरणे उभारण्यात आली. रस्त्यात चंदनाचा सडा घालण्यात आला. घोडेस्वार, हत्ती, वाजंत्री सारा थाट सजला. राजा साधूकडे गेला. त्याने आग्रह करून साधूमहाराजांस पालखीत बसविले. स्वत: राजा पायी चालत निघाला. तो साधूवर चौऱ्या वारीत होता. मिरवणूक सुरू झाली. हजारो लोक जमले होते. साधूचा जयजयकार होत होता. लोक लाह्या, फुले यांची वृष्टी करीत होते. कोणी तर चांदीसोन्याची फुले उधळली.

मिरवणूक संपली. महासनावर साधूमहाराज बसले. राजाने त्यांची पूजा केली. नंतर साष्टांग प्रणाम करून राजा म्हणाला, "हजारो लोक जमले आहेत. दोन उपदेशाचे शब्द सांगा."

साधूमहाराज उभे राहिले. टाळ्यांचा कडकडाट झाला. नंतर सारे शांत झाले. साधू म्हणाला, "मी काय सांगू ? मी एकच गोष्ट सांगतो. दुसऱ्याला कधी दु:ख देऊ नका, दुसरा तुमचे भले चिंतील अशा रीतीने वागत जा. सर्वांना तुम्ही हवेसे वाटाल असे वागा. मनुष्य जन्मतो तेव्हा स्वत: रडतो परंतु इतरांना आनंद होतो. आता असे मरा की, तुम्हाला मरताना आपण चांगले वागलो असे मनात येऊन आनंद वाटेल व

असा चांगला मनुष्य मरणार असे मनात येऊन लोक रडतील. लोकांची सदिच्छा, लोकांचे आशीर्वाद हेच आपले सुख. राजा, तू नीट वागत नव्हतास. तुझा राज्यकारभार चांगला नव्हता. लोक म्हणत,

"राजा म्हणजे पीडा. कधी सरेल ही पीडा." त्यामुळे तू व्याधीने पिडलास. परंतु तुझा कारभार कल्याणमय होऊ लागताच 'किती चांगला राजा' असे लोक म्हणू लागले. तुझा रोग हटला. प्रजेच्या आशीर्वादात राजाचे बळ, प्रजेच्या शापात राजाचे मरण, म्हणून सर्वांनाच सांगतो की, चांगल्या रीतीने वागा. एकमेकांचे शिव्याशाप न घेता एकमेकांचे आशीर्वाद घ्या आणि हा संसार सुखाचा करा. पृथ्वीवर स्वर्ग आणा."

✦✦✦

शब्दावरून पारख करावी

एक होता राजा. त्याचा स्वभाव जरा विचित्र होता. लोक त्याला कधी नावे ठेवीत, कधी त्याची स्तुती करीत. त्या राजाला एकदा एका साधुपुरुषाच्या दर्शनाची इच्छा झाली. राजाने त्या साधूची कीर्ती ऐकली होती; परंतु त्या साधूचे दर्शन त्याला कधीच झाले नव्हते. ''जो कोणी मला साधुपुरुषाचे दर्शन करवील, त्याला मी एक हजार सोन्याची नाणी देईन.'' अशी राजाने सर्वत्र दवंडी देवविली.

त्या साधूला कोणीच पाहिले नव्हते. साधू निरनिराळ्या वेशांत वावरतो, निरनिराळी स्वरूपे धारण करतो, असे लोक म्हणत. साधूला ओळखायचे कसे ?

एका गरीब मनुष्य होता त्याला बायको होती. त्याला मुलेबाळे होती. परंतु घरात खायला नव्हते. आपली उपाशी मुलेबाळे पाहून त्याला वाईट वाटे.

तो राजाकडे गेला व म्हणाला, ''राजा, मला आजच हजार सोन्याची नाणी दे. दोन महिन्यांचे आत साधूचे दर्शन तुला घडवीन.''

राजा म्हणाला, ''दर्शन न घडविलेस तर ?''

दरिद्री म्हणाला, ''मरणाची शिक्षा मला दे.''

राजा म्हणाला, ''ठीक.''

त्या दरिद्री माणसाला एक हजार सोन्याची नाणी देण्यात आली. तो घरी गेला. मुलाबाळांना आनंद झाला. बायको आनंदली. घरी आता कशाला वाण नव्हती. मुलाबाळांना चांगले कपडे करण्यात आले. त्यांच्या अंगावर दागदागिने घालण्यात

आले. त्याची बायको सोन्याने पिवळी झाली. पैठणीने सजली. नवीन घर बांधण्यात आले. शेतीवाडी खरेदी घेण्यात आली. गाईगुरे विकत घेतली गेली. घोड्याची गाडी आली. अशी मौज झाली.

सर्वांना सुख झाले; परंतु तो दरिद्री मनुष्य दु:खी होता. त्याच्या डोळ्यांसमोर सारखे मरण होते, साधुपुरुष त्याला कोठे भेटणार, कोठे दिसणार ? परंतु जरी मरणाच्या विचाराने त्याला दु:ख होई, तरी त्यातल्या त्यात त्याला थोडे समाधान होते. आपण जरी मेलो तरी मुलाबाळांना सुख होईल या विचारानेच त्याने राजाजवळ तसे वचन दिले होते. आपण मेलो तरी मुलांना ददात उरणार नाही, आणि आईही आहे त्यांची काळजी घ्यायला; असे समाधान तो मानी; परंतु मरणाच्या कल्पनेचे दु:ख काही कमी होत नसे.

त्याचे खाण्यापिण्याकडे लक्ष नसे. तो दु:खी, कष्टी, उदासी दिसे. तो अशक्त झाला. फिक्कट दिसू लागला.

''तुम्हाला काय होते ? नीट जेवत नाही; नीट बोलत नाही, का असे ? घरात सारी सुखी आहेत, तुम्ही का दु:खी?'' असे बायकोने विचारले.

''आपण सुखी झालो. परंतु कितीतरी गरीब माणसे जगात आहेत. त्यांना कोण देणार पोटभर खायला ? त्यांच्या विचाराने मनाला वाईट वाटते.'' तो म्हणाला.

जगात दु:ख पुष्कळ आहे. आपण काय करणार ?'' ती म्हणाली.

''थोडेफार दु:ख दूर करता येईल तर बघावे.'' तो म्हणाला.

''मी अडल्यानडल्यास मदत करीन. भाकरीतुकडा कोणाला देत जाईन. मी उतणार नाही, मातणार नाही. गर्वाने दुसऱ्यास कधी हिडिसफिडीस करणार नाही.'' ती म्हणाली.

''देव तुझ्यावर दया करील.'' तो म्हणाला.

''परंतु तुम्ही हसा, खेळा, आनंदी राहा.'' ती म्हणाली.

''देवाची कृपा होईल तर हसेन खेळेन.'' तो म्हणाला.

तो गरीब मनुष्य दिवस मोजीत होता. एक महिना गेला. दुसरा सुरू झाला. त्याने साधूची सर्वत्र चौकशी केली, परंतु पत्ता लागेना. दुसरा महिनाही संपत आला. शेवटी तोही संपला.

राजाने त्या गरीब माणसाकडे शिपाई पाठविले. मोठा दरबार भरला. हजारो लोकही साधू येतो की काय, ते पाहण्यासाठी जमले होते. शिपायाबरोबर तो गरीब मनुष्य आला. त्याला तेथे उभे केले.

''कोठे आहे साधुपरुष?'' राजाने विचारले.

''राजा, पुष्कळ हिंडलो, फिरलो; परंतु साधूमहाराज दिसले नाहीत. त्यांना ओळखायचे तरी कसे ? ते नाना रूपे धारण करितात. अमुकच ते असे कसे समजावे? माझ्यावर कृपा कर. माझी मुलेबाळे आहेत. मला मरणाची शिक्षा देऊ नकोस. मी पाया पडतो. निराधाराला आधार दे.'' तो गरीब मनुष्य म्हणाला.

राजा संतापला. रागाने म्हणाला, ''तू लफंग्या दिसतोस, तू फसवलेस. तुला का ही गोष्ट आधी माहीत नव्हती ? ते साधुमहाराज नाना वेश धारण करतात, नाना रूपांत वावरतात हे तुझ्या कानी नव्हते आले ? आता क्षमा नाही. तुझी मरणाची शिक्षा टळत नाही. तुला हाल हाल करून मारले पाहिजे. साधे मरण नाही उपयोगी. राजाला फसविले आहेस.

त्या राजाचे चार प्रधान होते. त्यातील तिघांवर राजाची फार मर्जी होती. चौथ्यावर विशेषशी नव्हती. ते चारी प्रधान तेथे बसलेले होते.

राजाने पहिल्या प्रधानाला विचारले, ''या लफंग्याला कसे मारावे?''

तो म्हणाला, ''महाराज, याला कुंभाराच्या आव्यात भाजून मारावे.''

इतक्यात सभेतील एक मनुष्य उभा राहिला व म्हणाला, ''राजा, शब्दावरून माणसाची पारख करावी.''

राजाने त्याच्याकडे पाहिले; परंतु तो काही बोलला नाही. नंतर त्याने दुसऱ्या प्रधानाला तोच प्रश्न केला. तो दुसरा प्रधान म्हणाला, ''राजा, वस्तारा घ्यावा व त्याच्या शरीराचे राईराईएवढे तुकडे करावे.''

सभेतील तो मनुष्य पुन्हा उभा राहिला व म्हणाला, ''राजा, शब्दांवरून माणसाची पारख करावी.''

राजाने रागाने त्याच्याकडे पाहिले. नंतर त्याने तिसऱ्या प्रधानाला विचारले. तो तिसरा प्रधान म्हणाला, ''महाराज, याला भिंतीत चिणून मारावे.''

पुन्हा तो सभेतील मनुष्य म्हणाला, ''राजा, शब्दावरून माणसाची पारख करावी.''

त्या माणसाचे ते उद्धट वर्तन पाहून राजा संतापला. परंतु अद्याप चौथ्या प्रधानाला विचारायचे राहिले होते. शेवटी त्या चौथ्या प्रधानालाही विचारण्यात आले. चौथा प्रधान म्हणाला, ''महाराज, याला मारू नये. या गरिबाला सोडून द्यावे. पाहा त्याची स्थिती. दोन महिन्यांपूर्वी तो कसा होता व आज कसा आहे ? तो केवळ अस्थिपंजर झाला आहे. रोज त्याच्या डोळ्यांसमोर मरण होते. आपण दोन महिन्यांनी मरणार असे सारखे त्याच्या मनात होते. तो क्षणाक्षणाला मरत होता. किती मानसिक वेदना त्याला झाल्या असतील? झाली एवढी शिक्षा त्याला पुरे. त्याला आणखी मारणे योग्य नव्हे. मेलेल्याला मारण्यात काय अर्थ ?''

सभेतील तो पुरुष पुन्हा उभा राहिला व म्हणाला, ''राजा, शब्दावरून माणसाची पारख करावी.''

राजा त्या माणसाकडे वळला व म्हणाला, ''पुन्हा पुन्हा तू हे शब्द उच्चारीत होतास, त्याचा अर्थ काय ? नीट काय ते सांग, नाहीतर तुलाही मरणाची शिक्षा देतो.''

तो मनुष्य उभा राहून म्हणाला, ''राजा, पहिल्या प्रधानाने मडकी भट्टीत भाजतात त्याप्रमाणे या माणसाला भाजून मारावे असे सांगितले. का बरे त्याने असे सांगितले ? अरे, तो कुंभार आहे. परंतु तू त्याला प्रधान केलेस. त्याच्या डोळ्यांसमोर नेहमी मडकी असतात. आणि तो दुसरा प्रधान? तो आहे न्हावी. म्हणून त्याने वस्तऱ्याने तुकडे करावे असे सांगितले. त्याच्या डोळ्यांसमोर सदैव वस्तराच असायचा. आणि तो तिसरा प्रधान ? तो आहे गवंडी. भिंती बांधणे हे त्याचे काम. म्हणून भिंतीत चिणून मारा असे त्याने सुचविले. कुंभार, न्हावी, गवंडी यांना तू प्रधान केलेस. त्यांचे धंदे वाईट नाहीत. त्या त्या धंद्याने ते समाजाचीच सेवा करतात. परंतु राज्यकारभार कसा त्यांना हाकता येईल ? राज्यकारभार चालवायला मोठी दृष्टी हवी. जगाचा खूप अनुभव हवा. मनुष्य-स्वभावाचे ज्ञान हवे. खोल पाहता आले पाहिजे. नीट सल्ला देता आला पाहिजे. हा चौथा प्रधान भला दिसतो. किती सुंदर विचार त्याने सांगितले ! कसा चांगला सल्ला त्याने दिला; परंतु त्याच्यावर तुझा लोभ नाही. राजा चांगले प्रधान नेम व त्यांच्या सल्ल्याने वाग.''

त्या मनुष्याचे ते बोलणे ऐकून सर्वांनी माना डोलावल्या परंतु ते तीन प्रधान खट्टू झाले. त्यांनी आपल्या माना खाली घातल्या. राजा म्हणाला, ''त्या मनुष्याला इकडे आणा. या सिंहासनावर त्याला बसवू दे, त्याची पूजा करू दे.''

परंतु कोठे आहे तो मनुष्य ? कोठे गेला ? कोठे बसला? सारे इकडेतिकडे पाहू लागले. परंतु तो मनुष्य दिसेना. आता होता; क्षणात नाहीसा झाला. तो साधुपुरुषच तर नव्हता ? होय. ज्याच्या दर्शनासाठी राजा अधीर झाला होता, तोच तो साधुमहाराज होता. परंतु आता काय?

तो चौथा प्रधान राजाला म्हणाला, ''अनेक वेशात वावरणारे, नाना रूपांत दिसणारे ते साधूमहाराज समोर होते. त्यांचे दर्शन तुम्हाला झाले. या गरीब माणसामुळेच शेवटी हे दर्शन झाले. दर्शनच नव्हे तर त्यांचे शब्दही तुम्हाला ऐकायला मिळाले. धन्य झालात तुम्ही, धन्य झालो आम्ही सारे.''

राजा म्हणाला, ''होय, ते साधूमहाराजच होते. या गरीब माणसाला सोडून द्या. शेवटी याच्यामुळे दर्शन झाले. याला आणखी एक हजार नाणी द्या. गरीब माणसा, जा. सुखी राहा.''

त्या तीन प्रधानांकडे वळून राजा म्हणाला, ''तुम्ही आपापले धंदे करायला जा. ते धंदे नीट करा म्हणजे झाले. ज्यांच्यावर माझी मर्जी नव्हती, त्यांना आता मी मुख्य प्रधान नेमतो. राज्यकारभार कसा हाकावा हे तेच चांगले सांगतील.''

ते तीन प्रधान निघून गेले. चौथा प्रधान मुख्य प्रधान झाला. राज्याचा कारभार चांगला चालू झाला.

आणि तो गरीब मनुष्य ? त्याच्या घरात आनंदीआनंद झाला. बाबा परत आले म्हणून मुले उड्या मारू लागली. पत्नीच्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले.

''तुम्ही आमच्या सुखासाठी मरण पत्करले होते. आमची दैना तुम्हाला पाहवेना? होय ना ? किती तुमचे आमच्यावर प्रेम!'' ती स्फुंदत म्हणाली.

''त्या प्रेमानेच वाचलो. त्या त्यागानेच देव प्रसन्न झाला. त्याने दया केली. आता मी हसेन खेळेन. आनंदात राहीन. सारीच आनंदात राहू.'' तो म्हणाला.

''हो. सारी आनंदाने राहू, गंमत करू.''

मुले नाचत म्हणाली.

✦✦✦

कावळे

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

बालपणाचा मित्र

मला कावळा लहानपणी फार आवडे. त्याचा तो काळा कुळकुळीत रंग, त्याचा तो मोठा कावऽ कावऽ आवाज. त्याच्या पंखांचे फडफडणे, त्याच्या वाकुल्या मला सारे आवडे. आईच्या कडेवर बसून मी त्याला कितीतरी वेळा पाहावयाचा. लहानपणी, विशेषत: मला, जेवताना आई अंगणात घेऊन यायची. तिच्या हातात घास असायचा व भरवताना ती मला म्हणायची, ''हा घे हों, हा काऊचा, हा चिऊचा, तो बघ काऊ. येरे येरे काऊ, माझा बाळ घास खाऊ.'' आणि मग घास घ्यायचा. मी राजा, आईच्या कडेवर बसून असा एक एक घास मी खेळत खेळत, चिमण्या-कावळे बघत बघत घ्यायचा. मध्येच कावळा उडून जाई. ''गेला काऊ. घे रे एवढा घास, घे हो.'' असे आई म्हणायची. आजूबाजूस कावळा दिसल्याशिवाय मी जेवायचा नाही. मी जरा मोठा झाल्यावर त्याला भाकरी फेकायचा व तो धिटुकला ती घ्यायचा. एक दिवस तर मी अंगणात भाकर घेऊन बसलो होतो, तो आपला आला आणि माझ्या हातातून घेऊन गेला भाकर ! मी टाळ्या वाजवल्या. मला गंमतच वाटली. ''आई, काऊ आला व त्याने माझी भाकरी नेलीन्. त्याला त्यांची आई नाही का गं देत ? त्याला माझी आवडते, माझ्या आईच्या हातची आवडते, होय ?'' असे मी आईला विचारायचा व पुन्हा अंगणात जाऊन, 'काव-काव-काव, माझा तुकडा लाव' असे म्हणायचा. परंतु तो उंच झाडावर बसे. मला वाटे, कावळा माझ्याजवळ येतो, मला का बरे नाही त्याच्याजवळ जाता येत. मी आईला विचारायचा, ''आई, माझे गं कोठे

आहेत पंख ? माझे पंख कोणी तोडले ? कावळ्याला उडता येते, आपल्याला का नाही गं येत ?'' आई हसे व म्हणे, ''देवाला राग आला व त्याने आपणा माणसांचे सारे पंख कापून टाकले. नाहीतर पूर्वी माणसांना येत असे उडता. रावण नव्हता का आकाशातून उडत आला ?''

''तो तर रथात बसून आला होता. त्याचा रथ जटायूने मोडला.'' मी म्हणे.

''जा रे खेळायला बाहेर.'' म्हणून आई मला बाहेर घालवी.

काही असो, परंतु लहानपणापासून कावळ्याबद्दल मला प्रेम वाटे, स्नेह वाटे, आपलेपणा वाटे. मी मोठा होऊ लागलो. मला वाईट वाटे, कावळ्याला सारे लोक नावे ठेवतात; त्याला अमंगळ म्हणतात, लबाड, दुष्ट म्हणतात. त्याला अधाशी म्हणतात, खादाड म्हणतात, 'सर्वभक्षकस्तु वायसः' हा चरण रचून कोणीतरी कावळ्याची कायमची नालस्ती करून ठेवली आहे. ज्या कोणी हा चरण लिहिला त्याला मी मनात शेकडो शिव्या दिल्या.

मला वाटे, हे कावळ्यांना कसे सहन होते ? त्यांना हे माहीत आहे का ? आम्ही मानवप्राणी कावळ्यांना किती हीन मानतो हे त्यांना ठाऊक आहे का ? जर ठाऊक असेल तर ठाऊक असूनही ते मानवांशी इतक्या चांगुलपणाने का राहतात ? कधी मनुष्याजवळ भांडत नाहीत, त्याला सोडून जात नाहीत. आपण विचारावे कावळ्यांना, असे मी मनात ठरवले.

मला आपली चिमण्या, कावळे, गाई, मांजरे, कुत्री, मुंग्या, मैना, पोपट यांची भाषा समजे. त्यांची भाषा समजण्यास सोपी आहे. संदर्भाप्रमाणे त्यांच्या ध्वनींना वेगवेगळे अर्थ असतात. मी थोडेसे संस्कृत इंग्रजी शिकलो; परंतु मग कंटाळलो, कितीतरी शब्द त्या भाषांत आणि शब्दाशब्दासाठी किती त्यांच्यात भांडणे! शब्दांचे अर्थही त्यांचे निश्चित नाहीत. एकाच पुस्तकाचे अनेक अर्थ ते करतात. ज्या पुस्तकांचा अर्थ निश्चित नाही, ज्या शब्दांचा अर्थ नक्की नाही असे शब्द कोणी लिहावे तरी का? त्या शब्दांचा उपयोग करून कशाला रचावी पुस्तके ? त्या शब्दांचे अर्थ ठरवण्यासाठी कोश काढतात ! मला कंटाळा आला त्या मानवी शब्दांचा, त्या लठ्ठ लठ्ठ कोशांचा! ते लठ्ठ कोश उशाला घ्यायला बरे, असे वाटे. मी इतर भाषांचा अभ्यास करण्याचे सोडून दिले. सर्व मानवांना व्यापून राहणारी, अश्रू व हास्य यांची भाषा मी नीट शिकून ठेवली, पण त्यांतही भानगडी ! कधी कोणाचे म्हणे नक्राश्रू

असतात, तर कधी दुःखाश्रू ! कधी अपमानामुळे आलेले अश्रू, कधी आनंदाश्रू ! कोणी आनंदाने हसे, तर कोणी थट्टा करण्यासाठी हसे, कोणी मिश्कीलपणे हसे. साधे हसणे व रडणे, पण त्याचाही मानवी अर्थ निश्चित नाही.

मला आपली पाखरे आवडत, तृणे-फुले आवडत, गाई-बैल आवडत. त्यांच्याजवळ मी जायचा, बोलायचा, खेळायचा. त्यामुळे मला त्यांची भाषा समजू लागली. कावळ्यांचीही भाषा मला समजू लागली. त्यांची सुख-दुःखे मला समजत. त्यांच्या, 'काऽका काऽका' या आवाजातील आरोहावरोह मला ओळखता येत. एक दिवस एका कावळ्याजवळ मी सर्व चौकशी करायचे ठरवले. माणसाबद्दल त्याचे काय मत आहे, ते विचारून घ्यायचे मी ठरवले.

✦✦✦

कावळ्यांची कैफियत

मी एका शेतात गेलो. दुपारची वेळ होती. मी माझी भाकर घेऊनच शेतात गेलो. मी झाडाखाली भाकर खात बसलो. आधी चारी दिशांना मी भाकरीचे तुकडे फेकले. फेकले नाही, अर्पण केले! आजूबाजूला किड्या-मुंग्या असतील. अदृश्य योनीही असतील त्यांना नको का थोडे द्यायला. एकटे खाणे हे पाप. प्राचीन काळापासून वेद ओरडून सांगत आहे. 'केवलाघो भवती कैवलादि' – केवळ एकट्याने खाईल तो पापरूप होईल.' परंतु आज ऐकतो कोण ? कावळे, चिमण्या, किडा-मुंगी, मांजर, कुत्रे यांनाही आपण जेवताना घास देणे हे तर दूरच राहिले; परंतु शेजारी भाऊ उपाशी असेल, घरातील गडीमाणसे उपाशी असतील इकडे तरी आपले लक्ष कोठे असते ? थोर हिंदी संस्कृतीचे स्वरूप अजून आपल्या गळी उतरतच नाही. आपण सारे उदरंभर. आपलेच पोट भरणारे झालो आहोत.

तुकडे अर्पण करून मी जेवू लागलो. मी कावळ्याला हाक मारली. 'मला सोबतीला ये' म्हणून बोलविले. 'काऽ काऽ काऽ' हाक मारली. फारसे कावळे आजूबाजूला नव्हते. तरी पण तो पाहा, एक आला. भीत भीत आला. मी त्याच्या भाषेत बोलू लागलो. तो आनंदला. 'तुम्हाला येते आम्हा कावळ्यांची भाषा!' तो आश्चर्याने म्हणाला.

"हो, मला येते तुमची भाषा. आणि मला पशुपक्ष्यांची भाषा आवडते." मी म्हणालो.

“आम्ही व आमची भाषा तुम्हाला आवडते ? आम्ही तर नीच जातीचे, अति दुष्ट, आम्ही वाईट, लोभी, व्रणावर बसणारे ! आम्हाला तर तुम्ही त्याज्य ठरवले आहे. तुम्ही मानवजातीचे असून अपवाद कसे ? तुम्ही आमचा तिरस्कार नाही करीत?” त्या कावळ्याने विचारले.

“नाही, लहानपणी तुमचे काळेभोर रूप पाहून मला आनंद वाटे. आई मला तुमचे रूप दाखवीत दाखवीत भरवी. म्हणून तर मी तुम्हाला जेवायला हाक मारली. लहानपणाचे तुम्ही माझे मित्र. अगदी बाळपणापासूनचे मित्र. लहानपणी आई मला अंगणात ठेवी. मी तुमच्याकडे पाहायचा. त्या चिमणुलीबाईकडे पाहायचा. मला तुला पुष्कळ विचारायचे आहे. विचारू? सांगशील गड्या?” मी विचारले.

“हो, मोठ्या आनंदाने. आम्ही तुमच्याशी बोलायला किती उत्सुक असतो! परंतु तुम्ही सारे आपल्याच मिजाशीत व ऐटीत. तुम्ही भाऊभाऊही एकमेकांजवळ नीट बोलत नाही, मग आमच्याजवळ कशाला बोलाल ? आम्हाला वाटे, मानव हा किती विचित्र प्राणी आहे ! त्याला स्वत:शिवाय जगात कोणी आवडत नाही; परंतु तुझ्यासारख्याचे उपकार आहेत म्हणायचे. ठीक, विचार अगदी नि:संकोचपणे तुझ्या साऱ्या शंका विचार.” कावळा म्हणाला.

त्याचे सुंदर मार्मिक भाषण ऐकून मला आश्चर्य वाटले. आम्ही मग एकमेकांशी अगदी मनमोकळेपणाने गोष्टी केल्या.

“का रे कावळोबा, तुम्हाला आमचा मानवांचा राग नाही का येत ? आम्ही तुम्हाला नाना नावे ठेवली, तुम्हाला हीन, नीच, पतित मानले, त्याचे तुम्हाला कधी वाईट नाही वाटले ? या गोष्टी तुम्हाला माहीत नाहीत का ? तुमच्या कानांवर आल्या असतील तर तुम्ही इतके शांत कसे ? तुमच्यातही कोणी शांतीचा संदेश देणारे संत झाले का ? तुम्ही माणसांच्या डोक्यावर चोची का नाही मारल्यात? अंगणात छोटी मुले ठेवलेली असतात, त्यांचे डोळे का नाही फोडलेत? या मानवाने आज हजारो वर्षे तुमची नालस्ती चालवली आहे. तिचा सूड तुम्ही का नाही घेत ? तुमच्या मनात कधीच असा विचार नाही आला का ? तुम्ही का मानापमानाच्या पलीकडे गेला आहात ? ‘हाथी चलत है अपनी गतमो कुतर भुकत वाको भुकवा दे.’ असे का तुम्ही मनात म्हणून मानवाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करता ? माझ्या मनात अशा नाना शंका येतात. त्या साऱ्यांचे तू निवारण कर.” असे म्हणून मी थांबलो.

कावळ्याने चोच एकदा घासून पुसून साफ केली. पंख जरा चोचीने खाजवले. इकडे आपले बुबुळ फिरवून जरा नीट न्याहाळून पाहिले आणि मग तो म्हणाला, "ऐक गड्या, तुला सारी हकिकत सांगतो: थोडक्यात सांगतो, कारण मला लवकर घरी परत गेले पाहिजे. दोन वृद्ध कावळे आजारी आहेत. त्यांच्या सेवेसाठी मला गेले पाहिजे. त्यांच्यासाठीच तू टाकलेला हा तुकडा मी नेईन. म्हणून मी तो खाल्ला नाही. तुला वाटायचे, आपण एवढ्या प्रेमाने आपल्या घासातला घास याला दिला आणि हा खात कसा नाही? म्हणून आपले सांगून टाकले. आता थोडा पूर्ववृत्तांत तुला सांगतो. 'पूर्वीपासून आमची जात आपली अल्पसंतोषी; कोणाच्या आगीत, दुगीत नाही. जे मिळेल ते आनंदाने खावे व सृष्टीत दोन दिवस आनंदाने नांदावे, अशी आमच्या जातीची वृत्ती. मनुष्याने आमच्या जातीविरुद्ध, एवढेच नव्हे तर साऱ्या मानवेतर सृष्टीविरुद्ध चालवलेली नालस्ती आमच्या कानांवर येत असे. मनुष्यप्राणी सर्वांत श्रेष्ठ, तो देवाची प्रतिमा, ती भगवंताने निर्माण केलेली सर्वोत्तम कलाकृती. त्याला बुद्धी, हृदय, मन आहेत. त्याचा आकार सर्वांगसुंदर वगैरे मनुष्याची आत्मप्रौढी आम्ही ऐकत होतो व मनात हसत होतो ! परंतु मनुष्याला वाटे की, इतरांची निंदा केल्याशिवाय स्वत:चे श्रेष्ठपण सिद्ध होत नाही. म्हणून मानव सर्व मानवेतर पशुपक्ष्यांची निंदा करू लागला. जो कोणी पशू, जो कोणी पक्षी थोडे त्याचे अनुकरण करील, त्याच्या इच्छेप्रमाणे वागेल, त्याची स्तुतीही करी. काही कवी वगैरे वेडे लोक त्यांच्यात झाले. त्यांनी पशुपक्ष्यांची, मानवेतर सृष्टीची रसाळ वर्णने केली. आमचे गुणगान गाईले, परंतु आमची बेअब्रू त्यांनी केली आहे. विशेषत: कावळ्यांची फार बेअब्रू तुम्ही केलेली आहे. आम्ही हे सारे सहन करीत होतो, परंतु थोड्या वर्षांपूर्वी काही तरुण बहाद्दर मंडळी आमच्यात निघाली. ते बंडाची भाषा बोलू लागले. मानवजातीविरुद्ध बंड करूया, असे ते म्हणू लागले. शेवटी सर्व कावळ्यांची एकदा एक प्रचंड सभा घ्यायचे आम्ही ठरवले."

"मग तुमचे हे संमेलन झाले का ?" मी अत्यंत उत्सुकतेने विचारले.

"हो, हो झाले तर, त्याची हकिकत मी तुला पुढे सांगणारच आहे, पण आता मला उशीर होईल." असे सांगून तो कावळा मला आश्वासन देऊन उडून गेला.

✦✦✦

कावळ्यांची परिषद

''आलास का कावळोबा, केव्हापासून मी तुझी वाटच पाहात होतो. आम्हा माणसांबद्दल तुम्हा पशुपक्ष्यांना काय वाटते, ते मला समजून घ्यायचे आहे. कावळ्यांची प्रचंड सभा भरवायचे ठरले म्हणून मागच्या वेळी तू सांगितले होतेस.'' मी विषयाला एकदम हात घालण्याच्या हेतूने दुसऱ्या दिवशी जेवताना कावळ्याला बोलावून म्हणालो.

त्या कावळ्याने आदल्या दिवसाप्रमाणेच आपली चोच घासून पुसून जरा साफ केली आणि तो म्हणाला, ''नर्मदातीरी कबीर वडावर सभा भरवण्याचे आमचे ठरल्याचे मागेच मी तुला सांगितले होते. त्या सभेला दक्षिण हिंदुस्थानातला एक कावळा अध्यक्ष नेमला. वय झाले तरी त्याचा रंग कुळकुळीत काळा होता. वृद्ध असून तेजस्वी, तेजस्वी असून क्षमावान्, मोठा दूरदर्शी, धोरणी असा तो होता. अध्यक्षांच्या स्वागतासाठी आम्ही मिरवणूक काढली. त्याला हजारो कावळे आले. अध्यक्ष येताच हजारो कावळ्यांच्या तोंडून 'काऽका, काऽका !' असे आनंदोद्‌गार बाहेर पडले. सर्व वड चकचकीत काळ्या रंगाने भरून गेला. स्वागताध्यक्ष भाषणात म्हणाले, 'हजारो वर्षांनतर आपण पुन्हा एकत्र जमलो आहोत. मानव उठल्याबसल्या सभा बोलावतात. सभा म्हणजे त्यांची फॅशनच झाली आहे. आज गंभीर प्रसंग म्हणून आपण जमलो आहोत, आज कावळा जागा झाला आहे. आपल्यातील तरुण वर्गाने नवीन झेंडा उभारला आहे. त्यांच्या हृदयाला अपमान झोंबत आहे. मानवपशूने चालवलेली निंदा आपण हजारो वर्षे सहन केली. याचे त्यांना

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

वाईट वाटत आहे. चित्त जळत आहे. रक्त उसळत आहे. पंख फडफडत आहेत. चोच शिवशिवत आहे. पण आपले पूर्वज रागाने बडबडले नाहीत. मानवांनी चालवलेल्या निंदेची त्यांनी उपेक्षा केली. मनात मत्सर ठेवला नाही. मानवाची सेवाच करीत राहिले. आजच्या पिढीला ते शल्य सलत असेल, पण आपण विचारपूर्वक पाऊल टाकावे. अशा वेळी आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी थोर अध्यक्ष लाभले, हे सुदैव. त्यांची फार स्तुती मी करीत नाही. शब्दावडंबर हा मानव-पशूचा धर्म आहे. प्रदर्शन करणे, दंभ मिरवणे, सोंगे आणणे या त्याच्याच कला. आपण जमलो आहोत त्या वृक्षाचा इतिहास फार उज्ज्वल आहे. हजारो पक्ष्यांची पूर्वी येथे वसाहत होती. सारे प्रेमाने नांदत होते. अशा या पवित्र वडावर शिखरारूढ होण्याची मी अध्यक्षांना विनंती करतो.'

स्वागताध्यक्षांच्या भाषणानंतर सभेस रीतसर सुरुवात झाली. एक तरुण संघाचे उत्साही कार्यकर्ते प्रथम बोलावयास उठले. सर्वांनी पंख फडफडवले व त्यांचा जयजयकार केला. ते म्हणाले, 'आजपर्यंत आपल्या जातीने कमालीची सहनशीलता दाखवली. जगात जो जो तुम्ही मवाळ व्हाल, तो तो जग तुम्हाला दडपील. या माणसाने साऱ्या गरिबांची पायमल्ली चालवली आहे. तो कोकरांचा- कोंबड्यांचा बळी देतो, सिंह-वाघाचा देत नाही. मऊ लागले म्हणजे जग कोपराने खणू लागते. क्षमावृत्ती ही तरुणांना लाजिरवाणी. आपण काळे आहेत म्हणून आपली निंदा. आणि हिंदुस्थानातल्या मानवाने का काळ्या रंगाची निंदा करावी ? सर्व रंगांच्या पलीकडे असणारे चैतन्य एक आहे हे याच देशात ना सांगितले? आणि यांचा देव तरी पाहा, शालिग्राम तर काळा असतो. गंडकीची काळी शिळा. तिच्या सुंदर मूर्ती करतात. काळ्या संगमरवरात तोंडदेखील दिसते. यमुनेचे पाणी काळे आहे. मानव भराभर ग्रंथ लिहितो ती शाई काळीच. मेघांचा रंग काळा. काळी चंद्रकळा यांना आवडते, काळ्या फळ्यावर यांचे शिक्षण. कुणा धर्मोपदेशकांचे झगे काळे. काळी कपिला पवित्र. बुक्का काळा असतो. कस्तुरी काळी असते. काळे डोळे गहन आणि सुंदर असतात. सुंदर केसांचा रंग काळा असतो. शेतकऱ्यांची घोंगडी पांघरणारा कृष्ण काळा, रामही काळा. काळा रंग सुंदर आहे, पवित्र आहे, पण हा मानव आमच्या रंगाची थट्टा करतो. आमच्या डोळ्यांची थट्टा करतो. एकडोळ्या म्हणतो, एक बुबुळ नाचवून आम्ही दोन बुबुळांचे काम करतो. बुबुळ एक असले, तरी नजर कशी तीक्ष्ण असते. एक बुबुळ नाचवून आपण ईश्वराची काटकसर करतो. माणसाची नाके बसकी, फताडी, फुगीर ! त्यापेक्षा आपली चोच किती चांगली ! या माणसांच्या समाजात वेगवेगळ्या भाषा, त्या आपल्या शब्दांपेक्षा

किती कर्कश्श ! मानवांची रोजची भांडणे ऐकून आपले कान किटत चालले आहेत. मिरवणुकीत ओरडत आहेत, प्रेतयात्रेत हेल काढताहेत, क्रीडांगणावर आरोळ्या ठोकीत आहेत. नाना प्रकारचे विचित्र आवाज काढणारा हा प्राणी. पण लहानपणी हा जेवताना याची आई आम्हासच बोलावते. गोष्टी आमच्या, गाणी आमची. पण हा उपकार स्मरत नाही. मोठेपणी हा कृतघ्न मनुष्य आम्हासच दुष्ट म्हणतो. म्हणे कावळा लबाड, धूर्त ! काय फसवले बा यांना आपण ? केव्हा यांची कोठारे लुटली? केव्हा खोटीनाटी भांडणे लढलो ? खोटे दस्तऐवज केले, दिलेली वचने मोडली, झालेले तह गुंडाळले ? स्वत: लबाड म्हणून त्याला आपण लबाड दिसतो. तसे पाहिले तर आपल्यात केवढा बंधुभाव! शेजारी चिमण्या असोत, पोपट-मैना असोत, आम्ही कधी भांडत नाही. मनुष्य दुबळ्यांना चिरडतो, रडवतो, गांजतो. बायकांना छळतो, नोकरांना, मजुरांना गांजतो. आम्हाला का दुबळ्या चिमणीच्या थोबाडीत मारता नसती आली ? पण आपण एकमेकांना छळणार नाही. एकट्याने पोट भरणे आपल्याला आवडत नाही. आपण दुसऱ्यांना हाक मारतो. स्वत:च्या सख्ख्या भावाशी लढणारा, स्वजातीशी भांडणारा, शेकडो भेदभाव पाडणारा द्विपाद बडबड्या पशू, रक्ताचा तहानलेला, चराचरांस लुबाडणारा हा लफंग्या, याचे पोट कधी भरत नाही, तृप्ती ज्याला माहीत नाही, आकाशातही जो उडायला येतो व आम्हाला त्रास देतो, पाण्यात माशांना त्रास देतो, जमिनीवर इतरांना हुसकून देतो, गोळ्या घालतो. असा जगघाण्या हा माणूस आणि याने आमची बदनामी करावी?

याचे कवी ज्या कोकिळेची स्तुती करतात, तिला आम्ही पोसतो. ही भेदातीत निरपेक्ष दया व प्रेम. पण त्याबद्दल आमचे कौतुक करणे दूर राहिले. शिवाय मानव त्याबद्दल आम्हाला दुष्ट व लबाड म्हणतात. आम्ही किती अल्पसंतुष्ट ! सडकेनासके खाऊन जगातली घाण दूर करतो. घरात उंदीर मेला, देतो हा मनुष्य फेकून. काही सडले, कुजले की फेकतो हा बाहेर. त्याच्या उष्टेखळीजवळ, मोरीजवळ किती घाण! त्याचे उकिरडे जंतूकिड्यांनी बुजबुजलेले. ही सारी घाण आम्ही दूर करू पाहतो; तर उलट हा आम्हालाच दोष देतो. याच्या गाई-गुरांच्या जखमा आम्ही स्वच्छ करतो. यांच्या गुरांचे आम्ही डॉक्टर, पण 'व्रणावर बसणारे' म्हणून हा आमचा उपहास करतो. मृतांचे आत्मे आमच्यामध्ये येऊन वास करतात, म्हणून रोज काकबळी द्यावा, असे ऋषींनी पूर्वी ठरवले, पण नव्या मानवाने पूर्वीच्या चांगल्या चालीरीती सोडून दिल्या. 'काकोपि जीवति चिरंच, बलिंच भुङ्क्ते' असे हा तुच्छतेने आपले वर्णन करतो. जणू याच्या काकबळीवरच आपण जगतो ! पोट भरण्यासाठी

का आम्ही ते दोन शीतकण खातो ? पितरांच्यातर्फे आम्ही अन्नग्रहण करतो. तर हा हपापलेले समजतो आम्हाला ! हा मनुष्यच चहाच्या पेल्यासाठी, विडीच्या थोटकासाठी, सुपारीच्या खांडासाठी वाटेल ते करील. या माणसांच्या तुरुंगात सुशिक्षित देशभक्त तरुण आले. ते भाकरीच्या तुकड्यासाठी, डाळीच्या दाण्यासाठी कसे भांडत, ते आम्ही पाहिले आहे. जेलमधल्या पोपया चोरून खात. कधी शिपायाने पकडले तर त्याला लाच देत. तंबाखू, विडी, कांदा, मिरची, हरभऱ्याची डाळ, रताळी, टमाटे, बीट दिसले की त्यांचा फन्ना पाडीत. भेंडी दिसते ना दिसते तोच त्यांच्या पोटात जाई. चुका, चाकवत, कोथिंबीर, चिंचेचा पाला सगळे त्यांच्या थाळीत जाई. आणि हा असा मानव कावळ्याला आधाशी म्हणतो ! त्याच्यापेक्षा काटेरी पाला खाणारी शेळी बरी. निंबाची पिवळी रसरशीत फळे आपल्याला आवडतात; पण त्याचा त्या लिंबोळ्यांवरही डोळा. तुळशीचे झाड पवित्र म्हणून त्याचा पाला खाईल. हरभरा तर पानांसकट कोंबील. वृक्ष, तृण, वनस्पती, पशू, पक्षी, मासे याने काय खायचे ठेवले आहे ? हा बकरा खातो, बोकड खातो, कोंबडी खातो, बदके खातो, गाय खातो, बैल खातो, याला वाघाची चरबी, डुकरांचे मांदे, माशाचे तेल सारे पाहिजे ! आहे तरी कसला या बेट्याचा देह ! पक्षी आनंदाने आकाशात फिरावयास जातो तर हा बाण मारतो, गोळी मारतो. छर्रे मारतो. गमतीसाठी हा शिकार करतो. मधमाश्यांनी श्रमाने मिळवलेला मध हा लुटतो. गाई-म्हशींचे दूध वासरांनाही न ठेवता हा घटाघट पितो. इतके करून वर स्वत: देव म्हणून मिरवतो. वाहवा रे देव ! असल्या देवाला चोचीने फाडून फाडून खावा, असे मला वाटते. सर्व मानवेतर प्राण्यांनी कट केला तर चटणी उडवू याची चटणी! कावळ्याने पुढारीपण घेऊन बंडाचे विचार फैलावले पाहिजेत. माणसाची ही प्राणघेणी संस्कृती, जगन्नाशक संस्कृती, खाबू पोटोबा संस्कृती तिचा नायनाट करू चला ! एकच घोषणा करा व उडवा त्याची सत्ता ! स्वतंत्र व्हा, स्वतंत्र व्हा.' असे म्हणून हा तरुणांचा नेता खाली बसला. बहुतेकांचे विचार त्याने बोलून दाखवले होते.

इतक्यात अध्यक्षांची परवानगी घेऊन तो पाहा एक पोक्त कावळा उठला. तो म्हणाला, 'कावळ्याचा रंग पूर्वी निळा होता. पण मागे एकदा मानवाचे पाप फार झाले. आपल्या पापांचा कलंक जर इतर कोणी घेईल तर आपण यापुढे पुण्यवान राहू, असा त्याने संकल्प केला. जसे जगाच्या कल्याणासाठी शंकर विष प्यायले त्याप्रमाणे कावळ्यांनी मानवाच्या पापांचा स्वीकार केला. आकाशाच्या बाळाप्रमाणे निळे निळे दिसणारे कावळे तेव्हापासून काळे दिसू लागले! माणसाने आपले वचन पाळले नाही. तो एकसारखा

पापांतच बुडत चालला आहे. मोकाट, स्वैर, स्वच्छंद, बेछूट वागत आहे. वागू दे. पण आपल्या काळ्या रंगाचा हा उज्ज्वल इतिहास सर्वांनी ध्यानी घ्यावा. जगाचे दुःख दूर करणे हे आपले ध्येय, ते आपण विसरू नये. मानव बिघडला असला तरी आपण बिघडू नये. नाहीतर हळूहळू सारी दुनिया बिघडेल. एकटा मनुष्य बिघडला म्हणून काय झाले ? मानवेतर सृष्टीचे निर्मळ जीवन सृष्टीला सांभाळील. आपापले स्वधर्म आपण चालू ठेवू. त्यातच आपला विकास, आपला उद्धार!'

या प्रौढ काकाच्या भाषणानंतर निरनिराळ्या सूचना पुढे आल्या. कोणी म्हणाले, 'आपण मानवाकडे आधीं शिष्टाई करू. सूचनेशिवाय लढणे बरे नव्हे.' 'सशस्त्र लढा की नि:शस्त्र असहकार' हाही प्रश्न पुढे आला. कोणी म्हणाले, 'त्यांना चोचीने फाडा.' कोणी म्हणाले, 'त्यांच्या घराभोवतीची सफाई आपण केली नाही की आपोआप तो निरनिराळ्या रोगांनी मरेल.' दुसरे म्हणाले, 'माणसांबरोबर घुबडाला शत्रू मानून त्याचाही नायनाट करावा.' काही जहाल कावळे म्हणाले, 'शिष्टाई शिष्टाईजवळ करावी. दुष्टाजवळ कसली शिष्टाई! तो आपली टर उडवील. आपल्याला दगडाने मारील.' काहींनी सूचना केली की, 'ईश्वराच्या घरी जाऊन आपले गाऱ्हाणे मांडावे.' तेव्हा काही म्हणाले, 'देवाच्या कानी कशाला घालायला हवे ? त्याला सारे दिसते, समजते. त्या सर्वज्ञ, सर्वव्यापी, परमेश्वराला सारे समजते. त्याला आपले दुःख माहीत आहे. तो म्हणेल तुम्हाला मन, बुद्धी, शक्ती सारे दिले आहे.'

अखेर अध्यक्ष म्हणाले, 'परमेश्वराला सर्व माहीत असले तरी आपण एकवार त्याच्याकडे गाऱ्हाणे न्यावे. तो आपला पिता. इतके दिवस आपण त्याच्या नियमांप्रमाणे वागलो. पण आता हे जिणे असह्य झाले म्हणून त्या नियमाबाहेर वागावे लागेल, हे त्याच्या कानी घालावे. त्या विश्वंभराकडे आपल्यातील पाच-सहा मंडळींचे शिष्टमंडळ पाठवावे. जरा वेळ लागला म्हणून काय बिघडले?' त्यांचे म्हणणे सर्वांना पटले.

✦✦✦

स्वर्गाकडे कूच

अध्यक्ष व इतर पाच असे सहाजण ईश्वराकडे निघाले. शिष्टमंडळात तरुणालाही घेतले. कावळ्यांची व यमाची मैत्री. पितरांच्या मध्यस्थीने, मृतात्म्यांच्या वशिल्याने कावळे यमदेवापर्यंत जाऊन पोहोचले. 'आम्हाला त्या राजाधिराजाकडे, जगदीश्वराकडे घेऊन चल.' अशी अध्यक्षांनी यमराजाला विनंती केली व ती त्याने मान्य केली.

यम आपल्या महिषावर आरूढ झाला. सहा कावळे त्याच्या अवतीभोवती उडत चालले. अध्यक्ष जरा वृद्ध. त्यांना यमधर्माने महिषाच्या मस्तकावर बसावयास सांगितले. प्रथम ते बसत ना. सर्वांनी आग्रह केला. 'तुम्ही बसा. तुम्ही वृद्ध आहात. वृद्धांचा मान मानव ठेवीत नसला तरी आम्ही ठेवू.' असे ते पाच कावळेही म्हणाले. शेवटी आग्रहास्तव ते महिषावर बसले. यमाचा रंग काळा, महिषाचा काळा, ते कावळे काळे. एकरूपी, एकरंगी ते होते.

यमधर्म म्हणाला, 'पूर्वी भरतखंड पितृपूजा, वृद्धपूजा यांबद्दल प्रसिद्ध होता. पण आज तेथे वृद्धांना मान नाही. चीन देशात अजून थोडा आहे म्हणतात.'

'यमधर्मा, मानव फार बहकत चालले. आम्ही त्याच्याविरुद्ध बंड करणार आहोत.' तरुणांचा नायक म्हणाला.

यमधर्म म्हणाले, 'तुम्ही पद्धतीप्रमाणे वागा. दुसरा वाईट वागला तरी तुम्ही वाईट नका वागू. मानवांना आज देवाच्या राज्यात किंमत नाही. सारे देवाच्या राज्याबाहेर अंधारात रडत आहेत. त्यांच्यातील मोठमोठे धनिक, सत्ताधीश, अहंकारी लोक दुसऱ्याला

छळणारे, नावे ठेवणारे, स्वत:ची पोटे भरणारे, दुसऱ्यांना रडवणारे, गुलाम करणारे, दुसऱ्याच्या गुलामीत आनंदाने राहणारे, आळशी व परावलंबी सारे बाहेर रडत पडले आहेत. त्यांच्यातल्या थोड्या थोर व्यक्ती देवाजवळ जाऊ शकल्या. त्यांनी पुष्कळ रदबदली केली. देव त्यांना म्हणाला, 'त्यांना शुद्ध होऊ दे. त्या भाईंबद्दल तुम्हाला वाईट वाटत असेल तर तुम्ही पुन्हा जन्म घ्या, पुन्हा आपली बलिदाने द्या, देव त्यांना पुन्हा पुन्हा खाली लोटून देतो. तुम्ही पाहाल मजा.'

कावळ्यांना हे ऐकून आश्चर्य वाटले.

देवाचे राज्य जवळ येऊ लागले. दूर उंच कळस झळकत होते. त्यावर एक दिव्य ध्वजा होती. 'सत्यं-शिवं-सुंदरं' अशी त्यावर अक्षरे होती.

✦✦✦

दुर्दैवी मानव

यमराज, त्यांचा महिष आणि हे कावळ्यांचे शिष्टमंडळ देवलोकात येऊन दाखल झाले. तो त्यांना कोलाहल व आरडाओरडा ऐकू आला. मानवांची अफाट गर्दी दिसू लागली. ईश्वराचे दूत त्यांना भराभर खाली लोटीत होते. तो पाहा एक गयावया करीत आहे. 'अहो, माझ्या मालकीच्या ३० गिरण्या आहेत. हजारोंना मी पोटास दिले. मला घ्या आत.'

'फेका याला, म्हणे हजारोंना खायला दिले. परंतु लाखोंना बेकार केलेस ते ? त्यांना खेड्यापाड्यांतील हवेतून दूर शहरात आणून त्यांचे आरोग्य बिघडवलेस. देवाने दिलेली शरीरे लवकर विदीर्ण केलीस. त्यांना व्यसनात पाडलेस. तू चैनीत लोळलास, पोटाला नको असता खाल्लेस, लोक उपाशी मरत होते आणि तू लाडू जिलब्या झोडीत होतास. लोक थंडीने कुडकुडत मरत होते आणि तू हजारो रुपये कपड्यांत दवडीत होतास. फेका, पाप्याला फेका. हजारो, लाखो मुलाबाळांच्या 'हाय! हाय !' याच्यावर आहेत. दुर्भिक्ष्य, चोऱ्या, अनीती याला हा जबाबदार आहे. फेका.' तो लक्षाधीश चेंडूसारखा फेकला गेला. इतरांची तीच दशा.

ते कोणी मुत्सद्दी आहेत वाटते. ते म्हणत आहेत. 'मी तर राष्ट्राचा फायदा केला. आमच्या व्यापाराला दुसऱ्या देशांत सवलती मिळवल्या. मला देशभक्ताला आत सोडा. मला देवाजवळ जाऊ दे.'

'फेका खाली या करंट्याला. देशभक्त ही तेथे शिवी आहे. दुसऱ्या राष्ट्रांच्या

माना मुरगळल्या, त्यांचे धंदे बसवले, त्यांना गुलाम केले ! आपल्या लोकांचे गगनचुंबी बंगले उठवलेस आणि गरिबांच्या झोपड्यांना आग लावलीस ! ही तुझी देशभक्ती ! हजारोंना मरायला पाठवलेस आणि तू चोरा, मागे राहिलास. देशभक्त म्हणे ! ठेचा याला आधी. अनेक जन्म हा लायक व्हायचा नाही.'

'अहो, मी प्रोफेसर होतो. माझा सात्विक धंदा. मला घ्या आत.' एक प्रोफेसर म्हणाले.

'प्रोफेसर होतास ? मग ज्ञानात काय भर घातलीस ? ज्ञानात किती रंगलास ? ज्ञानासाठी किती वेडा झालास ? नोट्स लिहून दिडक्या मिळवणारा तू. ज्ञानाची विक्री करणारा. तू का आचार्य ? विद्यार्थ्याला उदात्त ध्येय दाखवलेस ? ज्ञान म्हणजे काय थट्टा? ज्ञान म्हणजे जीवनाचे दान आहे. तू काय केलेस ? फेका, फेका या करंट्याला. विद्यार्थ्यांना गुलाम करणारा. 'दुसऱ्याच्या नोकऱ्या करा, मिंधे व्हा' सांगणारा ! जा किड्या. हजारो जन्म खितपत पड. रड. जा.'

'मी वकील होतो. मी न्यायाच्या कामी मदत केली.' एक वकील म्हणाले.

'फेका याला. न्याय म्हणजे काय रे ? पैसेखाऊ चोरा ! भांडणे तू लावलीस. खऱ्याचे खोटे नि खोट्याचे खरे तू केलेस. सदसद्विवेक बुद्धी गुंडाळून ठेवलीस. असत्याची पूजा सुरू केलीस. हा काय न्याय ? गरिबांना लुटून बंगले उभारलेस, त्यांना रडवून पुन्हा त्यांचा हितकर्ता म्हणून मिरवलास. कर तोंड काळे !'

'हे कोण ? यांचे तोंड सांगत आहे हे कोण ते. यांनी स्त्रियांना छळले, रडवले. त्यांना मारले. तोडा याचे हात फेका खाली !'

'मी गरीब कारकून. मी काय करू ?' एक कारकून म्हणाला. 'कारकून ना ? पाप्याला साहाय्य करतो तोही पापीच. फेका यालाही.' देव म्हणाला.

+++

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा
११५४४८ दाखल नं. ______ ग्रंथानुक्रमांक ८५४५५
किंमत २०० पाने २०८

देवाच्या दरबारी

'पाहिलेत हे चित्र! पाहिलीत ही मानवाची दैना ? भाग्यानेच एखादा यातून पलीकडे जातो.'' यमधर्म म्हणाला.

'परंतु आमचे भाईबंधू कोठे आहेत ? चिमण्या, मुंग्या व इतर जीवजंतू कोठे आहेत ?' तरुणांच्या नायकाने विचारले.

'अरे, ते आत देवाच्या राज्यात आहेत. त्यांनी ईश्वराने सांगितल्याप्रमाणे काम बजावले आहे. ज्यांनी कामात अळंटळं केली नाही, त्यांना आत प्रवेश आहे. ते त्या बाजूला काही बैल आहेत. शक्ती असून ते चालत ना, ढोंग करीत. परंतु ते अपवादच. मानवसृष्टीत कायदा न मोडणारा तर मानवतेवर सृष्टीत कायदा न पाळणारा अपवादात्मक. तुम्ही बंड वगैरे करू नका. तुम्ही देवाला प्रिय आहात.'

'ते काही तेजस्वी लोक रडत आहेत. ते एकाच्या अंगातून रक्त येत आहे. कोण आहे ते ?' कावळ्याने विचारले.

'ते सारे संत आणि धर्मसंस्थापक आहेत. तिकडे थोर महंमद पैगंबरांच्या अंगातून रक्त येत आहे. कारण त्यांच्या एका वेड्या अनुयायाने काल दुसऱ्या धर्मीयाच्या अंगात सुरा भोसकला, तो त्यांना येथे लागला. आपल्या अनुयायांचे पातक इथे धर्मसंस्थापकांना भोगावे लागते. ते पाहा, श्रीकृष्ण रडत आहेत. त्यांची मान खाली आहे. त्यांच्या अंगावरही ठायी ठायी जखमा आहेत. गाईला मारलेली प्रत्येक काठी त्यांच्या अंगावर बसते. आणि ते सारखे रडणारे भगवान बुद्ध ! आपण केवढा थोर धर्म

दिला; पण त्यांचे अनुयायी सर्वभक्षक आहेत. त्यामुळे ते रडत आहेत. आणि ते भगवान ख्रिस्त ! युरोप–अमेरिकेतील ख्रिश्चनांचा नंगा नाच पाहून काय करावे त्यांना समजत नाही. हे थोर पुरुष रात्रंदिवस तळमळत असतात. मधून मधून काही संत जगात जातात, परंतु काही जमत नाही. त्यांचा विचार चालला आहे की, ईश्वराला सांगावे, 'आम्हा मानवांना नष्ट कर. आम्ही नालायक आहोत. आमचे नाव पुसून टाक.' परंतु सर्वांचे एकमत होत नाही. पुन्हा पुन्हा आपण जाऊन दिवा पेटवू, असे ते म्हणत आहेत.'

जाता जाता मंडळी आत शिरली. देवाचे अफाट राज्य. तेथे हवा खाऊनच तृप्ती होत होती. तेथे मुंग्या, चिमण्या, मोर, कोकिळा, गाई, बैल दिसू लागले, परमेश्वराच्या मांडीवरही ती जाऊन बसत. देव त्यांना कुरवाळी, विचारी, 'पुन्हा जाता भूतलावर ? माझा मनुष्य बाळ अजून सुधारत नाही. तुमचाच तो भाऊ. तो सुधारेपर्यंत त्याच्या साहाय्याला तुम्ही जायला हवे. तुम्ही जाता का ?'

'हो देवा, हो, तुमची इच्छा प्रमाण. कसे झाले तरी तो आमचा भाऊ. त्याचाही उद्धार झाला पाहिजे. ईश्वरी इच्छेप्रमाणे वागावयास तो शिकला नाही तोपर्यंत आम्ही पुन्हा पुन्हा खाली जाऊ आणि एक दिवस आम्ही सारे तुझ्याजवळ येऊ.'

यमधर्माने ते सहा कावळे ईश्वराजवळ नेले. ते प्रभूच्या पाया पडले. देवाने त्यांचे पंख कुरवाळले. विचारले, 'का रे लवकर आलात?'

'देवा, तुला पाहण्यासाठी. मनाची शंका फेडण्यासाठी परंतु शंका नाहीशी झाली. आम्ही जातो. आमच्यावर सोपवलेली कामगिरी करतो. प्रभू, तुझी इच्छा प्रमाण.'

'जा बाळांनो, मी तुमच्या हृदयांत प्रेरणा ठेवली आहे. त्याप्रमाणे वागा. मोहात पडू नका. दमलात म्हणजे मी परत बोलावीन हो. जा.' असे म्हणून प्रभूने त्यांना निरोप दिला.

यमधर्माचा निरोप घेऊन आमचे सहा दूत परत आले व त्यांनी पाहिलेले दृश्य आम्हास निवेदन केले. आम्ही सर्वांनी, माणूस नाचतो म्हणून आपण नाचायचे, या धोरणाचा स्पष्ट शब्दांत निषेध केला. तरुणांनाही सारे पटले. मनुष्य कितीही नालस्ती करो, आपण प्रभुमय जीवन कंठावे, आपले काम करावे, असे आम्ही ठरवले. आम्ही

सारे आपापल्या प्रांती गेलो. पूर्वीप्रमाणे वागू लागलो. समजलास मुला! मी आता जातो. माझे ते दोन वृद्ध मित्र आजारी आहेत अजून.'' तो कावळा म्हणाला.

''कावळोबा, हा भाकरीचा तुकडा जा घेऊन त्या वृद्ध मित्रासाठी!'' मी त्याला भाकरीचा तुकडा देत म्हणालो.

''ठीक आहे, नेतो. त्या वृद्ध काकांना आनंद होईल. तू नीट वाग. ईश्वराच्या इच्छेप्रमाणे वाग.'' तो म्हणाला.

✦✦✦

आनंदी-आनंद

कावळ्याची सारी हकिकत ऐकून मी लज्जित झालो; स्तंभित झालो. ''सख्या गुरो, हा आणखी तुकडा ने. तूही खा. पाणी पी. मला समाधान होईल. तू मला दिव्य विचार दिलेस. मी कृतज्ञतेने हा तुकडा देतो. घे.'' मी म्हणालो. माझ्या आग्रहास्तव त्याने तुकडा खाल्ला. तो पाणी प्याला. मी त्याला वंदन केले. गेला. कावळा उडाला.

माझ्या जीवनात क्रांती झाली. माझ्या मनातील पशुपक्ष्यांविषयींचे प्रेम शतगुणित झाले. मी तृणा-फुलांवर, किड्या-मुंगीवर प्रेम करू लागलो. चिमण्या-कावळ्यांवर प्रेम करू लागलो. परंतु त्याचबरोबर मानव प्राण्याचा मी तिटकारा करू लागलो. मला मानवाची घाण येऊ लागली. मानवाचा शब्दही ऐकू नये, असे मला वाटे. डोळ्यांवर मी फडके बांधी. कानांत बोळे घाली. मला मानवाचे दर्शन नको वाटे.

पण मी स्वतः मनुष्य होतो. माझा स्वतःचाच मला वीट येऊ लागला. मी भलतीकडेच वाहावत चाललो. काय करावे, मला सुचेना. कधी डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागत. 'देवा, मला मार्ग दाखव.' मी तळमळून म्हणे.

मार्ग जवळच होता. माझ्या आजूबाजूला माझे जे मानवबंधू होते, त्यांच्यावर मी प्रेम करायला लागले पाहिजे होते. मी प्रेम करू लागलो. मला समाधान मिळू लागले. परंतु मी लहान जीव. मी किती देणार, असे मनात येई. मी शुद्ध नाही, मी अहंकारी, मत्सरी आहे, असे वाटे. तरी पण मी निराश न होण्याचे ठरवले. जे करता येईल ते करायचे. प्रत्येकाच्या हृदयात ईश्वराचा सूर आहे. माझ्याही हृदयात तो आहे.

त्याप्रमाणे वागण्याचे मी ठरवू लागलो. अशा रीतीने निराशा कमी होत गेली. शांती मिळू लागली. जीवनात अर्थ आला. जीवनाबद्दल गंभीरता वाटू लागली. जगण्यात आनंद वाटू लागला.

आपण जसजसे सुंदर, तसतशी सृष्टी आपल्याला सुंदर दिसू लागेल, हे तत्त्व मी ओळखले. सारे आपणावरच आहे एकंदरीत !

✦✦✦

दारूबंदीच्या कथा

उदार आनंदराव

सुरगावचे पूर्वीचे वैभव आज उरले नव्हते. एके काळी ते लहानसे खेडे; परंतु गजबजलेले असे. सुरगावचे नाव सर्वांना माहीत. कारण तेथील जमीनदार आनंदराव म्हणजे कर्णाचा अवतार. ते जमीनदार होते; परंतु दिलदार होते, उदार होते. पुन्हा त्यांना नाना प्रकारची हौस. गावात रामनवमीचा मोठा उत्सव असे, पुढे मारुतीजन्मही असे, त्यानिमित्ताने कथाकीर्तन व्हायचे, कुस्त्या व्हायच्या, जत्रा भरायची. आनंदरावांमुळे या सर्व गोष्टींना शोभा असे. ते खर्च करायला मागेपुढे पाहात नसत. अनेकांचे आदरातिथ्य करतील, अनेकांची सोय लावतील.

आनंदरावांकडे घोड्यांची एक जोडी होती. अशी जोडी आसपासच्या पाचपन्नास कोसांत नव्हती. उंच, धिप्पाड, रुबाबदार घोडे; आणि आनंदराव त्या घोड्यांच्या गाडीतून जायचे-यायचे. ते आपल्या गावी परत येताना दोन्ही हातांनी पैसे फेकीत यायचे. रस्त्याच्या दुतर्फा गोरगरीब माणसे त्यांच्या त्या रथाची वाट पाहात बसत. सुरगावला जुनी वेस होती. केवढा उंच दरवाजा ! त्याच्यावर चढून लोक वाट पाहायचे. धूळ उडवीत येणारा तो रथ दूर दिसताच नगारा वाजे आणि गोरगरीब गावाबाहेर दुतर्फा जमत. दरवाजाजवळ ही गर्दी असायची आणि आनंदराव यायचे. मुठी भरून पैसे फेकायचे. लोक ते उचलून घेत. असे हे आनंदराव ! देवाने त्यांना भरपूर दिले होते आणि त्यांनाही सर्वांना द्यायची बुद्धी होती.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

परंतु एकदा ते मुंबईला गेले होते. कोणा लक्षाधीशाकडे उतरले होते. तेथे मोठी मेजवानी होती. मेजवानीत एक पेय होते. कोणते, आहे माहीत ? उंची विलायती दारू ! आणि आनंदरावांना तेथील बड्या लोकांनी दारूचा पहिला पेला दिला. मुंबईच्या मित्राने त्यांना आणखी काही दिवस ठेवून घेतले. आनंदराव दारूचे भक्त बनले. मुंबईहून जाताना ते उंची दारू बरोबर घेऊन गेले.

आणि आता त्यांना ते व्यसन कायमचे जडले. तलफ येताच ते जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी यायचे. अर्देसर शेटजींकडून दारू न्यायचे. ते घरी येताना आता शुद्धीत नसत. पैसे उधळीत येणारा तो उदारांचा राजा, तो आनंदराव आता उरला नव्हता. झिंगलेला आनंदराव चाबकाने घोड्यांना रक्तबंबाळ करीत यायचा.

नशा वाढत चालली, व्यसन बळावत चालले. पैसे पुरत ना. ते सुंदर उमदे घोडे विकले गेले. शेतीवाडी जाऊ लागली. सावकाराचे अपार कर्ज झाले. घरातले दागदागिने, भांडीकुंडी जात चालले. दारूची बाटली ! परंतु त्रिभुवनातील सारी संपत्ती तिच्यापुढे तुच्छ ठरते. त्या संपत्तीला ती गिळून टाकते. आनंदराव भिकारी झाले. त्यांच्या अंगावर आता चिंध्या असत. पायात काही नसे. तो रुबाब, ते तेज, ते वैभव सारे लोपले.

त्यांच्या पत्नीने विहिरीत जीव दिला. कारण सावकार वाड्याचा ताबा घेणार होते. त्या माउलीला ती विटंबना कशी सहन होणार ? जेथे मोती वेचले, फुले वेचली, तेथे शेण वेचायची पाळी आली आणि आईच्या आत्महत्येने मुलगा वामन वेडा झाला. तो आई आई करीत गावोगाव भटकतो.

आनंदराव कोठेतरी बसत, कोठेतरी झोपत. त्यांना घरदार उरले नाही. कधी रस्त्यातून ते अनवाणी जात असायचे. ऊन कडक असायचे. पायांना फोड यायचे. एखादी बैलगाडी जाताना दिसली तर आनंदराव हात जोडून म्हणायचे,

'मला घे रे जरा गाडीत, पाय पोळले रे. घे रे जरा दादा.'

आणि गाडीवानाला दया येई. गाडीवानाच्या डोळ्यांत पाणी येई. हेच ते आनंदराव, उंच घोड्यांची गाडी उधळीत यायचे. पैसे वाटीत यायचे. रस्त्याच्या दुतर्फा गोरगरीब उभे असायचे. गावच्या दरवाजाजवळ तर ही गर्दी असायची ! परंतु आज ? आज त्याच आनंदरावांना, 'मला घेतोस रे गाडीत ?' असे दुसऱ्याला हात जोडून विनवावे लागत होते. 'मला देतो रे दिडकी; दे रे एक बिडी,' अशी त्यांना दुसऱ्याजवळ भीक मागण्याची पाळी आली होती.

दारूपायी आनंदरावांचे सारे सारे गेले, त्यांच्या सोन्यासारख्या संसाराची दैना झाली ! आणि एके दिवशी मनस्वी थंडी पडली होती. पाण्याचे बर्फ व्हायची वेळ आली होती. आनंदराव कोठे आहेत ? त्यांना आहे का निवारा; आहे का पांघरूण ? गावाबाहेरच्या मरीमाईच्या देवळात ते होते. ना पांघरायला, ना अंथरायला. थंडीने ते गारठून गेले. आहे का धुगधुगी ? आहे का प्राण ?

उजाडले. हळूहळू सूर्य वर आला. त्यालाही का थंडी वाजत होती ? परंतु आता ऊब आली. लोक बाहेर पडले. गाईगुरे निघाली. पाखरे उडू लागली. कोणीतरी देवळात आले; तो मरीआईच्या पायाशी आनंदराव पडलेले. तो मनुष्य धावतच गावात गेला. सगळीकडे बातमी गेली. सारा गाव देवळाजवळ जमा झाला. कोणी हळहळत होते, कोणाचे डोळे ओले झाले होते.

इतक्यात 'आई कोठे गेली ? आई ? असे म्हणत वेडा वामन आला. अकस्मात आला. त्याला ती गर्दी दिसली. तो धावत आला.

''माझी आई दाखवा!'' तो म्हणाला.

''तुझा बाप येथे मरून पडला आहे बघ. जरा शहाणा हो. सोड वेड.'' कोणी म्हणाले.

वामन वडिलांकडे बघत राहिला. पलंगावर मऊ गाद्यांवर निजणारे आनंदराव, हजारोंना आधार देणारे आनंदराव, गरिबांचा दुवा घेणारे आनंदराव आज तेथे भणंग भिकाऱ्याप्रमाणे, अनाथाप्रमाणे मरून पडले होते. शेवटी का जगदंबेच्या पायाजवळ त्यांनी क्षमा मागितली ? 'पुढचा जन्म चांगला दे' असे का म्हटले? वामनचे डोळे भरून आले.

''बाबा, तुम्हीही गेलात ?'' असा टाहो फोडून त्याने पित्याला मिठी मारली. परंतु त्याने अश्रू पुसले. त्याचे वेड गेले. जीवनातील नवीन दालन उघडले. तो जमलेल्या लोकांना, नर-नारींना, लहानथोरांना हात जोडून म्हणाला,

''बंधू-भगिनींनो, माझे वेड गेले. माझी स्मृती आली. माझे हे वडील आज येथे अनाथ दीनाप्रमाणे मरून पडले आहेत. ज्यांनी हजारोंच्या अंगावर पूर्वी पांघरूण घातले, ते आज उघडे राहून थंडीत मेले. आपला गाव सावध होवो. आपल्या गावातही दारूचा नवीन गुत्ता आला आहे. माझी तुम्हाला प्रार्थना आहे की गावचा गुत्ता दवडा. सुरगावात कधी दारू येऊ द्यायची नाही, असा संकल्प करा. सुरगाव म्हणजे सुरांचा गाव, देवांचा गाव. दारूचे विष येथे नको. प्रेमाचे अमृत येथे पिको. तुम्ही मला अशा

प्रतिज्ञेची भीक घालीत असाल तर मी या गावात राहीन, मी जगेन. नाहीतर आईबाप गेले त्यांच्या पाठोपाठ मीही जातो. हे आनंदराव, त्यांचे हे दुःखी मरण, दीनवाणे मरण तुम्हाला सांगत आहे, 'नीट जगायचे असेल तर दारूपासून दूर राहा.' करा, या मृतात्म्याला साक्ष ठेवून प्रतिज्ञा करा.''

सारे गंभीर होते. गावची प्रमुख पंच मंडळी म्हणाली, ''आपल्या गावात दारू नको. सुरगावात कधीही दारू नको. ठरले. आनंदरावांचे उदाहरण जळजळीत निखाऱ्याप्रमाणे सांगत आहे. केवढा मोठा पुरुष, त्यांची काय दशा झाली ! या गावात दारू नाही येऊ द्यायची, ठरले ना ?'' सारे हो म्हणाले.

आनंदरावांची प्रेतक्रिया झाली. वामन गावच्या त्या मरीमाईच्या देवळातच राहतो. तो दारूबंदीवर कीर्तने करतो. स्वतःच्या वडिलांची हकिकत सांगतो. कीर्तनात त्याचे डोळे भरून येतात. श्रोते सद्गदित होतात आणि मग कीर्तनात तो विचारतो, ''नाही ना गावात आणणार दारू ? संकल्प करा. हात वर करा'' आणि हजारो हात वर होतात.

तुम्ही सुरगावला गेलात तर तेथे आनंदरावांची ही गोष्ट तुम्हाला ऐकू येईल. वामनही आता जिवंत नाही. त्या आठवणी आहेत. तो जुनाट पडका वाडा आहे. गावाबाहेर ते मंदिर आहे. गावाला पूर्वीची कळा नाही; परंतु काही असले तरी गावात दारू नाही आली. त्यामुळे सुरगावाला अजून मान आहे. आणि नवतरुणांनी, सेवादल सैनिकांनी गावाचे पुन्हा गोकुळ करायचे ठरवले आहे. आनंदरावांच्या गोष्टीचा बोलपट करून तेथील सेवादलाचे सैनिक गावोगाव दाखवणार आहेत. सुरगाव आदर्श करणार आहेत. त्यांना यश येवो.

✦✦✦

दुर्दैवी सीता

सीताचा नवरा गिरणीत होता. तीही गिरणीत काम करी. चिंचपोकळीजवळच्या एका जुनाट चाळीतील एका अंधाऱ्या खोलीत त्यांचा चिमुकला संसार. प्रथम ती कोकणातून मोठ्या हौसेने आली. गावचे लोक म्हणाले, ''सीता, नवऱ्याच्या रोजगारावर चाललीस. जपून राहा मुंबईस. आता ये बाळंतपणाला. बाळंतपणाला मुलखातच यावे.'' सीता लाजली. ती मुंबईला आली. कधी मुंबई तिने पाहिली नव्हती. इकडे तिकडे बघे. मुंबई पाहून तिला आश्चर्य वाटले. मुंबई कोकणचे मायपोट. प्रत्येक घरची दोन-चार माणसे मुंबईला आहेत. मुंबई म्हणे कोणाची ? मुंबई श्रमणाऱ्यांची.

रामाचे सीतेवर खूप प्रेम होते. तो तिला सिनेमाला नेई. त्याने तिला राणीची बाग दाखविली; भुलेश्वर, मुंबादेवी दाखविली; बाबुलनाथ, महालक्ष्मी, हँगिंग गार्डन, सारे दाखविले. सुट्टीच्या दिवशी एकदा दोघे चौपाटीवर गेली. दोघे शिंपा गोळा करीत होती. कोणी मुले वाळूत किल्ले रचीत होती. सीता किल्ला करू लागली. रामा मदत करू लागला. असे दिवस जात होते. त्यांची ती लहानशी अंधारी खोली. तेथे प्रेमाचा प्रकाश होता.

परंतु रामाला आता निराळ्या लोकांची संगत लागली. तो जुगार खेळू लागला. पैसे जाऊ लागले.

''तुम्ही जुगार नका खेळू.'' ती म्हणाली.

''मोठे मोठे खेळतात. त्यात पाप नाही. पैसे मिळतील. मुलखात कौलारू घर बांधू. तेथे राम-सीतेचा जोडा राहील. मग हसशील, खेळशील.'' तो म्हणाला.

''घर बांधतो की वनवास भोगतो, कोणाला माहीत ? पगार तर पुरत नाही.''

''वेडी. अग, पेरल्याशिवाय उगवत नाही. पेरलेला दाणा फुकट गेला असे का म्हणशील ? आधी मनुष्य गमावतो. अनुभवाने शहाणा होतो. मग गेलेले परत मिळते. तुला सोन्याने मढवीन. तुझी मुलं साहेबांच्या मुलांप्रमाणं राहतील.''

''आपली मीठभाकर बरी. साहेबाची ऐट आपल्याला कशाला? मुलखातले लोक आपल्यापासून दूर पळतील. तुम्ही माझं ऐका. नको जुगार.''

''गप्प बस.''

तो उठून निघून गेला. ते तिरस्काराने उच्चारलेले 'गप्प बस' शब्द तिला लागले. तिचे डोळे भरून आले.

''तू गिरणीत कामाला चल उद्यापासून. मी विचारले आहे.''

''मला येईल का काम ?''

''तेथे शेकडो बाया आहेत. मनापासून काम कर. शंभर पाऊणशे पगार मिळेल.''

''आणि तोही जुगारापायी जाईल.''

''बायकांनी चुरूचुरू बोलू नये.''

सीता आज गिरणीत गेली. मुलखातल्या मोकळ्या हवेतून आलेली ती मुलगी. चिमुकल्या अंधाऱ्या खोलीतही आनंदाने राहणारी ती आज गिरणीत गेली. जाताना त्याला भाकर दिलंन, स्वत:ची बांधून घेतलंन. इतर बाया कुजबुजू लागल्या. परंतु एकदोघींनी तिला काम शिकविले. सुट्टीत भाकर खायला ती गेली. जवळची चटणी, कांदा तिने जवळच्या बायांनाही दिला. ती अजून उदार होती. मोकळी होती. सायंकाळी ती दमून घरी आली. चूल पेटवून स्वयंपाक करून ती पतीची वाट पाहात बसली. परंतु त्याचा पत्ता नाही. ती आडवी झाली. तो उशिरा आला. दार ठोठावलं त्यानं. ती उठली. तो शुद्धीत नव्हता.

''जेवायला चला.'' ती म्हणाली.

''मला दारू दे, स्पिरीट दे. म्हणे जेवायला चला. मला दारू लागते, समजलीस! ती पोटभर मला पाज. मिलमधून सारा पगार आण. याद राख.'' तो नशेत बोलला. तिचे अश्रू थांबेनात. ती थकली होती; परंतु तिला भाकरी खाववेना. ती तशीच निजली.

सकाळी तीच शिळी भाकरी घेऊन दोघं कामाला गेली. सीतेचा पगार आला. त्याने ताब्यात घेतला. तिच्या नेसूचे फाटले होते; परंतु कोण घेणार लुगडे ? मागती तर मार खाती. पैसे दारूला हवेत म्हणून धान्याचा काळाबाजार करी. घरात भाकरीला पीठ नाही, भाताला तांदूळ नाही. तो हॉटेलात राईसप्लेट खाई. सीतेला घरी उपवास. आठवड्याला आरंभी दोन-तीन दिवस घरात धान्य असे. पुढे तो ते नेई.

तिला दिवस गेले होते. आता तिला रजा होती; परंतु 'इतक्यात रजेवर कशाला आलीस ?' तो म्हणे नि अंगावर धावे. ती गिरणीत जाऊन म्हणे, ''येऊ द्या मला कामावर !'' तेथील अधिकारी म्हणे, ''कायद्याप्रमाणे ठेवता येत नाही.'' हाल, अपमान, उपासमार, पोटात बाळ वाढवणार कसा ? ती रडे. बाळंतपणाला तिला मुलखात कोण पोहोचवणार ? माहेरी कागद कोण लिहिणार ?

एका इस्पितळात ती बाळंत झाली. तिला मुलगा झाला होता; परंतु बाळाला पाहून तिच्या पतीला आनंद वाटला नाही. कोण वाटणार पेढे ? कोण करणार बाळाचे कौतुक ? दहा दिवस झाले. ती घरी आली.

''मी हा मुलगा अनाथालयात नेऊन देतो. कशाला घरी ब्याद? त्याच्यासाठी पैसे कोठून आणायचे ? माझ्या दारूच्या आड हे कार्टे येईल. मी त्याला नेऊन देतो. घ्या, नाहीतर फेकून देईन असे सांगतो. ती संस्था घेईल.'' तो म्हणाला.

''काय बोलता तुम्ही ? हे बाळ नेणार ? सोन्यासारखे बाळ ! मग मी कोणाला पाजू, कोणाला पाहू ? बाळाला नेणार असाल तर माझे प्राणही घ्या.''

''तुझे प्राण घेतल्यावर दारूला पैसे कोठले ? पोराची कटकट गेली म्हणजे तू कामाला लवकर जाशील. मला पैसे होतील. आण त्या पोराला गुंडाळून. चल आण लक्कन.''

त्याने पोर उचलले. तिने आकांत मांडला. ''गप्प बस. ओरडायचे नाही. वरवंटा घालीन टाळक्यात. गप्प. तुझा पोर काही मरत नाही. जगात वाढेल. घरीच मरायचा, आजारी पडायचा. त्या संस्थेत वाढेल.''

मुलाला घेऊन तो गेला. पहाटेची वेळ. माटुंग्याच्या बाजूला तो गेला. तेथे संस्थेच्या दारात गुपचूप मूल ठेवून तो गेला. देवाचे वारे बाळाला अंगाई गीत म्हणत होते. भूमातेच्या मांडीवर बाळ झोपले होते. अनाथालयाच्या चालकांनी सकाळी ते बाळ नेले. बाळ चिमण्या डोळ्यांनी बघत होते. ते रडू लागले. कोण घेणार, पाजणार?

परंतु संस्थेने काळजी घेतली. ते बाळ सर्वांचे प्रिय झाले, ते फार रडत नसे. जणू शहाणे होते.

ती तरुण माता करुण दशेत होती. तिच्या मातृहृदयाच्या चिंधड्या उडाल्या. तिला अन्न गोड लागेना. बाळाची आठवण येऊन पान्हा फुटे. ती झुरणीला लागली.

"कामाला जा उद्यापासून. बसून बसून मरशील. हात-पाय हलव जरा. जा कामावर." तो म्हणाला. ती मिलमध्ये गेली. तेथे एक नवीन नर्स आली होती. ती म्हणाली, "बाई, इतक्यात नका कामाला येऊ ! दोन महिने झाले का ?" "बाई, नवरा घरी मारील. द्या काही काम सांगा मालकाला." ती म्हणाली. ती नर्स मॅनेजरकडे गेली व म्हणाली, "काही हलके काम द्या तिला."

"तुम्हाला काय गरज ? कायदा आमच्या बोकांडी आहे. जाऊ दे तिला." मॅनेजर म्हणाला.

ती घरी गेली. नवरा बोले, मारी. शेवटी इतर कामगार बाया एके दिवशी त्या नर्सला म्हणाल्या, "ठेवा तिला कामावर. येथे आमच्याजवळचा तुकडा खाईल. घरी नरकयातना आहेत तिला." त्या नर्सने मॅनेजरची समजूत घालून तिला हलके काम दिले. इतर बाया तिला चटणी-भाकर थोडी थोडी देत.

"मूल का गेले ?" त्या बाया विचारीत. तिचे अश्रू उत्तर देत. पगाराचे थोडेतरी पैसे मागे राहावेत, काही खायला घ्यायला होतील तिला वाटले; परंतु पगाराचा कागद होई त्या दिवशी नवरा हजर असे.

त्या महिन्यात तिने खोटेच सांगितले, "मी गेले होते संडासात. पगाराचा कागद मिळाला नाही. दंडही झाला आहे." परंतु त्याने चौकशी केली. ते खोटे होते.

"घरी तर ये सटव्ये, तुझा संडास काढतो." तो गरजला.

त्याने तिला मरेमरेतो झोडपले. सकाळी तिला उठवेना. तो कामाला गेला. ती विव्हळत होती, "देवा नारायणा, मला ने, अंबाबाई, झोळाई, सोमजाई, मला ने." ती म्हणत होती. तो घरी आला. ती निश्चेष्ट होती.

"पुरे ढोंग, ऊठ रांडे" असे म्हणून त्याने लाथ मारली. परंतु हालचाल नाही. काही नाही. त्याने तीव्रपणे पाहिले. तो जवळ बसला.

"मेलीस की काय ?" तो म्हणाला. उठून शेजाऱ्यांना जाऊन म्हणाला. "बायको मेली काय, बघा हो." ते आले. आयाबाया आल्या. कोणी डॉक्टरला आणले.

''मेली'', डॉक्टर म्हणाला.

''हे सांगायची फी हवी का ?''

''तर, मेल्याचे का फुकट सांगू ?''

''तुला पैसे देऊन दारूला काय ?''

डॉक्टर निघून गेला. रामा तेथे बसला होता. रागाने म्हणाला, ''इतक्यात मरायला फावलं तुला. दवाखान्यात तुला पाठवले बाळंतपणाला. त्याचे पैसे तरी फेडायचे होतेस माझे. आणि आता तुला जाळायला कोठून आणू पैसे ? बोल की सटवे!'' शेजाऱ्यांनी सारी क्रिया केली. रामा नुसता बरोबर गेला. तिकडे अनाथालयात आज बाळ रडत होता.

दिवाळीचे दिवस. रामा मुलखात गेला. तुळशीची लग्ने लागली. रामाने नवीन नवरी हेरून ठेवली. ''मार्गसरात येतो. बार उडवतो.'' तो म्हणाला. कोणी त्याला म्हणाला, ''अरे काही कामगार चार-चार बायका करतात. त्यांचा पगार मिळावा म्हणून लग्न. द्यावा ओला- सुका तुकडा, द्याव्या चिंध्या आणि घ्यावा पगार. खेळावा जुगार, बघावा सिनेमा, प्यावी दारू. स्पिरिट. तुला एक बायको मिळायला काय पंचाईत ?'' रामा हसला. तो मुंबईस गेला. आणि म्होरं माघाच्या महिन्यात पुन्हा मुलखात जाऊन नव्या नवरीला मुंबईस घेऊन आला. तीही गिरणीत कामाला लागली. घाण्याला जुंपली गेली. ती पहिली सीता धरित्रीमाईच्या पोटात गेली. आता या दुसऱ्या रमीचे काय होणार ? दारूला नि जुगाराला माहीत ! आणि मुलांची काळजी घेणारे अनाथालय आहेच !

खरेच नको ही दारू. करा तिला दूर.

✦✦✦

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

तारक देवता

दारू म्हणजे राक्षस, दारू म्हणजे सत्यानाश, दारूपायी माणूस माणुसकीला गमावून बसतो. तो गटारात लोळतो, लाचार होतो. नको ही दारू. गणपतरावही सर्वांना तोच उपदेश करतात. ते त्या व्यसनात सापडले होते; परंतु प्रभुकृपेने आणि स्वतःच्या प्रखर निश्चयाने ते त्या व्यसनातून मुक्त झाले.

एकदा गणपतराव एका गावाला दारूबंदीच्या प्रचाराला गेले होते. प्रथम सेवादलाच्या मुलांनी दारूबंदीची गाणी, पोवाडे यांचा कार्यक्रम केला. स्त्री-पुरुषांची तुफान गर्दी जमली होती. मध्येच कोणी उठून उभा राही आणि म्हणे, 'दारू पीना हराम है.' पोवाडे ऐकून एक प्रकारचे नवचैतन्य सर्वांच्या मनात संचारले होते.

आणि आता गणपतराव उभे राहिले. तो साधा पोषाख, ती प्रसन्न कोमल मुद्रा, डोक्याला खादीचा रुमाल होता. अंगावर खादीचे उपरणे होते. ते बोलू लागले. लोक तन्मयतेने ऐकत होते.

"खरेच मी सांगतो की दारूपासून दूर राहा. दारूमुळे छप्पन कोटी यादव आपसांत लढून मेले. या भारतभूमीत दारू नको. दारू सोडता येते. मीही दारू पीत होतो. त्या व्यसनात मीही बुडालो होतो. दारूचे व्यसन अनेक कारणांमुळे जडते. कधी मित्रामुळे, कधी रोगामुळे, कधी दुःखाचा विसर पडावा म्हणून. मला का बरे लागले हे व्यसन ? माझे पोट फार दुखे. नाना उपाय केले; परंतु पोटदुखी राहीना. मरण बरे परंतु नको वेदना, असे होई. एकदा एक मित्र म्हणाला,

'थोडी दारू घेऊन बघा. कदाचित थांबेल वेदना. निदान विसर तरी पडेल.' मला धैर्य होत नव्हते; परंतु एके दिवशी मी त्या दुकानात गेलो. दारू पाहिजे, असे शब्द तोंडातून बाहेर पडत ना. मी तसाच माघारी गेलो. मनाला शरम वाटत होती. संकोच वाटत होता. शेवटी त्या मित्रानेच एके दिवशी ती वस्तू आणून दिली. पहिला पेला पोटात गेला. वेडेवाकडे तोंड केले. परंतु अखेर मला ती सवय लागली. पोटदुखी गेली नाही. हे व्यसन मात्र बळावत चालले.

माझे वडील मोठे कर्मठ. वेदविद्येत पारंगत. ते तिकडे कोकणात एकटेच असत. परंतु त्यांचे वय झाले होते. मी त्यांना माझ्याकडे आणले. ते देवपूजा करीत. लहान नातवाला खेळवीत. परंतु एके दिवशी मी कचेरीत गेलो होतो. घरी वडील काहीतरी शोधीत होते. तो त्यांना ती लपवून ठेवलेली बाटली दिसली. तो ग्लास दिसला. त्यांना ती गोष्ट असह्य झाली. ते दिवसभर बेचैन होते.

मी रात्री घरी आलो.

'जेवायला चला.' मी त्यांना म्हटले.

'मी येथे पाणीही पिणार नाही. मी येथून रात्रीच्या गाडीने जातो. दारू पिणाऱ्याकडे मी कसा राहू ? तू येण्याची मी वाट पाहात होतो. मी वळकटी बांधून ठेवली आहे.' ते म्हणाले.

आणि ते खरेच गेले. माझी धाकटी बहीण शिकलेली होती. एका इंग्रजी शाळेत ती शिकवी. ती एकटीच होती. तिचा सर्वांना आधार. लहानपणीच तिचा पती निवर्तला. व्रती जीवन जणू ती जगत होती. ती सेवामूर्ती होती ! माझे वडील तिच्याकडे गेले. ते तिला म्हणाले,

'तो मुलगा असून नसल्यासारखा. तूच माझा मुलगा. शेवटचे दिवस येथे तुझ्याकडे जावोत.' ते तेथे राहात होते. माझे व्यसन चालू होते. एकदा कचेरीतील ५०० रुपयांचा चेक वटवायला म्हणून निघालो. वाटेत दारू प्यालो. तो चेक कोठे पडला, गेला, कळलेही नाही. फजिती होती. बेअब्रूची पाळी होती. नोकरीही गेली असती. माझ्या बहिणीला मी तार केली की पाचशे रुपये पाठव आणि बिचारीने पाठवले. बहीण सर्वांना आधार देत होती. माझ्यावर तिचे प्रेम होते. मीच तिला शिकवले होते; परंतु मी दारूत बुडालो.

वडिलांना फार वाईट वाटे. त्या पाचशे रुपयांची गोष्ट त्यांना कळली. लवकर डोळे मिटोत असे त्यांना वाटू लागले. ते शेवटी आजारी पडले. त्यांचे मन खचले. ते

अंथरुणाला खिळले. माझ्या बहिणीने रजा घेतली. ती सेवा करीत होती. एके दिवशी वडील तिला म्हणाले,

'गणपतीला बोलव. शेवटचे दोन शब्द त्याला सांगेन. म्हणावं नातवालाही घेऊन ये. त्याला शेवटचे पाहीन.'

आणि बहिणीचे पत्र आले. मी मुलाला घेऊन बहिणीकडे गेलो. वडील अंथरुणावर होते. त्यांनी नातवाला जवळ घेतले. डोळ्यांत पाणी आणून ते म्हणाले,

'तू लहान आहेस. देव तुझा सांभाळ करो. गणपती, अरे नीट वागतास तर या मुलाला काही कमी पडले नसते. परंतु तुझ्याजवळ दिडकी उरणार नाही. प्रभूची इच्छा.'

मी बोललो नाही. वडिलांचे पाय चेपीत बसलो. मी काही वाईट मनुष्य नव्हतो. परंतु एका दारूमुळे सर्वांची मान खाली व्हायला मी कारणीभूत झालो होतो. थोर पितृहृदयाला मी दुखवले होते, जखमी केले होते. ते पाप मला जाळी, ते मला पोळी. परंतु व्यसन सुटत नव्हते.

आणि ती रात्र आली. मी घरातून बाहेर पडलो. खूप दारू प्यालो. रात्रभर जवळजवळ बाहेर होतो. एका मैदानात पडून होतो. बारा-दोनचा सुमार. थंडगार वारा होता. दंवही टपटप पडत होते. मी उठलो. अजून पुरी शुद्ध नव्हती आणि मी घरी आलो. सारे सामसूम होते.

माझ्या बहिणीने दाराला कडी लावली होती. ती वडिलांजवळ बसली होती. दिवा मिणमिण करीत होता. वडिलांची प्राणज्योतही मंदावत चालली होती. मी त्यांच्याजवळ बसलो. मला एकदम रडू आले. मी मोठ्याने काहीतरी बडबडून रडू लागलो. वाड्यातील मंडळींस वडील गेले, असे वाटले. शेजारची स्त्री-पुरुष माणसे दाराशी बाहेर जमली. माझी सत्त्वशील बहीण ! सारे दुःख नि फजिती गिळून ती शांतपणे बाहेर जाऊन त्या लोकांना म्हणाली, 'अजून प्राण आहे. भावाला अनेक आठवणी येऊन त्याला हुंदका आला. निजा तुम्ही. तुम्हाला त्रास झाला.'

शेजारची मंडळी गेली, झोपली. किती करुणगंभीर प्रसंग ! केवढा फजितवाडा! परंतु माझी बहीण धीरोदात्तपणे सारे सहन करीत होती. तोंडाने गीता म्हणत होती; आणि जवळच्या अंथरुणावर मी पडलो.

आता उजाडले होते. वडील शांत दृष्टीने पाहात होते.

'गणपती!' त्यांनी हाक मारली.

'काय ?'

'माझ्या कपाळाला भस्म लाव. तुला लहानपणी रुद्र शिकवला होता. ते रुद्रमंत्र म्हण. ते पवित्र वेदमंत्र ऐकता ऐकता नि मनात म्हणता म्हणता मला मरण येवो.'

'तुम्ही मला क्षमा करा.'

'पिता नेहमीच क्षमा करतो. क्षमा देवाजवळ माग. तो चांगली बुद्धी देणारा.'

त्यांना बोलवेना. मी त्यांच्या कपाळाला भस्म लावले. मी रुद्र मंत्र म्हणत होतो. जवळ बहीण होती. माझा लहान मुलगा तेथे होता. वडिलांनी त्याच्या डोक्यावर क्षणभर हात ठेवला. आणि तेही रुद्र म्हणू लागले. त्यांचा आवाज मंद होत गेला. थांबला. दृष्टी मिटली. मी रुद्र म्हणत होतो. रुद्र संपला. मी वडिलांकडे पाहिले. ते मृत्युंजय शंकराकडे कधीच गेले होते. माझी बहीण मला म्हणाली,

'रडायची वेळ नाही. हे धन्य मरण आहे. परंतु तू प्रतिज्ञा कर की, दारूला शिवणार नाही. तरच त्यांच्या आत्म्यास शांती ! ते तर म्हणाले की, मी क्षमा केली आहे. त्या क्षमेला पात्र हो. कर प्रतिज्ञा.'

ती बहीण नव्हती. ती तारक देवता होती. चुकलेल्या भावाला सत्पथावर आणणारी ती माझी गुरुदेवता होती आणि मी प्रतिज्ञा केली. वडील तर गेले आणि माझी दारूही गेली. पेन्शन घेतल्यापासून मी दारूबंदीचा प्रचार करीत असतो. माझा मुलगा आपल्या पायांवर उभा आहे. मी फकिरी पत्करली आहे. या सेवादलाच्या मुलांबरोबर मी हिंडतो. माझे अनुभव सांगतो. दारू सोडता येते, हे माझ्या अनुभवावरून सांगतो. परंतु प्रखर निश्चय हवा. प्रभूची कृपाही हवी. बंधुभगिनींनो, नको ही दारू. दारूपायी देशाचे दोन-तीनशे कोटी रुपये जातात. हेच पैसे जर तुमच्या संसारात राहिले तर देशाला तेज चढेल. हे दोन-तीनशे कोटी रुपये देशाच्या संसारात खेळत राहतील. कुटुंबात समाधान नांदेल. डोळे रडणार नाहीत, हृदये जळणार नाहीत, हाल-अपेष्टा कमी होतील. संसार सोन्यासारखे होतील. मी अधिक काय सांगू ? गावात दारू ठेवणार नसाल, चोरट्या भट्ट्या नष्ट करणार असाल तर हात वर करा.'' शेकडो हात वर झाले. आणि खरोखरच आसपास सर्वत्र दारूबंदी होऊ लागली. किती छान, किती सुरेख, नाही ?

✦✦✦

सावित्रीचा सुका

"आई, बाबा कधी येतील ?"

"तू नीज रे राजा."

"मी नाही निजत जा. बाबा मला खाऊ घेऊन येणार होते, चेंडू आणणार होते. रबरी चेंडू."

"खाऊ आणला तर सकाळी खा. चेंडू त्यांनी आणला तर सकाळी खेळ. कोण नेणार आहे तुझा खाऊ, तुझा खेळ ? नीज. तुझे डोळे झोपेस आले आहेत."

आणि बाळ झोपला. सावित्री वाट पाहात होती. नाही नाही ते विचार तिच्या मनात येत होते. तिच्या नवऱ्याचे नाव सुका. कोठून त्याला दारूचे व्यसन लागले हरी जाणे ! ती माहेराहून लहान बाळाला घेऊन आली. तो ते नवीन प्रकार दिसले. ती एक रात्र तिला आठवली. भयंकर रात्र ! सुका घरी तर्र होऊन आला होता. त्याला आणखी पैसे हवे होते. "तुझ्या आईने दिले असतील. तू एकटी पोर तुझ्या आईची. दिले होते की नाही पैसे ? दे ते पैसे." असे म्हणून तो दरडावीत होता.

"पैसे संपले. बाळाला दूध लागते. अंगावर दूध नाही. नाही पैसे. बाळाला आता दूध कोठून ?" ती म्हणाली.

"तुझ्या बाळाला दूध हवे आणि बाळाच्या बापाला दारू नको?" असे म्हणून तो पाळण्याकडे धावला. तिने त्याला लोटले दूर ! ती तरुण माता

नागिणीप्रमाणे चवताळली होती. तो कोपऱ्यात पडला. तिला वाटले त्याला झोप लागली आणि तिचाही पुढे डोळा लागला; परंतु एकदम ती दचकून उठली. बाळ रडला असे तिला वाटले. ती पाळण्याजवळ गेली. कोठे आहे बाळ ? बाळ नाही. ती घाबरली. बाळाला घेऊन पती कोठे गेला ? मध्यरात्र होऊन गेली होती. एकाएकी तिला काही शब्द आठवले. ती घरातून बाणाप्रमाणे बाहेर पडली.

कोठे जात होती ती ? सर्वत्र सामसूम होते. मध्येच कुठे कुत्रे भुंके, गाढव ओरडे. तिला भान नव्हते. ती पाहा नदी वाहत आहे, जणू अखंड प्रार्थना म्हणत आहे. तिला कोणीतरी नदीकडे जात आहे असे दिसले. तिच्या पायांत वाऱ्याची गती आली. तिने गाठले त्याला. तिने त्याचा हात पकडला.

"माझे बाळ द्या." ती ओरडली.

"ते माझे आहे." तो म्हणाला.

"देता की नाही ? कोण आहात तुम्ही ? राक्षस की काय ? कोठे चाललात बाळाला घेऊन ?"

"नदीत बुडवायला."

"तुमची जीभ झडत कशी नाही ?"

"अधिक बोलू नकोस. तुलाही नदीत फेकीन."

"द्या माझे बाळ."

"दूर हो मुकाट्याने, नाहीतर गळा दाबीन."

तिने त्याच्या हाताला कडकडून चावा घेतला. बाळ खाली पडले. तिने पटकन् उचलले. बाळ रडत होते. मऊ मातीत ते पडले होते. ती त्याला घेऊन निघाली. तो सैतानाप्रमाणे धावून आला. तिने बाळ खाली ठेवले आणि त्याला दूर लोटले. पलीकडे खळगा होता. तो त्यात पडला. ती मुलाला घेऊन पळत निघाली. पाठीमागे बघत नव्हती. आले एकदाचे घर आणि तिचे डोळे गळू लागले. ती बाळाला पाजीत होती. मृत्यूच्या तोंडातून परत आलेले बाळ ! तिच्या स्तनांत अपार पान्हा दाटला होता. बाळ पीत होता. पिता पिता झोपला. तिने त्याला पाळण्यात ठेवले; आणि ती पतीची वाट पाहात बसली. तो येईल असे तिला वाटे. परंतु पहाट झाली तरी पत्ता नाही. कोंबडा आरवला. गावात हालचाल सुरू झाली.

कोठे जाते वाजत होते. दळणाच्या ओव्या कानांवर येत होत्या. दाराला कडी लावून सावित्री निघाली. लगबगीने ती आली. त्या जागेपाशी आली. सुकाचे डोके दगडावर आपटले होते. तो तिरमिरीत येऊन तेथे पडला होता. ती त्याच्याजवळ बसली. तिने पदर फाडून जखम बांधली. तिने त्याला सावध केले, उठविले. हात धरून ती त्याला घरी घेऊन आली. तिने अंथरुणावर त्याला निजविले. तिने देवाचे आभार मानले.

आता चांगलेच उजाडले होते. सावित्रीने भांडी घासली, पाणी आणले. चूल पेटवून तिने भाकरी केली.

''उठा, भाकर खा.'' ती सुकाला म्हणाली.

''बाळ कोठे आहे ?'' त्याने विचारले.

''पाळण्यात आहे.''

''पाळण्यात आहे की पाण्यात ?''

''असे काय वेड्यासारखे बोलता ? बाळ पाळण्यात आहे.''

''खरेच ?''

''हो खरेच.''

इतक्यात पाळणा हलू लागला. मुलाने नेत्रपुष्पे उघडली होती. तिने त्याला उचलून जवळ घेतले. सुका अंथरुणावर बसला होता.

''बघा हसतो आहे.'' ती म्हणाली.

''दे, मी घेतो.'' तो म्हणाला. त्याचा हात दुखत होता; त्या हातावर तिचे दात उठले होते.

''माझ्या डोक्याला काय लागले ? हाताला काय झाले ?'' त्याने विचारले.

''मागून सांगेन.'' ती म्हणाली. तिचे डोळे भरून आले. ती बाळाला तेथेच ठेवून चुलीजवळ गेली. ती भाकरी करीत बसली. सुकाने मुलाचे मुके घेतले. नंतर त्याला पाळण्यात ठेवून तो हातपाय, तोंड धुवून आला. तो तेथे बसला. त्याने भाकर खाल्ली.

''सांग मला सारे.'' तो म्हणाला.

''या बाळाची शपथ. आजपासून दारू नका पिऊ. शपथ घ्या. मग सारे सांगेन.'' ती म्हणाली.

तिने त्याला सारी हकिकत सांगितली. तो मुलाकडे पाहात होता. त्याने त्यास एकदम उचलून घेतले नि हृदयाशी घट्ट धरले.

''उदंड आयुष्याचा हो.'' तो म्हणाला.

काही दिवस बरे गेले. परंतु दारू कमी झाली तरी सुटली नाही. एखादे वेळेस तालुक्याच्या ठिकाणी तो बाजाराला म्हणून जाई आणि तिकडेच झिंगून पडे. कोणी गावकरी गाडीत घालून त्याला आणीत. दारू पिणाऱ्याच्या घरी सदैव चिंता, शाश्वती कशाची नाही. आज सावित्री तशीच काळजीत होती.

गाडी जोरात येत होती. घरी जायचे म्हणून बैल पळत होते.

घंटा घणघण वाजत होत्या. रस्त्यात अंधार होता. तो गाडीवानाला रस्त्यात काहीतरी पांढरे दिसले. त्याने कासरा खेचला.

''कोणीतरी रस्त्यात पडले आहे.'' तो म्हणाला. व्याख्याते, गाडीवान, व्याख्यात्यांना नेण्यासाठी आलेले मित्र सारे खाली उतरले. रस्त्यात ती व्यक्ती बेशुद्ध पडली होती.

''हा तर सुका, सावित्रीचा सुका. पुन्हा दारू पिऊन आला.'' गावकरी म्हणाले. ''आपली गाडी त्याच्या अंगावरून जाती तर तो मरता. गाडीवानाला दिसले काहीतरी. त्याने बैल थांबवले म्हणून वाचला.'' व्याख्याते म्हणाले.

''सावित्रीच्या बांगड्यांचा जोर.'' कोणी म्हणाले.

त्यांनी सुकाला उचलून गाडीत ठेवले. कोणी पायी चालू लागले. आणि गाडी एकदाची गावात आली. व्याख्याते तडक सभेकडे गेले. सुकाला घरी पोहोचविण्यात आले. सावित्रीचा जीव खाली पडला.

व्याख्यात्यांनी सभेत दारूबंदीवरच जोर दिला. ते ताजे उदाहरण होते. ''गावात दारू नका ठेवू. दारू म्हणजे दुःख, दारू म्हणजे संकट. दारूमुळे धर्म बुडतो, माणुसकी जाते, कर्ज होते, संसाराचा विचका होतो. दारू म्हणजे जिवंतपणाचा नरक'' – पुष्कळ ते बोलले. सकाळच्या वेळी दुसऱ्या दिवशी व्याख्याते सुकाच्या घरी गेले. सुकाने प्रणाम केला. सावित्री पाया पडली.

''तुमची कृपा म्हणून कुंकू राहिले.'' ती स्फुंदत म्हणाली.

''कृपा देवाची. परंतु आजपासून दारू पिणार नाही अशी यांनी शपथ घ्यावी. संकल्प करावा. हा महात्माजींचा फोटो येथे मी लावतो. त्याला साक्ष ठेवून प्रतिज्ञा करा.'' व्याख्याते म्हणाले.

शेवटी सुकाने महात्माजींच्या फोटोस साक्षी ठेवून शपथ घेतली. त्याची दारू सुटली. त्याच्या घरात हल्ली आनंद आहे. त्याचा मुलगा राजीव मोठा झाला आहे. दर शुक्रवारी महात्माजींच्या फोटोस तो हार घालतो व 'आम्हा सर्वांस सद्‌बुद्धी द्या', अशी प्रार्थना करतो.

✦✦✦

मोदगावची कहाणी

एक आटपाट गाव होते. त्याचे नाव मोदगाव. मोदगाव म्हणजे आनंदाचे गाव. सारे सुखी होते. कधी भांडण नाही, तंटा नाही. एकमेकांस मदत करीत. भाऊ भाऊ म्हणून सारे नांदत.

परंतु कोणीतरी त्या गावात दारू आणली. नवीन वस्तू ! हळूहळू तिचे व्यसन लागले. गावात रोज उठून मारामारी नि कटकटी. स्त्रियांचे अश्रू संपत ना. मुलांचे हाल थांबत ना. गावाचे वैभव लोपले. गाव भिकारी झाला. शेते नीट पिकत ना. झाडांवर फळे नीट येत ना, गुरे दूध देतनाशी झाली. विहिरी आटू लागल्या. गावात पाप फार झाले.

तो पाहा. एक मुलगा दीनवाणा आहे. आई मरून गेलेली. बाप दारुडा. मुलगा त्या शेतात पडला आहे. नाही खायला, नाही ल्यायला. पहाटेची वेळ झाली. आकाशात कृत्तिकांचा पुंजका दिसत होता. कोठून तरी सुगंध आला. मुलगा जागा झाला, तो एका रथातून देवता जात आहे असे त्याला दिसले.

"थांब, आई जगदंबे!" तो रथापुढे होऊन म्हणाला. "काय रे बाळ ?" ती विश्वमाता म्हणाली.

"आई, आमच्या गावाची अशी का दशा ? शेते-भाते पिकत नाहीत. गाई दूध देत नाहीत. आम्हा मुलांना खायला नाही. आयाबाया रडतात. मोठी माणसं भांडतात. का हे असे ?"

“तुमच्या गावात दारू आली. जेथे दारू असते, तेथे मी भाग्य ठेवीत नाही. रात्रंदिवस सेवा करणाऱ्या आयाबाया, त्यांच्या डोळ्यांतून, जेथे अश्रू गळतात. त्या गावाला मी शाप देते.”

“आमचा गाव दारू सोडील तर ?”

“पुन्हा भाग्य येईल. मोदगाव पुन्हा मोदाने, आनंदाने भरल्या गोकुळासारखा गजबजेल.”

“आम्ही तसे करू, आई.”

“करा. पुन्हा उतू नका, मातू नका.”

मुलाने प्रणाम केला. भाग्यदेवतेचा रथ गेला. मुलगा तेथेच झोपला. आता उजाडले. पाखरांनी त्याला जागे केले. सूर्यकिरणांनी गुदगुल्या केल्या. तो उठला, गावात आला. सांगू लागला की, “मला देवता भेटली.” त्याच्याभोवती सारा गाव जमला. ती वार्ता ऐकून मायबहिणींचे डोळे भरून आले. एक म्हातारी म्हणाली, “खरे आहे पोराचे म्हणणे. गावातील दारू दूर करा. पुन्हा सर्वांचे संसार सोन्यासारखे होतील.”

त्रिपुरी पौर्णिमा जवळच होती. त्रिपुरासुरास शंकराने जाळले. शरीर, हृदय, बुद्धी या तिन्ही पुरांना व्यापणाऱ्या दारूच्या असुराला नष्ट करायचे लोकांनी ठरविले. त्रिपुरी पौर्णिमेला दारूचा पुतळा करून लोकांनी वाजतगाजत गावाबाहेर नेला नि जाळला आणि परत येताना भाग्यदेवतेची पालखी मिरवत आणली. सारा गाव लतापल्लवांनी शृंगारला होता. सर्वजण रात्री टिपऱ्या खेळले. गोफ विणला. ऐक्य-देवतेची गाणी म्हटली. प्रतिवर्षी त्रिपुरी-पौर्णिमेला दारूचा पुतळा जाळतात. भाग्यदेवतेचा उत्सव करतात. त्या दिवशी सारे प्रतिज्ञा करतात, ‘गावात दारू आणणार नाही. कोर्टकचेरीत जाणार नाही. गावात ज्ञान, उद्योग, प्रेम, स्वच्छता आणू.’ आणि पुन्हा त्या गावात भाग्य आले. मोदगाव मोदाचा झाला, तेथील लोक सुखी झाले तसे आपण सारे होऊया !!!

✦✦✦

साक्षरतेच्या कथा

पैलगडची रमी

ती पांहा अंधारी खोली. कोण राहते त्या खोलीत ? कोण राहणार ? गरिबाशिवाय कोण राहणार ? रमी राहते तिथे. तिचा एक मुलगा तिकडे मुंबईला गिरणीत काम करतो. तो रमीला पैसे पाठवतो. परंतु त्या पाचदहा रुपयांवर थोडाच संसार चालणार ? घरात आणखी चार मुले आहेत. नवरा मरून दोन वर्षे झाली. रमीवर सारा भार. वडील मुलगा मुंबईला गेला. फार मोठा का तो? मोठा कुठला ? सतरा-अठरा वर्षांचा असेल. परंतु आईला म्हणाला, ''जातो मी. तेवढंच एक तोंड पोसायला कमी होईल. या भावंडांना काही पाठवीन.'' आणि तो खरेच पाठवी.

रमी मजुरी करी. शेतात जाई. खानदेशातील तो उन्हाळा. परंतु गरिबाला ना उन्हाळा, ना हिवाळा. थंडीत त्याने कुडकुडावे, उन्हात त्याने करपावे. रमीची दहा-बारा वर्षांची मुलगी. तीसुद्धा कामाला जात असे. गरिबाच्या मुलांना लवकर मिळवते व्हावे लागते.

घरी मुलांना भाकरतुकडा करून ठेवून रमी कामाला जायची. ती असे कामात, परंतु लक्ष पोरांकडे असायचे. एके दिवशी कामावरून आली तो तिची मोठी मुलगी तापाने फणफणलेली; फाटकी घोंगडी पांघरून पडून होती.

''बाबी, काय गं होतं ?'' रमीने विचारले.

''ताप भरला आई. कामावरून कशीतरी घरी आले. बस माझ्याजवळ.'' ती म्हणाली.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

आठ दिवस झाले. बाबीचा ताप हटेना. रमीला कामाला जाता येईना. घरात विष खायलाही दिडकी नाही. तिकडे वडील मुलाची नोकरीही सुटली होती. कोठून पाठविणार तो पैसे ? कसे दवापाणी करावे ? कोठून मोसंबे आणावे ? गरिबांची दैना आहे.

त्या भागाला पैलाड म्हणत. सारी गरिबांची वस्ती. सकाळी सातनंतर कोणी घरात नाही सापडायचे. लहान मुले, कुत्री ही असायची गावात. बाकी गेली सारी कामाला.

आज दुपारच्या वेळेला एकदम टपालवाला आला. ''रमी, कोण आहे रमी?'' म्हणत आला. रमी मुलीच्या डोक्यावर हात ठेवून बसली होती. डोळ्यांतून पाणी घळघळत होते.

''मी रमी, भाऊ.'' ती म्हणाली.

''किती शोधायचं! नीट पत्ता नाही. मनिऑर्डर आहे. पैसे आले आहेत.''

''पोरानं पाठवले, होय ना !''

''पोरानं का चोरानं मला नाही माहीत.''

''तो पूर्वीचा टपालवाला मला ओळखी. तुम्ही नवीन आलात वाटतं ?''

''तो गेला बदलून. सही करा.''

''मी कोठून सही करणार ? आम्हाला का लिहिता येतं, दादा?''

''अंगठा द्या. इथं कोणाची तरी साक्ष हवी. कोणाला बोलवा.''

रमीने शेजारी इकडे-तिकडे पाहिले. कोणी चिटपाखरू नाही.

''दादा, सारे कामाला गेले. कोणाला आणू ? द्या पैसे. माझेच आहेत. पोर तापानं फणफणली आहे. मोठ्या डॉक्टरला आणीन; त्याला देईन हे पैसे.''

''साक्षीशिवाय कसे देऊ ? मी चाललो.''

''उद्या आणाल का भाऊ ?''

''या खेड्यात दोनदा येतं टपाल आठवड्यातून. उद्या कसा मी येणार ? आता चार दिशी. मी जातो. मला तुझंच एकटीचं घर आहे का म्हातारे ?''

तो टपालवाला निघून गेला. त्याला आणखी गावे घ्यायची असतील. रमी रडू लागली. पोराने पोटाला चिमटे घेऊन पैसे पाठवले; परंतु मिळत नाहीत ! आपले असून मिळत नाहीत. म्हणे सही कर, आम्हाला का लिहा-वाचायला येते ? असे मनात म्हणत ती पोरीजवळ जाऊन बसली.

तिसरा प्रहर झाला. तो कोण आला मुलगा ? त्याच्या भोवती ती पाहा लहान मुलांची गर्दी. कोणाला चित्रे देत आहे. कोणाला खट्टीमिठी लिमलेटची वडी. तो एकाला म्हणाला,

''अरे, तुझ्या हातांना ही खरूज आहे. थांब, हे मलम चोळतो. रोज हात धुऊन ते लावीत जा.''

''माझे डोळे बघता का ?''

''बघू ? लाल झाले आहेत. पुढच्या वेळेस औषध आणीन हं.''

''त्या रमीकडे येता ? तिची मुलगी बाबी फार आजारी आहे.''

''दाखवा घर.''

रमेश रमीच्या घरी आला. मुलीजवळ माय बसली होती.

''आई, हा गांधी आला आहे बघ.''

''कोण रे बाबा तू ?''

''मी सेवा दलातला मुलगा. आम्ही खेड्यातून पाळीपाळीनं औषधं वगैरे घेऊन हिंडायचं ठरवलं आहे. काय होतंय मुलीला?''

''ताप, भारी ताप ! आणि डॉक्टर कोठून आणू ? आज पोराचे पैसे आले होते, म्हटलं की डॉक्टर आणीन सोनगावचा. परंतु पैसे मिळाले नाहीत.''

''का नाही मिळाले ?''

''सही करता येत नाही. साक्षीला माणूस भेटेना. गावात शाळा नाही. मास्तराची साक्ष घेतली असती. तो मागचा टपालवाला मला ओळखी. कोणाची तरी साक्ष घेई. हा नवा माणूस. पैसे येऊनही मिळाले नाहीत.''

''आई, मी डॉक्टर घेऊन येईन. बरी होईल मुलगी. परंतु तुम्ही सर्वांनी शिकलं पाहिजे.''

''कधी शिकायचं दादा ?''

''रात्री घटकाभर. मी येथे रात्रीची शाळा काढीन. तुम्ही याल?''

''मी येईन, माझी पोरं येतील. आम्ही सारी शिकू. माझ्या पोराला मग मी कागद लिहीन. तोही मुंबईला शिकतो आहे. पैसे येऊन मिळाले नाहीत ! शिक्षण नाही म्हणजे सारं फुकट !''

रमेश दुसऱ्या दिवशी डॉक्टरांना घेऊन आला. औषध मिळू लागले. बाबी बरी झाली. रमेश त्या गावीच येऊन राहिला. लहानसा गाव. त्याने तेथे शाळा काढली. सायंकाळी मुलांना शिकवी. रात्री मोठ्यांना. एके दिवशी पुरुष मंडळी येत; एके दिवशी आयाबाया. बाबी आणि तिची आई सगळ्या बायकांना बोलवायच्या. गावात सेवादल आले; स्वच्छता आली; साक्षरता आली. छोटे उद्योग येऊ लागले. रमेशला सारे दुवा देत. सेवादलाला दुवा देत. परंतु रमेश म्हणायचा, ''बाबीच्या आईला सारं श्रेय ! ती म्हातारी शिकायला उभी राहिली. तिच्यामुळं गाव तयार झाला, शिकल्यावाचून गती नाही, म्हातारीला पटलं. ज्ञान म्हणजे भगवान ! लिहिणं वाचणं हवं. नाहीतर पदोपदी अडतं. लिहिता-वाचता येणं म्हणजे आजकाल मोठा आधार असतो.'' असे म्हणून रमेश गाऊ लागे व मुलेही म्हणू लागत –

शिकू शिकू
शिकू शिकू
स्पर्धेमाजी आम्ही टिकू ।।
जो न शिके
जो न शिके
आनंदा तो मूर्ख मुके ।।
शिका शिका
शिका शिका
संसारी मिळवाल सुखा ।।

गाणी गात मुले नाचू लागत.

+++

भीती पळणारा मंत्र

त्या गावच्या माळणी भाजीपाला घेऊन जेथे जेथे आठवड्याचा बाजार भरे तेथे तेथे जायच्या. मोठ्या उद्योगी नि मेहनती. जड टोपल्या घेऊन त्या चार चार कोस जायच्या. दिवे लागायला घरी परत यायच्या. मग चूल पेटवून भाकरी-तुकडा करीत. मुलांना जरा जवळ घेत.

पाचोऱ्याचा आठवडी-बाजार म्हणजे यात्राच असे. जिकडे तिकडे दुकानेच दुकाने ! एका बाजूला आपापल्या पाट्या घेऊन माळणी बसायच्या. आज त्या माळणींच्या रांगेत एक माळीदादाही भाजी घेऊन बसला होता. माळणी कुजबुजत होत्या; परंतु आता बोलायला सवड नाही. गिऱ्हाईकांची ही पाहा गर्दी ! भाजी खपत आहे. पैसे जमत आहेत. वांगी, रताळी, घेवडा, गवार, कोबी, फुलवर, मेथी, चुका – नाना प्रकार येथे आहेत. कोथिंबिरीचा घमघमाट सुटला आहे.

इतक्यात, तो पाहा, एक मोठी पिशवी घेऊन आलेला मनुष्य भराभर हवी ती भाजी उचलीत आहे. चार वांगी घे, चार रताळी घे. कोथिंबिरीची जुडी उचल, लिंबे उचल असे त्याने चालवले आहे. कोण आहे तो ? माळणी त्याला 'घे बाबा नि जा' असे म्हणत. काय करतील बिचाऱ्या ? त्या माणसाचा काय हक्क त्या भाजीवर ? जणू त्याची ती कायमची वतनदारीच दिसत होती. त्या माळणी जणू त्याच्या साता जन्माच्या देणेकरी !

तो मनुष्य त्या माळीदादाजवळ आला. त्याच्याजवळ कोवळे लुसलुशीत मुळे होते. त्या माणसाच्या तोंडाला पाणी सुटले ! त्याने एक जुडी उचलली.

''खाली ठेवा ती जुडी. फुकट घ्यायचा काय अधिकार ? घेऊ नका जुडी. ठेवा खाली.'' माळीदादा म्हणाला. माळणी बघत होत्या. त्यांना आश्चर्य वाटले. आता काय होते, म्हणून त्या बघत होत्या. त्या बायांदेखत झालेला हा अपमान त्या माणसाला सहन झाला नाही. आजपर्यंत कोणी त्याला असे बोलले नव्हते. तो ऐटीने म्हणाला,

''खाली ठेव म्हणतोस ? ही दुसरी घेतो बघ. तू मला कोण समजतोस ?''

''तुम्ही पोलीसदादा आहात.''

''याद राख.''

''याद तुम्हीच राखा. आता लोकांचं राज्य आहे. असं गोर–गरिबांना सतावणं बरं का ?''

''तुझं व्याख्यान मला नको.''

''कुंपणच शेत खायला लागलं तर दादा, शेतानं कोणाकडे जायचं ? तुम्ही प्रजेला सांभाळायचं, तर तुम्हीच लुटायला लागलात? इतके दिवस चालली मिजास. आता नाही चालायची भाऊ. काळाप्रमाणं वागा. हा नवा जमाना आलाय.''

''गप्प बस. आला शिकवायला !''

त्या माळीदादाने खिशातून डायरी काढली. त्या डायरीला लहानशी पेन्सिल बांधलेली होती. पोलीस बघत होता. माळणीचे इकडेच डोळे होते. इतर लोकही थबकले. सर्वांना आश्चर्य वाटत होते. माळीदादा पोलीसदादाला म्हणाला,

''तुमचं नाव सांगा. मला टिपून घ्यायचं आहे. मी वरती उद्या अर्ज टाकतो, प्रेमानं मागून घेतलीत थोडी भाजी तर निराळी गोष्ट. महागाई असते. तुम्हाला पगार कमी असेल. परंतु अशी अरेरावी ? हे नाही चालायचं. नाव सांगा.''

पोलीस जरा घाबरला. त्याने मुळ्याच्या जुड्या खाली ठेवल्या. त्याने माळणींची भाजीही तेथेच टाकली.

''जातो दादा. धडा शिकवलास. स्वराज्याचा अर्थ शिकवलास. अर्ज नको करू. नाव कळवू नको. पुन्हा मी येणार नाही.'' पोलीस नम्रपणे म्हणाला.

''रागावू नका, पोलीसदादा, आपण सारे भाऊ. न्या ही जुडी, खरंच न्या. परंतु अशी कोणाची भाजी उचलू नका.'' माळीदादा सौजन्याने म्हणाला. त्याने त्याला मुळे घेऊन जायला प्रेमाने भाग पाडले, पोलीस गेला. बाजार चालू होता. संध्याकाळ झाली. माळणी गेल्या. माळीदादा गेला.

आठवड्याच्या बाजाराला तो माळीदादा नेहमी यायचा; परंतु आता पोलीस कधी फुकट भाजी उचलायला आला नाही. त्या माळणींना नवल वाटे. एकदा माळणींनी माळीदादाला विचारले !

"का रे भाऊ, आता भाजी उचलायला ते येत नाहीत. तू काय मंत्र म्हटलास ? कोणती जादू केलीस ?"

"माझ्याजवळ एकच मंत्र होता."

"कोणता मंत्र ?"

"नाव टिपून घेतो म्हटल्याबरोबर अशी माणसं भितात. आता स्वराज्य आहे. त्रास कोणी देईल तर वरती लिहून कळवावं. ज्ञानाचा मंत्र ! तुम्हा बायांना लिहिता-वाचता येत नाही. शिका आता."

"आम्ही का शिकायचं ?"

"तुम्ही का माणसं नाही आहात ? प्रत्येक माणसानं शिकायला हवं. स्त्रिया स्वराज्याच्या लढ्यात तुरुंगातसुद्धा गेल्या. त्या का मागे राहिल्या ?"

"खरं आहे रे भाऊ. त्या जळगावची अनसूया, तिनं झेंडा लावला चावडीवर ! आम्ही शिकू, पण कोण शिकवणार ?"

"सेवा दलाची मुलं शिकवतील. सेवा दलातील मुली शिकवतील. आमच्या गावची जमनी वर्ग घेते, तिला मी सांगेन, तुम्ही शिकाल ?"

"शिकू, आम्ही शिकू."

"छान. आपण जर शिकू तरच स्वराज्य टिकेल, नि सगळ्यांच्या सुखाचं ते होईल. शिकल्यानं भीती जाते, सारं समजू लागतं. ज्ञान म्हणजे भगवान."

"किती चांगलं बोलतोस तू दादा!"

"जमनी येईल हं तुमच्या गावाला. तुमचं गाव कोणतं ?"

"आम्ही बिल्दीच्या."

आणि खरेच, सेवादलाची जमनी बिल्दीस जाऊ लागली. मायबहिणी शिकू लागल्या. त्या सभेत बोलत. व्याख्यानांची त्या टिपणे ठेवीत. बिल्दी गावात कोणी निरक्षर राहायचे नाही, असे गावकऱ्यांनी ठरवले आहे. त्यांचा संकल्प पुरा होवो !

+++

ज्याला ज्ञान, त्याला मान

पंढरपूरची कार्तिकी यात्रा जवळ आली होती. वऱ्हाड-खानदेशकडे भोळा भक्तिभाव फार. हजारो यात्रेकरू पंढरीच्या यात्रेला जातात. हजारो वारकरी निघतात.

ते एक लहान स्टेशन होते. ते पाहा शेतकरी. ते वारीला निघाले आहेत. खांद्यावर पताका आहेत. हातात टाळ आहेत. कोणाजवळ वीणा आहे. धुळे-चाळीसगाव रेल्वे लाईनवरचे ते स्टेशन. जामदे त्याचे नाव. गाडीची वेळ होत आली. घंटा वाजली.

"दे रे भाऊ लवकर तिकीट. गाडी येईल, दे."

"पैसे आहेत का ?"

"आम्ही का फुकट मागू तिकीट ? फुकट नको कुणाचं. आम्ही शेतकरी. आम्ही जगाला पोसू. कोणाचं फुकट नको आम्हाला. दे लवकर तिकीट. चार तिकिटं दे."

"वीस रुपये मोजा."

"वीस ?"

"हो, वीस."

"एका तिकिटाला पाच रुपये ?"

"हो ! हो !! हो !!!"

"मागं तर कमी होतं !"

"आता वाढले. तुमच्या आजोबाच्या वेळेस आगगाडी तरी होती का ? सारखं बदलतं सारं ! मोजा वीस रुपये."

''घ्या. काय करायचं ? सारीच महागाई ! पोटाला कमी खाऊ पण देवाला बघून घेऊ ! विठ्ठलाच्या पायांवर डोई ठेवून येऊ. द्या तिकिटं. घ्या या चार नोटा पाचा-पाचाच्या.''

चार तिकिटे घेऊन शेतकरी फलाटावर उभे होते. भगभग करीत गाडी आली. गाडीत ही गर्दी ! परंतु कोणीतरी त्यांना आत घेतले. कोण होता तो ?

''दादा, तू होतास म्हणून ही तंबोरी फुटली नाही. नाहीतर ती खाली पडती. वाडवडिलांची ही तंबोरी !'' शेतकरी म्हणाला.

''तुम्ही एखादा अभंग म्हणा.''

''म्हणू ? तुम्हाला गोडी आहे अभंगाची ?''

''मला फार आवडतात.''

त्या शेतकऱ्याने फारच सुंदर अभंग म्हटला. रघुनाथ डोळे मिटून ऐकत होता. अभंग थांबला. त्याने डोळे उघडले.

''तुम्ही काय करता ?'' शेतकऱ्याने विचारले.

''मी सेवादलाचे काम करतो. रस्ते झाडतो. लोकांना शिकवतो. भेदभाव माजवू नका म्हणून सांगतो.''

''साधुसंतांनी हेच सांगितलं.''

इतक्यात एकाने हळूच तिकीट काढले व विचारले,

''हे तिकिट बघा कोठलं आहे ते ?''

''पंढरपूरचं.''

''ठीक. आणि काय किंमत ?''

''साडेचार रुपये.''

''साडेचार ?''

''हो.''

''आमच्याजवळून तर पाच-पाच रुपये घेतले.''

''तुम्ही कसे दिलेत ? त्याच्यावर तर लिहिलेलं आहे.''

''मास्तर म्हणाले, एकादशी आहे, तिकिटं महाग आहेत!''

''एकादशीला रताळी महाग होतील, शेंगांचे दाणे महाग होतील, तिकिटं का महाग होतात ?''

“आम्हाला काय भाऊ माहीत ?”

“तुम्ही पंढरपूरला जाल, परंतु शिकणार नाही. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी लिहिली तुमच्यासाठी. परंतु वाचायला कोण शिकतो ? असे अडाणी राहता. सारं जग मग फसवतं, अपमान करतं. शिका, सेवादलाचे सैनिक तुम्हाला शिकवतील. पुढच्या वर्षी पंढरीला जाल तर ज्ञानेश्वरी, गाथा, गीताई वाचीत जा, खरं ना ?”

“खरं रे भाऊ. हवं शिकायला. शेतकऱ्यांचं कुणी नाही बघा. साऱ्या जगाचा तो पोशिंदा, परंतु त्याचा सगळीकडे अपमान.

“आता ज्ञान मिळवा. स्वराज्य हाती घ्या. ज्याला ज्ञान त्याला मान.”

“मामलेदार कचेरीत ज्याच्या हातात वर्तमानपत्र त्याला खुर्ची देतात आणि आम्हाला दूर बसवतात.”

“खरं ना ? तुम्ही वाचायला शिका. शेत नांगरणारा दुपारच्या वेळेस झाडाखाली बसून भाकर खाताना वर्तमानपत्र वाचू लागेल तेव्हा खरं स्वराज्य येईल. समजलं ना?”

“होय दादा. आज चांगलेच डोळे उघडले, विठ्ठला. आता तुझी आणभाक ! शिकल्यावाचून राहायचं नाही.”

“छान. आता अभंग म्हणा.”

त्या शेतकरी वारकऱ्याने पुन्हा एक सुंदर अभंग म्हटला. रघुनाथ डोळे मिटून ऐकत होता.

✦✦✦

गांधीबाप्पाची शपथ, शिकेन !

हिंदू धर्मात ज्ञानाची फार थोरवी आहे. ज्ञानरूपी परमेश्वर असे आम्ही म्हणतो. ब्रह्माची व्याख्याही अशीच. महंमद पैगंबरही म्हणायचे, 'जो सृष्टीचे ज्ञान मिळवितो त्याने शंभर वेळा नमाज म्हटला. ज्ञानासाठी हजारो मैल जावे लागले तरी जा.' अशी ज्ञानाची महती आहे. युरोपियन स्त्रिया एकट्या जगभर जातात. त्यांना ना भय ना भीती. कारण त्यांना सारे माहीत असते. परंतु हिंदी स्त्रिया एकट्या कोठे जाणार नाहीत. त्यांना कशाची माहिती नसते, वाचता येत नाही. कोठे चौकशी करावी, कोठे विचारावे, कळत नाही. सारी फजिती ! तुकाराम महाराजांनी म्हटले आहे,

'अवगुणा हाती । आहे अवघीची फजिती ।।'

समर्थ सांगतात,

'दिसामाजि काही तरी ते लिहावे ।
प्रसंगी अखंडीत वाचीत जावे ।'

परंतु समर्थांची वाणी आपण ऐकली नाही. अज्ञानामुळे गुलाम झालो, आता स्वराज्य आले आहे. जर सारे सुशिक्षित होतील, तरच ते टिकेल.

ती बघा एक बाई. एकटीच दिसत आहे. कोठे जायचे आहे तिला ? दादर स्टेशनवर ती केव्हाची उभी आहे. पुणे, मद्रास, नागपूर सगळीकडे जाणाऱ्या गाड्या येथून जायच्या. या आजीबाईला कोठे जायचे आहे ? एकापाठोपाठ तर गाड्या येतात.

ती पाहा गाडी आली. बायकांच्या डब्यात आजी घुसली. बाजूला गाठोडे घेऊन बसली. गाडी सुरू झाली. सुशिक्षित बायका डब्यात होत्या. कोणी पत्ते खेळू लागल्या. कोणी सुया काढून विणू लागल्या. कर्जत स्टेशन आले. दोन मुली आत चढल्या. त्यांना बाकावर जागा मिळाली. आजीबाई खालीच बसलेली होती.

"आजी, इथं वर बसा." सरला म्हणाली.

"बरी आहे इथं मी." आजीबाई म्हणाली.

"अगं, त्यांना इकडे होईल विटाळ. बसू दे त्यांना तिकडे संडासाजवळ सोवळ्यात." एक प्रतिष्ठित बाई म्हणाली.

"या आजी, आमच्याजवळ बसा. खाली घाण असते." विजया म्हणाली. इतक्यात बोगदा आला. मोठा बोगदा.

"ही गाडी कुठं जाते ?" आजीबाईने विचारले.

"पुण्याला." सरला म्हणाली.

"पुण्याला ?"

"हो. का ? घाबरू नका."

"मला जायचं येवल्याला. ही नाशिकची गाडी नव्हे का?"

"ती हिच्या आधी होती आजी."

"म्हातारीला काय कळे; आता कसं होईल माझं ?"

"घाबरू नका. पुण्याला चला आमच्याकडे. आम्ही तुम्हाला दौंड–मनमाडच्या गाडीत बसवून देऊ. सरळ येवल्याला जाल. उशीर होईल इतकंच."

"बरोबर कोणी नसलं म्हणजे अशी फजिती होते."

"आजी, तुम्हाला वाचायला येत असतं तर अशी नसती फजिती झाली. गाडीवर लिहिलेलं असतं. शिवाय कोणती गाडी केव्हा येईल ते वेळापत्रकात असतं. तुम्हाला वाचता येत नाही, घड्याळ समजत नाही, म्हणून ही अशी फजिती !"

"खरं आहे मुलींनो."

"आता शिका लिहा–वाचायला. आम्ही सेवादलातील मुली, आम्ही वर्ग चालवतो. त्या कर्जतला लहान मुलींबरोबर चार चार मुलांच्या आया, अशा शेतकऱ्यांच्या बायाही शिकायला येतात. गंमत होते. लहान मुली मोठ्या बायकांच्या चुका दुरुस्त करतात."

“मी का आता शिकू ?”

“काय झालं न शिकायला ? ही होणारी फजिती टळेल. पण आधी इकडे वर बसा, या. आम्ही तुमच्या मुलीसारख्या. तुम्हाला बापूजींच्या गोड गोष्टी वाचून दाखवू ?”

“बापूजींच्या ?”

“म्हणजे महात्माजींच्या.”

“का गं मुलींनो, हरिविजय आहे, रामविजय आहे, तसा महात्माविजय कोणी का नाही लिहीत? मग तो खेड्यापाड्यांतून वाचतील. त्याचा सप्ताह करतील. आम्ही आयाबाया ऐकू. देवमाणूस होते महात्माजी ! कशा गोळ्या घातल्या गं त्यांच्यावर ? आणि त्यालाही त्यांनी म्हणे हात जोडले ! धन्य धन्य त्यांची !”

“आजी, आमच्या सेवादलाचे साने गुरुजी श्रीगांधीविजय लिहिणार आहेत. अष्टोदरशे म्हणजे १०८ अध्याय करणार आहेत. त्यांची श्यामची आई तुम्ही वाचली आहे का ?”

“मला नाही वाचता येत; परंतु आमच्या शेजारचे एक दादा रोज रात्री त्यातून वाचायचे. मी ऐकायला जात असे. डोळ्यांना पाणी येई ऐकताना. ते का लिहिणार आहेत श्रीगांधीविजय ? छान होईल.”

“परंतु तुम्ही वाचायला शिका.”

“तुमच्यासारख्या मुली भेटल्या तर शिकेन हो.”

आजी रमली. विजयाने बापूजींच्या गोड गोष्टी वाचून दाखविल्या. पुणे आले. त्या मुलींनी आजीबाईला घरी नेले. तिची सारी व्यवस्था केली. पुण्याला दौंडाकडून मनमाडकडे जाणाऱ्या गाडीत तिला बसविले. पुण्याचे पेरू बरोबर दिले.

“मुलींनो, तुमचे उपकार.”

“उपकार कसले ?”

“कुणी तुम्हाला असं वागायला शिकवलं ?”

“सेवादलानं. आजी, पण एक कबूल करा. लिहावाचायला शिका.”

“शिकेन हो. तुमच्या गांधीबाप्पाची शपथ !”

✦✦✦

माणूस होण्यासाठी शिका

त्या वर्षी प्रथम पाऊस सुंदर पडला. शेतकरी खुशीत होते. शेते मस्त होती. सोळा आणे पीक येईल, लोंक म्हणत. सरकारी आणेवारी झाली; परंतु शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष पीक पडेल तेव्हा खरे. कधी रोग पडेल, कधी टोळ येतील, कधी उंदीर खातील. तर कधी अकाली पाऊस कोसळेल. शेतकऱ्यांचे सारे परस्वाधीन.

आणि खरेच मुसळधार पाऊस आला. पाऊस धो धो पडत होता. हातातोंडाशी आलेले पीक मातीत मिळाले. कपाशीचे पीक गेले, शेंगांना मोड आले. नद्यानाल्यांना पूर येऊन तीरावरच्या शेतांमध्ये रेती-गाळ साचून राहिला. आकाश गळत होते आणि शेतकऱ्यांचे डोळेही गळत होते ! सारी मेहनत मातीमोल झाली.

अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या सभा होऊ लागल्या. खंड माफी करा; शेतसारा माफ करा; शेतकऱ्यांस तगाई द्या; असे ठराव होऊ लागले. सरकार काय करणार इकडे सर्वांचे डोळे होते.

कलेक्टरांकडे शिष्टमंडळ गेले.

"विचार करतो." साहेब म्हणाले. काही दिवसांनी गावोगावच्या चावडीत सरकारी जाहीरनामे लागले,

"शेतकऱ्यांनी पिकले किती, खर्च किती आला, तोटा किती आला, त्याचे जमाखर्च सादर करावे. ज्याचे नुकसान झाले आहे असे दिसेल, त्याला शेतसारा माफ करण्यात येईल."

शेतकऱ्यांना लिहिता वाचता येत नाही; ते कसा जमाखर्च ठेवणार ? जे शिकलेले जमीनदार होते त्यांच्याजवळ जमाखर्च होते. त्यांना भराभरा सूट मिळत गेली; आणि गरीब शेतकरी, त्यांचीच दाद लागेना !

त्या दिवशी गोविंदा त्या गावाला गेला होता. गोविंदा मोठा सेवेकरी. त्याची मूकसेवा होती.

''दादा, आमचा शेतसारा नाही का कमी व्हायचा ? सारा भुईमूग गेला.''

''सरकार जमाखर्च दाखवा म्हणते.''

''आमचा उघडा हिशेब. सारा तोंडी सांगू. म्हणावं, आमची घरं बघा. गाडगीमडकी रिकामी आहेत. ती सांगतील की या घरात यंदा दाणे नाहीत.''

''साहेबाला पांढऱ्यावरचं काळं समजतं. त्याला हिशेब हवा. काय करायचं ? तुम्हाला सारी दुनिया नाडते तरी तुम्ही चार अक्षरं शिकणार नाही. शिका म्हटलं तर म्हणाल, 'आम्हाला का मामलेदार, मुन्सफ व्हायचं आहे ?'

बाबा रे, माणसासारखं या जगात वागायचं असेल तर शिकलं पाहिजे. पदोपदी अडतं. पत्र लिहिता येत नाही, आलेलं वाचता येत नाही. पत्र लिहिणाऱ्याला द्या पैसा. मनीऑर्डर लिहिणाऱ्याला द्या पैसा. आधीच गरिबी, त्यात ही अशी दक्षिणा वाटायची. कधी तुमचे डोळे उघडायचे ? शिका. उद्या स्वराज्य आलं, तर ते कसं टिकायचं याची मला चिंता वाटते.''

''येणार का भाऊ स्वराज्य ?''

''येणार, इंग्रज जाणार.''

''गांधीबाप्पाची पुण्याई.''

''परंतु गांधीबाप्पांची पुण्याई कोठवर पुरणार ? आपण चांगले होऊ या. शिकूया. उद्योगी होऊया. प्रेमानं राहूया. स्वच्छता ठेवूया.''

''होय, दादा. उद्यापासून मी हातात पाटी घेतो. आम्ही अडाणी म्हणून तर जगाचे पोशिंदे असून उपाशी मरतो !''

''बरोबर बोलतात. शिका, खरं स्वराज्य आणा.''

✦✦✦

मंदीचे डोळे

मंदी मोठी गोड मुलगी ! सर्वांना ती हवी-हवीशी वाटे. खेळकर आणि आनंदी. चपळ आणि उत्साही. खोड्या करील, उपयोगीही पडेल.

"मंदे, तुझे डोळे मला दे." कुसुम म्हणायची.

"आणि तुझं नाक मला दे." मंदी हसत तिला म्हणायची.

मंदी शाळेत जाई. अजून लहान होती. तिचे वडील देवाघरी गेले होते. आईची एकुलती एक मुलगी, आणि घरची गरिबी. चार ठिकाणी चार धंदे मंदीची आई करी. कसाबसा निर्वाह चाले.

एके दिवशी काटेरी तारेवरून मंदी उडी मारीत होती. परंतु तार पायांना जोराने लागली. गंजून गेलेल्या तारा, त्या विषारी असतात. मंदीचा पाय बरा होईना. शेवटी आईने तिला डॉक्टरांकडे नेले. डॉक्टरांनी औषधोपचार केले. थोडे दिवस गेले नि पाय सुकत चालला.

"हे बघा, आता रोज यायला नको. हे आयोडिन देतो. ते दिवसातून दोन-तीन वेळा लावीत जा." डॉक्टर म्हणाले.

"डॉक्टर, किती पैसे झाले ?"

"पैसे नकोत. असल्या हसऱ्या मुलीचे का पैसे घ्यायचे ? मंदे, आता रडू नको. पाय बरा होईल."

मंदीला घेऊन ती माता घरी गेली; परंतु दोनचार दिवस गेले नि मंदीच्या डोळ्यांना धार लागली. ते सुंदर टपोरे डोळे; काळेभोर निर्मळ डोळे ! काय झाले ? कोणाची दृष्टी पडली ?

आईने डॉक्टरांना जाऊन सांगितले. त्यांनी डोळ्यांत घालायला औषध दिले. परंतु एके दिवशी काय झाले, आई होती घाईत. डोळा तर दुखत होता.

''मंदे, औषध डोळ्यांत घालून मी जाते. तू पडून राहा मग. होतील बरे दोन दिशी. रडू नकोस.'' आई म्हणाली. तिने पटकन बाटली आणली. मंदी निजली होती. आईने डोळ्यांत बाटलीतले औषध घातले. तो डोळ्यांचा भडका उडाला !

''आई, डोळे जळले गं, भाजले. अयाई, आग-आग ! आई, तू आयोडिन घातलंस डोळ्यांत !'' मंदी रडत- ओरडत म्हणाली.

आई घाबरली. ती धावत धावत डॉक्टरांकडे गेली.

''काय हो, काय झालं ?'' डॉक्टरांनी विचारले.

''डॉक्टर, लवकर चला. पोरीच्या डोळ्यांत आयोडिन पडलं! भाजले डोळे. चला...''

''असं कसं केलंत ? बाटल्यांवर लिहून ठेवलेलं होतं - हे डोळ्यांचं औषध, हे आयोडिन - तुम्ही बघायला नको ?''

''डॉक्टर, आईबापांनी लिहा-वाचायला शिकवलं नाही. काय करायचं ? अशी अडाणी राहिले. चला आधी.''

''तुमच्या घरात साबुदाणा आहे का ?''

''आणीन नसला तर.''

''त्याची पातळ लापशी करा. चमचा चमचा डोळयांत घालायची, पुन्हा काढायची. डोळे या लापशीनं धूत राहायचे. शेवटी निर्मळ लापशी डोळ्यांतून बाहेर येईपर्यंत असं करायचं. जा, मी येतोच.'' आई लगबगीने घरी गेली. थोड्याच वेळाने डॉक्टरही तेथे गेले. लापशी तयार झाली. ते डोळ्यांत घालीत होते. डोळ्यांना बरे वाटले.

''होय डॉक्टर, नीट होईल ना डोळा ?''

''होईल हो; घाबरू नको. आणि डोळे बरे झाले म्हणजे आईला आधी लिहायला शिकव. तू शाळेत जातेस, परंतु तुझ्या आईला कोण शिकवणार ? आईला

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

लिहितावाचता येत असतं तर तुझे डोळे जायची आज पाळी आली नसती. खरं ना?''

''आई, शिकेल का डॉक्टर ?''

''तुझ्या डोळ्यांची गोष्ट त्यांच्यासमोर आहे. शिकतील. शिकाल ना, मंदाच्या आई ?''

''मंदानं शिकवले तर शिकेन.''

''मी आईची मास्तरीण !''

''परंतु आईला छडी नको हो मारू.'' डॉक्टर हसून म्हणाले.

+++

ज्ञान हा खरा दिवा !

राधीची मुलगी आजारी होती. सासरहून कागद आला होता. राधीचे मुलीवर फार प्रेम. पोरीला पाहून यावे, असे तिच्या मनात आले.

''येऊ का जाऊन ? दोन दिवशी परत येईन. तोवर सांभाळा घर.'' ती नवऱ्याला म्हणाली.

''तू एकटी जाशील ? स्टेशनवर उतरून पुढं बरंच जावं लागतं. रस्ता चुकायचीस.''

''तोंड आहे ना ? कोणाला विचारीन. आणि देव का रस्ता दाखवणार नाही ? तो का पोरासाठी तडफडणाऱ्या आईला चुकवील? मी जाऊन येते.''

''जा. मला तर सवड नाही. घेतलेले पैसे खंडायचे आहेत; कामावर जायला हवं.''

राधीने गाठोडे बांधले. नातवंडांना थोडा खाऊ घेतला नि निघाली. पाय हेच गरिबाचे वाहन. ती माउली डोईवर गाठोडे घेऊन निघाली. आली स्टेशनवर.

''कोठलं तिकीट हवं ?'' स्टेशन मास्तरने विचारले.

''पोरीच्या गावचं, आजारी आहे भाऊ ती. दे लक्कन !''

''अगं, गावाचं नाव काय ?''

''गाव त्या स्टेशनपासून दूर आहे.''

''स्टेशनचं नाव काय ?''

''मला लांबकन्याला जायचं.''

''मग शिंदखेडचं देऊ तिकीट, का दोंडाईच्याचं देऊ ?''

''कोणतं बी द्या.''

तिकीट घेऊन फलाटावर राधी आली. भग‌भग करीत गाडी आली. आज नरढाण्याचा बाजार होता. गाडीत गर्दी. राधी कशीबशी आत घुसली.

''तिकडे दूर हो.'' कोणी म्हणाले.

''पोरीकडे चालले रे भाऊ. ती आजारी आहे. बसू नको माझ्या गाठोड्यावर. आत पापड आहेत, मोडतील.''

''डोकीवर घे तुझं गाठोडं.''

राधी गाठोडे डोक्यावर घेऊन उभी राहिली. आणि शिंदखेडे स्टेशन आले.

''लांबकान्याला जायचं. इथंच उतरू का रे भाऊ ?''

''नरढाण्याला का नाही उतरलीस ? उतर, इथं उतरलीस तरी चालेल.''

राधी उतरली. पडली स्टेशनबाहेर. रस्ता विचारून निघाली. तिसरा प्रहर टळला होता. झपझप ती जात होती. तो पुढे दोन रस्ते आले. तेथे एक खांब होता. रस्ते कोठे जातात ते त्याला लावलेल्या पाटीवर लिहिलेले होते. परंतु राधीला का वाचता येत होते ? आजूबाजूला कोणी माणूस दिसेना. ती निघाली एक रस्ता घेऊन. देव मावळला. कोठे आहे गाव ? गुराखी जात होते. गाई घरी जात होत्या.

''का रे पोरांनो, लांबकाने गाव इकडेच आहे ना ?''

''इकडे तर दळवाडे. लांबकाने तिकडे राहिलं. ते रस्ते फुटले ना तिथला दुसरा रस्ता.''

''अगं बया ! आता कसं करू ?'' असे म्हणून ती मटकन खाली बसली. ''आता रात्र होणार, अंधार !''

''आमच्या गावात चला.'' गुराखी म्हणाला.

''कोणी ओळखीचं नाही रे.''

''तो गणप्या आहे. तो तुमची करील व्यवस्था.''

''तो का गांधीचा मनुष्य आहे ?''

''हो. तो सेवादल चालवतो. सर्वांच्या उपयोगी पडतो. मागं ते वादळ झालं

ना? छपरं उडाली. झाडं पडली. गणप्या व त्याचे मित्र यांनी किती काम केलं ! गरिबांच्या झोपड्या त्यांनी पुन्हा शाकारून दिल्या. चला, उठा.''

राधी गावात आली. गणप्या भेटला.

''मी आता गाडी जुंपतो. पाखरांसारखे बैल आहेत. तुम्हाला पोहोचवतो, आई. थोडी भाकरी खाऊन घ्या. चालून दमला असाल. तुम्ही भाकर खा; तोवर गाडी जोडतो.'' गणप्या म्हणाला.

राधीने भाकर खाल्ली आणि गणप्याने गाडी जुंपली. बैल निघाले हरणासारखे.

''तुम्हाला वाचता येत असतं तर अशी फजिती नसती झाली.'' गणप्या म्हणाला.

''खरं तुझं म्हणणं. त्या खांबावर पाटी होती; परंतु आमचे डोळे असून फुकट! केवढा हिसका पडला! तू देवमाणूस भेटलास म्हणून बरं. नाहीतर रातची कोठे गेले असते, भाऊ ?''

सर्वांनी लिहावाचायला शिकलं पाहिजे. त्याचा फार उपयोग असतो.''

''आम्हा बायांना कोण शिकवणार ?''

''सेवादलातील मुलंमुली शिकवतील. तुमच्या गावी नाही का सेवादल ? कोणतं तुमचं गाव ?''

''टाकरखेडे.''

''अमळनेरच्या मुलांना मी लिहीन. ते तुमच्या गावात सेवादल काढतील. रात्री शिकवतील. सकाळी सफाई करतील.''

''तुम्हाला असं करायला कोण सांगतो ? ''

''गांधीबाप्पा.''

''ते तर गेले ना रे भाऊ ? सारं जग हळहळलं.''

''ते गेले तरी त्यांची शिकवण आहे. ते बघा लांबकाने आलं. ते दिवे दिसताहेत.''

आणि गाव आला. गणप्याने राधीला तिच्या मुलीच्या घरी थेट नेले. गाडी कोणाची म्हणून मुलगी बाहेर आली, तो तिचीच माय समोर उभी.

''माय वो, कोठून आलीस ?''

"तुला बघायला, भेटायला आले. रस्ता चुकले. या दादानं गाडी जोडून आणलं. देवमाणूस. तू बरी आहेस ?"

"आता बरं वाटतं."

गणप्यानं तेथे भाकरी खाल्ली. तेथील मुले त्याच्या ओळखीची होती. तेथे सेवादल होते. तेथे साक्षरतेचा वर्ग चालू होता. तो त्या वर्गाला गेला आणि त्याने राधीची गोष्ट सांगितली. शेवटी म्हणाला, "ज्ञान हा खरा दिवा. ज्ञान हा खरा प्रकाश. हातात कंदील आहे; परंतु पाटी वाचता येत नाही; तर रस्ता चुकायचा. भलतीकडे माणूस जायचा. ज्ञान सर्वांना डोळस करते. म्हणून शिका नि सर्वांना शिकवा. भारतात आता कुणाला अडाणी नका ठेवू."

✦✦✦

मोरी गाय

मोरी गाय

गाय ही भारतवर्षाची मायमाउली, गाईने भारताला वाढवले; भारताला चढवले. वेदकालापासून ऋषिमुनींनी गाईंची थोरवी ओळखली; तिचा महिमा वाढवला. तिची गीते गाईली. तिची सुपती-नरपतींनी पूजा केली. परंतु आज स्थिती पालटली आहे. गाईंची उपासमार होत असून म्हशीची पूजा होत आहे. सारे पारडे फिरले आहे. आज भारताला सत्त्व नाही, विचार नाही, सदाचार नाही, म्हणूनच वैभव नाही.

शामराव कुलकर्णी अशा या भारतातल्या एका खेड्यात राहात. पूर्वी घरची स्थिती बरी होती; पण आता खालावली होती. त्यांना दोन मुले. वामन नि रंगू. सुशील पत्नी होती. पडवीत म्हैस होती. एक गाय होती, गाईचे नाव मोरी. तिच्या कपाळावर चांद होता. मोरी गाईची परंपरा मोठी उज्ज्वल. तिची पणजी प्रथम त्या घरी आली. शामरावांच्या आजोबांना ती आवडली. ती वेळेस दहा दहा शेर दूध देत असे. तिचे दहा बैल शामरावांच्या आजोबांच्या घरी राबत होते. तिची मुलगी तांबू मोरीची आई. तांबूवर शामरावांच्या वडिलांचे फार प्रेम असे. शामरावांची आई रोज सकाळी उठून तांबूची पूजा करायची. तांबू मेली तेव्हा शामरावांचे वडील रडले.

मोरीला ते दिवस आठवतात व रडू येते. ती मनाशी विचार करते, बरे झाले आई गेली ती. नाहीतर जेथे भालप्रदेशावर मंगल हळदी-कुंकू लावले जात असे, त्याच कपाळावर तडाखे बसले असते. तू गेलीस आई, सुटलीस. पण ते दिवस मला आठवतात गं! तू आनंदाने अंग चाटायचीस तेव्हा माझे अंग रोमांचित होई. एक

दिवस मी पूजावस्तू होईन. आईप्रमाणे कुटुंबाची सेवा करीन. आईची परंपरा सुरू ठेवीन असे माझ्या मनात येई. आई, तू मला मुकेपणाने चाटता चाटता किती शिकवत होतीस ! तुझ्या हंबरण्यात किती गंभीर अर्थ असे ! तुझ्या दुधातून तू धर्मामृत पाजीत होतीस. पण आज ? कसे दिवस मी कंठू ? असे मनात येऊन मोरी रडे ! तिचे अश्रू खाली भूमीवर पडत.

मोरीचे वासरू नुकतेच मेले होते. फार कडाक्याची थंडी पडली होती. ठिकठिकाणी पाण्याचे बर्फ झाले होते. पशू-पक्षी मरून पडले होते. मोरीचे वासरू थंडीने कोपऱ्यात काकडत होते. मोरी दूर बांधलेली. दावे बळकट. साधे असते तर ती ताड्कन तोडून आपल्या बाळाजवळ जाती. त्याला कुशीत ऊब देती, त्याला चाटती; परंतु तिला काही करता येत नव्हते. तिच्यादेखत त्या बाळाचे रक्त गोठून जात होते आणि काही करता येत नव्हते. अरेरे!

घरात शामराव अंगावर लेप घेऊन पडले होते. मुलांच्या अंगावर चार चार घोंगड्या होत्या. परंतु मोरी ? ती त्यांच्याच कुटुंबातली नव्हती का ? त्यांची आराध्य देवता ना ? मोरी जाऊ दे, परंतु तिचे पाडस, त्याला कोणी पांघरूण घातले नाही. दोन फाटकी तरटे त्याच्या अंगावर घातली असती, तर तो बाळ ऐटीने राजासारखा निजला असता. मोरीने ती तरटे गोपाळकृष्णाच्या पितांबराप्रमाणे मानली असती. गोपाळकृष्ण वासरावर आपली कांबळ घाली. आपली भाकर गाईला देई; परंतु तांबूची मोरी ? तिला आज कोणी विचारत नव्हते. तिच्या वासरासही कोणी विचारत नव्हते.

धुगधुगी असेल बाळाला. सकाळी सूर्य उगवला म्हणजे येईल ऊब राजाला. मी धरीन पोटाशी. कढत दूध पाजीन. मोरी आशेने मनात म्हणत होती. सारे लक्ष पाडसाकडे होते. जसजशी प्रभातवेळ जवळ येऊ लागली, तसतसा मोरीचा जीव खाली-वर होऊ लागला. आशा-निराशा, जीवन-मरण काय आहे ? ते कोपऱ्यात काय आहे ? हाडे-मांस आहे की आत जीव आहे, ती माती आहे की आत ज्योत आहे ?

शामराव उठले. त्यांच्या अंगावर अजून घोंगडी होती. घरातील चुलीजवळ हात गरम करून ते बाहेर येत होते. पण बाहेर येताच हात गारठले व दुधाचे भांडे खाली पडले. मोरीचे दूध काढायला ते येत होते. मोरी हल्ली फार नसे दूध देत.

शामराव गोठ्यात आले. मोरी वासराकडे पाहून हंबरू लागली. शामराव वासराजवळ गेले. तो वासरू मरून पडलेले थंडगार गोळा. त्यांनी हलवले. काठी मारली. ते पाहा, मोरीने तोंड फिरवले. तिच्याने पाहवेना. शामरावांनी त्याला फरफर ओढले. आपला बच्चा ओढत नेलेला पाहून मोरीचे काळीज थरारले, चरकले ! ती हंबरडा फोडू लागली. मजजवळ आणा रे जरा. पाहू दे त्याला. मी चाटीन, त्याला येईल ऊब. माझं शेवटचं दूध पाज रे. कढत कढत. घोट घेईल. धारोष्ण दूध नसेल रे मेलं. पण मोरीचे कोण ऐकतो ? गाईची भाषा शामरावांच्या वडिलांना व आजोबांना कळत असे. शामरावांना कळत नसे. ते इंग्रजी थोडेसे शिकले होते; परंतु गाईची भाषा, मुक्या जनावराची भाषा, अश्रूंची भाषा ते समजेनासे झाले.

मोरीचे जीवन गेले. तिचे जणू पंचप्राण गेले. तिचे दूध शोकाग्नीने आटले. शामरावांनी थोडा चारा मोरीसमोर आज टाकला. कारण आज वासरू नाही, तेव्हा गाय लाथ मारील. ते दूध काढायला बसले. ज्या मातेचे वत्स मेले आहे, एका क्षणापूर्वी मेले आहे, तिच्या डोळ्यांसमोरून ओढले आहे, तिचे दूध काढायला ते बसले. गाईचे हृदय त्यांना कसे कळावे ? तिला भावना होत्या. तिला दुःखामुळे पान्हा फुटेना. शामराव आचळ जोरजोराने ओढू लागले. मोरीला वेदना होऊ लागल्या. कधी वर न केलेला पाय तिने जरा वर केला. पण पुन्हा खाली घेतला. आपल्या धन्याला लाथ लागेल. याच्या आईने व बापाने माझ्या आईची पूजा केली. त्यांचा हा मुलगा. त्याला पाय कसा लावू, असे वाटून मोरीने पाय खाली घेतला होता. शामरावांनी एक काठी पाठीत मारली. जी तिची पाठ आईकडून चाटली जात असे, तिच्यावर आता काठ्या बसत होत्या. परंतु अशाही प्रसंगी बसावी ! मोरी शोकाने वेडी झाली. तिने लाथ मारली. शामरावांना लागली. सपासप दोन-तीन काठ्या बसल्या. शामरावांचा मुलगा वामन तेवढ्यात बाहेर आला. ''बाबा, तिचं वासरू मेलं. म्हणून नसेल हो ती दूध देत. राहू दे आजचा दिवस. मारू नका.'' वामन आवर्जून म्हणाला.

''अरे, मग मात्रा कशात घेऊ ? गाईच्या दुधात मात्रा घ्यायची आहे ना ? औषधाला नको थोडं तरी दूध ? आणि वासरू असलं तरी किती देते म्हणा !'' शामराव रागाने बोलत होते.

मोरीने ते शब्द ऐकले, ती आपले दुःख विसरली, ती सत्त्वशील गाय होती. धन्यासाठी आपली आई रात्री-अपरात्री दूध द्यायची हे तिला आठवले. हा धनी

कसाही असला तरी त्याच्या पूर्वजांची पुण्याई थोर आहे. माझी आई व आजी वरून मला शिव्याशाप देत असतील. मी सत्त्व गमावले म्हणत असतील. तांबूआई, बघ मी दुःख गिळते. माझी दुग्धधारा असेल तेवढी देते. शामरावांच्या भांड्यात धार वाजली, ''बघ पान्हावली ! अरे, सोटे-पान्हवण पाहिजे तिला. हेच तिचं आंबोण. यां लबाड असतात रे उनाड गाई. आता वासरू नाही. तिला वाटलं, आज पाय उचलला की उद्यापासून कटकट बंद. पण माझ्याशी आहे म्हणावं गाठ. उद्यापासून दोन काठ्या लगवायच्या व मग बसायचं कासेखाली.'' शामराव म्हणाले.

मोरी ऐकत होती. आपण थोडा सत्त्वभंग केला त्याचे हे प्रायश्चित्त! ही शिक्षा भोगलीच पाहिजे असे तिने मनात ठरवले.

दूध काढल्यावर मोरीला सोडायचे पण महाराने वासरू नेल्यावर सोडायचे ठरले. महार आला व त्याने फरफटत वासरू नेले. मोरीला सोडण्यात आले. अंगणात बाळ असेल, तो पाहीन असे तिच्या मनात होते. ती धावत अंगणात आली. पण ते तिथे नव्हते. वासरू ठेवण्याची जागा ओळखली. आपल्या वासराच्या अंगाचा वास तिने ओळखला. ती जागा तिने हुंगली. ती तिने चाटली, तेथे अश्रूंची धार सोडली. स्तनधार सोडली, रस्त्यात बाळाचा वास तिला येत होता; परंतु पुढे येईना. लोकांच्या जाण्यायेण्याने वास निघून गेला. बाळाला पाहण्यासाठी ती रानात भटकली, हंबरली, पण काही नाही. त्या टेकड्या तिला उत्तर देत. जणू ते पहाड, ते पाषाण तिच्या दुःखाची, मातृहृदयाची टवाळी करत होते.

दिवसभर तिने काही खाल्ले नाही; परंतु इतक्यात तिच्या मनात विचार आला. रात्री धन्याला दूध नको का शिंपीभर द्यायला? काही खाल्ले नाही तर दूध कसे येणार अंगावर ? काठ्या बसल्या तरी काठ्या खाऊन दूध निर्माण होत नाही. माझे सत्त्व जाईल, औषधाला दूध दिलेच पाहिजे. धनी मारो किंवा कुरवाळो. इच्छा नसूनही ती काडी कुरतडू लागली. पोटचा गोळा गेला, त्याचे दुःख दूर सारून ती काडी खाऊ लागली. सत्त्वशील थोर मोरी ! ज्या भारतवर्षात पशुपक्षीही सत्त्वशील व सत्यनिष्ठ झाले; हरणे, गाई सत्यपूजक झाली, त्या भारतातील नरनारी पापात, स्वार्थात, लोभात, दंभात असल्याने मिंधेपणात लडबडलेली असावीत काय? भारतमाते, आज तुझी अब्रू, तुझ्या नद्या, तुझ्या वृक्षवेली, तुझी गाईगुरे, तुझी पाखरे थोडीफार राखत असतील तर असतील, तुझे मानवपुत्र तर अगदीच बहकलेले दिसतात.

मोरीपुढे रात्री चारा टाकण्यात येत नसे. ''दिवसभर चांगली रानात चरून येते; तिला कशाला चारा घातलास वामन ?'' शामराव घसरा घालायचे. म्हशीपुढे चारा घालण्यात येई. मोरीचे तोंड पुरणार नाही तिथंपर्यंतच ती म्हैस म्हणायची, ''घे हो बाई, माझ्यातला थोडा खा. तू शेजारी अगदी उपाशी. मला खाताना वाईट वाटतं.'' परंतु मोरी खात नसे. जे अन्न आपल्यासाठी वाढलेले नाही ते ती कशी खाईल ? वाटेल त्याचे गिळंकृत करणारी, स्वाहा करणारी, माणूस थोडीच ती होती ! ती पडली चार पायांची. दोन पायांच्या सर्वभक्षक नरदेवाची सर तिला कोठून येणार ?

रानात उन्हाळा असल्याने तिला पाणीही मिळत नसे. कोठे चिखलातले चोखून घेता आले तर तेवढेच घ्यावे. रानात चाराकाडीही नव्हती. अन्नाशिवाय तिची उपासमार होतच होती. आता पाण्याविना कंठशोष पडू लागला. दूध तिच्या स्तनांतून आता थेंबभरही येत नसे. 'माझ्या रक्ताच्या बिंदूबिंदूचे दूध करून स्तनांतून दे रे पाठवून.' अशी गोपाळकृष्णाला मोरी प्रार्थना करी. परंतु गोपाळकृष्णाने ती ऐकली नाही, शामरावही आता मोरीखाली बसेनासे झाले.

आज रानात मोरीच्या पायात भला मोठा काटा घुसला होता. लंगडत लंगडत ती गोठ्यात आली. पण तिच्याकडे कोण लक्ष देणार ? रोज लंगडत जाई, लंगडत येई. मोरीला वाटे आपण मरावे, त्याच गोठ्यात मरायची तिची इच्छा होती. शामरावांना वाटत होते, मोरी गाभण राहिली असेल. परंतु तिची कास वाढती दिसेना. ''गाय काही विणार नाही यंदा पावसात.'' ते घरात म्हणत होते, ''भाकड उनाड झाली. आता विकून टाकूया. बियालाही पैसे नाहीत. बैल दुसऱ्याचे आणून पेरता येईल, पण बी तर हवं ? येतील दहा-पाच रुपये तेवढेच. ही आता काय कामाची ? म्हशीला थोडं जास्त खाणं दिलं तर जास्त दूध विकता तरी येईल.'' मोरीच्या कानांवर हे बोलणे एखादे वेळेस पडे. 'मला खायला घातलं तर मी नाही का दूध देणार ? माझ्या वासरांना नीट वागवलं तर मी नाही का विणार ? माझी अब्रू आता झाकलेलीच राहू दे. आणखी उघड धिंडवडे नको व्हायला. झाली संसाराची शोभा ती पुरे. परंतु मला विकणार ? कुणाला ? खाटकाला विकणार ? या भारतात पूर्वी गाईकडे पाहण्याची थोर दृष्टी होती. त्यांनी मला देवता केलं होतं. माझ्या भावांना नंदी केलं होतं. भारतातील मानवबंधू आज हे विसरले असले तरी जागे होतील. पूर्वजांची पुण्याई पुन्हा चमकेल.

आमचा भाग्यकाल येईल. पुन्हा आमच्या कासा भरभरून येतील. आम्हाला प्रेम पाहिजे आहे. तुम्ही गरीब असाल तर प्रेमाचा चारा द्या, तरीही आमच्या कासेतून दुग्धधारा तडातड फुटतील.'

'नको रे देवा. मला कसायाला नको विकू. पण तोही काही वाईट नाही. रोज हे तिळतिळ मारतात. तो कसाब परवडला. निदान त्याच्याजवळ दंभ तरी नाही. एकीकडे हे सारे दांभिक आम्हाला छळतात. ना देत पाणी, ना चारा. ना बघतात पायात काटा गेला, की डोळ्यांत काटा गेला. तोंडानं गोमाता म्हणून आम्हाला लाथा मारतात, खाटिक निदान प्रेम दाखवून सुरा काढीत नाही. खाटकाच्या हातचं मरणही थोरच आहे. परंतु नको. मला इथंच पडू दे. ही जागा. इथं माझ्या आई-आजी मेल्या. इथं आई मेली तेव्हा शामरावांचे वडील रडले. तीच जागा. पावित्र्यानं भरलेली. इथंच मला पडू दे देवा. मला नाही रे जगण्याची इच्छा... छे ! मी कंटाळू? कष्टास, हालास कंटाळू ? नाही बरं देवा. मी सत्त्वच्युत होणार नाही. तुझी इच्छा असेल तसं कर, गोपाळा.'

***

एक दिवस मोरी गाय रानात गेली होती. तिला दुसऱ्या गाई-बैलांकडून बातमी कळली की, तिचा एक भाऊ खाटकाला विकला आहे. मोरी घेरी येऊन पडली. इतर गाई-बैलांनी तिला चाटले. साऱ्यांना तिची पवित्रता माहीत होती. तिच्याबद्दल साऱ्यांना पूज्यभाव वाटे. ती थोर तांबूच्या घराण्यातील, खानदानी घराण्यातील सत्त्वनिष्ठ मोरी ! उठली. सावध होऊन ती उठली. अश्रुधारांचा वर्षाव भू-लिंगावर करू लागली. हंबरडा फोडू लागली.

एक गाय म्हणाली, ''आपल्या गावातून यंदा पुष्कळ गाई-बैल खाटकाकडे जाणार. आता शेतकऱ्यांना बी-बियाणं जमवायचं आहे आणि जवळ नाही दिडकी. सावकार कर्ज देत नाही. आपणास विकून तो बी-बियाणं आणणार, आपली त्यांना किंमतच वाटत नाही.''

दुसरी म्हणाली, ''आमची काळजी घेत नाहीत. तुम्ही तरी काय करावं ? जसं करावं तसं भरावं ! एकदम आपण साऱ्या एका ठिकाणी जाऊन मरू. जगून तरी काय ? रोज शिव्या ऐकायच्या; मार खायचा; आपल्या गो-जातीची बेअब्रू झालेली पाहायची. जिथं देवता म्हणून फुलांनी आपलं पूजन झालं तिथं दगड-काटे खाऊन

मरण्याची पाळी आली. आपल्या कासेत शक्ती आहे पण या माकडांना कळेल तर? भोगाल म्हणावं फळं. रडाल-रडाल ! हाय हाय कराल !''

मोरीला हे बोलणे पटले नाही. ती म्हणाली, ''नका त्यांना शिव्याशाप देऊ. आपणाला दु:ख होत आहे तेवढं पुरे. मानव सुखात राहो. दिलीप, वसिष्ठांची ती मुलं. कृष्ण भगवानाची बाळं. आज ना उद्या योग्य मार्गावर येतील. ते आंधळे झाले आहेत, म्हणून आपणही का आंधळं व्हायचं ? जर असं दोहो बाजूंनी, दोहो हातांनी पाप होऊ लागलं तर उद्धाराची, मोक्षाची उषा कधीच फाकणार नाही. पापाला आपल्या पुण्याईनं आपण वाढू देता कामा नये. मानव आज भुलला आहे. आपण मुक्या प्राण्यांनी अधिक तपस्या केली पाहिजे. ज्याला कळतं त्यानं तरी पदच्युत होऊ नये. जे जे होईल ते ते आपण सहन करूया. ज्या हातांनी आपल्यावर प्रेम केलं त्या हातांनी काठी मारू नये का ? ज्यानं प्रेम केलं त्याला मारण्याचाही अधिकार आहे, आपण त्यांचं पूर्वीचं गो-प्रेम विसरता कामा नये. त्यानं आपणास माता म्हटलं आहे. पुत्र वेंडावाकडा झाला तरी माता प्रेम विसरणार नाही. 'कुपुत्रो जायेत क्वचिदपी कुमाता न भवति ।' जोपर्यंत दुधाचा टाक देता येत आहे तोपर्यंत देऊ. माझी आई सांगत असे, देव भक्ताला राखतोच राखतो.''

मोरीचे गंभीर बोल इतरांच्या हृदयांत खोल गेले, झाडांवर पाखरेसुद्धा ऐकत होती. झाडांनीसुद्धा मनात बंड करायचे आणले होते. हे खाटकाप्रमाणे आपल्याला तोडतात. नवीन वाढ करत नाहीत. पाणी घालत नाहीत. आपणही यांना फळ-फूल देऊ नये. थोडेफार जवळ आहे ते पोटातच जिरून जाऊ दे. आपण यांच्यासाठी मेघांना बोलायचे नाही. आपले तरी काय अडले आहे ? पण यात केवळ मानवांचा नाश नव्हता. त्यांचाही होता, सृष्टीचा होता. झाडांना मोरीचे शब्द पटले. आपले कर्तव्य आपण सोडता कामा नये. झाडांनी रात्री वाऱ्याबरोबर आपले विचार परस्परांस कळवले. वाऱ्याने सर्वांना एकमेकांची हृद्गते कळवली. तृणांकुरांनी वर येण्याचे ठरवले. पाखरांनी गाण्याचे ठरवले. मधमाश्यांनी मधाची पोळी बांधायचे ठरवले. मानवाला करू दे पाप. आपण सारीजण किडे-मुंग्या, तृण-वनस्पती, गाई-बैले सर्वांनी पवित्र काम सुरू ठेवावे. तू पाप करून थकतोस की आम्ही पापपरिहार करून थकतो ते पाहूया, असे सृष्टीने ठरवले. मोरी गाईचे ते उपनिषद वाऱ्याने सृष्टीभर नेले, साऱ्या मानवेवर सृष्टीला मोरी गाईचे प्रवचन धीर देते झाले.

मोरी आपला बळी केव्हा दिला जातो इकडे लक्ष देऊन होती. दिवसभर तर ती रानातच तप करी. रात्री, पहाटे एखादा शब्द तिच्या कानांवर यायचा. पहाटेची वेळ झाली होती. मोरी आपल्या गोठ्यातून आकाशाकडे पाहात होती. सप्तर्षींतील वसिष्ठ, अरुंधती तिला दिसत होते. वसिष्ठ केवढा गोभक्त ! हजारो-लाखो गाई विश्वामित्र त्याला देऊ लागला, तरी त्याने आपल्या हाताने वाढवलेली नंदिनी दिली नाही. केवढे प्रेम व निर्लोभता ! मोरीचे हृदय प्रेमाने भरून ओथंबून आले. तिने वसिष्ठ ऋषीचे अश्रुजलाने तर्पण केले. मोरीचे अश्रू पाहून आकाशातून टप टप दवबिंदू अंगणातील निंबावर पडले. वसिष्ठांनी, अरुंधतीने मला पाहिले का ? माझ्या आईचा, आजीचा तारा तेथे असेल का ? त्यांनी अश्रू ढाळले असतील ? त्या पवित्र प्रातःकाळी मोरी गाय भक्तिमय झाली होती. कृष्ण भगवानाला ती मुकेपणाने आळवू लागली.

उठा उठा हो श्रीहरी
उठा मुरहर नरहरी ।
तव सखी दुःखाच्या सागरी
धावे सखया वेगेसी ।।
किती विनवू मी कंसारी
धाव सखया झडकरी ।
येतो सूर्य उदयावरी
तूही येई भेटाया ।।

तिचे हे आळवणे चालू असता घरातले शब्द तिच्या कानांवर आले, ''आज घेऊन जातो मोरीला. काय मिळतील १०-५ रुपये ते घेऊन येतो.' शामराव बोलत होते. आठ वाजता तिला गोठ्यातून बाहेर काढण्यात आले. ती बेफाम झाली. हातातून निसटून गोठ्यात आली. तेथे बसली. उठेना. पाठीत काठ्या बसल्या. मुसक्या बांधून तिला ओढून नेण्यात आले. आपली आई, आजी, पणजी जेथे मेल्या तेथे मरावे अशी मोरीची इच्छा होती. ती पुरी झाली नाही. तिला चरण आठवला -

'तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत!'

देवाची इच्छा प्रमाण. सारे चराचर मंगलच आहे. खाटकाच्या हातात तूच आहेस. त्या सुऱ्यातही तूच आहेस. देवा, ने-मला कोठेही ने, परंतु हृदयराउळात

तुझी मूर्ती असू दे. खाली मान घालून मोरी चालली होती. इतर गाई-बैल तिच्याकडे पाहात होते. मोरीने एक हंबरडा फोडला. ''माझं प्रवचन ध्यानात धरा, सत्त्वाला जागा.'' असे तिने या बंधू-भगिनींस सांगितले. मोरी गेली हे पाहून गावातील तृणवनस्पती, दगड-धोंडे, पशू-पक्षी सर्वांना वाईट वाटले. परंतु तिचे शब्द, तिची शांत-गंभीर वाणी अद्याप सृष्टीच्या कानांत घुमत होती.

मोरी शांत दिसत होती. अश्रू तोंडावर सुकले होते. डोळे शांत, स्निग्ध झाले होते. तिने आपल्या धन्याला आणि मुला-बाळांना आशीर्वाद दिला.

आज गुरांचा बाजार. तेथील मुख्य गिऱ्हाईक कसाबच. हिंदुस्थानातील दारिद्र्य, निष्ठुरता सारे तेथे दिसत होते. एका गोष्टीवरून साऱ्या संसाराचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. हिंदुस्थानातील झाड पाहा, फळे पाहा, पशू-पक्षी पाहा, गाई-बकऱ्या पाहा, मुले पाहा, स्त्रिया पाहा, कुठेही नजर फिरवा, हिंदुस्थानचे दारिद्र्य, दुर्दैव तुम्हाला दिसून येईल. सर्वत्र मृतकळा.

खाली माना घालून गोमाता उभ्या होत्या. अपार मूक शोकसागर तेथे उसळला होता. सौदे होऊ लागले. शामरावांच्या मोऱ्या गाईकडे कोणी येईना. ती अत्यंत रोड होती. खाटिक पाहात व हसत जात. ''अरे, पाच रुपये-घ्या, घ्या.'' शामराव म्हणत, शेवटी एका कसाबाला करुणा आली. आपल्या धन्याला आपल्यासाठी इतके तोंड वेंगाडावे लागावे याचेच मोरीला वाईट वाटू लागले. ती देवाला मनात आळवीत होती. 'देवा, घेऊ दे रे मला कोणीतरी विकत. माझ्या चामड्याचे नाही का होणार एक दोन जोडे, हाडांचे नाही का होणार चार-आठ आण्यांचे खत, मांसाचे नाही का होणार काही पैसे ? देवा, धन्याला का रे लाजवतोस?' मोरीची ती प्रार्थना भगवानाने ऐकली. त्या सजन कसायाने तिला विकत घेतले. त्या कसायाचे नाव सजन होते. थोर पुरुषाचे नाव आपणास लाभावे यातही पूर्वपुण्याई असते. त्या नावामुळे एखाद्या वेळी सद्‌बुद्धी होते. जीवनात क्रांती होते.

मोऱ्या गाईला ते ऐकून प्रेमाचे भरते आले. सजनची इतर कसायांनी चेष्टा केली. तो म्हणाला, ''त्या गाईचे अधिक हाल होऊ नयेत म्हणून मी ती विकत घेतली. तिला मी घेतलं नसतं तर त्या शेतकऱ्यानं तिचे हाल केले असते. अन्न-पाण्याविना मारलं असतं. माझ्याकडे ती गाय किती आशेनं पाही. तिचे मी हाल नाही होऊ देणार. एका घावानंच मान दूर करीन तिची !''

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

मोरीला कृतज्ञता वाटू लागली. ती सजनचे हात चाटू लागली. सजनला आश्चर्य वाटले. मारणाऱ्यावर प्रेम करणारी ती गाय ! सजनच्या डोळ्यांत पाणी आले. सजन प्रेमाने तिच्या पाठीवरून हात फिरवत होता. मित्र म्हणाले, ‘‘सजन, चल घरी.’’ सजन म्हणाला, ‘‘अजून मला काम आहे. अजून तो गोपाळ कसा आला नाही ? मी घेतलेल्या गाईंत एखादी चांगली असली तर तो घेऊन जातो. मी तेवढ्याच पैशांत त्याला देतो. तो गाईची उपासना करतो. सेवा करतो. गाईच्या सेवेत आपलंही कल्याणच आहे. आपण भाकर खातो ती गाईच्या पुत्राच्या श्रमाचीच ना ? गोपाळ फार थोर मनाचा तरुण आहे. त्यानं गोसंवर्धन शाळा उघडली आहे; जणू गाईंचा आश्रमच त्यानं काढला आहे. आज अजून का येत नाही ! का त्याच्याजवळ पैसे नाहीत ?’’ सजन असे म्हणत आहे तो गोपाळ दिसला.

सजनचे शब्द ऐकून मोरीच्या मनात विचार आले. ‘आपल्याला तो गोपाळ घेईल का ? तो गोपाळकृष्ण तर नाही ? स्वत: परमात्मा तर नाही ? या सज्जन कसायाच्या हाती मी पडले. दुसऱ्या कसायांनी लगेच दंडे हाणीत नेले असते. घेईल का गोपाळ आपल्याला विकत ? पण लगेच मनात येई, कशाला जगायची आशा ? त्या देवाजवळ, त्याच्या अव्यंग धामी जा. पण का आशा धरू नये ? मी मानवाची जास्त सेवा करीन. सेवेसाठी जगता आले तर त्यात किती आनंद आहे यामुळं मर्त्यलोकाचा देवांनाही हेवा वाटतो. ही कर्मभूमी, ही सेवाभूमी! मला संधी सापडली की, मी त्यांची सेवा करीन. म्हणावं, प्रेमदृष्टीनं बघा; दोन काड्या घाला; वेळेवर पाणी दाखवा; मी त्यांच्या बाळांना दूध देईन.’ असे विचार ती मनात खेळवीत होती.

तो पाहा गोपाळ आला. सजनने त्याला सलाम केला. त्याने उलट केला. ‘‘आज फार गाई आल्या नव्हत्या. पुढल्या बाजाराला येतील. आणि गोपाळदादा, चांगली गाय आज एकसुद्धा नव्हती. साऱ्या मरतुकड्या, मी तीन-चारच विकत घेतल्या.’’ सजन बोलत होता. मोरीचे हृदय खालीवर होत होते. ती गोपाळकडे बघे आणि पुन्हा खाली मान घाली. जगण्यासाठी याचना नको. मोरी सत्त्वनिष्ठ होती.

गोपाळ सजनच्या गाई पाहू लागला, ‘‘आज तुमच्या पसंतीस यातली एकही येणार नाही, ही तर अगदी फुकट गाय. लोक मला हसले, पण घेतली मी विकत पाच रुपयांस ! काय वाटलं कोणास ठाऊक. मला तिची करुण, केविलवाणी मुद्रा पाहून

तिला घ्यावंसं वाटलं.'' सजन सांगत होता. गोपाळ मोरीकडे पाहू लागला. ''काय बघता इतकं त्या गाईला! माझं अंग चाटू लागली. जरा आश्चर्यकारक गाय आहे नाही !'' सजन स्वत:च आता गाईकडे पाहू लागला.

गोपाळ म्हणाला, ''सजन, ही गाय मी घेऊन जातो. ही फार थोर गाय आहे. जणू माझी मायच आहे. माझ्या आईची गाईवर फार भक्ती. हिला पाहून वाटतं, ती तर नाही हिच्या रूपात अवतरली? माझं हृदय हिला पाहताक्षणीच विरघळलं. आज मी बाजाराला येणारच नव्हतो. सध्या बऱ्याच गाई झाल्या आहेत. अरे, पैसे तरी कोण देतो ? मदत कोण करतो ? पुढं गाई दूध देतील. उत्पन्न होऊ लागलं तर वाढवता येईल पसारा. परंतु घरी मला स्वप्न पडलं. भगवान गोपालकृष्ण जणू म्हणाले, 'जा, जा. माझी गाय घेऊन ये.' मी जागा झालो, उठलो. भगवंताची इच्छा मी जावे अशी, म्हणून आलो. योगायोग तरी पाहा कसा. सजन, ही मोरी, ही मी घेऊन जातो. जणू धवल यशाचा, सत्त्वकलांचा चंद्रमा हिच्या माथ्यावर, भालप्रदेशावर विलसत आहे. पवित्र व पुण्य वस्तू सजन, तू आज मला दिलीस ! सजन, तूही गोभक्त आहेस हो ! सजन, मी हिला नेतो. आज माझं हृदय भरून आलं आहे. घे हे पाच रुपये.'' गोपाळने पाच रुपये सजनच्या पुढे केले.

''गोपाळदादा, नको मला या गाईचे पैसे ! तिनं माझं अंग चाटलं, जणू आईचं प्रेम मला दिलं ! ती थोर माता गोरूपानं आली असेल.'' सजनने एक सैल दोरी मोरीच्या गळ्यात बांधली व ती गोपाळच्या हाती दिली. त्याने गाईला वंदन केले. सजन इतर गाई घेऊन गेला.

मोरीला त्या इतर गाईंची करुणा आली. आपण तेवढे जगावे, याचे तिला वाईट वाटले. परंतु मी मरणाला तयार नव्हते का ? मी स्वार्थासाठी थोडीच जगत आहे ? परमेश्वराची सारी इच्छा ! असे मानून मोरी गोपाळकडे गेली.

गोपाळ मोरीला घेऊन आपल्या आश्रमात आला. एका बाजूला स्वच्छ, सुंदर गोठा होता. त्यात दहा गाई, दोन सांड होते. दोन-चार वासरे एका बाजूला होती. बाग होती. मळा होता. सायंकाळ होत आली होती. गोपाळने गाय अंगणात उभी केली. त्याची पत्नी वनमाला, तिने तिची पूजा केली. ''तिची दृष्ट काढ.'' गोपाळ म्हणाला. गोपाळच्या भावना त्याची पत्नी ओळखी. वनमालेने दृष्ट काढली. मोरीला सुंदर व स्वच्छ गोठ्यात आणले. तिला पाणी पाजले. किती दिवसांत तिला असे सुंदर,

निर्मळ जल मिळाले नव्हते. गोपाळने मोरीपुढे कडबा टाकला. ''मोऱ्ये, खा हो पोटभर. माते, सुखी हो. माझं ध्येय पूर्ण कर. मला गो-सेवा करायला हुरूप येऊ दे.'' असे म्हणून प्रेमाने गोपाळने अंगावरून हात फिरवला. ओरखडे होते तेथे तेल लावले. मोरी सुखावली होती. तिच्या डोळ्यांसमोरून सगळा जीवनाचा पट जात होता.

गोपाळ गाईचे चारा-पाणी करून घरात आला. वनमाला स्वयंपाक करत होती. गोपाळ हातपाय धुऊन घरात आला. घरात गोपाळकृष्णाची मूर्ती होती. गोपाळने निरांजन लावले. उदबत्ती लावली. डोळे मिटून देवाची मूर्ती अंतरी दृढ केली. ''वाढ. झाले ना ?'' गोपाळ वनमालेला म्हणाला.

''आज मुद्रेवर एवढा आनंद कसला दिसतो आहे ? मला तरी सांगा.'' वनमाला म्हणाली.

''आज आपल्याला जणू खरीखुरी आई मिळाली. त्या गाईला पाहून मलाह आईच्यासारखंच वाटलं. आज मुख्य देवता आली. आपलं ध्येय पूर्ण होणार. पुन्हा खेड्यांची गोकुळं होणार. म्हणून मला आनंद होत आहे.''

वनमालेने केळीच्या पानावर भाकरी आणि माठाची भाजी वाढली. द्रोणात दूध दिले.

''तू सुद्धा बस ना माझ्यासमोर. माझ्यासमोर बस. भाकरी तव्यावर ठेव आणि लोणी काढ, की आपल्याला ठेवलं आहेस?'' गोपाळने हसत हसत विचारले.

''हो. मी एकटी का खाईन ? विसरले हो. तुम्ही लहानपणी फार लोणी खात होता, नाही का ?'' वनमालेने विचारले.

''लहानपणी आई तुळशीला लोणी-साखरेचा नैवेद्य दाखवायची आणि मग मी खायचा. आईनं सवय लावली. गाईची भक्ती शिकवली.''

गोपाळ बोलत होता. वनमालाही जेवायला बसली. नाना संवाद करत त्यांचे जेवण संपले.

वनमाला घरात आवराआवर करत होती. ''आज मांजरी कुठं गेली ? केव्हाची दिसली नाही. जरा हाक तरी मारावी.'' वनमाला म्हणाली. ''मनी-मनी-मनी-मनी.'' गोपाळ मनीमाऊस हाक मारू लागला. मनीमाऊस दूध घातले. बाकीचे विरजण्यात आले. वनमालेने चूल सारवली. तवा भांडी घासली. अंगणात चटई पसरून गोपाळ एकतारीवर भजन करत होता. गोड, भक्तिपूर्ण पदे गोपाळ म्हणत

होता. भांडी घासता घासता वनमाला म्हणाली, ''ते परवा नवीन पाठ केलेलं गाणं म्हणा ना. ते मला फार आवडतं.''

''तूच लवकर ये व म्हण. मी येऊ का विसळायला नाहीतर? निदान, म्हणजे तरी लवकर येशील !'' गोपाळ म्हणाला.

''माणसाला खरं यायचं असतं तेव्हा तो विचारतो वाटतं ? मी काही म्हणेन माहीतच आहे तुम्हाला. मी तुम्हाला भांडी घासायला लावली तर ती मोरी गाय हसेल.'' असे म्हणत म्हणत वनमाला भांडी घेऊन घरात गेली.

''झाली होती वाटतं घासून ! तू विसळीतच होतीस म्हणून बोलावलं नाहीस. पण नीट घासलीस ना ? नाहीतर भांडी रागवायची हो !'' गोपाळ म्हणाला.

''पाहा कशी घासली आहेत ती. दुधाची व इतर सारीच कशी आरशासारखी स्वच्छ असतात.''

''आपली आपण करी स्तुती, तो एक मूर्ख !' असे रामदास स्वामींनी म्हटलं आहे. स्वतःच आरशासारखी स्वच्छ म्हणून घे!'' गोपाळ म्हणाला.

''मी म्हणू गाणं ? तुम्ही अलगुजावर वाजवा.'' वनमाला म्हणाली.

गोपाळ वाजवू लागला. वनमाला आपल्या कोमल गळ्याने गाणे म्हणू लागली. गोठ्यातील गाई ऐकू लागल्या. स्नेहाळ, संगीतप्रिय मोरी संगीत-सागरात पोहू लागली.

हसवी मम भारत देशा
अवतरूनि सख्या संहरि क्लेशा ।।
ठायी ठायी गाई हसू दे
भरलेली तत्कास दिसू दे
प्रकटव जनगण वैभवरेषा ।।
ज्ञान विकासो विद्या विलसो
सकळा सुंदर सुकला हासो
रमव सरस्वती-लक्ष्मी सुवेषा ।।
ये वनमालाधर गोपाळा
ये गोविंदा ये घननीळा
चरण तुझे शुभ दावि रमेशा ।।

वनमालेने 'ये वनमालाधार गोपाळा' चरण घोळून घोळून म्हटला. गोठ्यात मोरीसुद्धा तो चरण म्हणत होती. गीत थांबले. गोपाळाची सुरेल मुरली तशीच वाजत होती. थांबली मुरली.

"मला हे गाणं फार आवडतं. भाव गोड, चाल गोड, शब्द गोड." वनमाला म्हणाली.

"तू मोघम सांगितलंस, पण त्यातले कोणते शब्द तुला जास्त आवडले, सांगू?" गोपाळ म्हणाला.

"सांगा."

"ज्यात तुझं नाव आहे तो चरण तू घोळून म्हटलास. मी तो चरण मुळीच म्हटला नसता." गोपाळ म्हणाला.

"म्हटलं, माझं नाव त्यात नसून आपलं वर्णन त्यात आहे. 'वनमालाधर गोपाळ' असं आहे. आपल्या प्रिय वस्तूचं नाव आहे. म्हणून तो चरण मला आवडला." वनमाला म्हणाली.

"आपण गोठ्यातून जाऊन येऊ चल. शेण वगैरे ओढून घेऊ." दोघेही निघाली. वनमालेने हातात कंदील घेतला होता. गोठ्यात गाई सुखाने बसल्या होत्या. मोरी सुखावली होती. त्या मंगल मोऱ्या गाईने वनमालेला आशीर्वाद दिला. "बाळे, तुझाही कुसवा धन्य होऊ दे. तुझ्याही पोटी ध्येयवादी, सत्त्वनिष्ठ, सुंदर, समर्थ, तेजस्वी, धर्मपूजक, सत्यवेधक, प्रेमळ व दयाळू बाळ येवो. तूही पुत्रवती हो."

मोरी गाय आता चांगली भरदार दिसे. तिला गाजरे व इतर फळे गोपाळ चारी. तिच्या अंगावर तेज दिसू लागले. आपल्या पोटी गर्भ राहावा असे तिला वाटे. तिला गर्भ राहिला. तिची कळी वाढू लागली. तिच्या अंगप्रत्यंगातून जणू तेज ठिपकत होते. वनमाला म्हणे, "कशी दिसते मोरी गाय ? जणू भूषण आहे आपल्या या छोट्या संसाराचं ! भारतातील गाई अशा झाल्या पाहिजेत."

सकाळचे दूध थोडे घरात ठेवून बाकीचे गोपाळ विकून येई. बाजाराच्या दिवशी घरात जमलेले तूप तो विकी. मळ्यातला भाजी-पालाही त्या दिवशी न्यायचा. आता पावसाळ्यात पुष्कळ भाज्या लावल्या होत्या. दोघांपुरते धान्यही तो पेरी. गोपाळने आता एक लहानसा मुलगा कामाला ठेवला. तो तिथेच जेवी. त्याचे नाव सावळ्या.

वनमालेलाही आता दिवस गेले होते. तिला सारे काम उरकत नसे आणि दिवसेंदिवस कामही वाढत होते. आता आणखी गाई विणार होत्या. म्हणून सावळ्याला गोपाळने ठेवले होते. सावळ्याला काम आवडे.

गोपाळचे गोपालन-कार्य अशा प्रकारे चालले होते. मोरी मोठ्या सुखात नांदत होती. ती तेथील आराध्य देवता होती.

***

मोरी गाय विकून शामराव घरी परत आले. आपल्या घराचे भाग्य, घराचे मंगल आपण विकून आलो हे त्यांच्या ध्यानीमनीही नव्हते. वामनने विचारले, ''बाबा, गाय कुठं आहे ?''

''अरे, विकली. विकतही कुणी घेईना. शेवटी घेतली बाबा एकानं पाच रुपयांत. घरी आणावी लागते की काय अशी मला भीती वाटत होती.'' शामराव म्हणाले.

''बाबा, का हो विकली ? मला फार आवडत असे मोरी.'' वामन म्हणाला.

''अरे, इथं ठेवून करायची काय ? उगीच अडगळ, भाकड गाईचा उपयोग काय ?''

अजून उन्हाळा संपला नव्हता. एक दिवस वामनला ताप आला. तो अंथरुणावर पडला. त्याचे लक्षण बरे दिसेना. शामरावांनी वैद्यांचे औषध सुरू केले होते. वामनची आई त्याच्याजवळ रात्रीची बसलेली असे. वामनचा ताप हटण्याचे चिन्ह दिसेना.

''तुम्ही वासरू मारलंत, मलाही मारा. मी जातो. रत्न्या, मी आलो थांब.'' असे वामन वातात म्हणे. वामनचे शब्द ऐकून त्याची आई मनात चरके, घाबरे. पोरगा हाती लागत नाही असे तिला वाटे. ''मोरी, कुठं आहे मोरी ! चार मोच्ये, मला चार.'' असा वामन बोले.

''मोरी आणता येईल परत ? पोर एरव्ही काही वाचणार नाही.'' वामनरावांना पत्नी म्हणाली.

''अगं, कसायाला दिलेली गाय का कुठं परत आणता येते ? आणि गाय आणून का पोरगा बरा होणार आहे ? काहीतरी बडबडतोय झालं !'' शामरावांनी आपल्या बुद्धिवादाने तिची समजूत काढली.

एक दिवस वामन इहलोक सोडून निघून गेला. त्याच्या आईच्या शोकाला पारावार राहिला नाही. मोरी गाय गेली म्हणूनच आपला वामन गेला... असे त्या माउलीच्या मनात आले.

एक दिवस सारा गाव रात्री झोपला होता. उन्हाळा अति होत होता. शामराव अंगणात झोपले होते. त्यांची पत्नी आत झोपली होती. तिच्याजवळ छोटी रंगू कुशीत होती.

रात्री शामराव अंगणात एकदम जागे झाले, घाबरून, "अरे, आग आग, आपलं घर पेटलं. उठा धावा रे, आग, आग !" शामराव ओरडू लागले. पत्नी रंगूसह आली. आग विझवायला पाणी कोठे आहे ? विहीर दूर. घर तर शिलगत चालले. ज्वाला धडधडत चालल्या. आग भडकली. शामरावांना घरातील वस्तू काढता येईनात. लोकांनी आग विझवायचा प्रयत्न केला. पण व्यर्थ ! शामराव आपल्या डोळ्यांनी आपल्या घराची आग पाहात होते. साऱ्या वस्तूंचा, घरादाराचा होम झाला.

गावातील देवळात शामरावांनी संसार थाटला. पाऊस डोक्यावर आलेला. आता घर कसे बांधता येणार ? दोन-चार भांडी व काही मडकी देवळात होती. काही कपडे होते. पत्नीचे दोन-चार दागिने होते ते विकून खायला हवे होते. कसेतरी करून ते दिवस कंठीत होते.

पाऊस सुरू झाला. लोकांचे पेरे झपाट्याने सुरू झाले. शामरावांच्याजवळ ना नांगर, ना बैल. लोकांजवळ मिंधेपणाने भीक मागावी लागे. देवळात थंडी फार वाजे. एक दिवस लहानग्या रंगूला बरे वाटेना. तिला ताप आला. कोवळी पोर तापाने भाजून निघाली. शामराव तरी काय करणार ? त्यांची पत्नी रडे. एक दिवस रंगूही निघून गेली. शामरावांच्या पत्नीच्या डोळ्यांची धार आता खळेना. एखादा सण आला की पोरांची आठवण यायची !

पावसाळा संपला. शामरावांनी झोपडे बांधले. देवळातला संसार एका शुभमुहूर्तावर घरात आला. परंतु आता कर्ज झाले होते. शामरावांच्या पत्नीने, सावित्रीबाईंनी नथही विकायला दिली. सावित्रीबाईंना स्वस्थ वाटत नसे. त्यांच्या जिवाला टोचणी-हुरहूर असे. गावात कोणी स्वयंसेवक येऊ लागला. तो सूत कातायला शिकवी. वेळ फुकट दवडू नका सांगे. त्याच्यापासून त्यांनी एक चरखा घेतला, त्या सूत कातू लागल्या. वेळ मिळताच सावित्रीबाई चरख्यावर बसत. त्यांना तो चरखा आधार वाटे.

दसरा-दिवाळी गेली. संक्रांत गेली. शिमगा जवळ आला. कसातरी संसार चालला होता. सावकारांचा ससेमिरा होता. शामराव विवंचनेत असत. पुन्हा देवळात

जावे लागेल की काय ? एक दिवस शामराव घरी आले, तो सावित्रीबाई अंथरुणावर. त्यांना कधी ताप येई, कधी अति मस्तक दुखे. त्यांना करमेना.

एका वैद्याने शामरावांना सांगितले, ''गाईचे निर्भेळ तूप मिळेल तर उपाय आहे. मी एक चूर्ण देईन ते त्या तुपात मिसळून प्यायचं.'' वैद्याने औषध देऊन ठेवले. पण गाईचे तूप कोठे मिळणार? आणि शामरावांच्याजवळ पैसे तरी कोठे होते ? त्यांना कोणीतरी गोपाळचे नाव सांगितले.

मोऱ्या गाईला गर्भ राहिला होता. ती सुंदर दिसे. तीन-चार महिन्यांनी ती व्याली असती. आज गोपाळ गाईचे तूप विकावयास बाजारात जाणार होता ! सावळ्याने मळ्यातील भाजी काढली. छोटी गाडी जुंपली.

''लवकरच या परत.'' वनमाला म्हणाली.

''जरा उशीर झाला तर भीती वाटेल एकटीला ?'' गोपाळने विचारले.

''मी एकटी थोडीच आहे ? इथं गाई आहेत; बैल आहेत. इथं परमेश्वर आहे. भीती नाही वाटत एकटीला. म्हटलं आपलं लवकर या. मला एकटीला करमत नाही.'' वनमाला म्हणाली.

''अगं, गाईची वासरं आहेत. फुलझाडं आहेत. त्यांच्याशी खेळ. नाहीतर पाणी घाल झाडांना.'' गोपाळ म्हणाला.

''मी दमते. तुम्ही लवकर याल का ?''

''हो, हो. येऊ. झालं ?'' गोपाळ म्हणाला.

''सावळ्या... लवकर या रे.''

''होय वहिनी. लवकर येऊ.'' सावळ्या म्हणाला. गाडी बाजारात गेली. वनमालेने थोडा वेळ सूत काढले. मग थोडा वेळ बागेत रमली. मग गोठ्यात जाऊन तिने शेणमूत दूर केले. अंगण झाडले, घरातील दिवे पुसले. तो गाडीच्या घुंगरांचा आवाज आला. ''आले वाटतं...'' म्हणून वनमाला बाहेर आली. गाडीत आणखी कोणीतरी होते. तो ओसरीत उभी राहिली. गोपाळ शामरावांना घेऊन ओसरीवर आला. ''आपल्या घरात ते कमळीचं तूप ठेवलेलं आहे ना ? ते आण बरं.'' गोपाळ वनमालेला म्हणाला. गोपाळने प्रत्येक गाईला नाव दिले होते. तो गाईंवर वेगवेगळे प्रयोग करी. कमळीला दुधाचा चारा थोडा देण्यात येत असे. कमळीच्या दुधाचे तूप कसे रसरशीत होते. ''पाहिलंत शामराव, मी मुद्दाम हे विकत नाही. औषधाला म्हणून

ठेवलं आहे. तुम्ही यातील दोन शेर घेऊन जा. पैसे नको हो. बरी होऊ दे तुमची बायको म्हणजे झालं.'' गोपाळ म्हणाला.

गोपाळ त्यांना गाई दाखवायला गेला. पाहता पाहता ते मोरीजवळ आले. ''ही आमची आराध्य दैवत. विईल दोन-तीन महिन्यांनी, मग तुम्हाला तूप देऊ पाठवून.'' गोपाळ म्हणाला.

शामराव ऐकत होते. ते गाईकडे पाहातच राहिले. त्यांनी गाईला ओळखले नाही, पण तिने ओळखले. ती ओशाळली, लाजली. आपल्याला पाहून धनी लाजेल, शरमेल. आपल्याला त्याने ओळखू नये म्हणून तिने मान फिरवली.

''ही कुठं मिळाली गाय तुम्हाला ?'' शामरावांनी विचारले.

गोपाळने सारी हकिकत सांगितली. शामरावांच्या डोळ्यांतून आसवे ओघळली! ते मोरीजवळ आले. मोरीने त्यांचे पाय चाटले.

''गोपाळ, ही माझी मोरी गाय. मी दुष्टानं हिला गांजलं, छळलं. पायातला काटा मी काढला नाही. तिच्या वासराचे हाल केले. गोपाळराव, देवानं मला पाप्याला शासन केलं. करावं तसं भरावं. मोऱ्ये, क्षमा कर. आता तिला बरं वाटो. मी तुझी सेवा करण्यास येईन. आम्ही दोघं येऊ हो माते.'' शामरावांनी गाईचे पाय धरले. आपल्या जुन्या मालकिणीला बरे वाटावे म्हणून मोऱ्या गाईने देवाचा धावा केला.

गोपाळ म्हणाला, ''शामराव, तुम्हाला मोरी गाय मी परत देतो. व्याल्यावर तुम्ही घेऊन जा. ही तुमची गाय आहे. तुम्हाला पश्चात्ताप झाला आहे.''

''छे ! आता मीच तुमच्याकडे येऊन राहीन. मला गुराखी होऊ दे. गोवारी होऊ दे. तुमच्या स्फूर्तीनं, पुण्य आदर्शानं मलाही स्फूर्ती मिळो. पूर्वीचं पाप थोडंफार धुतलं जावो. इथंच गोमातेची सेवा करायला आम्ही उभयता येऊ.'' शामराव म्हणाले.

तेथून ते घरी आले. त्यांनी पत्नीला हकिकत सांगितली. मोरी आनंदात, सुखात आहे हे ऐकून ती आनंदली. तिचा रोग निम्मा पळाला. तुपातून चूर्ण घेतल्यावर आराम पडू लागला.

एक दिवस शामराव म्हणाले, ''आपण त्यांच्या आश्रमात जाऊन राहायचं का? हे घर-दार विकून सावकाराचं कर्ज देऊन टाकू. आपण गोमातेची सेवा करू. काय आहे तुझं मत ?''

"मी तर मागंच सांगितलं होतं तुम्हाला. खरंच छान होईल. मोऱ्या गाईची सेवा करू. पूर्वीचं पाप पुसून टाकू. केव्हा जायचं?" सावित्रीबाईंनी अधीर होऊन विचारले.

"जाऊ लवकरच." शामराव म्हणाले.

शामरावांनी शेत, घर विकले. ते गोसेवाश्रमात आले. गोपाळने शामरावांचे स्वागत केले. सारे एकत्र राहू लागले. शामराव जणू मोठा भाऊ, सावित्री मोठी बहीण. त्या साऱ्यांचा जणू एक आश्रम. त्यांच्यात काही भेदभाव राहिला नाही. वनमालेला आधार झाला. दोहोंची चार मंडळी झाली. शामराव सेवा करू लागले. ते पहाटे उठायचे, सावळ्या उठायचा. गोपाळही उठे. सावळ्या व शामराव शेण वगैरे काढत, खतासाठी खड्ड्यात नेऊन टाकत. गोपाळ धार काढी, मग सावळ्या व शामराव शुद्ध दूध काढायला येत. भाजीला, मळ्याला मग पाणी लावीत. शामराव गाई घेऊन रानात जात. जरा पाय मोकळे करून आणीत. शामराव गाई घेऊन रानात जात. जरा पाय मोकळे करून आणीत. अजून पावसाला अवकाश होता. शामराव वासरांना पाला चारत. मोरीची सेवा करत. गाईला पाणी पाजत. झाडांना पाणी देत. गोपाळ दूध घेऊन जाई व विकून येई. सावित्री व वनमाला भाजी वेचून ठेवत. फुलांचे हार करून ठेवत. अशा तऱ्हेने काम सुरू होते.

पावसाळा सुरू झाला. पृथ्वीवर पर्जन्यधारा पडू लागली. तेव्हा भूमीवर शीतल पाऊस पडू लागला. हिरवे हिरवे चिमुकले गवत पृथ्वीमातेच्या पोटातून बाहेर डोकावू लागले. भीत भीत बाहेर येऊ लागले, पण धीट झाले. वर येऊन माना नाचवू लागले, गाईगुरांना आनंद झाला. मयूर-हरणांना रानात आनंद झाला. हवेत गारवा आला. रानात चारा आला. गाई चरू लागल्या. शामराव गाई चारायचे. कधी गोपाळही जायचा, पावा वाजवायचा. मोरीचे दिवस भरत आले, असे वाटू लागले. तिला आता बाहेर सोडत नसत. हिरवे हिरवे गवत तिला आणून देत.

मोरी गाय व्याली, ती खूप दूध देऊ लागली. सर्वांना आनंद झाला. ती १५-१६ शेर दूध देऊ लागली. आजूबाजूचे शेतकरी पाहायला येत. आणखी गाई व्याल्या. अमळनेरला छात्रालय होते. तेथे गाईचे दूध जाऊ लागले. गावातही घरोघर गाईंचे दूध जाई, आश्रमाची प्रसिद्धी होऊ लागली.

पुढे वनमाला बाळंत झाली. सुंदर बाळ जन्माला आले. सावित्रीबाईंनी तिचे सारे केले. शामराव व सावित्रीबाई यांच्यासाठी वेगळी झोपडी बांधण्यात आली.

सावित्रीबाई म्हणजे वनमालेचे जणू माहेर होते, वनमाला बाळाला घेऊन गोठ्यात जायची.

रात्री अंगणात प्रार्थना होई. मोरी मनात म्हणे, माझ्या पहिल्या धनिणीला मुलगा होवो – वामन पुन्हा येवो ! माझ्या बाळाजवळ खेळायला येवो.

पुढे काही दिवसांनी सावित्रीबाईंना मुलगा झाला. तोंडावळा अगदी वामनसारखा होता. मोरी गाय आनंदली ! त्या दिवशी तिने रोजच्यापेक्षा जास्त दूध दिले. जणू वामनसाठी तिला निराळा पान्हा फुटला. घरात, गोठ्यात सर्वत्र आनंद होता.

पुण्याला एक प्रदर्शन भरणार होते. आपल्या गाईंचे प्रदर्शन करावे असे गोपाळच्या मनात नव्हते. पण समाजाच्या हितासाठी तो तिला नेणार होता. गोपाळ व सावळ्या मोरीला घेऊन गेले.

पुण्याच्या प्रदर्शनात... ती पाहा, एके ठिकाणी मोरी गाय उभी आहे. पवित्र, मंगल मोरी गाय उभी आहे. गोपाळने गोपाळाश्रमाची सारी हकिकत, सारे प्रसंग लिहून एक पुस्तक छापवून घेतले. एक आणा किंमत ठेवली. हजारो प्रती खपल्या. गोष्टीतील मोरी गाय ती हीच, असे पाहून लोक तिला नमस्कार करत. तिचा पाडा एक वर्षाचा अजून झाला नव्हता, तरी तो केवढा दिसे ! त्याच्या कपाळावर चंद्र खुले. मोऱ्या गाईने, तिथे वेळेस २५ शेर दूध दिले. मोऱ्या गाईला पहिले बक्षीस व चांदला पहिले पत्रक मिळाले !

एक दिवस मॅजिक लॅन्टर्नच्या साहाय्याने गोपाळने गोपालनावर सुंदर व्याख्यान दिले. व्याख्यान देता देता त्याने हजारो शेतकऱ्यांची मने जिंकली. त्यांना गोभक्ती शिकवली. प्राचीन वेदकाळापासून आपल्या देशात गोभक्ती कशी आली ते त्याने चित्रांतून दाखवले होते. मधून मधून त्याने गीते म्हटली. मोऱ्या गाईचाही त्याने उल्लेख केला आणि शेवटी तिचे चित्र दाखवले. कसायाजवळून घेतलेली, पाच रुपयांनाही महाग असलेली मोरी आणि सध्याची तेजस्वी मोरी!

मोरी गाय प्रदर्शनाचे मुख्य भूषण होते. मोऱ्या गाईच्या दर्शनाला लोकांचे थवेच्या थवे येत.

मोरीला व चांद्याला घेऊन गोपाळ व सावळ्या परतले. आश्रमात मोरी आली. जणू दिग्विजय करून आली होती ! त्या दिग्विजयी गोमातेचे स्वागत करायला वनमाला आणि सावित्री हातात पंचारती घेऊन उभ्या होत्या. त्यांची बाळे दुसऱ्या दोन सेवकांच्या

कडेवर होती. गोठ्यातील गाई हंबरल्या. मोरी हंबरली! आपला भाग्यकाल आला... आला ! गोमातेचा आला म्हणजे भारतमातेचाही आलाच. कारण जसजशी गोपूजा वाढेल तसतसे भारताचे भाग्य वाढेल.

भारताचे भाग्य गो-सेवेशी निगडित आहे. गाय म्हणजे भारताच्या संस्कृतीचे प्रतीक. भारताच्या संस्कृतीचे मंगल चिन्ह! गाय म्हणजे भारताचे तप, गाय म्हणजे भारताचा जय, भारताचे बळ. गाय म्हणजे भारताचे सत्त्व, गाय म्हणजे भारताचे औदार्य ! भारताचा ज्याला उद्धार करायचा आहे त्याने गोसेवा करावी !

✦✦✦

गुरुजींचे उपदेश

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

तिळगूळ घ्या गोड बोला

आज मकर संक्रांतीचा दिवस. सूर्य आज मकर राशीत शिरला म्हणून मकर संक्रांत म्हणतात. आजपासून दक्षिणायन संपून उत्तरायणास सुरुवात झाली. दक्षिण + अयन. अयन म्हणजे जाणे. विषुववृत्ताच्या दक्षिणेस सूर्य सहा महिने असतो. तो आता उत्तरेकडे जाणार. उत्तरायण हे पुण्यकारक मानले गेले आहे. भीष्माचार्य शरपंजरी पडले होते; परंतु ते ज्यावेळी लढाई करावयास लागले त्यावेळी दक्षिणायन होते. म्हणून प्राण न सोडता, उत्तरायणाची वाट पाहात, ते योगबलाने शरपंजरी पडून राहिले. उत्तरायण हे पवित्र का मानण्यात येई? उत्तर ध्रुवाकडून आपले पूर्वज आले असे म्हणतात. उत्तर ध्रुवाकडील लोकांस दक्षिणायनात थंडीत दिवस काढावे लागत. उत्तरायण लागल्यावर त्यांस पुनरपि सूर्याची उष्णता व प्रकाश मिळू लागत. म्हणून हा दिवस सुखवर्धक, पुण्यकारक असा ते मानू लागले. हिंदुस्थानात आल्यावरही ही प्राचीन परंपरा चालू राहिली. खानदेशात खेडोपाडी संक्रांत हे नाव माहीत नसून, उत्राण हे नाव या सणास ते देतात. उत्राण हा उत्तरायण याचा अपभ्रंश आहे. म्हणजे या उत्राण शब्दात संक्रांत याचा अर्थ आहे. संक्रांत याचा अर्थ आक्रमिलेले. संक्रांत पौष महिन्यांत येते. कारण १२ महिन्यात १२ राशी सूर्य भोगतो. तेव्हा संक्रांत या शब्दास महत्त्व नसून उत्राण या शब्दासच महत्त्व आहे.

उत्तरायण लागल्यापासून दिवस मोठे होऊ लागतात. बायका म्हणतात, 'दिवस तिळतिळ वाढू लागला.' दक्षिणायनात दिवस लहान व रात्री मोठ्या असतात. आता दिवस मोठे व रात्री लहान होऊ लागतील.

मकर संक्रांत हा आपण सण मानला आहे. आज तिळगूळ देतात. तीळ हा स्निग्ध पदार्थ आहे. तिळात स्नेहत्व आहे. थंडीच्या दिवसात तिळाचे तेल अंगास लावून स्नान केले तर अंग फुटत नाही. असा हा स्नेहपूर्ण तीळ आज आपण एकमेकास त्यात गूळ मिसळून देतो. त्यायोगे शरीराप्रमाणे आपले मन स्निग्ध व स्नेहपूर्ण झाले पाहिजे. कठोरत्व सोडून दिले पाहिजे.

हल्ली तिळगूळ फक्त बाळबोध व गरीबगरिबांत खेड्यापाड्यात असतो. सुशिक्षित लोक तिळाचा हलवा करतात. साखरेच्या पाकात तीळ घोळवून हा हलवा तयार करतात व तो तिळगूळ म्हणून वाटतात. हलवा जरी दिला तरी तोंडाने 'तिळगूळ घ्या, गोड बोला' असेच म्हणतात.

लहानपणी माझी बहीण एक गाणे म्हणे, ते मी ऐकत असे. ते या संक्रांतीसंबंधी असे; परंतु त्यात मोठा अर्थ भरलेला होता. हलवा तयार करताना आपण शेगडी घेतो व तिच्यात कोळसे घालतो. त्या गाण्यात कवी विचारतो – कोणती शेगडी, कोणते कोळसे ? तर –

हृदय–शेगडीमाजिं कोळसे
अहंपणाचे घालुनि खासे

आपले हृदय ही शेगडी आहे. या शेगडीमध्ये अहंपणाचे कोळसे घालून व तो अहंकार जाळून हा हलवा तयार करावयाचा आहे. किती सुंदर कल्पना !

नंतर सत्कृत्यांचे तीळ घेऊन ते भक्तीच्या साखरेत घोळवावयाचे म्हणजे शुद्ध व शुभ्र हलवा तयार होईल; परंतु या हलव्यावर केशरी रंग घ्यावयाचा, तो कसला घ्यावयाचा? ऐका –

सत्प्रेमाचा रंग केशरी
या हलव्यावर विलसे भारी
खातां मुक्तचि या संसारी
अशी आस असे या कविला ।।
सप्रेमें मुखीं घाला । तिळगूळ घ्या, मंजुळ बोला ।।

सत्कृत्यांच्या तिळांचा भक्तीच्या शर्करेने केलेला जो हा हलवा, त्यावर सत्प्रेमाचा-शुद्ध पवित्र प्रेमाचा-केशरी रंग दिला आहे. असा हा सुंदर हलवा खाल्ल्याने फळ काय मिळते? कवी म्हणतो, ''हा असा सुंदर हलवा खाल्ल्याने तुम्ही मुक्त व्हाल. सुखदु:खांपासून मुक्त व्हाल. म्हणजे समाधानी व्हाल. घाला तर मुखी हा गोड हलवा व लागा बोलावयास गोड.''

आजचा दिवस मोठा भाग्याचा आहे. ज्याच्याबरोबर आपण भांडलो असू, ज्याची स्पर्धा केली असेल, ज्याचा मत्सर वा द्रोह केला असेल, ज्याला लागेल असा कठोर शब्द आपण बोललो असू - अशाजवळ पुनरपि आपण गोड संबंध आणण्याचा प्रयत्न करावयाचा हा दिवस आहे. मरेपर्यंत भांडत कशास राहा ? भांडलो; चला पुन्हा गोड होऊ. किती छान कल्पना ! आपली भांडणे व परस्पर अढी विसरून जाण्यासाठी हा सुंदर दिवस योजलेला आहे.

घ्या तर तिळगूळ हाती. ज्याच्याजवळ तुमचा भांडणतंटा झाला असेल, जा तो मिटवा; परस्परप्रेम पुन्हा उत्पन्न होऊ द्या; सलोखा, स्नेह, समाधान ही अंत:करणात उत्पन्न होऊन गोडीगुलाबीने आयुष्याचा मार्ग सुखावह करा म्हणजे सुख येईल. हा मंगल दिवस मांगल्याने साजरा करा म्हणजे चांगले होईल.

+++

थोडे पण चांगले

थोडें परि निरें । अवीट तें घ्यावें खरें ।।

– तुकाराम

तुमच्याजवळ जे काही असेल ते थोडे असले तरी चालेल; परंतु ते चांगले असावे; त्यापासून तुम्हास सदोदित सुख मिळावे. उगीच पुष्कळ गोष्टी स्वतःच्या जवळ आहेत; परंतु त्यातील एकही जर हातात घेण्यासारखी नसेल तर तिचा काय फायदा ?

थोडाच व्यायाम घेतला तरी चालेल; परंतु तो नियमित दररोज जर घेतला तर फायद्रेशीर होतो. रोज दहाच मिनिटे व्यायाम घ्या; परंतु तो पद्धतशीर घ्या. त्यापासून शरीरास जो फायदा होईल, तो वाटेल तसा व्यायाम–कधी एक–दोन तास तर कधी मुळीच नाही, अशामुळे होणार नाही.

रोज अर्धा तास, पाऊण तासच वाचीत जा; परंतु ते नियमाने वाचीत जा. रोज गीतेचे दोनच श्लोक पाठ करावयाचे ठरविले तरी वर्षात सर्व गीता पाठ होईल. कार्य दिसते थोडे; परंतु एकवटले म्हणजे कितीतरी दिसते. रघुवंशातले रोज दहावीस श्लोक वाचले तर तीन महिन्यांत सर्व रघुवंश वाचून होईल. रोज थोडे का होईना – परंतु नेमके वेळचे वेळी करा.

रोज देवासाठी दहा–पंधरा मिनिटे तरी देत जा. त्यावेळी मन शांत करून परमेश्वराची प्रार्थना करा. तीन–चार तास नाना प्रकारची कर्मे, देवतार्चने, नाही करता

आली तरी चालेल; परंतु दहा-पंधरा मिनिटेच देवाचे ध्यान करा. कारण आपले चंचल मन फार काळ एकाच गोष्टीत मग्न राहू शकत नाही. यासाठी तीन-चार तास देवदेव करणे यात मनुष्याचे लक्ष सतत ईश्वराकडे राहू शकत नाही; म्हणून भक्तिपुरस्सर एकच का नाव होईना - परंतु ते उच्चारीत जा. मनापासून उच्चारलेल्या त्या एका नावाचा तुमच्या मनावर जो परिणाम होईल त्या वेळेस जी पवित्रता, निर्मळता, प्रेमळता तुम्हास वाटेल ती धन्य होय.

थोडेच खा; परंतु ते चांगले असू द्या. चिवडा, भजी असले पदार्थ वाटेल तेवढे खाल्लेत तर शरीरास अपाय मात्र होईल. याऐवजी शरीरास फायदेशीर होईल असे काहीतरी खा. दोन बदाम, दोन मनुका, दोन खडीसाखरेचे खडे एवढेच रोज इतर वेळी खाल्ले तरी ते हितकारक आहे. तसेच जेवणाचे वेळी थोडे परंतु स्वच्छ व हितकर असे खा. वरणभात-लिंबू म्हणजे एक प्रकारचे टॉनिक आहे. असे साधे अन्न सोडून दुसरे पदार्थ कशास खाता ? जवळ एखादाच कपडा असला तरी चालेल; परंतु जो असेल तो स्वच्छ नीटनेटका असला म्हणजे झाले. नाहीतर जवळ डझन सदरे आहेत. हा मळला, तो घाल; तो मळला, दुसरा घाल, असे होते. आणि एखादे दिवशी एकही नीट घालावयास नाही, असे होते. असे सर्व मलीन वस्त्रभांडार असण्याऐवजी थोडे परंतु चांगले असावे म्हणजे झाले.

थोडेच शिका; परंतु ते पायाशुद्ध शिका. एकच वाक्य शिका; परंतु ते ठसू द्या. आपल्याकडे फार प्राचीन काळापासून अशी म्हण आहे की -

'एकः शब्दः सम्यग्ज्ञातः सः स्वर्गलोके कामधुक् भवति।'

एकच शब्द नीट शिकला, तरी तो मनुष्य स्वर्गात सर्व काम पूर्ण करून घेऊ शकेल. तुम्ही एकच शब्द शिकलात - उदाः 'सत्य', 'प्रामाणिकपणा', 'भूतदया' - तरी त्यामुळे तुम्ही देवाच्या जवळ जाऊ शकाल. शिकणे म्हणजे तद्रूप होणे. भाराभर वाचतो; परंतु लक्षात काही नाही. भाराभर वाचण्यापेक्षा थोडे, परंतु मन लावून वाचा. जसे भराभर खाण्यापेक्षा थोडे चावून खाल्लेले नीट पचते; त्याप्रमाणे मनाचेही आहे. त्यास थोडे थोडे खाद्य द्यावे.

ध्येय असे ठेवा की जे काही मी थोडे मिळवीन, त्याचा मी धनी होईन. जे काही थोडे मिळवीन, ते चांगले व हितकर असेल. एखादाच मित्र मिळवीन; परंतु तो जिवास जीव देईल. नाहीतर खंडोगणती मित्र, परंतु

'कठिण समय येतां कोण कामास येतो ?'

अशा प्रकारचे नकोत. थोडेच करीन; परंतु स्वत:ला व दुसऱ्यासही संतोषदायक आहे असेच करीन.

राशीचा (Quantity) प्रश्न नाही, गुणाची (Quality) प्रतिष्ठा आहे, हे ध्यानात धरा. अमृताचा एक थेंब मिळाला तरी अमर व्हाल. आपल्या गीतेमध्ये एक श्लोकार्थ आहे –

'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।

थोडाच धर्म, थोडेच कर्तव्य, परंतु नीट करा. ते तुम्हास मोठ्या संकटातून वाचवील. कधीतरी तुम्हास हातभार देईलच. आपल्या आपत्काळात आपली सत्कृत्येच आपणास आधार देतात; कारण जे सत्य व धर्म्य आहे तेच आधार देईल. जे असत्य आहे ते वाळूप्रमाणे आहे; त्याचा आधार मिळणार नाही.

तेव्हा मनात नीट धरा. आम्ही थोडेच काहीतरी करू; परंतु ते चांगले व व्यवस्थित करू; सुंदर व हितप्रद असे करू. थोडेच वाचू; परंतु मनापासून वाचू. थोडेच शिकू; परंतु मनापासून शिकू. थोडेच बोलू; परंतु ते सत्य व मधुर असेल. अशा प्रकारची गुणांकडे दृष्टी ठेवा. 'काम किती करतो याकडे लक्ष देऊ नको' असे ज्ञानेश्वर म्हणतात. ते म्हणतात: असे वागणे म्हणजे योगी होणे आहे.

ज्ञानेश्वर लिहितात –

आहार तरी सेविजे । परि युक्तीचेनि मापें मविजे ।
क्रियाजात आचरिजे । तयाचि स्थिती ।।
मापितला बोल बोलिजे । मितलिया पाउलीं चालिजे ।
निद्रेही मान दीजे । अवसरें एकें ।।
जागणें जरी जहालें । तरी व्हावें ते मितलें ।
येतुलेनि सर्वसाम्य संचलें । असेल सुख ।।
ऐसें युक्तीकचेनि हातें । जैं इंद्रियां वोपिजे भातें ।
तैं संतोषेसि वाढतें । मनचि करी ।।
बाहेर युक्तीची मुद्रा पडे । तंव आंत आंत सुख वाढे ।
तेथें सहजचि योग घडे । नाभ्यासितां ।।

मोजका आहार, मोजकी निद्रा, मोजके जागरण, मोजके बोलणे, मोजके चालणे; अशा प्रकारे इंद्रियांस मोजकेच दिले, म्हणजे मनाचा संतोष वाढत जातो. बाहेरच्या या सर्व आहारादी गोष्टींत मिती पडली, नियमितपणा, व्यवस्थितपणा आला, म्हणजे मनातील शांतिसुख वाढते व योगाचा अभ्यास न करिता योगी होता येते.

म्हणून मुलांनो, जे काही कराल ते नीटनेटके, मनापासून, व्यवस्थित करा. यामुळे तुमचा अतोनात फायदा होईल. मग आयुष्यात तुम्हास पस्तावावे लागणार नाही. जितक्या लवकर तुम्ही वरील गोष्टी शिकाल, ही गुरुकिल्ली हाती घ्याल, तितक्या लवकर सुखाचे दरवाजे उघडतील. वेळीच सावध होऊन कार्यास लागणे हे चांगले. नाहीतर 'बैल गेला व झोपा केला', असे होईल !

+++

आपण शिकतो कशासाठी ?

आपण सर्वजण शाळेमध्ये जातो; तेथे काही वर्षे शिकतो; ज्यास जास्त इच्छा असते, तो पुढे महाविद्यालयात जातो व तेथे काही वर्षे शिकतो; परंतु हे सर्व आपण कशासाठी करतो? एक विद्यार्थी होता. तो म्हणाला, ''मॅट्रिक होऊन तरी पुढे काय करावयाचे ?''

प्रश्न मोठा कठीण खरा. मॅट्रिक होऊन काय करावयाचे? बी. ए. वा एम. ए. होऊन काय करावयाचे ? दिवसेंदिवस सरकारी नोकऱ्या तर कमी मिळत जाणार; कारण आपण सर्वच जण जर अंमलदार झालो तर देशातील इतर कामे कोणी करावयाची ? सर्वांना जर अंमलदार होता येणे शक्य नसेल तर शिकावयाचे तरी कशासाठी, हा प्रश्न शिल्लक राहतोच.

शिकण्यामुळे तुम्हास पोटास साधन मिळाले तर ठीकच आहे; परंतु शिकल्यामुळे जरी ते साधन मिळाले नाही, तरी शिकण्याचा तुम्ही कंटाळा करू नका. 'केवळ पोटाला साधन म्हणून शिकतो' असे मनात, होता होईतो मानू नका. डॉक्टर झालात, इंजिनिअर झालात, शेतकी कॉलेजातून शिकून बाहेर आलात, तरी या धंदेवाईक शिक्षणासही केवळ पोटभरू शिक्षण असे समजू नका.

पोटासाठी जर शिकावयाचे नाही तर मग कशासाठी ? माझे असे उत्तर आहे की मनुष्यास जगण्यासाठी दोन प्रकारचे अन्न लागते. शरीरास अन्न लागते, तसे मनासही लागते. शरीर पुष्ट व्हावे म्हणून अन्न सात्त्विक व कसदार असावे लागते, त्याप्रमाणे

मन खंबीर व आनंदी राहावे यासाठी मनाच्या पोटापाण्याची पण आपणास तरतूद केली पाहिजे. शरीरापेक्षा मनाची पुष्टता जास्त योग्यतेची आहे. आपण शरीराने पुष्ट असे पुष्कळ पशू पाहतो; परंतु मनाची श्रीमंती त्यांच्याजवळ कोठे आहे ?

आपण जे शिकावयास जातो, ते केवळ पोटाचे साधन मिळविण्यासाठी नसून, मनाच्या उन्नतीचे साधन म्हणूनही शिकावयास जातो. शिक्षण घेतल्याने मन उदार व मोठे होते. पुष्कळशा ज्या क्षुद्र व संकुचित वृत्ती आपल्या हृदयात असतात त्या शिक्षणाने नाहीशा होतात. शिक्षण घेतल्याने तुम्ही आपल्याच मतांचा हट्ट धरणार नाही. आपणापेक्षा दुसरे मोठे असतात ही जाणीव तुमच्यामध्ये उत्पन्न होते. शिक्षण तुमच्या मनातील स्वार्थी भावना दूर करते. जग हे मोठे यंत्र आहे. या यंत्रातील सर्व भाग जेव्हा गुण्यागोविंदाने राहतील तेव्हाच हे जगयंत्र सुरळीत चालू शकेल, हे तुमच्या लक्षात येते. 'मी जगात एकटाच नाही; माझे हितसंबंध दुसऱ्याच्या आड येता कामा नयेत,' असे तुम्ही शिकता. घड्याळातील प्रत्येक भागाने दुसऱ्या भागास न दुखविता आपले काम केले पाहिजे; म्हणजे घड्याळ नीट चालेल. तसेच समाजात ज्याने त्याने आपले विवक्षित काम दुसऱ्यास न दुखविता करण्याचा प्रयत्न करावा.

'शिकल्यामुळे मला मोठी नोकरी मिळेलच असे नाही. मला पोटासाठी भटकत राहावे लागेल; मजुरी करावी लागेल; परंतु मोलाने दुसऱ्याकडे काम करीत असताही, माझ्या मनात उत्तम विचारांचे साम्राज्य सुरू असेल. गिरणीमध्ये काम करीत असता मनात गीतेचा श्लोक मी म्हणत राहीन; किंवा तुकारामाचा सुंदर अभंग घोळवीत राहीन.' शिक्षणाचे मुख्य काम तुमच्या मनास समाधान देणे हे आहे. प्रख्यात इंग्रज सेनापती वुल्फ जेव्हा कॅनडामधील क्वीबेक या शहरावर हल्ला करावयास जात होता, तेव्हा मध्यरात्र होती. गलबतांतून गुप्तपणे त्याचे आरमार व सैन्य जात होते. त्यावेळी Paths of glory lead but to the grave. 'यशाचा मार्ग मरणाप्रत नेत असतो' हा, ग्रे या कवीच्या प्रख्यात काव्यातील चरण तो घोकीत होता; व मग म्हणाला, 'क्वीबेक शहर घेण्यापेक्षा असला सुंदर चरण जर मला लिहिता आला असता तर काय बहार झाली असती !' रणांगणावर नाचणे हे वुल्फच्या शरीराचे काम होते. तो शिपाई होता; त्याच्या मनास समाधान व आनंद ग्रे कवीचा एक चरण देत होता. इतर शिपायांस हे मानसिक सुख अनुभवता येणार नाही.

काहीही पोटासाठी करा; परंतु मन सुंदर विचारांनी युक्त ठेवा, म्हणजे तुम्हास जग हे कंटाळवाणे, दुःख देणारे न वाटता, सुखमय वाटेल. गिरणीमधला मजूर एखाद्या यंत्राप्रमाणे काम करीत असतो; त्याच्या मनात कोणताही विचार नसतो. शून्य मनस्कतेने तो आपले काम करतो. समजा, मी उद्या मजूर झालो, तर मला ते काम तितके कंटाळवाणे वाटणार नाही; कारण ते शारीरिक काम करीत असता, मी मनामध्ये सुंदर विचारांचे साम्राज्य निर्माण करीन. गिरणी ५ वाजता सुटल्यावर दारूच्या गुत्त्यात न जाता, एखाद्या सुंदर पण थोड्या किमतीच्या पुस्तकाचे वाचन करीन व देहाचा शीण दारूने न घालविता, विचाराने घालवीन.

माझ्या मते शिक्षणाचे फळ हे आहे. 'नेदी चित्ता शांती ऐसी विद्या कशाला ?' असे आपल्याकडील एका कवीने म्हटले आहे. म्हणून तुम्ही जे शिकता किंवा शिकाल त्याच्याकडे केवळ पोट भरण्याच्या दृष्टीने पाहू नका. पोट भरणे हे सुद्धा कर्तव्यच आहे; परंतु पशू व मनुष्य या दोघांमध्ये फरक जर कशाने असेल तर तो पोट कसे भरतो याने नसून, कसा वागतो, कसा विचार करतो, याने आहे. शिक्षण घेतल्याने तुम्ही कमी भांडले पाहिजे. कलह न वाढविता मिटविले पाहिजेत, सहकार्य करावयास, तडजोड करावयास शिकले पाहिजे. कोणतीही परिस्थिती आली, तरी धैर्य धरण्यास शिकले पाहिजे. दुसऱ्याच्या सुखदुःखाकडे पाहिले पाहिजे. असे करू लागलात म्हणजे शिक्षणाचे कार्य झाले, असे मला वाटते.

✦✦✦

व्यवस्थितपणा

आपल्यामध्ये ज्या अनेक सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता असते, त्या घडवून आणण्यास व्यवस्थितपणाची फार आवश्यकता असते. नीट सुव्यवस्थितपणाची रचना, कार्यपद्धती, शोभा सर्व काही कोणतेही काम नीट करण्यास आवश्यक असतात. सर्व काम कसे यंत्राप्रमाणे व्हावे; म्हणजे स्वत:स व इतरांस पुष्कळसा कमी त्रास होऊन समाधान लाभेल.

अव्यवस्थितपणा हा आपणा लोकांचा जन्मसिद्ध दुर्गुण आहे. कोणतेही काम घ्या; तेथे गलिच्छपणा, घाणेरडेपणा, सर्व काही असावयाचेच. गोंधळ असण्यापेक्षा स्वभावत:च मनुष्यास सुव्यवस्थितपणा आवडतो; व जेथे सुव्यवस्थितपणा असतो तेथे मन रमते; व मनास तेथे उत्साह, आनंद व काम करण्यास जास्त उल्हास वाटतो.

आपण आपले विचार नीट व्यवस्थित रीतीने मांडले तर म्हणणे दुसऱ्यास लवकर पटवून देता येते. कल्पनांचा गोंधळ झाला की आटोपलेच. वक्ते वगैरे लोकांस हे फार आवश्यक आहे. जे सांगावयाचे ते ठरलेल्या वेळात नीट सांगून झाले पाहिजे. नाहीतर पांगारकरी पाल्हाळ चाललाच आहे. अंकगणित किंवा इतर कोणतेही शास्त्र यांत नीट सुव्यवस्थितपणा लागतो. कोणत्या नियमाखाली अमुक गोष्ट जाते हे एकदा समजून आले म्हणजे मग ती गोष्ट सोडविणे सोपे जाते. गोंधळामुळे ही शास्त्रे कठीण वाटतात.

ज्या वेळेस आपण वस्तूंची रचना नीट सुव्यवस्थित करतो, त्या वेळेस त्या किती थोड्या दिसतात; वाटते, 'एवढेच का काम आहे ?' त्यामुळे मनास फार समाधान होते. तुम्हास शंभर पेपर शिवावयास दिले, तर ते एकत्र जर ठेवले असतीत तर गट्ठा दिसणार नाही; परंतु ते सर्वत्र पसरून ठेवले, तर 'आहेत तरी किती' असे तुमच्या मनात येते व 'हे काम संपणार तरी केव्हा' असे होते. व्यवस्थितपणामुळे सुटसुटीतपणा येतो व सुटसुटीतपणामुळे ते काम नीट जलदीने लवकर करण्यास आपणास आनंद वाटतो.

अव्यवस्थितपणामुळे स्वतःचे किती नुकसान होते ते तुम्हास हरघडी दिसून येते. कधी पुस्तक सापडत नाही; कधी टाक जाग्यावर नाही; शाळेत जावे तर जवळ पेन्सिल नाही; एखादी वही घरी राहून जाते; जेवावयाची वेळ झाली, तर तांब्या जवळ नाही; कोठेतरी विसरलेला; कधी काठी नाहीशी होते; कोठे छत्री हरवते; कधी टोपी मैदानात राहते. अशा प्रकारे एक का दोन ? अनेक गोष्टी केवळ अजागळपणामुळे व अव्यवस्थितपणाने होतात. जागच्या जागी वस्तू ठेवल्याने मनुष्य आदळआपट करीत नाही; त्यास त्रास होत नाही; वेळ वाचतो. काड्याची पेटी नीट जागचे जागी नसल्यामुळे मुलांस किती त्रास होतो ! घाईघाईने खोलीत यावे, तर कोठे पेटी नाही. एखादे वेळेस विंचू येऊन दंश करतो; तर कधी टेबलावरील शाई सांडते; नवीन धोतरावर शाईचे डाग पडतात. हे सर्व का ? तर अव्यवस्थितपणा. नंतर दुसऱ्याकडे भीक मागत जावयाचे! तो म्हणतो, "रोज रोज रे कितीदा पेटी द्यावयाची ?" "आता एवढ्याच वेळेपुरती दे. ती पेटी घेऊन येतो." परंतु पुन्हा त्या मुलाची पेटी परत करणे, याची कोणास काळजी आहे ? एवढे सर्व करण्यात वेळ किती फुकट जातो? अभ्यासाचा मोलाचा वेळ अशा प्रकारे निरर्थक व क्षुल्लक गोष्टी शोधण्यात करण्यात व्यर्थ जातो.

अव्यवस्थितपणामुळे कधी कधी भयंकर नुकसान होते. विडी पेटविली व तेथेच काडी टाकली, तर आग लागण्याचा संभव असतो. दुर्दैवाने आग लागलीच तर एकमेक एकमेकांवर ती गोष्ट लादतात. त्यामुळे मने वितुष्ट होतात; भांडणे व कलह यांस ऊत येतो. तेव्हा या सर्व गोष्टींचे मूळ जो अव्यवस्थितपणा, त्यासच फाटा देण्यास शिका. म्हणजे हे सर्व आपोआप दूर होईल.

व्यवस्थितपणाने शोभा येते. पोषाख साधाच का असेना, पण तो जर नीटनेटका, चांगल्या रीतीने घातलेला असेल, तर त्याने सर्व साजून दिसते. धोतर गबाळ्यासारखे

नेसणे; कोटास बटणे नसणे; त्याच्यावर खंडीभर डाग; टोपी चुरमडून अष्टवक्री झालेली; तिच्यात ढेकणांची वस्ती - छे: छे: - सर्व किती अव्यवस्थित बरे ? पुस्तकांची पाने फाटलेली; गृहपाठावर शाईचा शिडकाव; इतत: डाग पडलेले; तांबड्या शाईने आखलेले नसणे; तारीख नसणे यामुळे शिक्षकांस संताप येतो; व काही शिकवू नये असे त्यांस वाटते. तुम्ही सर्व व्यवस्थितपणाने केलेत म्हणजे शिक्षकांस समाधान वाटते व शिकविण्यास त्यांस हुरूप येतो.

अव्यवस्थित मुलाचे लक्षही सतरा ठिकाणी असते. कदाचित त्याचे पैसे हरवले असतील, तिकडेच त्याचे लक्ष असते; दाराला कडीकुलूप लाविले की नाही, वगैरे गोष्टींकडे लक्ष वेधल्यामुळे शिक्षक काय सांगतात इकडे त्याचे लक्ष नसते. मग आपला कोरा तो कोराच. शिक्षक प्रश्न विचारतात तर बावळटाप्रमाणे, गुन्हेगाराप्रमाणे उभा राहतो; शिक्षा सोसावी लागते; मुलांत अपमान होतो. ज्ञान गेले ते गेलेच. पुन्हा दुसऱ्याच्या दारी जाऊन अभ्यास करावयाचा; दुसऱ्याचा वेळ मोडावयाचा. ज्यास ज्ञानाची लालसा असेल, त्यास व्यवस्थितपणा पाहिजे. त्याचा वेळ उगीच वस्तू धुंडाळण्यात जाणार नाही; मन संत्रस्त होणार नाही; वेळ भरपूर मिळाल्यामुळे त्याची सर्व कामे व्यवस्थित होतात; सर्व प्रकारचा अभ्यास त्यास करावयास सापडतो. इतिहासातील उदाहरणे देण्यापेक्षा मी गुरू करंदीकर यांचे उदाहरण देतो. त्यांचे सर्व काम व्यवस्थित. पुस्तक जागच्या जागी; वही जागच्या जागी; चाकू, सुरी, कात्री, डिंकाची वाटी - सर्व जागच्या जागी. प्रत्येक गोष्टही वेळच्या वेळी. यामुळे त्यांस सर्व गोष्टींस भरपूर वेळ मिळतो. ते संस्कृत व्याकरण-कौमुदी शिकवतात; रामायण-महाभारत वाचतात; पर्शियन शिकतातच; इतर वाचन चाललेलेच असते; व्यायाम घेतातच; छात्रालयातील मुलांस शिकवितातच. सारांश: ही अनेक कामे त्यांस व्यवस्थितपणामुळे करता येतात.

सुव्यवस्थित व शिस्तवार असे सैन्य अव्यवस्थित अशा दसपट सैन्याचा पराजय करू शकते, हा आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासातील महत्त्वाचा धडा आहे. अव्यवस्थितपणामुळे आपण परतंत्र झालो होतो, असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती नाही. निसर्गाकडे पाहिले तर मधमाश्या या फार व्यवस्थित. त्याप्रमाणे मुंग्या. व्यवस्थितपणाने सर्व करण्याचा धडा यांच्यापासून घ्या. कामे सोपी व्हावी म्हणून शास्त्रज्ञांनी व्यवस्था केली. आकाशाचा नीट अभ्यास करता यावा म्हणून आकाशाचे निरनिराळे

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

भाग केले; त्या भागांस नावे दिली; ग्रह, तारे यांस नावे दिली. व्यवस्थितपणामुळे हे अनंत आकाश त्यांस अभ्यासास सोईचे करता आले. व्यापारात, कारखान्यात तर फार व्यवस्थितपणा लागतो. प्रत्येक कामावर एकेक मनुष्य नेमलेला असतो. एखाद्या युरोपीयन बुकसेलरकडे पत्र पाठविले तर ताबडतोब ते पुस्तके पाठवितात; नसली तर कळवितात; परंतु आमच्याकडे तसे नाही. जर पुस्तक नसेल तर तसे कळवले तर पाहिजे. मनुष्य दुसऱ्याकडे पत्र पाठवितो; परंतु शेवटी दोघांकडून व्ही. पी. येते. मला असे अनुभव आले. व्ही. पी. परत करणे हा मार्ग मोकळा राहतो. त्यामुळे त्या कंपनीचे नुकसान, पुन्हा आम्हांसही त्यांचे शिव्याशाप.

आपल्याकडील दुकाने वगैरे पाहा. काडीमात्र व्यवस्थितपणा तेथे नाही. व्यापारी चांगले होण्यास व्यवस्थितपणा पाहिजे. सर्वत्र गोष्टी नीट करण्यासाठी, स्वतःचा काळवेळ वाचविण्यासाठी, दगदग– त्रास होऊ नये म्हणून दुसऱ्याचाही त्रास वाचावा म्हणून, आपण सर्वांनी व्यवस्थित होण्याचा प्रयत्न करूया; मनापासून करूया !

✦✦✦

रोजची प्रार्थना

'माझिये अंतरीं दीप होऊनिया नाशावे तिमिरास'

"देवा, माझ्या अंतःकरणातील अज्ञानाचा अंधकार जो आहे तो नाहीसा कर; माझ्या अंतःकरणात तमनाशक दीपाप्रमाणे तू अखंड पाजळत राहा." असे तुकाराम महाराजांनी वरील अभंगात देवाजवळ मागणे मागितले आहे. जर देवाची मनापासून प्रार्थना केली, तर खरोखरच देव मनातील मालिन्य दूर करितो. देवासारखा साहाय्यक दुसरा जगात कोण आहे ? आपल्याबरोबर सर्व इतर लोक हसतील, खिदळतील; परंतु मनाची टोचणी एका परमेश्वराविना कोण दूर करणार ?

मनुष्यास गंभीर, उदात्त व थोर वास्तूच्या सान्निध्यात तरी उदात्त विचार स्फुरावयास नकोत काय ? देवळात गेल्यावरही, आज घरी जेवायला काय मिळणार आहे, याचीच आठवण मनात यावी का ? प्रार्थना म्हणावयाची असो. तेथे आम्हास टवाळकी सुचते. आपण अपूर्ण आहोत. आपल्यामधील अवगुण आपणास कळावेत म्हणून आपण प्रार्थना करितो. परमेश्वर गुणांचा सागर आहे; परंतु मनुष्यप्राण्यात पुष्कळ व्यंगे असतात. ही व्यंगे दूर व्हावीत, दोषांचे निर्मूलन व्हावे, मनावरील डाग धुतले जाऊन ते धुतल्या तांदळांप्रमाणे व्हावे यासाठी आपण प्रार्थना करितो. माझे असे म्हणणे नाही की नेहमी चंबूप्रमाणे किंवा घुबडाप्रमाणे गंभीर व खिन्न तोंड करून असावे. हसावे, खेळावे, मजा करावी; परंतु ज्या प्रसंगी आपण सर्वरक्षक परमेश्वरासमोर उभे राहतो, त्यावेळेसही गंमतच करावयाची का ? एवढाच माझा प्रश्न आहे.

मनापासून देवाची प्रार्थना करा. परमेश्वर तुमच्या रूपाकडे पाहात नाही; तुमच्या गाण्याकडे पाहात नाही.

'वेडेंवांकुडें गाईन । परि तुझा म्हणवीन ।'

येईल तसे त्याचे नाव घ्या व ते मनापासून घ्या. म्हणजे तुमचे दोष हलक्या हाताने परमेश्वर दूर करील. प्रार्थना करावयास आपण विद्वान असले पाहिजे असे नाही. आईजवळ दूध मागतांना बालक व्याख्यान देत नाही. आईकडे ते अशा दृष्टीने पाहते की आई त्याचे हृदय समजते व त्याला पोटाशी धरून पाजते. तसेच परमेश्वरमाउलीचे आहे. भजनाच्या वेळेस या; व त्या श्यामसुंदर कृष्णाकडे, त्या ध्रुवनारायणाच्या सुंदर चित्राकडे अशा वृत्तीने पाहा, की परमेश्वर कुंचला घेऊन तुमची मने धुण्यासाठी धावत यावा.

मी पूर्वी एका लहान ख्रिश्चन मुलाची गोष्ट वाचली होती. रविवारी त्यांचा प्रार्थनेचा दिवस होता. चर्चमध्ये लहानथोर, स्त्रीपुरुष, मुले सर्व जमली होती. त्या वेळेस एक लहान पाच वर्षांचा मुलगा एका बाकावर बसून काही लिहीत होता. इतक्यात धर्मोपदेशक आला. त्याने त्या मुलास विचारले, ''बाळ, काय लिहितो आहेस ?'' तो मुलगा बोलेना. त्या धर्मोपदेशकाने त्याचा कागद हातात घेतला. त्या कागदावर 'ए' पासून 'झेड' पर्यंत सर्व इंग्रजी मुळाक्षरे लिहिली होती. धर्मोपदेशकाने विचारले, ''बाळ, ही सर्व अक्षरे कशासाठी लिहिलीस ?'' तो लहान मुलगा म्हणाला, ''तुम्ही गेल्या रविवारी सांगितले की प्रत्येकाने परमेश्वराची रोज प्रार्थना करावी. परंतु मला तर नीट प्रार्थना म्हणता येत नाही. तेव्हा मी एक युक्ती केली. 'ए' पासून 'झेड' पर्यंतची सर्व अक्षरे मी लिहिली. ही अक्षरे जुळवून देवाने माझी प्रार्थना मान्य करून घ्यावी. कारण या अक्षरांपलीकडे दुसरी अक्षरे नाहीत. तेव्हा जरी मला सुंदर शब्द रचता आले नाहीत, तरी मला सर्व अक्षरे येतात. ही अक्षरे म्हणजेच माझी प्रार्थना.'' त्या मुलाचे हे उत्तर ऐकून त्या उपदेशकास कृतार्थता वाटली. त्याने त्या मुलास कुरवाळले व सांगितले, ''बाळ, तुझ्या या सुंदर प्रार्थनेने देव प्रसन्न झाला आहे, बरे का !''

सांगावयाचे काय की, देव विद्वत्ता पाहात नाही. वैभव पाहात नाही.

जगातील सर्व गोष्टी विसरून नम्रपणा धारण केलात, तर परमेश्वर जवळ असतो.

म्हैसूरच्या विद्यार्थ्यांनी सभा भरवून महात्मा गांधींना थैली अर्पण केली. त्यावेळेस महात्माजी काय म्हणाले ? ''मला माहीत आहे की अनाथांचा नाथ, पतितास पावन

करणारा एक परमेश्वर आहे. ईश्वरावरची श्रद्धा लोपणे यासारखे मोठे दुःख, खेदाची गोष्ट, याहून भयंकर शिक्षा, दुसरी कोणतीही नाही. विद्यार्थ्यांमधील श्रद्धा दिवसेंदिवस लोपत आहे. यामुळे माझ्या अंतःकरणास फार वेदना होतात. मी एका विद्यार्थ्यास, 'रामनाम घेत जा' असे सांगितले, तर तो माझ्याकडे टवकारून पाहू लागला. 'हा राम कोण' असे जणू त्यास वाटले. 'कुराण पढ व अल्लाचे स्मरण कर' असे मुसलमान मुलास सांगितले, तर तो म्हणतो, 'कुराण मला समजत नाही. अल्लावर माझी श्रद्धा नाही.' शिक्षणातील पहिला धडा, पहिली पायरी म्हणजे निर्मळ व पवित्र अंतःकरण होय. अशी समजूत, अशी खात्री, मी कशी बरे करून देऊ ? ज्या शिक्षणाने तुम्ही देवापासून हरघडी दूर जाता, त्या शिक्षणाने स्वतःची व दुसऱ्याची खरी सेवा कशी बजावणार ?'' या प्रकारे उद्गार महात्माजींस काढावे लागले. सर्वत्र हिंदुस्थानात हेच उद्गार काढावे लागतील.

तरी असे करू नका. परमेश्वराबद्दल प्रेम, अत्यंत आदर व श्रद्धा ठेवा. प्रार्थनेस सकाळी–सायंकाळी जेव्हा जमाल, तेव्हा 'आपण देवाच्या दारी मनाची पवित्रता व्हावी, यासाठी आलो आहोत', या विचाराने या. त्या वेळेस हसतखिदळत, उल्लू, चंचल व खादाड अशा मनाने येऊ नका. दिवसातून एक क्षण असा असावा की ज्या वेळेस आपण परमेश्वराच्या पायांवर मस्तक ठेवले आहे, मनाने नम्र झालो आहोत. हा एक क्षण फार मोलाचा आहे. तो जर खरा असेल तर आयुष्यास निराळे वळण लागेल !

✦✦✦

भक्ती करा

परमेश्वराकडे धाव घेणाऱ्यांचे निरनिराळे प्रकार आहेत. देवदर्शनास जाणारे सर्व एकाच हेतूने प्रेरित होऊन गेलेले नसतात. देवास हाक मारणाऱ्यांच्या मनात निरनिराळे हेतू असतात. कोणी देवास सांगतात, 'देवा, माझी परीक्षा पास होऊ दे; मी सत्यनारायण करीन.' अशी भक्ती म्हणजे बाजारी आहे. वाण्याला जसे आपण म्हणतो, 'वाणीदादा, एक शेर साखर दिलीस तर दोन आणे देईन.' तद्वत् आपण ईश्वरासही म्हणतो की, 'देवा, मला अमुक दे म्हणजे मी तुला तमुक देईन. मला मुलगा दे; मी तुला मुगुट देईन.' अशा भक्तांना 'अर्थार्थी भक्त', 'इच्छेने भक्ती करणारे बाजारभक्त' असे संबोधण्यात येते.

यानंतर दुसरा एक भक्तांचा प्रकार आहे. त्यांच्या मनात खरोखर थोडी कृतज्ञता असते. हे भक्त दु:खांनी वगैरे पिडले, कष्टात, संकटात सापडले म्हणजे देवाला काकुळतेने हाक मारतात व म्हणतात, 'देवा, तू सागर करुणेचा, तू सागर सामर्थ्याचा, आमचा अंत पाहू नकोस. धाव घे, रामराया.' अशा करुणावाणीने ते देवास आळवतात. आपण अगतिक व निराश्रय आहोत या जाणिवेने अहंकाररहित होऊन ते परमेश्वराचा धावा करतात. यांच्या मनात केवळ बाजारी भक्ती, देवाणघेवाण अशी भक्ती नसते. तर थोडा जिव्हाळा असतो.

तिसरा भक्तांचा प्रकार आहे. त्यांना संकट वगैरे काही नसते; देवाजवळ धनद्रव्य, पुत्रपौत्र मागावयाचे नसते. केवळ जाणण्याची त्यास इच्छा असते. ते जगाकडे पाहतात.

येथील नाना प्रकारच्या वस्तू पाहतात. पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे, पर्वत-दऱ्या, नद्या-कनाले, गरिबी-श्रीमंती, चोर-साव, प्रकाश-काळोख, अशा शेकडो गोष्टी ते पाहतात व चकित होतात. या विश्वाचे कोडे उलगडण्याचा ते प्रयत्न करू लागतात. जग कोणी केले, कोण चालवतो, हे प्रश्न त्यांच्या मनासमोर येतात. आत्मा अमर आहे का, मृतोत्तर काय स्थिती होते, वगैरे प्रश्न त्यांच्या हृदयांत डोकावतात. असे प्रश्न ते बुद्धिबळाने सोडवण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच या जगाच्या शक्तीचे ज्ञान होण्यासाठी, या विश्वाच्या सूत्रधारकाचे, स्वामीचे ज्ञान होण्यासाठी ते खटपट करतात. हेही एक प्रकारचे भक्तच. यांना 'जिज्ञासू' म्हणजे 'ईश्वर समजून घेण्यासाठी प्रयत्न करणारे' असे नाव आहे.

चौथ्या प्रकारचे भक्त म्हणजे 'ज्ञानी भक्त.' 'ज्ञानी' म्हणजे ज्याला ज्ञान झाले आहे असा. ज्ञान म्हणजे काय ? मला भूगोल वाचून मुंबईचे ज्ञान झाले, ते खरे नव्हे. तर प्रत्यक्ष जळगाव, कल्याण वगैरे स्टेशने ओलांडून मी मुंबई पाहून आलो, हे खरे ज्ञान. ज्ञानी भक्त म्हणजे ज्याने ईश्वर जाणून घेतला, अनुभवला, असा भक्त. ईश्वराचे ज्ञान झाल्यावरही त्याची प्रेमाने व भक्तीने सेवा - कोणताही हेतू मनात नसता केवळ भक्तीसाठी भक्ती करणारे, असे हे शेवटचे ज्ञानी भक्त होत. अर्थार्थी, आर्त, जिज्ञासू व ज्ञानी असे हे भक्तांचे चार प्रकार होतात. यातून वरच्या वरच्या पायरीकडे जाणे हे आपले कर्तव्य आहे.

आपणास ईश्वराचे भक्त व्हायचे आहे; परंतु कोणत्या साधनांनी व्हावयाचे ? कोणत्याही गोष्टीस साधने लागतात. त्याप्रमाणे ईश्वराचे चांगले भक्त होण्यासही साधने पाहिजेत. ही साधनेही सांगितली आहेत. श्रवण, कीर्तन, अर्चन, पादसेवन, स्मरण, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन अशा भक्तीच्या नऊ पायऱ्या आहेत. आत्मनिवेदन ही सर्वात शेवटची पायरी. भक्ती करण्याचे हे निरनिराळे प्रकार आहेत. आत्मनिवेदन ही भक्ती फार कठीण आहे. परंतु बाकीच्या आठ आपणांस हळूहळू शक्य होतील. सख्य भक्ती म्हणजे काय ? तर ईश्वर हा जणू आपला सखा, सुहृद आहे, से समजून लडिवाळपणाने त्याच्याजवळ मागावयाचे. आपण आईजवळ जसे मागतो त्याप्रमाणे. परंतु ईश्वराजवळ लडिवाळपणा करण्यास त्याच्यावर प्रेमही तसेच अपरंपार पाहिजे. दास्य भक्तीत सेव्यसेवक भाव असतो. ईश्वरास भक्त म्हणतो, 'देवा, मी तुझा दास आहे. मी दीन आहे. तू मला वागवशील, सांगशील, तसे मी करीन.' वंदन म्हणजे देवास

नमस्कार करावयाचा. लाजत नव्हे. देवाच्या भक्तीत लाजलज्जा नको. रस्त्यातून जाताना आजूबाजूस लोक पाहताहेत की काय हे पाहून, मग चोरून नमस्कार. असले वंदन नव्हे. तर देवमूर्ती पाहताच ज्यांचे हृदय भरून येते व कृतज्ञतेने ज्यांचे हात आपोआप जोडले जातात, असे भक्त. वंदनभक्तीने आपोआप पुढे भक्ती व आदर वाढत जातो. पादसेवन, अर्चना या अशाच प्रकारच्या पायऱ्या आहेत. परमेश्वराचे पाय धरावे; त्याची आपण मनःपूर्वक आराधना करावी. श्रवण, कीर्तन, स्मरण हे भक्तीचेच मार्ग आहेत. ईश्वराचा मोठेपणा गावा, निःशंकपणे, न लाजता, ईश्वराचे गाणे म्हणावे, दुसऱ्यास तल्लीन करावे. श्रवण म्हणजे चांगल्या गोष्टी ऐकाव्या. ईश्वरासंबंधी, साधूसंबंधी कथा ऐकाव्या. आधी श्रवण होईल. तेव्हा त्याचे स्मरण करावयाचे. म्हणून आधी श्रवण करावे, मग श्रवण केलेल्या गोष्टींचा विचार करावा, मनन करावे.

स्मरण ही भक्ती सर्वांत सोपी. आपण कोठेही असलो तरी ईश्वराचे स्मरण करण्यास अडचण नाही. त्याला गंधफूल, धूपदीप, पोथ्या पुस्तके – कसलीच जरूर नाही. म्हणून स्मरण भक्ती ही सोपी व श्रेष्ठ आहे. केव्हाही मोहमार्गावर, पापाच्या आचरणाच्या वेळी, स्मरण करा; की तुम्ही शुद्धीवर याल. परमेश्वराच्या स्मरणाने चित्त शुद्ध होते. आपण केलेल्या पापांची आपणास लाज वाटते. स्मरण मनःपूर्वक करा. मग ते कोणाचेही करा. राम, गणेश, कृष्ण – सर्व ईश्वराचीच नावे आहेत. या जगातील प्रत्येक वस्तूचे नाव ईश्वराचे आहे. नावात काय आहे ? एका साधूने एका शिष्याला, 'तेरा, तेरा' असेच म्हणून ईश्वरास आळवण्यास सांगितले. वाल्या कोळी हा 'मरा, मरा' असेच म्हणून तरला. नावात काही नाही. 'हे नाव माझ्या देवाचे आहे', ही श्रद्धा मनात असली म्हणजे कोणत्याही नावाने हाक मारली तरी तो येईल.

मोठमोठे लोक ईश्वराचे भक्त असत. शिवाजी महाराज भवानीचा संदेश घेऊन मग कार्यास प्रवृत्त होत असत. भक्तीने अंगी बळ येते; निर्भयता मिळते; ईश्वर मला साहाय्यकारी आहे, मी त्याला आवडणारे काम करीत आहे, या विचाराचे सामर्थ्य आपणास मिळते. म्हणून तुम्ही भक्ती करा व हळूहळू रामदास, तुकाराम यांप्रमाणे ईश्वराचे स्वरूप समजून घ्या व तो आनंद चाखा.

✦✦✦

मूर्खांच्या हाती पुस्तक देऊ नका

सार्वजनिक मोफत ग्रंथालये जी असतात त्यामध्ये, किंवा जेथे थोडीफार वर्गणी असते त्यांमध्येही, पुस्तके नेणाऱ्यांच्या नाना प्रकारच्या लीला चालकांच्या नजरेस येतात. आपणास खुद्द घरगुती पुस्तके नेणाऱ्यांचासुद्धा असा कटु अनुभव येतो. उसनवार नेलेली, थोडा वेळ पाहावयास म्हणून नेलेली पुस्तके परत लवकर केली गेली आहेत असे होता होईतो व्हावयाचेच नाही. 'कृपा करून मला ते पुस्तक काही दिवस द्या. ते मी किती दिवस तरी पाहतो आहे. बरे झाले, आता दिसले. द्याच. मी ते दोनचार दिवसांत परत करीन.' अशा प्रकारच्या विनवण्यांवरून हजारो पुस्तके जातात व ती कमी होतात. ग्रंथालयातून पुस्तके नाहीशी होतात व इतर खरे वाचक जे असतात त्यांनाही आपण अडचणीत घालतो.

पुष्कळ वेळा आपली हरवलेली पुस्तके आपल्या मित्रांच्या घरी त्यांच्या शेल्फवर दिसतात व मग ती तेथून आपणास परत चोरून आणावी लागतात. एका गृहस्थाने आपला असा अनुभव सांगितला : "माझे एक पुस्तक सात वर्षे हरवले होते; पण सात वर्षांनी ते मला एका मित्राकडे आढळले. मी निमूटपणे ते खिशात घालून परत आणले." दुसरे एक पुस्तक चौदा वर्षांनी परत मिळाले. त्या पुस्तकात चिठ्ठी लिहिलेली होती (दिल्याची-घेतल्याची) ती पंधरा वर्षांपूर्वीची होती ! पंधरा वर्षांनी ते पुस्तक मालकीच्या मनुष्याकडे आले !

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

अशा प्रकारे पुस्तके नेणारे हे वाईट तर खरेच; परंतु दुसरे काही असतात, ते अशी पुस्तके नेऊन, विकून स्वत: पैसे मिळवतात ! विद्यासागरांच्या चरित्रात अशी गोष्ट आहे. एका गृहस्थाने त्यांच्याकडून एक सुंदर पुस्तक नेले. पुढे विद्यासागरांस त्या पुस्तकाची जरूर भासली. तेव्हा त्यांनी चिठ्ठी पाठविली. त्या गृहस्थास ते पुस्तक सापडले नाही. विद्यासागरांनी एका जुन्या पुस्तकविक्यास ते पुस्तक आहे का विचारले. तो म्हणाला, 'हो आहे एक प्रत.' विद्यासागरांनी ती प्रत विकत घेतली, ती त्यांचीच मूळची प्रत होती. त्या पुस्तक उसने नेणाऱ्याने ते पुस्तक विकून टाकले होते ! केवढा नीचपणा !

काही लोक नेलेली पुस्तके घाणेरडी करून, फाडून, तोडून पाने नाहीशी झालेली अशी करून आणतात. फाटके पुस्तक नेऊन, त्याला चिकटवून, नीट व्यवस्थित परत करणारा एखादा आढळतो, तर पुष्कळ, धड पुस्तके नेऊन, फाडून आणणारे असतात. काही लोक, पुस्तक वाचताना त्यांना स्वत:ला जे महत्त्वाचे वाटले, आवडले, त्याच्यावर पेन्सिलीच्या वगैरे नाना खुणा करून ठेवतात. आपल्या मालकीचे पुस्तक असले तर गोष्ट निराळी. परंतु सार्वजनिक पुस्तकांवर अशी स्वत:ची संमति-चिन्हे, निरनिराळ्या रेघा, वगैरे काढणे हे अन्याय्य आहे.

काही पुस्तके नेणारे वाचावयास मुळी नेतच नाहीत. त्यांचा हेतू काही निराळाच असतो. आपल्या घरी काही नवीन नवीन पुस्तके येणाऱ्या-जाणाऱ्यांना दिसावी एवढ्याचसाठी ते ती वाचनालयातून आणतात. कधी कधी पुस्तकांच्या किमती महाग असतात. मग त्यांना ती विकत घेता येत नाहीत. मग अशी पुस्तके लायब्ररीतून वगैरे आणून ते आपली खोली सजवून ठेवतात. आपण मोठे वाचक आहोत याचे खोटेच प्रदर्शन त्यांस करावयाचे असते. जर कोणी त्यांस विचारले, 'का हो, ते पुस्तक झाले का वाचून?' तर ते म्हणतात, 'नाही हो. आणल्यापासून ते पुस्तक वाचावयास क्षणभर फुरसत झाली असेल तर शपथ ! सतरा कामांची हल्ली गर्दी. दोन दिवसांत करतोच ते परत !' त्यांनी वाचावयास आणलेलेच नसते तर वाचतात कशाला ? परंतु फुकट मोठेपणा मिळवावयाचा असतो त्यांना.

लायब्ऱ्यांतून पुस्तके नेणारे काही, पुस्तके नेतात एवढेच नाही तर त्या पुस्तकावरील आपली मते लायब्ररियनला कळवितात. कोणी लिहितो, 'हे पुस्तक टाकाऊ आहे. त्यात मनाला किंवा बुद्धीला शिकवील असे काही नाही. कृपा करून

असली पुस्तके लायब्ररीत ठेवीत जाऊ नका.' परंतु बेट्याला माहीत नसते की तीच पुस्तके पुष्कळांस आवडतात व ती जर वाचनालयात लायब्ररीत – ठेवली नाहीत तर वाचावयास येणाऱ्यांची संख्या पुष्कळ कमी होईल, वर्गणीदार कमी होतील. त्या लायब्ररियनने जर असे त्या गृहस्थास कळविले, तर तो पुन्हा लिहितो, ''जगाची अभिरुचीच बदलत चालली. हा लेखक मला अगदी तिरस्करणीय वाटतो. पुस्तके केराच्या टोपलीत टाकण्यासच योग्य आहेत !'

पुस्तके नेणारे काही असे असतात की जी पुस्तके ते मागतात त्यांबद्दल त्यांना काहीच कल्पना नसते. एकदा एका गृहस्थाने 'काहीतरी' पुस्तक मागितले. त्याला वाटले की हे पुस्तक करमणुकीचे असेल; परंतु घरी जाऊन पाहतो तो ते कवितांचे पुस्तकच निघाले. एका गृहस्थाने 'बकुळीची फुले' हे पुस्तक नेले. त्याला वाटले, त्या पुस्तकात या फुलांचे उपयोग वगैरे दिले असतील; तर घरी नेऊन पाहतो तो त्या कविता होत्या. एकाने 'नवनीत' पुस्तक नेले. लोण्याबद्दल हकिकत असेल, असे त्याला वाटले; परंतु आत लोण्याबद्दल शब्द नाही. ते जुन्या कवींचे वेचे होते. आनंदकर्ते आपटे यांच्या 'मनी व मोत्या' या पुस्तकावरून हे गोष्टीचे पुस्तक असावे असे वाटले; परंतु ते पुस्तक शास्त्रीय निघाले. त्यात मांजर व कुत्रा यांच्याविषयी माहिती होती. एकाने 'जीवनसंध्या' वाचावयास नेले. 'जीवनात संध्येचे महत्त्व' वगैरे त्यात असेल अशी त्याची कल्पना होती; पण ती कादंबरीच होती. 'कोबीचे कांदे' असे एका पुस्तकाचे नाव होते. एकाने ते नेले. तो त्यात गोष्टीच होत्या. त्याला इतका राग आला की तो तणतणतच लायब्ररीत आला !

पुस्तके नेणारे पुस्तकात नाना प्रकारच्या खुणा घालून ठेवितात. पुस्तक परत करताना त्यांना त्या खुणांची आठवणच राहात नाही. एका लायब्ररियनने आपल्यापुढील अनुभव सांगितला. तो म्हणतो, ''शेकडो प्रकारच्या खुणा आम्हांस पुस्तकात सापडतात. कधी चेक असतो; कधी नोट असते; कधी कॉलरपिन असते; कधी प्रेमपत्रिका सापडतात. कधी प्रॉमिसरी नोटा, कधी महत्त्वाची पत्रे, कधी फोयो, कधी लहानसे पुस्तकच खूण म्हणून घातलेले, कधी बटने, कधी सुया, कधी खिळे, कधी पायमोजाचे बंद – जे हाताशी असेल ते त्या पुस्तकात खूण म्हणून ठेवतात आणि तसेच परत करतात !''

ज्यांना प्रेमपत्रिका पुस्तकात राहिल्याची आठवण होते ते लायब्ररियनकडे जाऊन, गयावया करून, डोळ्यांत आसवे आणून, ती परत मागतात; आणि कोणी ते पुस्तक

वाचावयास तसेच फिरून नेले असेल तर त्यांची तोंडे अगदी पाहण्यासारखी होतात. कधी कधी मोठमोठे खटले, या पुस्तकात सापडलेल्या चिठ्ठ्यांमुळे चालविणे सोपे गेले व उगीच संकटात पडलेले मनुष्य बचावले गेले आहेत !

पुस्तके नेणारे हे अशा पुष्कळ प्रकारचे असतात. मग याला उपाय काय ? उपाय एवढाच की, मौल्यवान व दुर्मीळ पुस्तके आधी कोणास देऊच नयेत; ज्यांना पुस्तके देऊ त्यांची नावनिशी नीट ठेवावी; आणि त्या त्या लोकांकडे आठपंधरा दिवशी जाऊन, त्यांच्या पुस्तके ठेवावयाच्या जागांवर जाऊन हल्ले चढवावे. म्हणजे हरवलेले मित्र तेथे सापडतील!

'मूर्खहस्ते न दातव्यं एवं वदति पुस्तकम्' ।

पुस्तक सांगते, 'मला मूर्खाच्या हाती देऊ नका !'

✦✦✦

चैन करू नका

मला वाटत असते, जे आपणाला मिळते ते सर्वांना मिळावे. कोणतीही खावयाची चांगली वस्तू मला मिळाली, तर ती मी न खाता इतर आपापल्या घरांहून दूर असलेल्यांस मी द्यावी. फार वेळेस मला चांगले पदार्थ खावयास मिळतात. त्यावेळेस इतर सर्वांना हे मिळत असतील का, हा प्रश्न माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो. म्हणून सणवार येईपावेतो मला उत्सुकता असते; परंतु सण आला, ती पक्वान्ने पाहिली, म्हणजे माझ्या मनाला विषादराहू ग्रासावयास लागतो.

तुम्ही मुले लहान आहात. सण आला म्हणजे घरात कोंड्याचा मांडा गरीबही करतात. गोडधोड खातात. तुम्ही घराहून दूर आहात; तुम्ही जिलेबी- बासुंदी करणारच. साहजिक आहे. त्यात दोष नाही. सण साजरा करणे हे केव्हाही चांगलेच. त्या दिवशी तरी आनंदी असावे. परंतु माझ्या काय काय मनात येते. सणाच्या दिवशी आनंदी असल्यास पक्वान्नेच केली पाहिजेत असे नाही. दुसऱ्याही गोष्टींनी आनंदी राहता येईल. चांगले चमचमीत जेवण झाल्यावर पोटावर हात फिरवीत, ढेकर देत, आपण म्हणतो, 'हिंदुस्थान दरिद्री आहे. आमचे लोक उपाशी असतात !' स्वत: तुपाशी जेवून उपाशी माणसांची कीव आम्ही करणार का ?

दुसऱ्याच्या दु:खाने जेव्हा आपण समदु:खी होतो, तेव्हा त्याचे दु:ख आपणास समजले असे समजावे. हिंदुस्थान दीन आहे, उपाशी आहे, हे तुम्हा-आम्हास केव्हा पटले असे समजावे ? जेव्हा तुम्ही आपल्या आचरणात एखादे वेळेस तरी चैन कमी

करता तेव्हा. म्हणून आपले माझ्या मनात येई – जिलेबी न करता, काहीतरी गोड पाहिजे म्हणून पोळीवर थोडे तूप व साखर घेऊनच सण साजरा करावा व उरलेले पैसे फंड म्हणून बाजूला ठेवावे. यामुळे तुम्हांस थोडी जाणीव झाली असती की आज सण असूनसुद्धा आपण नुसती साखर घेऊनच समाधान मानले. स्वत:ला थोडी झीज बसली पाहिजे; आपण थोडे सुख दिले ही जाणीव झाली पाहिजे.

तुमच्या मनात हे असे विचार अजून येत नाहीत. मॅझिनी जेव्हा ७/८ वर्षांचा लहान होता, तेव्हा तो आईबरोबर चर्चमध्ये गेला होता. वाटेत एक भिकारी त्याने पाहिला. त्याला खावयास मिळालेले नव्हते. मॅझिनीने स्वत:ला खाऊसाठी मिळालेले पैसे त्याला दिले. मॅझिनी आईला म्हणाला, "आई, हा भिकारी अगदी गरीब आहे नाही ?" आई म्हणाली, "बाळ, अरे असा एकच नाही; तर कितीतरी भिकारी देशात आहेत !" आईचे उद्गार ऐकून चिमणा मॅझिनी सचिंत झाला व 'माझा इटली भरपूर पोटापाण्यास देणारा मी करीन ' असे त्याने मनात ठरविले.

तुम्ही मुले १५ वर्षांवरची आहात. ज्या वयात जनकोजी, विश्वासराव लढाईला गेले, ज्या वयात शिवाजीने तोरणा जिंकला व स्वराज्याचे तोरण बांधले, ज्या वयात खुदिराम फासावर गेला, ज्या वयात पहिले माधवराव निजामावर चढाई करून गेले, तेच तुमचे वय आहे. मी तुम्हास लहान समजत नाही. आज जर या गोष्टी तुम्हास समजल्या नाहीत तर पुढेही समजणार नाहीत. आपण उपाशी राहावे असे नाही म्हणत मी. आपण जगू तेव्हा इतरांस जगवू. स्वत: बलिष्ठ झाले पाहिजे, खाल्ले-प्याले पाहिजे, परंतु चैन नको. सण आला तर साध्या रीतीने साजरा करून आपण केला असता तो खर्च बाजूस काढून ठेवावा. हिंदुस्थान हे मोठे कुटुंब आहे. या कुटुंबात एकजण ढेकर देतो, तर एकजण ढोपरात मान घालून रडतो – हे आपणास बरे दिसेल का ? आपला एक भाऊ मुंबईस उपाशी आहे. तर आपण येथे यथेच्छ पंचपक्वान्ने जेवावी का ? आपण साधे, थोडे गोड करून, पोटभर जेवावे व उरलेले जे पैसे आपण खर्च केले असते ते सत्कार्यास द्यावे.

+++

देवाघरच्या फुलांनो

१

विविध विचार

एक लहान मुलगी एका वाद्य विशारदाजवळ एक तंतुवाद्य वाजविण्यास शिकत होती. ती मुलगी गुरुजींस म्हणाली, "काय त्रास आहे! वाजवून वाजवून माझी बोटे दुखू लागली." हे तिचे संतापदर्शक शब्द ऐकून गुरुजी बोलले, "बेटा, घाबरू नकोस, कंटाळा करू नकोस आणि लक्षात ठेव 'तुझी बोटे' दुखत आहेत, त्याबरोबरच त्यांना रोज सवय होऊन ती बळकटपण होत आहेत." तेव्हा ती मुलगी म्हणाली, "एकंदरीत जगात असे दिसते की दुःखाशिवाय बळ येत नाही. श्रमल्याशिवाय शक्ती मिळत नाही." "Teacher, it seems that everything which strenthens, hurts" मुलीने सहज सांगितलेला सिद्धांत किती सत्य आहे ! तुम्ही सर्वत्र दृष्टी फेका आणि तुम्हास असे दिसेल, त्रासाशिवाय सामर्थ्य मिळाले नाही. तुम्ही थोर स्त्री-पुरुषांची जी निष्कलंक चरित्रें वाचलीत, त्या चरित्रांत या थोर पुरुषांस मानसिक व शारीरिक सामर्थ्य, विशुद्ध शील हे कोणी दिले? माती भाजली म्हणजे दगडाहून बलवान अशी वीट बनते. भाजल्याशिवाय भाग्य नाही. संकटांनी भाजून मने निघाली म्हणजे ती कणखर व बळकट होतील. संकटांतून व अडचणींतून जिने आयुष्य नेले अशा एखाद्या साध्वी स्त्रीचे मुखमंडल देवदूताच्या सात्त्विक तेजासही लोपवील. तपश्चर्येने तेज

मिळते. त्रास, संकटे याशिवाय खरे सामर्थ्य अंगी येत नाही. भांडी घडवणारे हातोड्याने भांडे सारखे ठोकीत असतात. ठोकून ठोकून ते भांडे मजबूत होते. तसेच आपल्या आयुष्याचे आहे. उन्हातान्हात काम करणारा मजूर उन्हातान्हास भीत नाही. म्हणून लक्षात ठेवा की, सृष्टीचा असा कायदा आहे की, "Strength comes to you through Suffering" काट्यांवर उभे राहावे लागेल जर गुलाबाप्रमाणे मिरवावयाचे असेल.

✦✦✦

२

एका पर्वताच्या उतरणीवरून दोन प्रवाह खेळत उडत खाली येत होते. एक प्रवाह स्वत:शी म्हणाला, 'आता या एकांताच्या जागीच बसून राहावे. कोठे धावपळ करा व यातायात करा.' असे म्हणून त्याने आपणास एके ठिकाणी थोपवून धरले. तो पुन्हा म्हणाला, 'मी येथे राहिलो म्हणून माझा उपयोग होणार नाही असे नाही. एखादा धाडसी प्रवासी या डोंगरावर रानावनात येईल. तो तहानेने त्रस्त होईल. मग माझ्याजवळ येईल. माझे हे थंडगार पाणी त्याला उत्साह व आनंद देईल. मग पुनरपि तो वाटसरू वाट शोधू लागेल. अशा रीतीने चुकले भागलेले लोक माझ्याजवळ येऊन सुखी-शांत होतील. माझ्याभोवती या चार भिंती मी बांधून घेतो-म्हणजे ते प्रवासी आत येऊन बसतील.' असा विचार करून तो प्रवाह तेथे आपल्याभोवती चार भिंती बांधून राहिला.

तो दुसरा प्रवाह मनात म्हणाला, 'मी येथेच या एकांतात कशास राहू? येथे मला ना धंदा ना उद्योग. येथे मला एकट्याला कंटाळा येईल. चला जाऊ डोंगराखाली आणि जगाची मजा पाहू.' तो प्रवाह वाहू लागला, डोंगर सोडून तो खाली आला व पुढे पुढे डौलाने कधी हसत, कधी रागावत, कधी शांत गतीने तर कधी वायूवेगाने जातो आहे पाहा. आपण चला त्याच्या बरोबर जाऊ. त्याच्या आजूबाजूला गवताचे गालिचे पाहा पसरले आहेत. असे सुंदर हिरवे गवत दुसरीकडे कोठेही दिसत नाही. परंतु या ओढ्याच्या काठी मात्र बारा महिने ही हिरवी मखमल पसरलेली आहे. अरे, हे पाहा दुसरे छोटे-मोठे प्रवाह या प्रवाहास राजा समजून आपला जलरूपी कारभार

देण्यास आले. या आमच्या प्रवाहाने सर्वांस आपल्या पोटाशी धरले व पुढे चालला. प्रगती हेच त्याचे ध्येय. विश्रांतीचा त्याला कंटाळा आहे. आता या मोठ्या प्रवाहाच्या बाजूस लहान गवत नसून मोठेमोठे तरूवर पाहा रांगेने लागून राहिले आहेत. केवढाली बने व राने ! काय ही शोभा ! अशी सरळ गगनभेदी झाडे अन्यत्र तुम्हास दिसतात का? या प्रवाहास आता लोक नदी म्हणतात. हे पाहा केवढाले मासे. या प्रचंड प्रवाहात कसे चपलेप्रमाणे चमकत आहेत. ही पाहा मोठमोठी धनाढ्य शहरे या नदीतटाकी वसत आहेत. या शहरात या नदीच्या पाण्याचा कितीतरी कारखान्यांना व गिरण्यांना उपयोग होत आहे. तरी ही नदी पुढेच चालली आहे. अरे, ही तर आता या अफाट समुद्रातून मिळाली. समुद्रास येणारी हजारो गलबते हिच्या मुखावाटे आत जात आहेत व व्यापार वाढत आहे. केवढे भाग्य आहे या प्रवाहाचे.

त्या पहिल्या प्रवाहाचे पुढे काय झाले पाहूया. तो पाहा एक वाटसरू डोंगरातील रानात वाट चुकला आहे. तो इकडे तिकडे वणवण करीत आहे. इतक्यात स्वत:भोवती भिंत बांधून घेऊन तेथेच डोंगराच्या बाजूस राहिलेला हा पहिला प्रवाह त्याला आढळला. तो पांस्थ मनात म्हणाला, 'येथे विश्रांती मिळेल.' तो पाणी पिण्यास म्हणून गेला व हातात पाणी घेतो तो काय नुसते शेवाळ ! पिण्यासारखे शीत व मधुर पाणी त्या पांथस्थास मिळाले नाही.

सारांश: त्या प्रवाहाप्रमाणे तुम्ही सतत पुढे जाणारे व्हा. कधी थांबू नका. A Life long Atusent आजन्म विद्यार्थी, मरेपर्यंत काहीतरी मिळविणारे व्हा. म्हणजे मग काही जन्मांनंतर सर्व सद्गुण अंगी मिळवीत गेलात म्हणजे नदी इतरांस सुखवीत सुखवीत जशी सागरास मिळाली, त्याप्रमाणे तुम्ही पण सर्व विश्वास आपल्या जगण्याने समवीत गुणरत्नाकर जो परमेश्वर त्यात जाऊन मिळाल. म्हणून एकलकोंड्या प्रवाहाप्रमाणे निष्क्रीय राहू नका. ते मरण आहे.

✦✦✦

३

आई-बापांचे आपणावर किती प्रेम असते ! स्वतःस मिळालेली वस्तू आई-बाप मुलांसाठी राखून ठेवतात. मुलगा दूर शिकावयास राहिला आणि घरी काही पक्वान्न किंवा चांगला पदार्थ केला असला तर घरच्या मंडळींस, आई-बापास मुलाची आठवण येते व आई म्हणते, 'गोविंदास ही भाजी आवडत असे. पण तो कोठे आहे आज येथे !' घरी म्हैस किंवा गाय जर जन्मली तर आई-बाप म्हणतात, 'आज घरी असता तर दूध-दही भरपूर खाल्ले असते मुलाने; परंतु आहे कोठे?' अशा अनेक गोष्टी आई-बापांचे प्रेम दाखवतात. परंतु मुले मात्र तितकेच प्रेम करतात असे नाही.

एकदा एका गरीब कुटुंबातील एक मुलगा आपला गाव सोडून सहा-सात कोसांवरील दुसऱ्या गावात हायस्कूलमध्ये शिकण्यास राहिला होता. मुलगा हुशार व प्रेमळ होता. तो सुटीत घरी आला म्हणजे आईस कितीतरी कामात मदत करावयाचा. मे महिन्याची सुटी संपली होती व हा मुलगा पुन्हा शाळा सुरू झाली तेव्हा त्या गावात निघून गेला.

पावसाळ्याचे दिवस आले व पावसाची झड सुरू झाली. नद्यानाले भरून गेले. जिकडे-तिकडे पृथ्वी जलमय दिसत होती. जणू पाण्यातूनच वर आली अशी ओलीचिंब झाली होती. पावसाळ्यात गाई म्हशी पुष्कळ वितात. आज आमच्या या गरीब मुलाच्या घरी एक गाय होती ती व्यायली होती. गाईला एक सुंदर पाडस झाले. गाईच्या चिकाचा घरात खरवस झाला. परंतु गाय व्यायल्याबरोबर त्या मुलाच्या आईस मुलाची आठवण झाली. ती नवऱ्यास म्हणाली, ''हे पाहा, बाहेर पाऊस आहे

व नद्यानाले भरले आहेत. तरीपण एक गोष्ट कराच. आपल्या रामूला खरवस तर फार आवडतो. आज घरी असता तर ! परंतु त्याला उद्या तुम्ही खरवस येथून घेऊन जा. चांगल्या वड्या पातेलीत घालून देईन. म्हणजे नीट नेता येईल.'' रामूचे वडील हे जरा अशक्त होते. घरची गरिबी म्हणून गाडी-घोडे करण्यास त्यास ऐपत नव्हती. परंतु मुलावरचे प्रेम व बायकोने केलेली ही विनवणी यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान वगैरे करून व थोडे जेवण करून रामूचे वडील निघाले. एका हातात ती खरवसाची पातेली व दुसऱ्या हातात छत्री असे ते चालू लागले. साडेसहा कोस अंतर होते. बाराच्या सुमारास ते त्या गावी पोहोचले व शाळेचा रस्ता त्यांनी धरला. शाळेच्या बाहेर मधली सुटी होईपर्यंत ते थांबले. मधली सुटी झाली व रामू वर्गाबाहेर आला. त्याच्याबरोबर त्याचे एक-दोन मित्र होते. इतक्यात वडिलांची व रामूची दृष्टादृष्ट झाली. रामूने विचारले, ''का, मध्येच आलात बाबा? एवढ्या पावसातून कशास आलेत!'' वडील म्हणाले, ''बाहेर त्या झाडाखालच्या दगडावर बसू चल. येऊ दे, तुझे मित्र पण येऊ दे, तुला एक गंमत घेऊन आलो आहे.'' रामू व त्याचे दोघे जिवलग मित्र त्या झाडाखाली गेले. वडिलांनी पातेलीचे फडके काढले व आत पाहतात तो खरवसाच्या सुंदर वड्या. रामू म्हणाला, ''बाबा, एवढ्याचसाठी का मुद्दाम आलात?'' वडील म्हणाले, ''होय, आम्हास तुझ्याशिवाय खरवस गोड लागेना. तिला तर सारखी तुझीच आठवण यावयाची. म्हणून आलो. गाईचे वासरू चांगले आहे मोठे.'' आई-बापांची ही प्रीती पाहून रामूच्या डोळ्यांत अश्रू आले. ते दुसऱ्यास दिसू नयेत म्हणून तो जरा दूर गेला व डोळे वगैरे पुसून आला.

आई-बाप असे प्रेम करतात, त्या प्रेमाची फेड तर आपणास कधीही करता येणार नाही. परंतु शक्य तोवर आपण त्यांस सुखी ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आई-बाप मरण पावले म्हणजे मग तुम्हास समजून येईल की खरे प्रेम करणारे आता कोणीही नाही. म्हणून जोपर्यंत ते जिवंत आहेत तोपर्यंत त्यांचे मन दुखवू नका. नाहीतर; मोठेपणी पश्चात्ताप होतो व वाटते, 'त्या वेळेस आई-बापास संतोष दिला असता तर! परंतु त्यावेळी तर माझ्या हट्टी वर्तनाने त्यांच्या डोळ्यांतून सतरादा टिपे काढली,' असे पुढे म्हणण्याची पाळी येऊ नये. म्हणून आजच तुम्ही आपल्या आई-बापास, बहीणभावास संतोष व आनंद द्या.

+++

४

All the thinking in the world does not bring us to thought. We must be abrobed in nature so that good thoughts come before us like free children of God and cry "Here we are."- Gokhale

निसर्गात रमा म्हणजे विचार तुमच्या पुढे येऊन नाचतील विचार ही सृष्टिदेवतेची मनमोकळी खेळणारी मुले आहेत.

✦✦✦

८

Sympathy is the key that fits the lock of any heart.

दुसऱ्यांची मने आपलीशी करून घ्यावयाची असतील, तर सहानुभूतीने त्यांच्याकडे आपण गेले पाहिजे. एखाद्या मुलास मी जर दरडावून विचारले तर तो आपले अंतःकरण मजजवळ खुले करणार नाही. एखादा ऐटबाज पोषाख करून गरिबांच्या झोपडीत गेला तर तो गरीब गोंधळून जाईल व तो आपले मन मोकळे करणार नाही. तुम्ही मुलाजवळ गोड बोला की तो सर्व सांगतो. ज्याप्रमाणे शाळेची कुलपे उघडावयास एक Master Key असते, त्याप्रमाणे दुसऱ्यांचे हृदयदरवाजे उघडावयाचे असतील तर त्यांच्याकडे सहानुभूतीची यशस्वी किल्ली घेऊन जा. अंतःकरणावर पडलेले दडपण, अंतःकरणावरील सामाजिक रूढी-परंपरांचे दडपण सहानुभूती दूर करते. एखाद्या झऱ्याच्या तोंडावरील पाषाण दूर केला, म्हणजे त्या झऱ्यातील पाणी झुळझुळ वाहू लागते. त्याप्रमाणे सहानुभूतीने मनावरील भार दूर केला म्हणजे मनातील सर्व भावनांचे नूर बदलू लागतात. अंतःकरणातील प्रवाह सुरू होतो. यासाठी ज्याला ज्याला जनमनाचे राजा व्हावयाचे असेल त्याने जनांबद्दल सहानुभूती बाळगली पाहिजे. वॉशिंग्टन या थोर पुरुषाविषयी असे म्हटले आहे की 'He was the first in the hearts of men' लोकांनी हृदयकपाटे खोलली तर अमेरिकनांच्या हृदयमंदिरात वॉशिंग्टन पुजलेला दिसे. वॉशिंग्टन यास हे वैभव कोणी दिले? त्याच्या मनात जो बंधुभाव होता त्याने दिले.

ज्याच्या हृदयात दुसऱ्याबद्दल सहानुभूती खरोखरीची आहे, केवळ तोंडदेखली सहानुभूती नसून, ज्या सहानुभूतीचा उगम अंतःकरणाच्या गंगेत झाला आहे, अशी आंतरिक सहानुभूती ज्याच्याजवळ दुसऱ्यांबद्दल असते, त्यांचे वैभव त्यांचे भाग्य यास सीमा नाही. राजे, महाराजे, सम्राट यांचे वैभव त्यांच्या वैभवासमोर फिके पडते. एखादा सम्राट आपल्या राजधानीतून मिरवला तर लोक त्याचे स्वागत करतात, परंतु हे स्वागत मनापासून नसते. हिंदुस्थानात राजपुत्र येतात, ड्यूकसाहेब येतात; त्यांची टोलेजंग स्वागते पण होतात, परंतु जनता काय वदते? ' लागली आग देशाला। म्हणती करा स्वागताला ।।' ही स्वागते दंडुक्याच्या धाक-दडपशाहीने उभारलेली स्वागते होत.

+++

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

६

काहीही करा पण ते मनापासून

एका उपदेश करणाऱ्या गृहस्थाने आपल्या मित्रांना पुढीलप्रमाणे उपदेश केला. तो चांगला वाटल्यावरून पुढे देत आहे.

‘सतराशे विषयांचे वरवर ज्ञान असण्यापेक्षा थोड्याच विषयांचे पण संपूर्ण ज्ञान असणे हे अधिक चांगले. कोणत्याही विषयासंबंधी अर्धवट व मोडकेतोडके तुटपुंजे ज्ञान असल्यामुळे फायदा होण्याऐवजी पुष्कळ वेळा घोटाळे मात्र उत्पन्न होतात. असल्या अर्धवट ज्ञानाची जगात स्तुती केली जाते हे खरे. अमक्या-अमक्याला प्रत्येक गोष्टीचे थोडेथोडे ज्ञान आपले आहेच असे प्रशंसापर म्हटलेले ऐकू येते. आपले ज्ञान अपूर्ण असते. कारण आपल्या शक्ती मर्यादित असतात हे तर खरंच; तरी पण ज्या पद्धतीने आपण ज्ञानसंग्रह करून घेतो ती पद्धतीही सदोष, घोटाळ्यांची, अस्पष्ट अशी असते. काहीतरी बेजबाबदारपणे आपण करतो. आपल्या डोळ्यांना नीट न्याहाळून पाहण्याचे शिक्षण आपण देत नाही. कानांना नीट ऐकण्याची शिस्त आपण लावीत नाही. आपले बोलणे पुष्कळ वेळा बेपर्वाईचे आणि फुगवून सांगितलेले असे असते; म्हणजे बोलण्याची शिस्त आपणास नसते. यामुळे आपल्या ज्ञानेंद्रियांस नीट वळण नसल्यामुळे ते घडते.’

✦✦✦

७

मी

छात्रालयातील विद्यार्थ्यांच्या गुणदोषांबद्दल आजपर्यंत दैनिकांत बरीच माहिती आली आहे; परंतु छात्रालयातील विद्यार्थी साधारणपणे ज्यांच्या हाताखाली आहेत व मुख्यत्त्वे करून ज्यांची देखरेख आहे असा सर्वांचा समज आहे त्याचे गुणदोष शिष्टाचारामुळे संपादक लिहू शकत नाहीत. सबब ते मीच स्वतः जरूरीपुरतेच देतो. दोष सांगितल्यामुळे ज्याप्रमाणे स्वतःची निंदा करावी असा माझा हेतू नाही तसेच काही गुण सांगून मी आत्मस्तुती करावी अशीही माझी इच्छा नाही.

मी कडक शिस्तीचा भोक्ता आहे व सर्व विद्यार्थ्यांनी छात्रालयाचे सर्व नियम पाळावेत याजबद्दल माझा फार कटाक्ष आहे. कोणत्याही स्वतंत्र देशातील लोकांना विद्यार्थीदशेतील काळ फार शिस्तीत घालावा लागतो. आपल्याकडे पूर्वीची शिस्त मोठमोठ्या गुरुकुलांत होती. रोज थंड पाण्याने सूर्योदयापूर्वी स्नान करणे व संध्यावंदन करणे, नमस्कार घालणे व रोज बरीच स्तोत्रे म्हणून नंतर सतत २ तास ३ तास (लघवीची सुटी न घेता) वेदपठण करणे, हे आपले वरील शिस्त शिकण्याचे मार्ग असत. पाश्चात्य देशांत लष्करी शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यास इतके कडकपणे दिले जाते. आपल्या बोर्डिंगमधील शेकडा ७५ विद्यार्थी त्या शिस्तीत १५ दिवसांत

मेटाकुटीस येतील. येथील छात्रालयात अत्यंत थोडे नियम आहेत की जे विद्यार्थ्याला जाचक होतात. सध्याच्या परिस्थितीत यापेक्षा कमी कडक नियम करणे शक्य नाही. मी स्वतः अशा प्रकारच्या शिस्तीतून गेलो नसल्यामुळे मला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. विद्यार्थ्यांना नियम घालून देताना तो नियम मी स्वतः पाळतो आहे किवा नाही याबद्दल मनात विचार येत नाही असे नाही पण खटपट करूनही जुन्या गैरसवयीचा इतका पगडा बसतो की केव्हा केव्हा प्रकृतीस अपायही होतो व मग तो नियम पाळण्याचे सोडून द्यावे लागते. त्या मनातील झटापटी विद्यार्थ्यास कशा कळाव्यात ? सकाळी उठण्याच्या बाबतीत वयाच्या ३५ व्या वर्षापासून सालोसाल निदान एक-दोन महिने खटपट केली. दर खेपेस त्याचे आजारात रूपांतर झाले. नियमाची उपयुक्तता पटली नाही. म्हणून नव्हे तर शरीर दुर्बलतेमुळे नेहमी माघार खावी लागत असे. माझ्यासारखा खमक्या पालक जर मला मिळाला असता तर किती बरे झाले असते ! असे आता मला पश्चात्तापपूर्वक वाटते. विद्यार्थीदशेत या सवयी लवकर बिनत्रासाने जडू शकतात. इच्छा मात्र पाहिजे. त्या सवयींचा उपयोग इतका आहे की, ज्या दिवशी मी लवकर उठतो त्या दिवशी मला दिवसाचे २८ तास आहेत असा भास होतो व काम किती होते याची कल्पनाही इतरांस करवणार नाही.

या शिस्तीच्या फायद्यामुळे ती न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांवर मी केव्हा केव्हा जरूरीपेक्षा अधिक रागावतो हा माझा दोष आहे. पण त्याचे कारण विद्यार्थीही काही अंशाने आहेत. जे विद्यार्थी मनापासून नियम पाळण्याचा प्रयत्न करतात त्यांच्यावर मी क्वचितच रागावतो. तथापि यावर उपाय म्हणजे ज्यावेळी विद्यार्थ्यांस वाटेल की मी अवास्तव त्याच्यावर रागावतो आहे त्यावेळी मजपासून त्याने आपल्या खोलीत धूम ठोकावी व पुनः काही वेळाने 'गुरुजी, रागावणार नसला तर सांगतो' अशी सुरुवात करून आपली बाजू मांडावी व मग काय तो निकाल घ्यावा.'

मला दुसरी सवय चहा पिण्याची. माझ्या मते ती सवय मला नाहीच आहे. दिवसेंदिवस मी चहाशिवाय राहिलो आहे व आजही राहू शकेन. पण निरनिराळ्या कामांमुळे इतकी गळ पडते की ज्यांच्या घरी मी जातो त्यांना दूध देण्याचे थोडेफार संकटच पडते. पुनः काही लोक 'आहोरे...' म्हणून हिणवण्यास तयारच. हे चहा घेण्याचे एक कारण. इतरही थोडीफार विद्यार्थ्यांस न कळण्याजोगी कारणे आहेत.

आता सांगतो गुण : प्रथमतः विद्यार्थी दशेतले. – मी फार गरीब विद्यार्थी होतो व वार लावून मी अध्ययन केले आहे. नेहमी नादार असे. पण वह्या-पुस्तके यांना लागणारा पैसा मी पाणी भरून मिळवीत असे. कर्नाटकात धारवाड नावाचे गाव आहे. तेथे पाण्याची फार टंचाई. रोज एक घागर एखाद्याकडे एक महिनाभर घातल्यास महिन्याचे आठ आणे मिळायचे. पाण्याची घागर निदान अर्ध्या मैलांवरून आणावी लागत असे.

मी वर्गात जरी हुशार नाही तरी व्यवस्थित विद्यार्थी होतो. रोजचे पाठ रोजच्या रोज करून, योग्य वेळी त्यांना पुनः उजळणी देत असे. कोणतीही परीक्षा मी टाळली नाही. कॉलेजमध्ये आल्यावर शेकडा ५० विद्यार्थी सहामाही परीक्षेची अळंटळं करतात. कॉलेजमध्येसुद्धा इंग्रजी व संस्कृतसारखे विषय मी आगाऊ वाचून जात असे. त्यामुळे माझ्यापेक्षा बुद्धिमान विद्यार्थ्यांपेक्षा मी वर येत असे. शंका आल्याबरोबर ती योग्य अशा इसमास विचारून ती फिटल्यावर मग पुढचा अभ्यास करीत असे.

आता मोठेपणचे गुण : मी अमळनेरला आल्यावेळी एका कॉलेजमध्ये प्रोफेसर होतो. पण विद्यार्थ्यांकरिता काहीतरी करावे या हेतूने मला काही मंडळींनी येथे बोलावले व आलो. माझ्याबरोबरचे लोक त्याच कॉलेजमध्ये उच्च पदावर आहेत. त्याशिवाय इतर मानमरातब. त्यांच्याबद्दल मला दुःख होते असे बिलकूल नाही. उलट त्यांच्या पोकळ अभिमानाबद्दल मला कीवच येते. गुलाम राहून पुनः मोठेपणा मिरवितात !

येथे आल्यावर माझ्या प्रोफेसरांनी मला सरकारी प्रोफेसरीची नोकरी देऊ केली होती पण मी नाकारल्यावर ती दुसऱ्यास दिली. त्याला सध्या ४५० रु. पगार आहे.

माझ्या उत्पन्नापैकी शेकडा ३० रु. मी दानधर्मात खर्च करतो. दरसाल निदान चार मराठी पुस्तके व चार मासिके विकत घेतो.

रोज थोडा वेळ तरी ईश्वराची मनोभावे आराधना करतो.

माझ्या बुद्धीप्रमाणे ज्यात मुलांचे कल्याण आहे अशा प्रकारचे शिक्षण मी मुलास वर्गात व बाहेर देतो. अंथरुणावर खिळून असलो तरच शाळेत शिकविण्यास मी जात नाही. केव्हा केव्हा अंगात ताप ठेवूनही मी शिकविलेले आहे.

माझी 'लहर' सांभाळून वागण्याची युक्ती सांगतो.

१) वर्गात शिकविलेले न समजल्यास ताबडतोब विचारणे. अर्धा पाऊण तास अनेक गोष्टी सांगितल्यावर 'रामायण वाचून रामाची सीता कोण' हा प्रश्न

विचारल्यावर जितका राग यावा तितका राग येतो. वर्गात लक्ष नव्हते हे कारण असल्यास ते स्पष्ट सांगावे.

२) छात्रालयातील मुख्यत्त्वेकरून खालील नियम मोडल्यास मला फार राग येतो. केव्हा केव्हा राग निष्कारण असतो हे मला नंतर कळते.

अ) वरचेवर घरी जाण्याची परवानगी मागणे. त्याने माझे फारच पित्त खवळते.

आ) प्रार्थनेस न जाणे इ) शाळा चुकविणे, फार तुंबणे (याही बाबतीत विद्यार्थ्यांनी जितकी खटपट करायला पाहिजे तितकी ते करीत नाहीत असे मला वाटते.)

यांपैकी कोणतीही चूक केल्यास माझे रागावणे-बोलणे मुकाट्याने सहन करणे. ती वेळ गेल्यावर हळूच सांगावे की 'तुम्ही निष्कारण रागावला.' इतकेही करून मी केव्हा रागातच 'हू' म्हणतो. पण तिकडे लक्ष देऊ नये. विद्यार्थ्याची चूक नसल्यास माझ्या रागाचा पारा १०० पासून १० वर एकदम येतो व तो दहावरचा शून्यापर्यंत येण्यास थोडा वेळ लागतो. असो. सध्या एवढे पुरे. राग कमी करण्याची सतत खटपट चालू आहे.

✦✦✦

८

निसर्गाशी संवाद

कवी हे निसर्गाचे-सृष्टीचे संदेश सांगणारे दिव्यदृष्टी महात्मे आहेत. सर्वच कवींस सृष्टीच्या अंतरंगात शिरता येत नाही. ही देणगी थोड्या थोर कवींस दिले असते. हिंदुस्थानातील कवीसम्राट रवींद्रनाथ यांना ही ईश्वरी देणगी श्रेष्ठ प्रकारची आहे.

एकदा त्यांच्या शांतिनिकेतनातील खोलीतून ते बाहेर पडले व दुसरीकडे जात होते. ते बाहेर पडले. तोच प्रचंड वारे सुटले. झाडे पडावयाची वेळ आली; प्रलय झाला असे भासले. परंतु रवींद्रनाथ भीतीने घरात येऊन खोलीत पांघरूण घेऊन बसले नाहीत. ते सृष्टीचे लाडके बाळ आहेत. भीषण सृष्टीची त्यांस भीती वाटत नाही. रागावलेल्या आईस मूल भीत नाही. आई मारीत असली तरी लहान मूल तिच्याच ओटीत तिच्याच लुगड्यात तोंड खुपसतो. सृष्टिमाता वाऱ्याच्या प्रचंड रूपाने, पर्जन्याच्या भीषण दर्शनाने, विजांच्या कल्लोळाने कवीबाळास भिववू शकत नाही.

ज्या वेळेस वारे वगैरे सुटले, त्या वेळेस रवींद्रनाथ तेथेच रस्त्यात खाली बसले. त्यांनी डोळे अर्धवट मिटले होते. बराच वेळ झाला. सायंकाळ संपून रात्र होण्याची

वेळ आली. रवींद्रनाथांच्या शिष्यांनी दिवे लावून आणले व ते गुरुदेवांच्या जवळ उभे राहिले. शेवटी रवींद्रनाथ उठले. एक शब्दही ते बोलले नाहीत. भावनांनी हृदय भरलेले असले म्हणजे मनुष्य फार बोलू शकत नाही.

थेट आपल्या खोलीत रवींद्रनाथ गेले. त्यांनी कागद घेतला. त्या कागदावर सुंदर गीत त्यांनी लिहिले. जे संदेश सृष्टीने त्यांना दिले ते त्यांनी लोकांस सांगितले. सृष्टी शतमुखांनी त्यांचेजवळ बोलत असते. खरा कवी स्वतःचे काही सांगत नाही. तो निसर्गाशी एकरूप होतो व निसर्ग त्याच्यामधून बोलत असतो.

परंतु असे कवी फार थोडे हे सांगावयास नकोच.

+++

९

मनुष्यप्राण्याचे शरीर व इतर पशुपक्ष्यांची शरीरे यात किती तफावत ! तुमचे हातपाय तुम्हास वाटेल तसे फिरवता येतात. तुमची वाणी हे केवढे अपूर्व साधन आहे! प्रत्येक वस्तूस निराळा शब्द तुमच्याजवळ आहे, तर पशू एकच शब्द सारखा काढतो. शिवाय तुम्हास बुद्धी दिली आहे. तुम्ही विचार करू शकता व म्हणून तुम्हास प्रगती करून घेता येते. म्हणूनच साधुसंत नरजन्माची महती गातात. चौऱ्याऐंशी लक्ष योनींनंतर हा मनुष्यजन्म येतो. त्या दिवशी ज्या स्थितीत असतो, त्याच स्थितीत तो पशू मरतो. शरीर फारतर त्यांचे पुष्ट होते. सुधारणा करणे, नराचा नारायण होणे हे मनुष्यासच साधेल व त्यासाठी त्याने या शरीराचा, बुद्धीचा उपयोग केला पाहिजे, काम केले पाहिजे. तुम्हास माहिती आहे की वस्तूचा उपयोग करणे म्हणजे वस्तू जिवंत ठेवणे होय. चाकू-तलवार यांचा उपयोग न केला तर त्यास गंज चढतो, त्या कुचकामाच्या ठरतात, त्याप्रमाणे तुमचे शरीर मन नेहमी उपयोगात आणले तर ते चपळ व उत्साही बनेल; तसेच मन व बुद्धी म्हणून शरीर व मन यांनी नेहमी काम करीत जा. दुसरे असे आहे की, पशुपक्षी यांना जशी स्वतःची सुधारणा करता येत नाही त्याचप्रमाणे जास्त अधोगतीही त्यास करता येत नाही. परंतु मनुष्याचे मन व बुद्धी त्याची उन्नती करू शकतात, त्याप्रमाणे अधोगती व पशूपेक्षाही नीच त्यास करतात. वाघ भूक लागेल तेव्हाच तो दुसरा प्राणी मारील; परंतु मनुष्य केवळ सूडबुद्धीनेही मारील. "Saton finds to do mischief with the hands" जो काही

उद्योगात मग्न नाही, त्याचे मन सैतान वाईट गोष्टीकडे वळवितो. तो व्यसनी होतो; दारू पितो, बिडी ओढतो. कसा तरी काळ घालविण्यात व्यसनात दंग होतो. यासाठी विचार करून नेहमी कार्यमग्न राहा. त्यात प्रगतीचे बीज आहे.

मुलांस नेहमी वाटते की आपण हुशार आहोत. काय करावयाचे आजपासून वाचून. परीक्षेच्या वेळी जरा आधी दोन दिवस वाचले म्हणजे पास होईन. आहे काय त्यात! माझ्या हातचा मळ आहे. परंतु मित्रांनो, हा फाजील आत्मविश्वास नाशास कारणीभूत होतो. कासव आणि ससा यांची गोष्ट तुम्हास माहीतच आहे. आयुष्याच्या या संग्रामात साधारण बुद्धीचा, परंतु चिकाटीचा उपयोग व सततोद्योगी मनुष्यच यशस्वी होतो हे लक्षात धरा. जरा तुम्ही बुद्धिमान व जास्त हुशार असाल तर मठ्ठाइतके श्रम त्या विषयावर घेऊ नका; परंतु अधिकस्य अधिक फलं हे लक्षात धरा किंवा दुसऱ्या अनेक विषयांचे ज्ञान मिळवा.

या तुमच्या आयुष्यात जे तुम्ही मिळवाल ते मोलाचे आहे. आज भावी आयुष्याचा पाया तुम्हास घालावयाचा आहे. सर्व विषयांत ज्ञान मिळवा. केवळ परीक्षेस महत्त्वाचा या दृष्टीने पाहू नका. ज्या ज्या गोष्टीमुळे जीवनास रमणीयता व विविधता आणता येईल ते ते शिका. गाणे, चित्रकला, खेळ, कवायत, भूगोल वगैरे सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तुम्हास Aesthetic Sense असला पाहिजे. चित्र पाहिले तर चित्रातील खुमारी समजली पाहिजे. तुमची खोली, बैठकखाना, घराचे आजूबाजूचे वातावरण कसे सजवावे, प्रसन्न करावे हे तुम्हास पुढील आयुष्यात समजले पाहिजे. या वेळेस भरपूर वेळ तुमच्याजवळ असतो. मिळवाल तेवढे थोडे आहे. भरपूर मिळवा. सर्व ज्ञानप्रांतांत घुसा. पूर्वी इंग्लंडमध्ये एक राजा होता. तो आजूबाजूच्या प्रधानांस, उमरावांस, वृद्धांस सलाम करीत नसे, तर कोणी तरुण मनुष्य आढळला तर त्यास नमस्कार करी, याचे कारण एकाने राजास विचारले, तेव्हा राजा म्हणाला, "हा प्रधान, हा सरदार, हा वृद्ध मनुष्य यांची योग्यता मला कळून चुकली आहे. हल्ली आहेत याच्याहून ते मोठे खचित होणार नाहीत. परंतु ही तरुण मुले यांच्यात कोणत्या शक्ती निद्रिस्त आहेत हे मला काय माहीत? कदाचित ही मुले थोरांहून थोर, राजांचेही राजे, शूरांचेही शूर होतील." आज तुमच्या मुलांचे वाटेल ते होण्याची शक्ती आहे. परंतु काम करा. बुद्धी व शरीर यांचा उपयोग करा.

परंतु लक्षात ठेवा. काम मर्यादेच्या बाहेर जाता कामा नये. विश्रांतीची पण कामाइतकीच जरूरी आहे. नेहमी काम करीत राहण्याने तुम्ही थकाल. म्हणून खेळा. नीट विश्रांती घ्या. म्हणजे जास्त उत्साहाने काम कराल. विश्रांती उत्तम प्रकारची घेण्यास आपण काम विसरले पाहिजे. To forget work is to be better prepared for work एखादा कारकून घरी गेला आणि कचेरीतीलच सगळ्या गोष्टी, हिशेब वगैरे मनात घोळवीत राहिला तर त्याला मुलाबाळांजवळ धड बोलता येणार नाही. त्याला विश्रांती मिळत नाही. पुन्हा ऑफिसात गेल्यावर घोटाळा. तर क्रीडांगणावर आलात म्हणजे अभ्यास विसरा. अभ्यासाच्या वेळी खेळ विसरा. आपले मन एकदम वाटेल त्या गोष्टीस तयार करणे ही मोठी कला आहे. नेपोलियन रणांगणावरही झोपे. तो म्हणे, ''मी एकदा अमुक करावयाचे ठरविले म्हणजे कोठेही मला तसे करता येते; लढाईच्या धूमधडाक्यात मनात आणले तर लगेच मला झोप लागते व ती इतकी गाढ की पंधरा मिनिटांच्या झोपेनेही मी ताजातवाना होतो.

असो, तर विश्रांती घ्या. विश्रांती घेण्याचे निरनिराळे प्रकार आहेत. ग्लॅडस्टनसारखे मोठे लोक, एक काम सोडून दुसऱ्या कामात मग्न होतात. ही त्यांची विश्रांतीच होय. मोठ्यामोठ्या लोकांना दोन-दोन तास खेळण्याची विश्रांती घेता येत नाही.

✦✦✦

१०

गणपती उत्सव

आज चार-पाच दिवस भगवंताची आम्ही पूजा केली. भूतलावरील पूजा स्वीकारून देव आपल्या स्वर्गात जावो. आमचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी पुन्हा आमच्याकडे येवोत.

काल मंगलमूर्ती मोरयाचे आपण विसर्जन केले. आज पाच-सहा दिवस आनंदाने गेले. व्याख्याने, प्रवचने, कीर्तने, भजने, मेळे, मेजवानी, खेळ, खिरापत यांची खैरात-लयलूट आज पाच दिवस झाली. प्रत्येकाच्या मुखमंडलावर आज आठवडाभर आनंद नाचत होता. आज आठवडाभर लहान-थोर ऐक्य, आनंद, प्रेम, मैत्री परस्परांबद्दल दाखवीत होते. आपण सर्व गुण्यागोविंदाने व आनंदाने राहिलो.

मांगल्याचा अवतार मोरेश्वर काल निघून गेला; परंतु त्याने मनावर घडलेले मांगल्याचे संस्कार आपण विसरता कामा नयेत. ते संस्कार पुढील वर्षी मोरया येईपर्यंत दृढतर होऊ द्या. ऐक्य व मैत्री, स्नेह व सलोखा, पडेल ते काम करण्याची तयारी यांचे बहुमोल धडे आपण विसरता कामा नयेत. मोरया गेला; परंतु काहीतरी देऊन गेला आहे. ते दिलेले, देवाने ते दिलेले, दिलेला हा सद्‌विचारांचा ठेवा आपण दूर भिरकावून देता कामा नये.

पुढील वर्षी पुनरपि आपण गणेश देवास, या सिद्धिविनायक विघ्नेश्वरास पुन्हा आणू; परंतु या वर्षापेक्षा पुढील वर्षी आपल्या मनाची वाढ, हृदयातील सद्भावनांची वाढ, बुद्धीची वाढ व शारीरिक बलाची वाढ आपणास त्यास दाखविता आली पाहिजे. आपल्या मनावर जे आज संस्कार घडले, त्या संस्कारांस अनुसरून आपण काय केले त्याचा सर्व हिशेब गजाननापुढे मांडला पाहिजे.

नाहीतर पुढील वर्षी गणेश येईल आणि आपले हृदय, आपली बुद्धी ही रिकामीच असतील. गणपती पुन्हा येईल, एक वर्ष जाईल; परंतु आमची बुद्धी पोरकट ज्ञानहीन असेल; देव येईल परंतु आमचे शरीर रोडके असेल, तसे होता कामा नये. पुढील वर्षी गणपती येईल त्यावेळी प्रत्येकाने नवीन ज्ञान देवापुढे मांडावे; नवीन सद्विचारांची फुले हृदयवेलीवर आलेली त्यास वाहावी. आपले व्यायामाने व खेळाने घाटदार व छानदार झालेले, चपळ व पुष्ट असे शरीर देवास दाखवावे म्हणजे दर वर्षी मोरयास येण्यास आनंद वाटेल. ज्याप्रमाणे छात्रालयात राहणाऱ्यांचे वडील जर येथे आले व त्यांनी आपल्या मुलांची प्रकृती सुधारलेली, बुद्धी तीक्ष्ण झालेली, विचार निर्मळ झालेले असे आढळले तर आनंद होईल, त्याप्रमाणेच या जगाच्या छात्रालयात, या जगाच्या मोठ्या शाळेत आपणास गणपती बाप्पाने ठेवले आहे. तो दर वर्षी आपली सुधारणा पाहण्यास येतो. माझ्या मुलांची कितपत सुधारणा झाली आहे, त्यांनी अमंगलत्त्व दूर केले आहे की नाही, ते निस्तेज व कलाहीनच आहेत की काय हे पाहण्यास हा जगच्चालक, जगद्पिता दरवर्षी येतो. त्याला मुलांची सर्वांगीण सुधारणा दिसली, तनमन सुसंस्कृत दिसले तर तो आनंदाने चार दिवस राहील. तरच त्यास आनंद होईल. नाहीतर त्यास आपल्याबद्दल दया, प्रेम वाटणार नाही; आपल्याबद्दल त्यास औत्सुक्य वाटणार नाही. म्हणून हे एक वर्ष शरीर व मन, स्वतःचे, दुसऱ्याचे जीवन धष्टपुष्ट व तेजस्वी करण्यात दवडा.

✦✦✦

११

लोकमान्यांचे पुण्यस्मरण

तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हास घडो ।

गुरुवार ता. १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आहे. लोकमान्यांचे नाव माहीत नाही असा महाराष्ट्रीय विरळा. इंग्रजांचे राज्य महाराष्ट्रात चालू झाल्यावर महाराष्ट्रीय जनतेस पुनरपि जागी करणारे जे महापुरुष महाराष्ट्रात होऊन गेले त्यांतच बाळ गंगाधर टिळक यांचा अंतर्भाव आहे.

१८५६ मध्ये टिळकांचा जन्म झाला. लहानपणापासून ते फार हुशार व स्वाभिमानी होते. त्यांचे वडील शास्त्री होते. वडिलांजवळ लहानपणी ते संस्कृत बरेच शिकले होते. मराठी शिक्षण संपल्यानंतर त्यांनी इंग्रजी शिक्षण घेतले. मॅट्रिक परीक्षा पास झाल्यावर ते डेक्कन कॉलेजात पुढील अभ्यासासाठी जाऊ लागले. कॉलेजातील पहिल्या वर्षी त्यांनी उत्कृष्टपणे शरीर कमावले. हजार हजार जोर-बैठका ते काढीत; तास तास नदीचे पात्रात संगमावर पोहत राहात. अशा प्रकारे पुढील आयुष्यात लागणारे शरीरबळ त्यांनी संपादन केले.

येथे कॉलेजमध्ये असता आगरकर त्यांचे सहाध्यायी होते. या दोघांचे येथे वादविवाद व्हावयाचे. टिळक हे जुन्या चालीरीती, धर्म परंपरांची तरफदारी करीत.

ओ. छ. श्री.
मा

यासंबधी परस्परांचे पटले नाही, तरी एका गोष्टीत उभयतांत एक वाक्यता झाली. ती गोष्ट म्हणजे लोकांमध्ये शिक्षणप्रसार करणे. शिक्षणाशिवाय राष्ट्र पंगू आहे ही गोष्ट उभय देशभक्तांस पटली. त्यांनी चिपळूणकर यांनी नुकतीच सुरू केलेली न्यू इंग्लिश स्कूलची संस्था भरभराटीस आणण्यास तयारी केली. न्यू इंग्लिश स्कूलचे पुढे फर्ग्युसन कॉलेज पण निघाले. टिळक व आगरकर कॉलेजमध्ये शिकवू लागले.

विष्णुशास्त्री यांनी निबंधमाला हे मासिक पुस्तक धर्मपरंपरांची, त्याप्रमाणे केसरी व मराठा ही अनुक्रमे मराठी व इंग्रजी साप्ताहिके काढून जनमने तयार करण्याचे, काम चालविले. चिपळूणकरांच्या मरणानंतर 'मराठा' टिळक चालवीत व आगरकर केसरीत लिहीत. या वेळेसच कोल्हापूरच्या महाराजांचा रेसिडेंट छळ करतो, वगैरे मजकूर छापून कोल्हापूरचा सर्व कारभार केसरीने चव्हाट्यावर मांडला. कोल्हापूरकर महाराजास वेडा ठरवून त्यांचे हाल करण्यात येत; परंतु शेवटी टिळक व आगरकर यांचेवर अब्रुनुकसानीचा खटला करण्यात आला व त्यांस शिक्षा झाली. टिळक व आगरकर तुरुंगात जवळजवळच राहात व त्यास तेथे वादविवाद करावयास सापडत. शिक्षणाच्या कार्यात दडून त्यांचे मतभेद येऊ लागले. कैद झाल्यामुळे या दोघा थोर पुरुषांबद्दल जास्तच पूज्य बुद्धी महाराष्ट्रीयांस वाटू लागली.

परंतु आता टिळक व आगरकर यांचे पटेना. केसरी पत्रात आपल्या इच्छेविरुद्ध आपणास लिहिता येत नाही म्हणून आगरकर यांनी नवमत प्रसारक 'सुधारक' हे वर्तमानपत्र काढले. टिळक केसरी पत्र चालवू लागले. पुढे कॉलेजमध्येही ही भांडणे होऊ लागली व टिळकांनी कॉलेजमधील आपल्या कामाचा राजीनामा दिला. आता सर्वस्वी केसरीचे काम टिळक करू लागले. केसरीची गर्जना महाराष्ट्रात घुमू लागली. लोकांत स्वाभिमान उत्पन्न होऊ लागला. इंग्रजी राज्याची भूल लोकांस पडली होती. परंतु हे स्मशानशांती निर्माण करणारे सरकार जनतेस कसे निःसत्त्व करीत आहे हे त्यांनी लोकांना दाखविले. लोकांत सरकारबद्दल असंतोष त्यांनी निर्माण केला. असंतोषः धियो मूलम । असंतोष हेच वैभवाचे मूल आहे. त्याच परिस्थितीत समाधान मानून किड्यामुंगीप्रमाणे राहणे यात पौरुष नाही. पुरुषार्थ नाही. उठा, संघटना करा, स्वाभिमान धरा असे शिकवू लागले. शिवाजी उत्सव त्यांनी सुरू केला व रायगडावर मोठ्या प्रमाणावर शिवाजी उत्सव समारंभ त्यांनी घडवून आणला. आजूबाजूचे शेकडो मावळे-मराठे या उत्सवास जमले व टिळक स्वतः पंक्तीतून वाढीत होते.

आपसिंह महाराज (थोरले)
.र वाचनालय, सातारा.

गणपती उत्सव पण त्यांनी सुरू केला. दहा दिवस गणपती उत्सव सुरू असतो. या प्रकारे संघटना, स्वाभिमान जेणेकरून निर्माण होईल त्या गोष्टी ते करू लागले.

१८८७ मध्ये केसरीतील लेखाबद्दल त्यांना पुन्हा शिक्षा झाली. यावेळेस तुरुंगात त्यांनी वेदासंबंधी महत्त्वाचे पुस्तक लिहून काढले. टिळक हे मोठे पंडित व संशोधक होते. सर्व विषयांत त्यांची गती सारखीच चाले. गणितशास्त्र, ज्योतिषाशास्त्र, संस्कृत वाङ्मय, तत्त्वज्ञान सर्व बाबतींत त्यांची बुद्धी अकुंठित गतीने चाले. तुरुंगातून अशक्त होऊन मोकळे झाल्यावर पुन्हा केसरीचे संपादकत्त्व हाती घेऊन 'पुनश्च हरि ॐ' हा तेजस्वी लेख त्यांनी लिहिला. तेजस्वी माणसाचे तेज संकटांनीच प्रखरतर होते. तोडलेला तरू वठून न जाता आणखी भराने तरारतो. केसरी महाराष्ट्रात प्रिय झाला. टिळकांचे नाव सर्व हिंदुस्थानात गर्जू लागले.

१९०५- ०६ च्या सुमारास बंगाल प्रांताची-बंगाली लोकांची जूट तोड करण्यासाठी लॉर्ड कर्झन यांनी विभागणी केली. ही विभागणी बंगाली लोकांनी बंद पाडण्यासाठी जोराची चळवळ सुरू केली. अरविंद घोष, त्यांचे बंधू वारींद्र बिपीनचंद्र पाल, सुरेंद्रनाथ वगैरे पुढारी बंगाल प्रांतात देशभक्ती प्रज्वलित करू लागले. इकडे महाराष्ट्रात ही चळवळ सुरू झाली. यावेळेस केसरीत तेजाळ लेख लोकमान्यांनी लिहिले. पुन्हा त्यांच्यावर खटला भरण्यात आला. टिळकांनी सात तास आपले भाषण चालविले होते. या भाषणात त्यांचे गांभीर्य, देशहिताची तळमळ, विद्वत्ता, कायदेपटुता हे सर्व दिसून येते. आपणास शिक्षा होणार ही गोष्ट त्यांना दिसतच होती व म्हणूनच आपली सर्व मते या भाषणात त्यांनी बोलून दाखविली. खटला बरेच दिवस चालून रात्री नऊ वाजता निकाल सांगण्यात आला व टिळकांना सात वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा फर्माविण्यात आली. मुख्य न्यायाधीश दावर हे पारशी गृहस्थ होते. ते टिळकांस म्हणाले, "तुमचा मेंदू सडलेला आहे, म्हणून असे देशहितघातक तुम्ही लिहिता." शिक्षा दिल्यावर टिळक म्हणाले, "या न्यायासनापेक्षा थोर असे ईश्वरी न्यायासन आहेच. मी निरपराधी आहे अशी माझी अद्यापही श्रद्धा आहे. कदाचित माझ्या हालअपेष्टेमुळेच मी हाती घेतलेले कार्य जास्त यशस्वी होईल. ईश्वराची तशी इच्छा असेल." या धीरोदात्त व शांत उद्‌गारांवरून टिळकांचे अलोट धैर्य आपणास दिसून येईल.

उतारवयात सात वर्षांची शिक्षा, यामुळे सर्व देश हळहळला. टिळक हे योगी होते. त्यांच्या मनाची समता कधी ढळत नसे. पर्वतावर मुसळधार पाऊस पडला तरी

पर्वतास धक्का बसत नाही. तसेच थोर पुरुषांचे असते. स्वतःच्या संकटांची त्यास क्षिती नसते. या वेळेसही तुरुंगात टिळकांनी लोकोत्तर पुस्तक लिहिले. या पुस्तकाचें नाव 'गीतारहस्य.' ८०० पानांचा हा मोठा ग्रंथ आहे. यात टिळकांचे तत्त्वज्ञान आहे. हिंदुधर्म, हिंदू तत्त्वज्ञान कसे श्रेष्ठ आहे हे त्यांनी सिद्ध केले आहे. मनुष्याने सतत परहितार्थ कर्म करीत राहिले पाहिजे; उद्योग ध्येय समोर ठेवून करावा. यश मिळो वा न मिळो. सिद्धी देणे हे परमेश्वराधीन आहे. प्रयत्न हा मानवाधीन आहे. या ग्रंथावरून टिळकांची विद्वत्ता सहज दिसून येते. Arctic Home in the Vedas, Orion हे दोन वेदांवरचे ग्रंथ व तिसरा गीतारहस्य, असे हे तीन ग्रंथ टिळकांच्या विद्वत्तेचे व पांडित्याचे निदर्शक आहेत. टिळक कैदेत असता त्यांची सुशील भार्या इकडे मरण पावली. त्यामुळे टिळकांना फार वाईट वाटले. ते तिकडून पाठविलेल्या एका पत्रात लिहितात,

'परमेश्वराने पाठविलेली दुःखे मी निमूटपणे सोशीत असतो खरा, परंतु ही वार्ता वाचून माझे मनही हादरले.' तुरुंगातून सुटून आल्यावर पुन्हा शरीरप्रकृती सुधारताच त्यांनी राष्ट्रकामगिरी खांद्यावर घेतली.

✦✦✦

१२

स्वदेशी हा प्रत्येकाचा धर्म आहे. परदेशात कपड्यासाठी कोट्यवधी रुपये आपण दवडतो. आपले मजूर उपाशी मरतात. अशा वेळी खादी पेहरणे हे प्रत्येक सुशिक्षिताचे तरी कर्तव्य नाही का? व्याख्यात्यांनी आम्हा शिक्षकांस उद्देशून सांगितले, ''तुम्ही पूर्ण स्वदेशी बनून सर्व विद्यार्थ्यांस स्वदेशीचे धडे दिले पाहिजेत. सर्व भावी नागरिक तुम्ही तयार करणार.'' स्वामीजींनी सांगितले. परंतु महात्माजींचे शब्दाप्रमाणे वागण्यासही जेथे जनता तयार नाही तेथे लुंग्यासुंग्या शिक्षकाने समजा सांगितले तर त्याप्रमाणे कोण वागणार? शिक्षकावर सर्वजण जबाबदारी टाकतात परंतु शिक्षकाचे ऐकते कोण? मी या दैनिकातून खादीबद्दल शंभर वेळा लिहिले असेल; परंतु छात्रालयात पवार व शंकर वाणी दोघे सोडले तर एक तरी विद्यार्थी खादी वापरतो का? मला समजत नाही की, ही मुले शिक्षक सांगतात, पुढारी सांगतात, महात्मे सांगतातच तरी एवढी साधी गोष्ट का करीत नाहीत? इतकी का निगरगट्ट यांची मने झाली आहेत? मी मुंबईस मागे गेलो होतो. तेव्हा मला एकजण म्हणाला, ''का रे, तू म्हणे अमळनेरच्या बोर्डिंगात सर्वांना खादीभक्त बनविले आहेस?'' त्याचे शब्द ऐकून मी खाली मान घातली. मी म्हटले, ''असे सांगणे आपले काम; करणे हे मुलांचे काम; त्यांना मारून मुटकून काही स्वदेशी वापरा असे सांगता येत नाही. आम्ही हतबल आहोत. आमच्यात ते तेज नाही. आमची योग्यताच नाही की आमच्या शब्दाप्रमाणे मुलांनी वागावे.''

माझे मामा येथे आले होते व ते दापोलीच्या बोर्डिंगात राहात होते. दापोलीचे बोर्डिंग त्यावेळेस सर्व मुंबई इलाक्यात गाजले होते. दापोली हा रत्नागिरी जिल्ह्यातील एक तालुका आहे, पहिले शाळेचे बोर्डिंग या इलाक्यात. तेच मग न्यू. इ. स्कूल वगैरेची बोर्डिंगे निघाली. या बोर्डिंगात १५०-२०० मुले होती. तेथील व्यवस्थापक नारायणराव गोगटे म्हणून होते. हे फार तेजस्वी पुरुष होते. गोगटे हे तेथील मिशन स्कूलमध्ये मास्तर होते. या गोगट्यांच्या मनात शेकडो कल्पना असत. दापोलीत ५० एकर जमिनीत आरारोट लावून दक्षिण आफ्रिकेत बोअरवॉटरच्या वेळेस दहा हजार पौंड आरारोट शिपायांस पाठवित. असे धाडसी उद्योग होते. मिशन स्कूलमधील एका पाद्री व्यवस्थापकाने मोडी पुस्तीत वरती 'श्री' लिहू नये असे फर्माविले. ज्या दिवशी अशी नोटीस निघाली त्या दिवशी गोगटे शाळेत आले नव्हते. त्यांना ही गोष्ट सायंकाळी समजली. ते फिरावयास जात होते. वाटेत हे पाद्री अधिकारी भेटले. तेव्हा नारायणराव संतापले व त्या साहेबास जोडा काढून मारावयास निघाले. ''उद्या आपला हुकूम मागे घे; नाहीतर मी जोड्याने मारीन, याद राखा.'' असे सांगून ते गेले. असे स्वतंत्र बाण्याचे ते होते. या बोर्डिंगात पुष्कळ शिक्षक राहात. तेथेही साने मास्तर म्हणून एक होते. त्यांचे माझे नाते नव्हते; परंतु माझी आजीसुद्धा या सानेमास्तरांच्या गोष्टी सांगे इतके ते लोकप्रिय झाले होते. हे साने मास्तर सर्व मुलांस स्वदेशी वापरण्याबद्दल निक्षून सांगत. ते स्वतः कपड्यांची ठाणे मागवित व एक शिंपी ठरलेला असे, त्याच्याकडून सर्व कपडे शिवून घेत. माझा मामा मला म्हणाला, ''साने मास्तरांच्या सांगण्याविरुद्ध कोणी जात नसे. आम्ही सर्व ते शिवून देतील ते कपडे वापरीत असू.'' मामास मी म्हटले, ''तुमचे साने मास्तर थोर पुण्याईचे, म्हणून त्यांचे मुले ऐकत; परंतु येथे मी सांगतो पण कोणीच ऐकत नाही.'' माझ्या मामास हे ऐकून आश्चर्य वाटले.

मुलांनो, आम्ही सांगितलेले एक काम तुम्ही आनंदाने करता; त्यावेळेस किती आज्ञाधारकपणे तुम्ही वागता? पण हाच आज्ञाधारकपणा या गोष्टीत का तुम्ही वापरू नये? महात्माजींची आज्ञा ऐकण्यास तुम्ही तयार नाही? ते किती थोर, किती जगदवंद्य, किती देशासाठी रात्रंदिवस तळमळतात! त्या महात्म्यास किती आनंद होईल जर त्यास मला कळविता आले की, आमची शाळा व बोर्डिंग यातील मुले खादी वापरतात! अशा प्रकारचा महात्माजींस आनंद सर्व शाळांतील विद्यार्थ्यांनी दिला तर त्यांचे

आयुष्य वाढेल, उत्साह वाढेल; तरुण लोक काहीतरी करतील असे त्यास वाटेल. परंतु या दुर्दैवी देशाची अशीच स्थिती आहे की काही पुढाऱ्यांनी मरमर मरावे; आपली मौल्यवान आयुष्ये समाजाच्या उन्नत्यर्थ खर्चावी, रक्ताचे पाणी करावे, त्यांनी जिवाचे रान करावे. एकेक दिवसात सात-आठ ठिकाणी व्याख्याने द्यावी, दौरे काढावे; क्षणभर विश्रांती न घेता हाडाची काडे करावी; शरीर खिळखिळे करावे. पण या सर्वांबद्दल हे निगरगट्ट, स्वाभिमानशून्य, स्वदेशप्रेमशून्य, सुखविलासी, ऐदी लोक काही तरी मोबदला देतात का? परमेश्वरा, केव्हा आमच्या मनात तू थोडी तरी जागृती, थोडी तरी देशप्रेमाची ज्योती उत्पन्न करशील ! अंतरीचा हा दिवा तू केव्हा लावणार आहेस ! आज आम्हा सर्वांची अंतःकरणे स्वार्थाच्या अंधकाराने, सुखवासनांच्या तिमिराने, विलासांच्या तमाने भरून गेली आहेत. देशप्रेमाचा पवित्र नंदादीप तू तेथे कधी बरे लावशील? त्या दीपाच्या प्रकाशात आमची चुकणारी पावले केव्हा बरे आम्ही सुधारू? भगवंता, तुलाच माहीत

✦✦✦

कुमारांपुढील कार्य

कुमारांपुढील कार्य

मित्रांनो, मराठी भाषेवर माझे अपार प्रेम आहे. बालपणापासून मी तिचा भक्त आहे. मराठी वाङ्मयावर मी पोसलेला आहे. मराठीवर प्रेम करण्यात मी कोणाला हार जाणार नाही. येथे अध्यक्ष व्हायला दुसरी कोणतीच माझी पात्रता नाही. प्रेमाच्या बळावर मी येथे बसलो आहे. ज्याप्रमाणे मराठी भाषेवर माझे अपार प्रेम आहे, त्याप्रमाणे मुलांवर, तरुणांवर, विद्यार्थ्यांवर माझा जीव आहे. मी त्यांना विशेष काही दिले आहे किंवा देऊ शकेन असे नाही; परंतु त्यांच्यात राहावे, मिसळावे असे मला वाटत असते. त्यांच्यात राहून मीच नेहमी नवतरुण राहात असतो !

भावनांवर नाचत मी लिहिले

मी गोंधळून गेलो आहे. मी थोडेफार लिहिले तरी मी हाडाचा साहित्यिक नाही. साहित्य कसे असावे याची फारशी चिकित्सा मी माझ्या मनात कधी केली नाही. अमुक एकच लिहायचे असाही ठरवलेला बाणा नाही. साहित्यतंत्राचा मी कधीही अभ्यास केला नाही. मी तुमच्यासारखा विद्यार्थी होतो तेव्हा माझ्या मनात साहित्यसेवेचे अनेक विचार येत; परंतु मला तुरुंगातच लिहायला मिळाले. अनेक वर्षे मनात जमलेल्या भावना नि विचार यांच्या राशी मी तेथे कागदावर ओतल्या. माझे हृदय रिते करत असताना मला अपार आनंद होई. मी भावनांवर नाचत लिहिले. लिहिताना रडे, संतापे, रोमांचित होई. बंकिमचंद्रांविषयी असे सांगतात की, ज्या

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

दिवशी ते अत्यंत सुंदर लिहीत, त्या दिवशी ते दुप्पटतिप्पट मागून जेवत ! बंकिम हे साहित्यसम्राट आहेत, मी सामान्य आहे. परंतु मलाही अनेक वेळा असा अनुभव आला आहे की, लिहून झाल्यावर गळून गेल्याप्रमाणे होई. अपार भूक लागे. जणू मी माझ्या लिहिण्यात रक्त ओतत होतो. सारे प्राण ओतत होतो. मिल्टनने म्हटले आहे की, 'थोर वाङ्मय रक्ताने लिहिलेले असते !' माझे वाङ्मय कसेही असो; त्यात मी रक्त ओतलेले आहे. ते रद्दड असले तरी त्यात प्राण आहे. तेथे रक्त आहे. अश्रू आहेत. माझ्या वाङ्मयाला हात लावाल तर माझ्या हृदयाला हात लावाल. माझे वाङ्मय माझी वाङ्मयीन मूर्ती आहे.

खरे तेज सत्यातून प्रकट होते

हे सारे मी का सांगत आहे ? एक गोष्ट आरंभीच मला सांगायची आहे म्हणून. तुम्ही साहित्याची उपासना करू इच्छिणारे. ती उपासना उत्कटपणे करा. एकही ओळ अशी लिहू नका की जी केवळ औपचारिक आहे. जे लिहावे त्यात प्राण ओतावा. गटे म्हणाला होता, ''अनुभवाशिवाय मी एक ओळ लिहिली नाही !'' मित्रांनो, जीवन असो वा कला असो, सत्याच्या अधिष्ठानाने लिहिण्यानेच त्यांना मोल चढत असते. तुम्ही स्वत:शी सत्यरूप राहा. लिहिण्यासाठी म्हणून लिहू नका. तुम्हाला आत भूक असेल, वेदना असेल, तरच लेखणी हाती घ्या. हृदय भरलेले असेल, डोके भरलेले असेल तर लिहायला घ्या. रिकाम्या आडातून काय मिळवाल ? दांभिक पसाऱ्याचा काय उपयोग ? मनुष्याचे भाग्य आहे की हातांनी तो जे करतो ते आधी त्याच्या हृदयात असते ! भारतीय जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत आज सत्याची, उत्कटतेची नि प्रामाणिकपणाची नितांत आवश्यकता आहे. अत:पर कसातरी संसार आपणास करायचा आहे. तेजस्वी संसार चालवायचा आहे. खरे तेज सत्यातूनच प्रकट होत असते.

ते साहित्यिक धन्य होत

देशबंधू दासांनी 'सागर-संगीत' नावाचे काव्य लिहिले. त्यांची आई आजारी होती. देशबंधू घरी नव्हते. ती माता म्हणाली : ''त्याचे सागर-संगीत आणून द्या. ते मी जवळ घेईन. त्यात माझा चित्तरंजनच आहे !'' तुम्ही जेव्हा साहित्य निर्मू लागाल,

तेव्हा तुमच्या पुस्तकांविषयी असे म्हणता येऊ दे. ज्यांना ज्यांना असे म्हणता येईल की, माझ्या पुस्तकात मी आहे, ते साहित्यिक धन्य होत. त्यांना माझा प्रणाम.

ज्ञानेश्वरे रचिला पाया

मराठी सारस्वत थोर आहे. त्याचा पायाच मुळी एका ज्ञानवैराग्यसंपन्न कुमाराने घातला. ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका लिहिली. एकदा पूज्य विनोबाजी म्हणाले, ''ज्या भाषेत ज्ञानेश्वरी आहे, ती माझी मातृभाषा आहे हे माझे परमभाग्य होय.'' विनोबाजींनी सर्व भारतीय भाषा अभ्यासिल्या आहेत. अरबी, इंग्रजी, फ्रेंच याही त्यांना येतात. परंतु ज्ञानेश्वरीतील अमृतासमान ओव्या आणि तुकोबांचे प्राणमय अभंग यांनी त्यांना जणू भरती येते. ज्ञानेश्वरीच्या पायावर मराठी सारस्वताचे मंदिर उभारलेले आहे. आणि त्या कुमाराची कोणती प्रतिज्ञा होती आणि या प्रतिज्ञेचा हेतू काय होता ?

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परे जडो । मैत्र जिवाचे ।।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांच्छील तो ते लाहो । प्राणिजात ।।

या ध्येयासाठी त्यांना ब्रह्मविद्येचा सुकाळ करायचा होता. ब्रह्मविद्येचा 'थोर विचार' असा मी अर्थ करतो. ब्रह्म म्हणजे मोठी वस्तू. क्षुद्र वस्तूंचे विचार त्यांना नको होते. मोठे विचार मांडून समाजातील विषमता, अन्याय, पाप यांचा अंधार त्यांना दूर करायचा होता. प्रत्येकाला कर्तव्याचा पंथ दिसावा म्हणून त्यांची खटपट होती. स्वधर्माप्रमाणे वागणे म्हणजे स्वत:तील गुणधर्मांचा विकास करून तद्द्वारा समाजाची सेवा करणे; परंतु विकास होण्यासाठी समाजात वाव हवा. तेथे समता हवी. स्वातंत्र्य हवे. तेथे मोठे विचार हवेत. बंधुभाव हवा आणि असे होईल तरच सर्वांना आवश्यक ते सारे मिळेल. ददात राहणार नाही. समाजातील जीवनात ब्रह्मविद्या असेल तर कोणी दरिद्री, दु:खी, शोषित राहणार नाही !

ज्ञानेश्वरांचे मार्गदर्शन

मित्रांनो, ज्ञानदेवांनी तुम्हाला दिव्य मार्गदर्शन केले आहे. समाजात ब्रह्मविद्येचा सुकाळ करून दु:ख- दैन्य दूर करा आणि संसार सुखी होतील असे करा. तर मग

तुम्ही या ध्येयाहून कमी प्रतीचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवणार का ? उपनिषदांत म्हटले आहे –

'यो वै भूमा तत्सुखम् । नाल्पे सुखमस्ति'

मोठ्या वस्तूत सुख आहे, क्षुद्र वस्तूत नाही. आज उपासना करून, अभ्यास करून, तपश्चर्या करून जे साहित्य उद्या तुम्ही निर्माल, ते मोठ्या गोष्टींना प्रकट करू दे. आजही ब्रह्मविद्येचा सुकाळ हवा आहे. मराठी वाङ्मयात उदात्त विचारांचा, उदार भावनांचा पाऊस पडायला हवा आहे. त्यात शास्त्रीय दृष्टीचा रंगही मिसळा. तुम्ही तुमच्यासमोर हे असे मोठे ध्येय ठेवा.

मुळाशी हात घाला

समाजाला सुखी करायचे आहे ना ? तुमची कला आनंदासाठी ना आहे ? तर मग माझे सांगणे असे की, समाजाच्या जीवनात आनंद राहावा म्हणून तुम्ही मुळाशी हात घाला. उपाशी माणसाला दोन बिस्किटांनी समाधान होणार नाही; त्याला नेहमी भरपूर भाकर मिळायला हवी. शेतात भरपूर पिकायला हवे असेल तर शेत नीट नांगरावे लागते. नुसती मेथी पेरायची असेल तर फार खटाटोप नको; परंतु नुसत्या मेथीच्या भाजीने पोट भरत नसते. मेथी–कोथिंबीर हवीच, परंतु तांदूळ, गहू, ज्वारी यांनी पुष्टी मिळते. ही धान्ये हवी असतील तर खोल नांगरणी हवी. गहू हवे असतील तर ज्याप्रमाणे नांगर खोल दवडावा लागतो त्याप्रमाणे समाजाला सुखी करायचे असेल तर खोल लेखणी दवडा. पीक नीट यावे म्हणून कुंदा, हरळी नांगरून काढावी लागते. त्याप्रमाणे समाजाच्या सुखाच्या आड येणाऱ्या सर्व गोष्टींचे उच्चाटन करण्यासाठी लेखणी उचलू, अशी प्रतिज्ञा करा.

लेखणी तमाम जनतेची प्रतिनिधी होऊ दे

समाजातील मूठभर सुखी लोकांचे अलस–लुलित संसार रंगवून लेखणीचे ललित कृतार्थ नका मानू. तुमची लेखणी तुमच्या जनतेची प्रतिनिधी होऊ दे. जनतेची बाजू घेऊन उठू दे. तुमच्या लेखणीच्या कर्तृत्वाला आज वाव आहे. मोठमोठे विचार सभोवती घोंघावत आहेत. आणि समोर दुःखी, कष्टी अपार जनता आहे. भग्न असा विराट संसार आहे. तुमच्या मनोबुद्धी सानुकंप असतील,

संवेदनाक्षम, संस्कारक्षम असतील, तर वातावरणातील हे अदृश्य वारे तुम्हाला कळतील. तुम्ही का केवळ दृश्याचे उपासक आहात ? दृश्याभोवती विचारांच्या नि भावनांच्या लाटा उसळत असतात. प्रत्येक वस्तूभोवती विचारांचे, भावनांचे वलय असते. ज्याप्रमाणे अणू विखंडून त्यातील अनेक शक्ती शास्त्रज्ञ मुक्त करतात, त्याप्रमाणे या संसाराभोवती जी विचार-वादळे घोंघावत असतात, त्यांची शक्ती पकडून ती घरोघर नेऊन पोहोचवणे आणि तिच्या जोरावर क्रांती घडवून आणणे हे कार्य साहित्यिकांचे आहे. लोकांची मनोरचना बदलणे हे थोर कार्य आहे. खरीखुरी सुधारणा व्हायला हवी असेल तर क्रांती हवी असते. अंतर्बाह्य क्रांती ! मानसिक आणि सामाजिक. ती क्रांती घडवून आणून कायमच्या सुखाकडे मानव नेणे हा तुमचा थोर वारसा आहे.

रूढींवर हल्ले चढवायला उभे राहा

नवसमाजनिर्मिती करायची आहे, दलदली हटवायच्या आहेत, विषारी तण जाळायचे आहे, अज्ञान दूर करायचे आहे. भ्रम हटवायचे आहेत, दगड फोडायचे आहेत. तुम्ही या कामांसाठी कंबरा बांधा. व्हॉल्टेअरने म्हटले आहे, ''रूढींविरुद्ध बंडाचे झेंडे हाती घेऊन उभे राहतील, ते ते मानवजातीचे उपकारकर्ते होत !'' म्हणून जनतेचे हृदय हलवून, त्यांच्या बुद्धीला धक्के देऊन क्रांती करायची आहे. महाराष्ट्रात साधुचरित व बुद्धिनिष्ठ आगरकरांनी असा तेजस्वी झेंडा उभारला होता. परंतु अजूनही सर्व प्रकारची गुलामगिरी दूर करू पाहणाऱ्या बंडखोरांची अत्यंत आवश्यकता आहे! आजही अजून सर्वत्र बुजबुजच आहे. अस्पृश्यांना अजूनही दूर ठेवीत आहोत. अजूनही कार्यक्रमांवर जोर देण्याऐवजी जातिभेदावर भर देत आहोत. हे भेदांचे भुंगे आजही समाज पोखरीत आहेत. आडनावांच्या, जातींच्या नि धर्मांच्या पलीकडे अजूनही आमची दृष्टी जात नाही. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, वाङ्मयीन सर्व प्रकारच्या रूढी असतात. या सर्व बुरसटलेल्या रूढींवर हल्ले चढवायला तुम्ही उभे राहा. सरंजामशाही नको; जमीनदारी नको; खोती नको; खाजगी नफेबाजी नको; पिळवणूक नको; कोणाची मिरासदारी नको; यासाठी लेखणी हातात घेऊन उभे राहा. तुमचे पराक्रमी ललित येथे दाखवा.

महात्माजी म्हणजे भारतीय युग

इतिहासात अनेक प्रवाह, अनेक चळवळी प्रथम अलग सुरू होतात. मग त्या एकात एक मिसळून एक महान प्रवाह होतो. कधी तो प्रवाह मग एखाद्या महान विभूतीत दिसू लागतो. अर्वाचीन भारतीय इतिहासात शिक्षण-सुधारणा, स्त्री-सुधारणा, सामाजिक सुधारणा, धार्मिक सुधारणा, राजकीय सुधारणा अशा अनेक चळवळींचे प्रवाह अलग अलग सुरू झाले; परंतु हे सारे प्रवाह महात्माजींच्या महान व्यक्तिमत्त्वात एकत्र झालेले आपणास दिसतात. महात्माजी म्हणजे भारतीय युग आणि या युगात राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक सर्वच प्रवाह मिसळले आहेत. हे महायुग आहे. एखादे धार्मिक युग असते, एखादे राजकीय; एखादे सांस्कृतिक; परंतु आजच्या भारतीय युगात ही सारी युगे एकदम जन्मली आहेत. एकात एक मिसळली आहेत.

युगाशी एकरूप व्हा

अशा या युगाशी तुम्हाला एकरूप व्हायचे आहे. जीवनाची पूर्णता अनंतात आहे. तुम्ही एकटेच खोलीत स्वत:च्या जीवनाचे धागेदोरे विणीत नका बसू. कृत्रिम काल्पनिक जाळी नका विणू. तुमचा आत्मा सभोवतीच्या विराट जनतेच्या आत्म्याला भेटवा. विशाल सहानुभूतीशिवाय थोर सारस्वत संभवणार नाही. तुमची आजची स्फूर्तीसुद्धा सामुदायिक होवो; सर्वांची स्फूर्ती तुमच्याद्वारा प्रकट होवो. तुमचा उद्धार म्हणजे जनतेचा उद्धार, तुमचे गान म्हणजे चाळीस कोटींचे वृंदगान !

ज्ञानाच्या क्षेत्रात सीमा नाहीत

कोणतीही कला सोपी नाही. तेथे साधना लागते. तपेच्या तपे द्यावी लागतात. कला म्हणजे पूर्णता. कला परिपूर्णतेची अपेक्षा करते. खूप वाचा. उत्तमोत्तम नमुने वाचा. प्राचीन वागीश्वरी वाचा. अर्वाचीन वाग्भट अभ्यासा. प्रतिभावान नाटककार आणि थोर कवी गोविंदाग्रज यांना मोरोपंतांच्या पाच हजार ओव्या पाठ येत होत्या ! मुक्तेश्वर म्हणतो, "एकेक अक्षराची भीक मागून मी हे लिहीत आहे." स्वभाषेतील नव्हे तर परभाषेतीलही वाङ्मय अभ्यासा. ज्ञानाच्या क्षेत्रात सीमा, सरहद्दी नाहीत. सारे जागतिक वाङ्मय तुमच्यासमोर आहे. वडाचे झाड दूरवर पाळेमुळे पसरून ओलावा घेते. महान साहित्यिक, जेथून मिळेल तेथून सारे काही घेतो. स्वत:च्या भावनांच्या मुशीत, आपल्या वैशिष्ट्यांचा नि व्यक्तिमत्त्वाचा जिवंत ठसा त्यावर मारीत

असतो. केवळ स्वयंभू असे जगात काही नाही. शेक्सपिअरने अनेक जुनी कथानके घेतली; परंतु त्याने कोळसे घेऊन त्यांचे हिरे केले ! कालिदासाने महाभारतातून शाकुंतल घेतले; परंतु नवीनच अभिनव वाग्विलास त्याने करून दाखवला. रवींद्रनाथांवर उपनिषदे, कबीर यांचा अपार परिणाम झाला आहे.

जीवनग्रंथांचा अभ्यास करा

थोर ग्रंथांचे अध्ययन करा; परंतु तेवढ्याने भागणार नाही. जीवनग्रंथांचा खोल अभ्यास करा. प्रत्येक प्राणी म्हणजे विश्वग्रंथाचे पान आहे. प्रत्येक जीवन म्हणजे महाकाव्य आहे. ती जीवने तपासा. मुंबईच्या चाळींतून जा. दहा हात लांबी-रुंदीच्या खोलीत सहा-सहा कुटुंबे कशी राहतात ते पाहा आणि साहित्यिक असाल तर असा आगीचा डोंब पेटवा की ज्या समाजरचनेत हे शक्य होते ती भस्म होईल. जा, शेतकऱ्यांची जीवने तपासा. खंडोगणती धान्य पिकवणारे देवाचे शेतकरी दुर्दैवी का ? त्यांच्या मुलांना दोन दोन दिवस काकडीवर, आठ आठ दिवस आंब्यांच्या कोयांवर तर काहींना चिंचोक्यांवर राहण्याची पाळी का ? साहित्यिक म्हणजे सहानुभूतीचा सागर ! ज्या मानाने तुमची सहानुभूती मोठी, त्या मानाने तुम्ही मोठे साहित्यिक. तुमच्या सहानुभूतीची लांबीरुंदी कोठवर पोहोचते ते पाहा.

सारस्वत-सागरात बुड्या मारा

म्हणून माझ्या मित्रांनो ! तुम्ही दरिद्रीनारायणांत मिसळा. त्यांचे संसार पाहा. तेथील प्रश्न अभ्यासा. तेथील दृश्ये पाहा. अन्याय, जुलूम, व्यसने, उपासमार, अज्ञान-सारे पाहा. आणि त्यांचे अमर ठसे उमटवून घेऊन त्यातून जिवंत साहित्य निर्माण करा. हे क्रांतीचे, प्रगतीचे युग आहे. व्यक्तिगत स्फूर्तीला सामुदायिक करून सर्वांच्या मनोबुद्धीभोवती असणारी बंधने तोडा. त्यांना ती दाखवा. तोडायला सांगा आणि स्वसामर्थ्याची जाणीव झालेले हे कोट्यवधी बंधू क्रांतीकडे, नवसमाजरचनेकडे जावेत, म्हणून ज्ञान-विज्ञानाचा संदेश भावनेच्या द्वारा तुम्ही पोहोचवा. तुम्हाला आजचे जीवन तपासायला मी सांगत आहे. त्यातील साऱ्या दुष्ट, भ्रष्ट गोष्टींवर हल्ले चढवायला सांगत आहे. तुम्ही आजकालचे व्यापक जीवन खोल जाऊन अभ्यासाच, केवळ पुस्तकांतूनच नव्हे तर प्रत्यक्ष हिंडून, फिरून, मिसळून. परंतु त्याच्याबरोबरच जुना

इतिहासही वाचा. महाराष्ट्र- भारतवर्ष यांचा इतिहास अभ्यासा. त्यातून तुम्हाला नवी दृष्टी मिळेल. भारताच्या दहा हजार वर्षांच्या इतिहासातील गती-नियम कळतील. तुमचा आत्मा आजच्या जीवनाशी मिसळा; त्याचप्रमाणे हजारो वर्षे क्रांत-उत्क्रांत होत आलेल्या भारतीय आत्म्याचीही भेट घ्या. पंडित जवाहरलालांनी 'भारताचा शोध' म्हणून महान ग्रंथ नगरच्या स्वातंत्र्यमंदिरात लिहिला. भारताच्या अखंड विकासमान आत्म्याची अनंत कालखंडातून हिंडून त्यांनी भेट घेतली. जुने इतिहास, परंपरा, दंतकथा, आख्यायिका - या सर्वांचा अभ्यास हवा. खूप खाद्य मिळते. एखाद्या गोष्टीतून एकदम महान अर्थ सापडतो. विनोबाजी म्हणाले, ''विराट पुरुषाला हजारो डोकी, हजारो हात असे वर्णन आहे; परंतु हजारो हृदये असे मात्र म्हटलेले नाही. हृदय एकच; तुम्ही कोट्यवधी भारतीय एका हृदयाचे व्हा !'' - केवढा थोर विचार या प्राचीन मंत्रातून त्यांना मिळाला! वेद, रामायण, महाभारत, उपनिषदे, शेकडो आख्यायिका, गोष्टी तुम्हाला माहीत नसतात. असे नका करू. या सारस्वत सागरात मधूनमधून बुड्या मारीत जा. कल्पनांचे तेथे अपार भांडार आहे.

सत्यांच्या प्रतीकांना तुच्छ मानू नका

हे सारे जुने काल्पनिक इतिहास, खोट्या दंतकथा कशाला असे म्हणू नका. एका अर्थाने आपणही सारे काल्पनिकच आहोत ! आपण क्षणभंगुर बुडबुडे, मृगजळे, आता आहोत दुसऱ्या क्षणी नाही. परंतु क्षुद्र असूनही आपणास महत्त्व नाही का ? क्षणभंगुर असून आपण चिरंजीव आहोत. का ? तर आपण लहान-मोठे सारे कशाची तरी प्रतीके असतो. आपले जीवन म्हणजे काही विचार, काही ध्येये यांची पूजा. आपल्या कृतीतूनच काहीतरी सत्य आपण प्रकटवीत असतो. आणि आख्यायिका, दंतकथा, परींच्या गोष्टी यातील ती काल्पनिक पात्रे, पशुपक्षी सारी सत्याची प्रतीके असल्यामुळे त्यांना तुच्छ नका मानू.

निसर्गावर प्रेम करा

भारताच्या भव्य इतिहासाचा अभ्यास करा. त्यातून सामर्थ्य प्राप्त होईल. आणि आजचा इतिहासही खोल दृष्टीने बघा. तिसरी गोष्ट म्हणजे निसर्गावर प्रेम करा. निसर्ग आपली माता आहे. शेक्सपिअर सृष्टीजवळ शिकला. माझ्या मनात कधी कधी

विचार येतो की, जन्मणाऱ्या मुलाचे पोषण व्हावे म्हणून विश्वशक्तीने आईच्या स्तनात दूध निर्माण केले. परंतु मुलाच्या मनोबुद्धीचे पोषण व्हावे म्हणून कोणती योजना ? शेवटी माझ्या ध्यानात आले की, 'समुद्रवसना, पर्वतस्तनमंडला' ही सृष्टिमाता मनोबुद्धीचे पोषण करणारी. बुक्स इन ब्रुक्स, सरमन्स इन स्टोन्स – निर्झरात पुस्तके नि पाषाणात प्रवचने असे शेक्सपियरने म्हटले. तो महाकवी तिच्याजवळ शिकला. परंतु आपण या मातेची उपेक्षा करतो. निसर्गावर प्रेम केल्याशिवाय तुमच्या साहित्यास भव्यता, व्यापकता येणार नाही. ताजेपणा, मधुरपणा येणार नाही. महाराष्ट्रातील, भारतातील जनस्थिती बघा. ही सभोवतीची सृष्टी बघा. मनुष्यांचे स्वभावही कळायला आसमंताची नैसर्गिक परिस्थिती बघावी लागते. या निसर्गातील सौंदर्यप्रतीती तुम्हाला येऊ दे.

आपण असे उचंबळतो का ?

मला एखाद्या वेळेस वाईट वाटते की, महाराष्ट्रातील निसर्गाचे वर्णन फारसे कोणी केले नाही. गोविंदाग्रजांनी 'अंजन कांचन करवंदीच्या देशाला' वंदन केले आहे. वासुदेवशास्त्र्यांनी 'आंबे, नारळी, पोफळी' असे दोन–चार श्लोक केले आहेत. ते शिकवत असता मी वर्गातून साश्रू नि सद्‌गदित होऊन उठून गेलो होतो ! कवी माधव यांचे कोकणातील सुंदर वर्णन, बालकवींनी केलेले सृष्टिवर्णन, पाचगणीच्या घाटातील दृश्यांवरची रेव्हरंड टिळकांची कविता, अशा थोड्या कविता आहेत; परंतु हे अपवाद. कोणत्या ऋतूत कोणती फुले फुलतात; कोणते पक्षी गातात; कोणती पिके होतात, हेसुद्धा आपणास नीट माहीत नसते ! शरद ऋतूत कमळे फुलतात, हे परंपरेनेच आम्हाला माहीत आहे. मी दापोलीच्या हायस्कूलमध्ये शिकत होतो. तेथील थोर मुख्याध्यापक एकदा म्हणाले, "कोकणात किती सौंदर्य! पावसाळ्यातील भव्य देखावे ! डोंगरावर उभे राहावे. दुरून समुद्र पाहावा. झाडांवरून पाणी टपटपत असावे. चिंचेच्या झाडांना कोवळी पालवी फुटावी. मी वेडा होतो." परंतु याचे वर्णन कोठे नाही. या सौंदर्याला काव्यात कोणी अमर केले नाही. इंग्लंडमध्ये सदैव धुके, ढग, परंतु तिकडचा कीट्स तेथील सौंदर्याने वेडा होतो. मला त्याची प्रतिभा असती तर ? कोकणचा अपार धो धो करणारा समुद्र ! परंतु वायरनप्रमाणे 'कर गर्जना कर हे सागरा!' असे म्हणून कोणी कवी उचंबळला नाही ! वाल्मिकी, कालिदास, भवभूती, रवींद्र हे

निसर्गाचे महान उपासक होते; परंतु आपणाला निसर्गाचे प्रेम नाही. नाद नाही, छंद नाही. वर्डस्वर्थ कवी लिलॅक फुले पाहून – ॲज इफ मेड ऑफ लाइट – प्रकाशाचीच जणू ही बनलेली, असे म्हणून नाचतो. आपण असे कधी उचंबळतो का ?

सृष्टीचे मित्र बना

मित्रांनो, सृष्टीचे सहृदय मित्र बना. तृणपर्णावरचे दवबिंदू पाहा. ते मोती बघा. आणि गवतातून कोळ्यांनी विणलेली जाळी ! सूर्यकिरणांनी रंगलेली. जणू सोनेरी मोत्यांच्या झालरी लावलेली पऱ्यांची ती हवेवर डोलणारी नाजूक मंदिरे ! बघा ती मौज. आणि पहाटेच्या प्रशांत वेळी झाडांवरून थेंब पडतात, जणू अश्रू... ते ऐका. ते निळे डोंगर बघा; खोल दऱ्या, नद्या, नाले, तळी, वृक्षवेली, फुले, पाखरे – सारे पाहा. एखादे साधे फूल, परंतु किती सुंदर असते ! टेनिसन म्हणाला : ''एक फूल जाणणे म्हणजे विश्व जाणणे !'' फुला-पाखरांच्या अंगावरची नक्षी बघा. फुलपाखरांच्या मागे धावा. कोकिळेला शोधीत फिरा. घुबडाचे घुत्कार ऐका. नाचणारे मोर बघा. गाई, बैल, मांजरे त्यांचे डोळे बघा... गंमत आहे.

आकाशातील काव्य पाहा

खालचे वरचे सारे विश्व पाहा. आकाशातील रात्रीचे काव्य पाहा. वेदांतील ऋषींनी माध्यान्हीच्या निळ्या निळ्या आकाशाचेही वर्णन केले आहे ! आम्ही पहाटेची पाहणार नाही, मग माध्यान्हीचा धगधगीतपणा नि त्यातील प्रखर सौंदर्य पाहणे दूरच राहिले ! तुम्हाला ताऱ्यांचे कधी आकर्षण वाटले आहे ? निळ्या आकाशाने कधी तुम्ही वेडे झाला आहात? काजव्यांची कवायत पाहिली आहे ? प्रकाशाची कवायत!

रवींद्रांच्या काव्यातील सुगंध आणि ओलावा

एखाद्या डोंगरावर बसावे; समोर क्षितिज असावे; आपल्या मनाला ही सारी सृष्टी विशाल पाळण्यात घालून नाचवत आहे, असे वाटते. या अनंत सृष्टीत मी वाढतो. अनंत होत आहे असे वाटते. अरबस्तानातील रात्रीच्या वेळच्या अनंत निःस्तब्ध आकाशानेच पैगंबरांच्या तोंडून कुराण वदवले. भारतीय सरितांनी, पर्जन्यधारांनी, वनांनी वेदोपनिषदांना जन्म दिला. रवींद्रनाथ निसर्गाजवळ शिकले. निसर्गातील गंध, रंग, प्रकाश, आनंद त्यांनी लुटला आणि गीतांजलीत 'प्रकाश,

प्रकाश' असे म्हणत एका गाण्यात जणू ते नाचत आहेत असे वाटते ! बालपणात त्यांनी वडिलांबरोबर हिमालयाचे अपार सौंदर्य नि उदात्त गांभीर्य प्राशन केले. पुढे मोठेपणात पद्मा नदीच्या विशाल प्रवाहात ते चार-चार महिने बोटीत बसून जीवन काढीत. वारे, लाटा, पक्षी, आकाश, अस्तोदय - सर्वांच्या संगतीत असत. त्यांच्या काव्यात हा सुगंध आणि ओलावा आहे.

तर अनंत वाणी ऐकू येईल

सृष्टीच्या अंतरंगात शिरा. तुम्हाला तिथे अनंत वाणी ऐकू येईल. एकदा रवींद्रनाथ सायंकाळी फिरायला बाहेर पडले, तो वादळ उठले. वृक्ष नाचू लागले. धुळीचा बुक्का-गुलाल उधळला जाऊ लागला. विराट नाच सुरू झाला. रवींद्रनाथ स्वत:ची रेशमी कफनी विसरून धुळीत बसले. त्यांचे हृदयही नाचू लागले. पुढे वादळ शांत झाले. रवींद्रांनी डोळे उघडले. लगेच एक अमर गीत लिहून सायंप्रार्थनेत त्यांनी म्हटले.

थोरांचा संदेश

सृष्टीचे हे महान गान तुम्हाला एकदम ऐकू येणार नाही. सृष्टीशी परिचय वाढवा. तुम्हाला तिची अनंत भाषा, अनंत छंद मग सारे कळू लागेल. जरा पहाटे उठत जा. बाहेर पडा. वारा अंगाला लागू दे. तृणपर्णे पाहा. तांबडे कसे काय फुटते, प्रकाश कसा येतो, पाहा. जीवनास मंगल असे प्रात:स्नान होईल. अमेरिकन ग्रंथकार, तो निसर्गप्रेमी थोरो म्हणतो, ''दोन तास शेतात काम करा. तुमची सारी पोटदुखी जाईल. तुमच्या लिहिण्यात तेज, तजेला, नवजीवन येईल.'' आज सृष्टीपासून आपली फारकत झाली आहे. तुम्ही अजून नवीन आहात. ही चूक करू नका. जिज्ञासा, कौतुकवृत्ती यांत आत्मा आहे. प्रत्येक वस्तूजवळ जाणे, तिला बघणे, तिच्याजवळ बोलणे, यातील गंमत तर पाहा. तुम्ही झपाट्याने वाढत जाल.

अनुभवाने समृद्ध व्हा

अशा रीतीने अनेक अनुभव घ्यावे. जीवन अनुभवाने समृद्ध करावे. सृष्टीच्या सान्निध्यातील अनुभव, मानवी जीवनातील अनुभव. शेतकरी व्हा, कामगार व्हा. ते

जीवन बघा आणि वादळात फिरायला जा. उंच डोंगर चढा, दऱ्यांत उतरा, सागरात डुंबा. एका चिनी चित्रकाराची गोष्ट आहे– वादळात, मुसळधार पावसात समुद्र कसा दिसतो ते त्याला पाहायचे होते. तो समुद्रात कित्येक तास उभा होता. सभोवतीचे वारे, लाटांचे तुषार नि फेस यांची अंगावर वृष्टी होत होती. वरून मुसळधार पाऊस ! आणि तो चित्रकार लाटांत सारखा उभा होता. सर्वांगाचे डोळे नि कान करून पाहात होता, ऐकत होता.

सर्वांशी दोस्ती हवी

उत्कटतेशिवाय काही नाही. साहस, मोठमोठ्या गोष्टी, विशाल ध्येये, अपार अभ्यास, भरपूर अनुभव, असे करून जीवन सर्व बाजूंनी समृद्ध नि उदात्त करा. तेजस्वी, निर्भय आणि सहानुभूतीचे असे बना. तुम्ही जीवन निर्भय नि समृद्ध केलेत म्हणजे मग तुम्हाला कशाची उणीव भासणार नाही. कल्पना, उपमा, दृष्टांत सारे सारे भराभरा सुचेल. तो कवी मोठा, ज्याला एक गोष्ट सांगताना तत्सदृश्य हजारो स्फुरतात ! संसार क्षणिक असे म्हणायचे असेल तर बुडबुड्याप्रमाणे, मृगजळाप्रमाणे, काचेप्रमाणे, स्वप्नाप्रमाणे, छायेप्रमाणे असे भराभर त्याला जे भंगूर ते ते आठवते. ज्ञानेश्वरांसमोर अशा वेळेस सारा निसर्ग, सारी सृष्टी उभी राही. कारण सारा महाराष्ट्र त्यांनी पालथा घातला होता. बृहन्महाराष्ट्राचे दर्शन घेतले होते. बृहन्महाराष्ट्रातील शब्द ज्ञानेश्वरीत आहेत. शेक्सपिअरला, व्हिक्टर ड्यूगोला शब्दांचा तुटवडा भासत नसे. सारे धंदेवाले त्यांना माहीत. सर्वांशी दोस्ती.

बहिष्कार नको

आणि सर्व ठिकाणांहून शब्द घ्या. जुने, नवे घ्या. बहिष्कार घालीत नका बसू. क्षुद्र दरिद्री अहंकार नको. मराठी भाषेचा ठसा प्रत्येक शब्दावर आपण मारीतच असतो. इंग्रजीतील बोट (नाव) शब्द घेऊ. तो स्त्री-लिंगी करू. फार काथ्याकूट करीत नका बसू. अस्मान, आकाश दोन्ही शब्द राहू देत. जमीन म्हटले की अस्मान आठवते. राहू दे अस्मान शब्द. पचवा सारे नि पुष्ट व्हा. शेकडो उर्दू शब्दही संस्कृत धातूंपासून आलेले आहेत. मराठीची स्वत:ची अनंत शब्दसंपत्ती आहे. तिच्यात आले इतर शब्द म्हणून घाबरत नका बसू. साऱ्यांचा त्या त्या विवक्षित ठिकाणी उपयोग शोभतो.

आपण भितुरडे झालो आहोत. पचनशक्तीच जणू मेली! इतरांवर अजिबात बहिष्कार नको. आज जग जवळ येत आहे. इतके द्वेषमत्सर करून कोठे जाणार ?

हे सारे करा

तुम्हाला मी तीन-चार गोष्टी सांगितल्या. सभोवतीच्या मानवी जीवनाशी एकरूप व्हा. प्राचीन इतिहास अभ्यासा; त्याप्रमाणे अर्वाचीनही, आजचाही. तिसरी गोष्ट निसर्गाशी एकरूप व्हा आणि चौथी गोष्ट थोर थोर देशीविदेशी, प्राचीन-अर्वाचीन ग्रंथकारांचा अभ्यास करा. आजच्याही थोर साहित्यिकांजवळ जात जा.

मी स्वत: दूर राहणारा आहे. संकोची आहे. मी कधी कुणाकडे गेलो नाही. परंतु तुम्ही सर्वांना लुटा. जिकडून जे घेता येईल; ज्याच्यापासून जे शिकता येईल, ते आदराने घ्या आणि वाढा.

अशी तयारी करीत असतानाच लिहिण्याची सवय ठेवा. मनात भावना, विचार जमले आहेत असे वाटले की लिहा. फुलायच्या आधी कळी फुगीर दिसते. आत गंध नि रंग इतके भरतात की शेवटी पाकळ्यांना कळा लागून ते सारे विकसन प्रकट होते ! तसे तुमचे होवो. उत्तरोत्तर अधिकाधिक सामर्थ्य येईल, आत्मविश्वास येईल.

द्विविध स्वरूप

मी तुम्हाला आता प्रत्यक्ष कार्याची कल्पना देणार आहे. तुम्ही सारे कुमार साहित्यिक आहात. कुमार साहित्याचा द्विविध अर्थ होईल. कुमारांसाठी लिहिलेले साहित्य आणि उद्या यांतून सुंदर साहित्य निर्माण व्हावे म्हणून सामुदायिक प्रयत्न करणारे तुमचे मंडळ. तुमचे असे हे द्विविध स्वरूप आहे.

शास्त्रीय ज्ञान यायला हवे

कुमारांसाठी मराठीत फारसे साहित्य नाही. जीवनातील अनेक गोष्टींना स्पर्श करणारे बालसाहित्य, विश्वाची कल्पना देणारे साहित्य मराठीत नाही. मुलांसाठी केवळ गोष्टी नकोत. त्यांचा उपयोग नाही असे नाही; त्यातून त्यांना आनंद मिळतो. त्यांच्या भावनांना सुंदर वळण लागते. त्यांची कल्पनाशक्ती जागी होते. असा पुष्कळ उपयोग आहे. परंतु विसाव्या शतकातील जीवनाचे एवढ्याने संवर्धन होणार नाही.

मित्रांनो, तुम्हाला तुमच्या लहानपणात या अडचणी भासल्या असतील. तुमची लहान भावंडे 'पुस्तके घ्या' म्हणून पाठीस लागतात. आपणास अडचण पडते. आहेत कोठे पुस्तके ? कुमारांसाठी अनेक विषयांवरची हजार तरी पुस्तके तयार करायला हवीत. शिक्षक, प्राध्यापक, लेखक सर्वांचे सहकार्य हवे. सरकारी मदत हवी. जर्मनीत १९१४ पूर्वी मुलांसाठी एकेका शास्त्रीय विषयावर पाऊणशे पाऊणशे छोटी पुस्तके केली गेली होती. वनस्पतींवरची, ताऱ्यांवरची इंजिनांवरची मोठमोठी चित्रे. त्यात नाना भाग रंगीत. मुलांची जिज्ञासा वाढवायला हवी. 'आनंद'चे आद्य संपादक वासुदेव गोविंद आपटे यांनी 'का व कसे ?' अशा शास्त्रीय माला निर्मिल्या होत्या. हे शास्त्रीय ज्ञान द्यायला हवे. तसाच इतिहास.

जागतिक इतिहास शिकवावा

मुलांना एकदम जागतिक इतिहास शिकवावा. जगाचे नागरिक त्यांना बनवावे, समुद्राची लाट ज्याप्रमाणे दुरून वाढत येते, त्याप्रमाणे जागतिक इतिहासातील विचारलाटा दोनदोनशे वर्षे वाढत येतात. जागतिक जीवनात दोनशे वर्षे म्हणजे दोन दिवसच. तो पाहा अतिप्राचीन काळ. तेथे इजिप्त, बाबिलोन, मोहेंजोदडो या सर्व प्रदेशांत एक संस्कृतीची महान लाट आलेली दिसते. नंतर ती पाहा २५०० वर्षांपूर्वीची दुसरी वैचारिक लाट ! तिकडे ग्रीस देशात सॉक्रेटिस, प्लेटो, येथे भगवान बुद्ध नि महावीर, चीनमध्ये लाओ त्से नि कन्फ्यूशस. दाखवा मुलांना त्या लाटांचे रंग, उंची नि भव्यता. ती पाहा पंधराव्या-सोळाव्या शतकातील धर्मसुधारणेची लाट. युरोपात ल्यूथर वगैरे. हिंदुस्थानातील साधू-संत. त्याच्या पुढची स्वातंत्र्याची लाट पाहा. जगात सर्वत्र स्वातंत्र्याचे लढे. अशा रीतीने मुलांना जागतिक लाटांवर नाचवावे. मग पुढे वाढत्या वयाबरोबर अधिक रंग त्यात भरावे. हे इतिहास, त्याप्रमाणेच सर्व प्रकारच्या थोरांची चरित्रे धगधगीत नि जळजळीत, ठसठशीत नि प्रासादिक.

प्रचंड कार्य

मुलांच्या पुस्तकांत नुसती बोधभाषा नसावी. मुलांची जीवने छंदोदय असतात. पाऊस पडत आहे, हे वाक्य त्यांना आवडणार नाही. पाऊस रिमझिम पडत होता, वारा भिरभिर वाहत होता, तारे चमचम करीत होते, ओढा खळखळ वाहत होता -

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा
दाखल
किंमत पान

असे त्यांना आवडते. मुलांच्या जीवनातील संगीत कळल्याशिवाय मुलांच्या हृदयाची पकड घेणारे वाङ्मय लिहिता येणार नाही. त्यांना ताऱ्यांची, वाऱ्यांची, वनस्पतींची, रसायनशास्त्राची, विद्युतशास्त्राची - सर्व सृष्टीची माहिती द्या. ती क्लिष्ट नको. शास्त्रीय असून सोपी नि गुदगुल्या करणारी अशी ही पुस्तके हवीत. ही केवळ क्रमिक पुस्तके नसावीत. आबाल स्त्री–पुरुषांना खेड्यापाड्यांतून समजतील अशी ही हवीत. हे प्रचंड कार्य आहे. आजपासून ठरवा. मी हे लिहीन, तू हे लिही. वीस वर्षांनी मराठीत एक हजार पुस्तके, विविध विषयांवरची सोपी, सुटसुटीत अशी निर्माण करा. महाराष्ट्राचे तुम्ही पांग फेडाल.

ग्रिम बंधूंचे कार्य

महाराष्ट्रभर हिंडून सारे परंपरागत वाङ्मय गोळा करा. मी एका खेडेगावात काही दिवस राहात होतो. तेथील वृद्ध बाप्पाजी म्हणाले, 'आज मी गोष्ट सांगतो.' त्यांनी सुरू केली. दोन–तीन दिवस ती गोष्ट चालली होती. आपल्याकडे पूर्वी छापखाने नव्हते. इंग्रजीत 'वेल रेड्' – पुष्कळ वाचलेला – असा शब्द आहे. आपल्याकडे 'बहुश्रुत' असा शब्द आहे. परंपरागत तोंडातोंडी वाङ्मय येई. लोक ऐकत. उखाणे, ओव्या, गाणी, पोवाडे, गोष्टी सारे तोंडी असे. वाङ्मयाशिवाय समाज जगू शकत नाही. ते साहित्य आज नष्ट होत आहे. तुम्ही ते सारे गोळा करा. जावे एखाद्या गावात, दवंडी द्यावी. 'जो गोष्ट सांगेल, त्याला चार आणे, आठ आणे देऊ.' अशा रीतीने सर्व प्रकारच्या गोष्टी, आख्यायिका, दंतकथा गोळा करा. जर्मनीतील ग्रिम बंधूंनी बारा वर्षे हिंडून अशा गोष्टी गोळा केल्या. त्या गोष्टी जगातील मुलांना आनंदवीत आहेत. आपल्या महाराष्ट्रात ग्रिम बंधू केव्हा निर्माण होणार ?

एक खानदेशी कथा

तुम्हाला एक खानदेशी कथा सांगू ?

एका गावातील बाईला एक मुलगा होता. पुढे बऱ्याच वर्षांनी तिला दुसरे मूल झाले. परंतु ते मूल म्हणजे साप होता ! त्याला नाग्या म्हणत. नाग्या घरात हिंडे- फिरे. मोठ्या भावावर त्याचे अपार प्रेम. भावाबरोबर शेतावर जाई. वेटोळे करून बसे. एकदा मोठ्या भावाला परगावी लांब जरा जायचे होते. तो नाग्याला म्हणाला, "नाग्या,

मी लवकर येईन. दूध पीत जा. उपाशी राहू नको. आठा दिवशी परत येईन.'' भाऊ गेला. नाग्या दिवस मोजीत होता. आठ दिवस झाले. भाऊ परत आला नाही ! नाग्या जेवेना, दूध पिईना.

आई म्हणाली, ''नाग्या, असं किती दिवस करणार ! जा, नाहीतर आण भावाला शोधून.''

नाग्या खरेच बाहेर पडला. रस्त्याने बाजूने चालला. रात्र झाली. नाग्या जात होता. भावाच्या चिंतनात मग्न होता. तिकडून एक बैलगाडी येत होती. नाग्याला भान नव्हते. नाग्या चिरडला गेला ! त्या गाडीत तो मोठा भाऊ होता. गाडी घरी आली. भाऊ घरात गेला; नाग्या दिसला नाही. भावाने विचारले, ''आई, नाग्या कोठे आहे?'' ''नाही रे, तुलाच शोधायला गेला. घरी खाईना, पिईना, झोपला वाटतं ?''

भाऊ नाग्याला शोधीत निघाला. तो वाटेत नाग्या चिरडलेला दिसला ! भाऊ रडला. पुढे तेथे त्याने नागाची एक मूर्ती करून बाजूला बसवली. रोज तेथे दुधाचा नैवेद्य आणून तो दाखवी. ती दगडी मूर्ती अजूनही डोंगरी या गावाजवळ आहे. हिंदुस्थानातील नागही माणसांवर प्रेम करणारे होते. तेथे भाऊ भाऊ नाही का करणार? प्रभूला माहीत !

अशा माणिक- मोत्यांसारख्या लोककथा मिळतील.

आपली ओळख करून घ्या

दोन-चार लोककथा छापून कृतार्थतेचे नगारे नका वाजवू. सोळा वर्षांच्या ज्ञानदेवांनी १० हजार अमृतासमान ओव्या लिहिल्या. नाथांनी किती लिहिले ! तुकारामांचे पाच हजार अभंग, ५० हजार ओळी, दासोपंतांनी किती लिहिले, त्याला अंत ना पार. मोरोपंतांची पाऊण लाख कविता. कोठे हे अतिभारती लेखक, कोठे आपला मरतुकडा वाग्विलास! थोडेसे लिहितो न् वाचतो काय ! काय ते पदोपदी प्रकाशन समारंभ नि उदोउदो ! युगप्रवर्तक ग्रंथ असेल तर प्रकाशन समारंभाला अर्थ. लेखकाला आपले लिहिणे आवडते, 'आपआपके तानमे चिडियाँ भी मस्तान हैं ।' परंतु उठल्याबसल्या प्रकाशन समारंभांनी सारे गांभीर्य जाते. तुमच्यासमोर ते ज्ञान-वैराग्याचे धगधगीत सूर्य-राजवाडे आहेत. गावोगाव हिंडून त्यांनी पत्रे गोळा केली. त्यांनी महान् कार्य केले. तुम्ही गोष्टी, गाणी, ओव्या दंतकथा सारे गोळा करा.

बृहन्महाराष्ट्रात जवळजवळ दोनशे तालुके, एकेका तालुक्यात चार चार कुमार सुट्टीत हिंडोत. वर्ष–दोन वर्षांत करा सारे गोळा, नि कोणाकडून नीट संपादन करा. ते अमर कार्य होईल.

तसेच महाराष्ट्रातील प्रत्येक गावची हकिकत गोळा केली तर साडेतेरा चौदा हजार गावांचा ज्ञानकोश होईल ! इंग्रजांनी जिल्ह्याजिल्ह्यांची गॅझेटे लिहिली. तुम्हा आम्हाला हे सारे करायचे आहे. आपली आपल्याला ओळख नाही.

अशी निष्ठा हवी

मुलांनी आपल्या आयुष्यातील मार्मिक आठवणी, प्रसंग लिहून काढावेत. त्यांच्या निवडीचे सुंदर पुस्तक होईल. मुले कधी कधी मार्मिक बोलतात. श्री. सोपानदेव चौधरी म्हणाले, 'माझा लहान मुलगा एकदा म्हणाला, 'गारा म्हणजे पावसाचे बी !' किती सहृदय बालकल्पना ! तुम्ही कानडोळे उघडे ठेवा. सर्वत्र ज्ञान आहे, काव्य नि वाङ्मय आहे. मित्रांनो, स्वतंत्र प्रतिभेचे नि प्रज्ञेचे होऊन महनीय निर्मिती करू लागेपर्यंत सामुदायिक सहकार्याने अशी कितीतरी कामे तुम्हाला करता येतील. इच्छा हवी. उत्कटता हवी. तळमळ हवी. माझ्या मराठी भाषेचा मला फकीर होऊ दे, ही निष्ठा हवी.

हे विसरू नका

जुने वाङ्मय गोळा करा. सुंदर अनुवाद करून नवीन निर्मिती करा. साहित्याचे तुम्ही थोर उपासक, आणि साहित्याच्या द्वारा जीवनाचे उपासक व्हा. कोणत्या तरी विषयाचे सम्यक् ज्ञान, इतर अनेक विषयांची चालचलाऊ माहिती असलेले असे व्हा. आजच्या जीवनात वावरायचे आहे, बोलायचे आहे, लिहायचे आहे. विसरू नका.

साहित्याचे अनंत विषय

तुमच्या सभोवती प्रक्षुब्ध वातावरण आहे. अपार वेदनांतून, बलिदानातून, दिव्यातून राष्ट्र नुकतेच गेले. पुन्हा ही कसोटी घेणार का ? मित्रांनो, तेजस्वी कुमारांनो, ज्या राष्ट्रात जन्मलात, वाढलात, त्या राष्ट्राच्या जीवनापासून दूर नका राहू. दुर्दैव की महाराष्ट्रातील लेखक राष्ट्रीय आंदोलनाशी तितके एकरूप नसतात आणि ज्याच्याशी

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) ... वाचनालय, सा...

आपण एकरूप होत नाही, ते रंगवता तरी कसे येणार ? राष्ट्राच्या इतिहासात ४२ च्या आंदोलनात किती अमर प्रसंग आहेत ! पूज्य विनोबा वर्ध्याच्या ९ ऑगस्टच्या मागील वर्षीच्या सभेत म्हणाले, ''कवींना नि कादंबरीकारांना कित्येक वर्षे पुरेल इतका मालमसाला ४२ च्यां 'चले जाव' लढ्याने दिला आहे.'' महाराष्ट्रातले किती प्रसंग! करुण नि गंभीर ! तो कोवळा शिरीषकुमार, तो भगवान भुसारी, ते वीर-शिरोमणी भाई कोतवाल, ते वसंत दाते नि कमलाकर दांडेकर, ते नऊ गोळ्या खाऊन मरणारे परशराम पहिलवान, तो सातारचा आयुर्वेदविद्यार्थी पेंढारकर - रानात अज्ञातवासात टायफॉईडने देवाघरी गेला ! रत्नागिरी जिल्ह्यातील सब-इन्स्पेक्टरच्या हातातील पिस्तुल धरणारी पुत्रवत्सल वृद्ध माता ! वसंत पाटील वगैरेंचे सावलीच्या तुरुंगातून ते रोमांचकारी निसटून जाणे ! तो सिंधमधील हेमू ! तो फ़ाशी गेलेला नागपूरचा विष्णू ! पाटण्याचा युसुफ ! आणि चिमूर ! आणि आगाखान राजवाड्यातील अनंत अर्थ मुकेपणाने सांगणाऱ्या त्या दोन समाधी ! महात्माजींचा तेथील उपवास; सरकारने त्यासाठी जमवून ठेवलेले चंदन, आणि महात्माजी गेले तर तत्काळ लाखो गुप्त पत्रके काढून हिंदुस्थानला सांगता आले पाहिजे म्हणून डोळ्यांतून अश्रू ढाळीत जयप्रकाशजींनी लिहून ठेवलेले ते बुलेटिन ! मित्रांनो, सारा रक्ताचा आणि अश्रूंचा हा इतिहास तुमच्यासमोर आहे. एखादा ईश्वरी देणगीचा श्री. शंकरराव निकमांसारखा थोर शाहीर, एखादा उदयोन्मुख प्रतिभाशाली वसंत बापट या भावनांना वाचा देत आहेत; परंतु तुमचे सर्वांचे काय ? उसळतात का सर्वांच्या भावना ? पेटते काय हृदय ? ते भीषण दुष्काळ आणि नौखाली हत्याकांड आणि आगीत अमृतकुंभ घेऊन तेथे गेलेले राष्ट्राचे प्राण महात्माजी ! आणि ती आझाद सेना ! ते नेताजी ! ती त्यांची वाणी, तो त्याग, ते कष्ट, ते ध्येयसमर्पण! तो 'चलो दिल्ली', 'जयहिंद' नाद ! माझे एक मित्र श्री. सीतारामभाऊ चौधरी नुकतेच हिमालयातून कैलास, मानस-सरोवर सारे पाहून आले. ते म्हणाले, 'कैलासावर जयहिंद शब्द कोरलेला दिसला ! जणू भारताचे रक्षण करणारा शिवशंकरच डमरू वाजवून जयहिंद गर्जत आहे !'

भव्यता सदैव वंदनीय

मित्रांनो, पृथ्वी-मोलाचे प्रसंग मढ्यांना उठवणारे, पाषाणांना पाझर फोडणारे, पर्वतांना वाचा देणारे, आकाशाला गहिवरणारे ! विश्वाला हादरवणारे प्रसंग ! परंतु

कोण बघतो ! तंत्रीला बोटाचा स्पर्श होताच तिच्या तारांत कंप उत्पन्न होऊन तिचे संगीत दूरवर जाते. ती लहानशी तंत्री विश्वाच्या हृदयाला भेटते. तुमच्या हृदयतंत्रीच्या हजारो तारांना या भावनांचा स्पर्श होतो का ? जेव्हा कलावानाच्या आत्म्यावर स्पंदने होतात, आघात होतात, तेव्हा त्या स्पंदनांतून जे निर्माण होते, ते जगाचे होते, ते व्यक्तीचे राहात नाही. ते उद्‌गार महान होतात. त्यांना अमरता येते. हेच सौंदर्य. ही एकच गोष्ट दिक्कालातीत आहे. त्या त्या वेळेची ध्येये बदलतात; परंतु त्या त्या वेळेच्या ध्येयासाठी जे त्याग, बलिदाने, वनवास भोगावे लागतात, त्यातील भव्यता ही सदैव वंदनीय असते. म्हणून रामायण-महाभारत हृदयांवर आजही सत्ता गाजवत आहे.

ते पारतंत्र्यही धन्य

परंतु लक्षात ठेवा की, रामायण, महाभारत एकदाच लिहिले जात नाही. रचले जात नाही. ते नेहमी रचले जात असते. राष्ट्र स्वतंत्र असो वा परतंत्र. राष्ट्राचे चारित्र्य सतत घडत राहिलेच पाहिजे. पारतंत्र्यातही पृथ्वीमोलाची माणसे गेल्या शंभर पाऊणशे वर्षांत आम्ही जितकी दिली, तितकी स्वतंत्र देशांनीही दिली नसतील. ज्या पारतंत्र्यात इतकी नवरत्ने निर्माण झाली त्या पारतंत्र्यालाही प्रणाम करावासा वाटतो.

भविष्यकाल तुमचा आहे

कुमारांनो, उद्याचा भविष्यकाल तुमचा आहे, उद्याची ध्येये तुमच्याभोवती प्रदक्षिणा घालीत आहेत. सर्व प्रकारची संकुचितता, जातीयता-प्रांतीयता झडझडून फेकून उभे राहा.

घालून अकलेचा पवाड । व्हावे ब्रह्मांडाहुनी जाड !
तेथे कैचे आणिले द्वाड । करंटेपणा ।।

असे श्री समर्थ म्हणाले, वेदांमध्ये सरस्वती-वाणीदेवता म्हणते:

अहं राष्ट्री संगमनी जनानाम् ।

'मी वाणी राष्ट्रासाठी आहे. सकल लोकांचे संगमन- संगम एकत्र स्नेहसंमेलन करू पाहणारी मी आहे' हे ऋषींचे ध्येय तुमच्याही वाणीचे असो. ज्ञानेश्वर म्हणाले :

भूतां परस्परे जडो । मैत्र जिवाचे ।

माझ्या लिहिण्याने स्नेह वाढो. खरी मैत्री उत्पन्न होवो. गड्यांनो, द्वेष वाढेल असे लिहू नका. स्वाभिमान या निराळ्या गोष्टी, आणि सूड, द्वेष या निराळ्या गोष्टी. गटे म्हणाला, ''मी द्वेषाची गाणी गाणार नाही.''

वाणी ही महान वस्तू

आज सारे जग जवळ येत आहे. सारे जग जणू तिमजली घर होत आहे. कोठेही सूडबुद्धीने आपण धक्का मारला तरी या तुमच्या घरावरच त्याचे आघात ! तुमच्या बोटीलाच सारी भोके. एकाच बोटीत वसलेले, - कोणी या टोकाला, कोणी त्या टोकाला, एवढाच फरक. हे सांगण्याबद्दल माझ्यावर टीका होईल. होवो; तरीही मला सांगितलेच पाहिजे की, सावधगिरीने भावना भडकल्या तरी विवेकाचा ब्रेक लावून तुम्ही बोला नि लिहा. वाणी ही महान वस्तू आहे.

'तुम्ही भारत-भाग्य विधाते'

तुम्हाला तरी उज्ज्वल, मंगल भविष्य दिसो. भारतात सारे गुण्यागोविंदाने नांदत आहेत, द्वेष शमले आहेत, परस्परांची संस्कृती अभ्यासित आहेत, अनेक भाषा शिकत आहेत, विकास करून घेत आहेत, ज्ञानविज्ञान वाढत आहे, कला फुलत आहेत, सर्व जनता त्यांच्या संवर्धनात सामील होत आहे - व्यक्तिस्वातंत्र्याचीही मर्यादित प्रतिष्ठा ठेवणारा समाजवाद आला आहे, वर्ग नष्ट झाले आहेत, स्पृश्यास्पृश्ये इतिहासजमा झाली आहेत. गावे गजबजली आहेत, मोठे उद्योगधंदे राष्ट्रीय होत आहेत, प्रगतीसाठी राष्ट्र आवश्यक गरजा भागवून अनंत हात पसरून पुढे जात आहे, अज्ञान, रूढी, रोग नष्ट होत आहेत, प्रयोग चालले आहेत, हिमालयावर युवक चढत आहेत, सागराच्या तळाशी ज्ञानासाठी जात आहेत, ज्ञानासाठी नचिकेताप्रमाणे मृत्यूशी स्नेह करीत आहेत, असा हा भारत-शास्त्रप्रेमी नि ध्येयवादी तुमच्या डोळ्यांसमोर उभा राहू दे. तुमची स्वप्ने, तुमच्या आशा-आकांक्षा यांतून नवा भारत बनवायचा आहे. तुम्हीच भारत भाग्यविधाते. तुमचा जय हो !

शब्द म्हणजे पेरणी

आजपर्यंत जगाला वाङ्मयानेच वाढवले, वळण दिले, आनंद दिला. माणुसकी दिली. वाङ्मयानेच सहृदयता, उदारता, बंधुता, पुरुषार्थ, पावित्र्य, प्रेम, न्याय ही

दिली आहेत. भारतीयांची मनोरचना पाहा. विचार, आचार पाहा. कोणी त्यांना रंगरूप दिले ? रामायणाने, महाभारताने, कबीराच्या दोह्यांनी, तुलसी-रामायणाने, गोपीचंदाच्या गीतांनी, मीराबाईच्या मधुर भजनांनी, ज्ञानेशांच्या ओवीने, तुकोबांच्या अभंगांनी, वामनी श्लोकांनी, मोरोपंती आर्यांनी, रामदासांच्या वाणीने, शाहिरांच्या रसवंतीने, बायकांच्या कहाण्यांनी अशा सर्व वाङ्मयाने भारतीय जीवनाला रंग दिला आहे. प्राचीनांनी त्यांच्या कालानुसार ध्येये दिली, विचार दिले. आजच्या युगधर्माला अनुरूप अशी गाणी, गोष्टी, विचार तुम्ही द्या. तुमची जबाबदारी मोठी आहे. तुम्ही जी गीते लिहाल, ज्या गोष्टी रचाल, जी नाटके लिहाल, निबंध लिहाल, त्यातून जनतेच्या मनोबुद्धीला वळण मिळेल. लिहिलेला वा बोललेला प्रत्येक शब्द म्हणजे पेरणी आहे. वेडेवाकडे लिहू नका. तुमचा होईल खेळ, राष्ट्राचा जाईल प्राण. म्हणून सादीने म्हटले आहे, 'पांढऱ्यावर काळे करण्यापूर्वी शंभरदा विचार करा.' अमृत नसेल देता येत, दूध द्या. तेही न जमले तर निर्मळ जीवन द्या. परंतु दारू नको. जीवनात विनोद, हास्य यांना महत्त्वाचे स्थान आहे; परंतु साऱ्या जीवनाचे हसे नका करू. इंदूबिंदूच्या कुरूपतेतून निर्माण होणारा विनोद नको. खेडवळांची भाषा नाटकात वापरून त्यांच्या भाषेची थट्टा करणारा विनोद नको.

माझे साहित्य

मी तुम्हाला काय सांगू, किती सांगू ? उपदेश करायला मी उभा नाही, तुमचा प्रेमळ भाऊ म्हणून मी बोलत आहे. मन मोकळे करून बोलत आहे. महाराष्ट्राचा कायापालट करा. लोकांना वाङ्मय द्या. ते वाचण्यासाठी त्यांना साक्षर करा. क्रांती करा. मराठी वाङ्मय पहिल्या प्रतीचे करण्याची प्रतिज्ञा करा. मी साधे सरळ लिहिले. त्यात कला नाही. पाल्हाळ असेल परंतु मी अपाय करणारे सहसा लिहिले नाही. महाराष्ट्रातील हजारो मुले-बाळे, स्त्रिया, शेतकरी, कामकरी त्याने आनंदले आहेत. सातारा जिल्ह्यातील भूमिगत कार्यकर्ते अज्ञातवासात माझी पुस्तके वाचीत. ते रडके झाले नाहीत. मी नवविचार, उदार भावना दिल्या आहेत. शनिमाहात्म्याचे धर्म मी दिले नाहीत. टीका करणारे टीका करोत, माझे लिहिणे पै किमतीचे ठरावेत. परंतु त्या पै किमतीच्या लिखाणाचाही खूप उपयोग होऊन राहिला आहे. भूक लागली असता हिरेही फेकावे लागतात आणि पै किमतीचे डाळे-मुरमुरेही पृथ्वीमोलाचे वाटतात !

जनताजनार्दन हे दैवत

परंतु माझ्यातील दोष तुम्ही टाळा. संयम, कला, शास्त्रीय दृष्टी, अभ्यास अधिक आणा. तुम्ही मोठे व्हा, मराठी सारस्वताचे अलंकार व्हा. परंतु तुमच्या कलेचे दैवत जनता-जनार्दन असो. लोकमान्यांनी गीतारहस्य 'श्रीशाय जनतात्मने' जनहृदयातील परमेश्वराला अर्पण केले आहे. जनतारूपी परमात्म्यासाठी त्यांचे ज्ञान होते. कलासुद्धा कशाचे तरी प्रतीक असते. कला कलातीत वस्तूकडे नेते. सायंकाळचे रंग अनंत भावनांची प्रतीके असतात. सायंकाळच्या छाया पाहताच रवींद्रनाथांना मृत्यू आठवे. सारी सृष्टीच प्रतीकात्मक आहे. म्हणून तुमची साहित्यिक कलाही कशाचे तरी प्रतीकच असणार. हे प्रतीक जनता असो.

माझ्याजवळ सांगायला अधिक नाही. साध्या गोष्टी मी सांगितल्या आहेत. कलेचा ऊहापोह, आनंदमीमांसा, निर्विकल्प-सविकल्प समाध्या यांत मी कधी बुड्या मारल्या नाहीत. आणि ज्याचा अनुभव नाही ते सहसा मी बोलत नाहीत. तुम्ही मला हट्टाने येथे आणले. माझ्याजवळचे प्रेमाने, आपुलकीने मी देत आहे, ते घ्या; पराक्रमी, पुरुषार्थशाली व्हा. मराठी साहित्य सर्वंकष करा. मराठी साहित्याचा विजय असो. महाराष्ट्राचा, भारताचा भविष्यकाळ उज्ज्वल बनवणारे होवो !

+++

साने गुरुजी लिखित अनमोल ग्रंथसंपदा

अध्यापन कार्य, समाजसेवा, स्वातंत्र्ययुध्द अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे 'साने गुरुजी!' मातृभूमीच्या सेवेसाठी नोकरीचा राजीनामा देऊन स्वातंत्र्यसमरात त्यांनी स्वत:ला झोकून दिले आणि अखेरच्या श्वासापर्यंत जनतेच्या सुखासाठी झटत राहिले. समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, एकता निर्माण व्हावी, शेतकरी-कामकरी वर्गाचे दैन्य-दारिद्र्य दूर व्हावे व सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी या हेतूने ते सर्वत्र जनजागृती करत राहिले. लहान मुले, स्त्रिया, तरुण, दीन-दलित यांना स्वत्त्वाची जाणीव व्हावी व उत्तमोत्तम विचारांची देणगी मिळावी यासाठी अत्यंत संस्कारक्षम असे साहित्य त्यांनी निर्माण केले.

आज साने गुरुजींसारखे उदात्त व्यक्तिमत्त्व आपल्यामध्ये नसले तरीही त्यांचा हा साहित्यरूपी अनमोल ठेवा आपल्याकडे आहे. अत्यंत सोप्या भाषेतील या बोधप्रद कथा, वैचारिक लेख, इतर भाषांमधील महान लेखकांचे अनुवादित साहित्य घरोघरी पोहोचावे या हेतूने साने गुरुजींची सर्व पुस्तके एकूण ५१ खंडामध्ये आम्ही आपणासमोर सादर करीत आहोत. महाराष्ट्रातील प्रत्येक घर गुरुजींच्या विचारांनी पावन व्हावे, हीच एकमेव इच्छा !

सोनसाखळी व इतर कथा

₹ 200

200029

रिया पब्लिकेशन्स

e mail : riyapublications@gmail.com